


नक्षत्रवृक्ष

उपासनेकडून पर्यावरण संतुलनाकडे..

प्रा. क्षितिज पाटुकले

अनुक्रमणिका

प्रस्तावना

माणूस हे एक वासनाबीज आहे आणि हे बीज माणसाचा प्रपंचवृक्ष फुलवत असत. नक्षत्रं ही वासनाबीजासारखी आहेत. न क्षरति तद् नक्षत्रम्! याचा अर्थच असा की नक्षत्रांची एक वृत्ती आहे. नक्षत्रांचा एक गुण आहे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ते पूर्वजन्मसंस्कारातून आलेले एक वासनाबीज आहे.

पृथ्वी, तेजस् आणि प्राज्ञ अशा ॐकाराच्या त्रिमात्रा आहेत. या त्रिमात्रांना अनुसरून द्यावा, पृथ्वी अणि अंतरिक्ष असे पृथ्वीचे वातावरणातील म्हणा किंवा अवकाशातील म्हणा, तीन स्तर आहेत. माणूस पृथ्वीवर जन्म घेतो आणि मरतो. माणसाचा प्राण गेला की, त्याचे मन वायुरूपाच्या अवस्थेत जीवात्म्याच्या पंचेंद्रियांच्या समूहाला बरोबर घेऊन अंतरिक्षात नक्षत्रलोकात जाते. नक्षत्रलोक म्हणजे अनंत जीवात्म्यांच्या वासनाबीजांचे स्टोअरेजच होय.

उत्पत्ति, स्थिती, आणि लय अशा तिन्ही अवस्थांतून जग जात असत. या अवस्थांना पहाणारा एक साक्षी असतो आणि हा साक्षी अक्षर असतो. आणि या अवस्थांमध्ये अडकून राहणारा अर्थातच उपाधीत अडकून राहणारा जीव क्षर पुरूष समजला जातो. क्षर आणि अक्षर अशा दोन पुरूषांविषयी गीतेमध्ये उल्लेख आहे. पृथ्वी हा एक 'भोग' आणि हा साधासुधा भोग नसून हा एक 'त्रिगुणात्मक' असा भोग आहे. प्रकृती म्हणजेच पृथ्वी आणि ही पृथ्वी सत्व, रज, आणि तम अशा त्रिगुणांची आहे. या त्रिगुणांचीसुद्धा परत अति सूक्ष्म अशा त्रिगुणांची विभागणी केली जाते किंवा होत असते. उदा. सत्वातला सत्व, सत्वातला रज आणि सत्वातला तम, रजातला सत्व, रजातला रज आणि रजातला तम आणि तमातला सत्व, तमातला रज आणि तमातला तम. अधिक स्पष्ट करायचं झालं तर, मौनातील निर्विचार अवस्था म्हणजे मौनाचा सत्वगुण. या मौनातील कामक्रोधजन्य विचार म्हणजे मौनातील रजोगुणाची अवस्था, आणि मौनात असूनही हातवारे करून कामक्रोधाची अभिव्यक्ती करणं हा मौनाचा तमोगुण होय. आणखी आध्यात्मिक साधनेच्या अंतर्गत स्पष्ट करायचं झालं तर, वैखरीतला 'ॐकार' हा तमोगुण, पश्यंतीतला ॐकार हा रजोगुण आणि ॐकाराची परेकडे नेणारी प्रणवावस्था म्हणजे सत्वगुण समजावं लागेल.

वरील त्रिगुणांचा सर्व ऊहापोह आम्ही याचसाठी केला आहे की, नक्षत्रांच्या त्रिगुणात्मक भावाच्या मुळाशी आपणा सर्वांस जाता यावे.

देव हेसुद्धा त्रिगुणांनी बांधलेले आहेत. रूद्रावतार हा शंकराचा तमोगुणात्मक आविष्कार आहे. अर्थातच हा सत्वगुणातील तमोगुण होय! सांगण्याचे तात्पर्य इतकेच की, देव त्रिगुणात्मक स्वरूपातील अवतार घेत असतात. तर भक्त त्रिगुणात्मक अशा संसारात जन्ममृत्यूच्या फेऱ्यात अडकत असतात. थोडक्यात देवसुद्धा नक्षत्रलोकांतच वास करत असतात. हे सूज्ञ माणसाला सांगण्याची आवश्यकता नाही. अंतरिक्षातील विशिष्ट अशा नक्षत्रलोकांतच देवाचे किंवा इंद्राचे राज्य पहायला मिळतं. फक्त देव हे युगांतराच्या पार्श्वभूमीवर अवतार घेतात तर जीव हा अनंत जन्म घेत पृथ्वीवर यातना भोगत असतो!

नक्षत्रं ही माणसाची डेस्टिनी आहे. ही डेस्टिनी जन्म आणि मृत्यु या सदरात मोडते. अर्थात कोणत्या आईबाबांच्या पोटी किंवा कोणत्या बीजापोटी माणसाला जन्माला घालायचे हे नक्षत्रंच ठरवतात आणि शेवटी माणसाचा मृत्यु कशात आहे किंवा तो कसा घडवायचा हे नक्षत्रचं ठरवत असतात. जीव हा

जन्मजन्मांतरीचा भोग आहे. अर्थात हा भोग भोगूनच संपवायला लागतो. मनुष्यजन्म हा दुर्मिळ आहे. या मनुष्यजन्मातच फक्त आध्यात्मिक साधनेनं म्हणा किंवा गीतातत्वाचा अभ्यास करून म्हणा, जन्मजन्मांतरीचे वासनाबीज पूर्णपणे जाळून टाकून नक्षत्रलोकातील उच्च अशा लोकांत प्रवेश मिळवता येतो.

मनुष्याचा चालू जन्म हा एक भात्यातील सुटलेला बाण आहे. या बाणाची गती किंवा चालू जन्मातील देहप्रारब्धाची गती थांबवता येत नाही. अर्थातच प्राप्त जन्मातील देहाचे भोग हे भोगून संपवायला लागतात. परंतु माणसाच्या पाठीवर एक अदृश्य भाता आहे. या भात्यात संचित आणि क्रियमाणरूपी कर्मांचे न सुटलेले बाण शिल्लक असतात. हे बाण ज्ञानाग्नीच्या योगाने जाळून टाकता येतात आणि हे फक्त मनुष्यजन्मातच शक्य होतं असतं

ज्ञानाग्निचेनि मुखे। जेणे जाळिती कर्मे अशेखे।
तो परब्रह्मचि मनुष्य वेखे। वोळख तू।।

– ज्ञानदेव

नक्षत्रांना शपथ, शाप आणि वरदान यांची पार्श्वभूमी लाभलेली असते. काही नक्षत्रांवर शापवाणी उद्गारली गेली आहे. तर काही नक्षत्रांवर अनेकांना वरदान प्राप्ती झाली आहे. काही नक्षत्रांवर कर्तव्य निभावण्याच्या हेतूने शपथा घेतल्या गेल्या आहेत. अशा तऱ्हेने नक्षत्रांचा शपथ, शाप आणि वरदान इ. माध्यमातील पूर्वेतिहासातून नक्षत्रांचे गुणधर्म ठरवले गेले आहेत.

माणसाच्या मनाचा अहंकार हा मोठा सवंगडी आहे. माणसाचा अहंकार सत्व, रज किंवा तमात्मक गुणधर्माचा असतो. आणि हा अहंकार शाप, शपथ आणि वरदान इ. माध्यमातून माणसाचा किंवा जीवात्म्याचा विचित्र प्रारब्ध संचय करत असतो. माणसाच्या जीवनातील कोणत्याही गुणाचा पराकोटीचा अभिनिवेश शाप देतो किंवा घेतो, तसेच शपथा घेतो किंवा कोणाचे आशिर्वाद किंवा वरदानही देतो किंवा घेतो. शपथ आणि शाप तसेच शाप आणि वरदान या एकाच नाण्याचा दोन बाजू आहेत. भीष्माची प्रतिज्ञा किंवा शपथ शेवटी त्याला शापासारखीच ठरली. तसेच देवराक्षसांची शापवरदानांची किंवा उ:शापांची आश्चर्यजनक पार्श्वभूमी जगाला मोठा भोग देऊन गेली आहे.

एवंच काय, न क्षरति तद् नक्षत्रम्। याचा अर्थ असाही आहे की, नक्षत्र ही अंतरिक्षातील एक हार्डडिस्क आहे आणि या हार्डडिस्कमध्ये अनेकांच्या अटळ अशा विधिलिखितांची कायमस्वरूपी नोंद केलेली असते. विधिलिखित म्हणजे जन्मजन्मांतरीचे ऋणानुबंधच होत. जीव ज्यावेळी जन्माला येतो त्यावेळच्या स्थल, काल आणि परिस्थितीनुसार तात्काल त्याच्या विधीलिखितातील विशिष्ट ऋणानुबंधातील गटाशी संबंधित वस्तू आणि व्यक्तिही हजर राहण्याची व्यवस्था नियती करत असते. यालाच 'गोष्ट जन्मांतरीची' ' असे म्हणतात. आणि हे गोष्ट जन्मांतरीचे नाटकच नक्षत्रे या विश्वमंचावर सादर करतात. आणि या नाटकातूनच नामरूपकुळवर्णादी माध्यमातून प्रकट होणारे तसेच शत्रुमित्रता, यशापकर्ष, आपत्तीविपत्ती आणि घातअपघातादी गोष्टींच्या मुळाशी असणारे प्रारब्ध गणित म्हणा किंवा शाप, शपथ आणि वरदान पार्श्वभूमीतून उलगडत जाणारे पूर्वजन्मातील धक्कादायक संदर्भ म्हणा, माणसाचे जीवननाट्य सुखपर्यवसायी किंवा शोकांतिका स्वरूपात सादर होत असतं.

पृथ्वीवर दिक्पालांचे एक प्रशासन कार्य करत आते. दिक्पाल हेसुद्धा नियतीचे घटकच होत आणि नियती ही नक्षत्रांच्या आधिपत्याखाली कार्य करते. काळ आणि नियती यांची विचित्र गुंफण माणसाच्या कर्मगतीचा प्रवाह किंवा कर्मगतीची वाटचाल नियंत्रित करत असते. देश, काल आणि परिस्थिती यांचा प्रकृतिबंध किंवा एकूणच प्रारब्ध गणिताचा एक प्रकारचा सातबाराच दिक्पालांच्या हाती असतो. अनेक

जीवांचा पृथ्वीवरील वावर हा दिक्पालांच्या अदृश्य अशा परवानगीतूनच होत असतो. दिक्पाल हे पंचमहाभूतांच्याही संपर्कात राहून निसर्गनियमांचे नीट पालन होत आहे की नाही याची दक्षता घेत असतात. जीवात्म्यांचे कोणतेही अतिक्रमण किंवा प्रमाद दिक्पालांकडून सहन केले जात नसतात. किंबहुना अशा अपराधांची परिसीमा झाल्यास दिक्पाल पंचमहाभूतांच्या साहाय्याने पृथ्वीवर मोठे उत्पात घडवत असतात. अर्थातच हे उत्पात वैयक्तिक प्रारब्धानुसार किंवा अनेकवेळा सामूहिक प्रारब्धानुसार झालेले पाहायला मिळतात.

पृथ्वीवर वृक्ष, वनस्पती आणि अमृतास्मान औषधी आधी निर्माण झाल्या. पंचपल्लव ही वृक्षसंकल्पना ब्रह्मदेवाच्या आदिसंकल्पाशी संबंधित आहे. चमहाभूतांच्या दिव्य स्वरूपातील समन्वयातून पंचपल्लवांचे भरणपोषण झालं आहे. पिंपळ, उंबर, अंजीर, ांबा व वड हे पंचपल्लव धार्मिक आणि मांगलिक कार्यासाठी उपयुक्त मानले गेले आहेत. घटात किंवा कलशात पंचपल्लव घालून निसर्गधारणेच्या मुळाशी असलेल्या पंचमहाभूतांची प्रतिकात्मक अशी पूजा केली जाते. यजमान दंपतीवर पंचपल्लवांनी अभिसिंचनसुद्धा केले जात असते.

वृक्ष आणि नक्षत्रं यांचा फार जवळचा संबंध आहे. पंचपल्लवातील वड, पिंपल आणि उंबर हे वृक्ष नक्षत्रलोकाशी संबंधित आहेत. किंबहुना हे तीन वृक्ष म्हणजे पृथ्वीवरील जीवसृष्टीचा मूलस्त्रोतच होत. नक्षत्रवृक्ष ही संकल्पनाच आध्यात्मिक आहे. दत्तभक्त श्री. क्षितीज पाटुकले यांनी नक्षत्रवृक्ष या प्रस्तुत ग्रंथाच्या माध्यमातून ब्रह्मदेवाच्या आदिसंकल्पाशीच जवळीक साधण्याचा प्रयत्न केला आहे. अक्कलकोट स्वामी समर्थांनी भक्तांना वडाचे मूळ धरून राहण्याविषयी सांगितले आहे. विश्वाच्या महासंगणकातील एक हार्ड ड्राईव्ह {HARD DRIVE} या स्वरूपातच वडाच्या मुळाकडे पहायला पाहिजे. वड, पिंपल आणि औदुंबर या महावृक्षांनी विश्वनिर्मितीच्या क्षणापासूनच्या स्मृती जतन केलेल्या असतात. त्यामुळे हे वृक्ष त्यांच्या छायेत आलेल्या माणसांचे अनंत जन्म वाचू शकतात आणि त्यामुळेच हे वृक्ष त्यांच्या छायेत आलेल्या माणसांचे प्रारब्धदोष धुवून काढू शकतात. नृसिंह सरस्वती महाराजांनी औदुंबर वृक्षाच्या तळीच प्रारब्धातील हिसाबकिताब पूर्ण करत अनेक भक्तांची पिशाच्चबाधा वा संबंधपिडा घालवली आहे. वृक्षाराधना केल्यावर माणसांतील शुद्ध सत्व जागृत होत असतं. निसर्गामध्ये देणंघेणं काहीच नसतं. वृक्षाराधना करून आपण निसर्गाचं अर्थातच पंचमहाभूतांचे ऋण एका वेगळ्या पद्धतीने फेडत असतो. त्याचच त्याला अर्पण करायचं असतं. शेवटी पाणीही त्याचच त्याला आणि अन्नाने पोषण केलेला हा देहही त्याचाच त्याला अर्पण करायचा असतो.

परोपकारार्थं इदं शरीरम्। ईश चिंतनार्थ इदं मनः।
विवेकार्यं इदं बुद्धि। ब्रह्मज्ञानार्थ जीवनम्।।
– स्वामी दत्तावधुत

शेवटी स्वामीजींच्या वरील अवतरणाप्रमाणे जीवनाविषयी शुद्ध भाव ठेवल्यास, त्यांच्या म्हणण्या–प्रमाणे विश्व आध्यात्मिक होऊन, ते शांतीने पूर्ण भरून जाईल आणि मग भक्ती ज्ञान आणि प्रेमयुक्त अशा प्रार्थनेतून शरणागत होऊन, प्रत्येक माणूस पृथ्वीवरील अमृततत्त्वाचा स्पर्श अनुभवून हनुमानासारखा चिरंजीव होईल.

।। इति समाप्ती ।।

– श्रीराम म. भट
प्रख्यात ज्योतिष अभ्यासक

नक्षत्र आणि नक्षत्रवृक्ष

आकाशात सहस्त्रावधी तारे लुकलुकत असतात. या सर्वांचा आणि संपूर्ण ब्रह्मांडाचा प्रकाशक तेजोनिधी 'सूर्य' हा आहे. अनिमिष नेत्रांनी विश्वाचे अवलोकन करणाऱ्या तारका म्हणजे केवळ तारका नव्हेत तर त्यांचा सखा जो चंद्र त्याच्या त्या सख्या आहेत. सूर्य, चंद्र, तारका, इतर ग्रह या सर्वांसह मनुष्य, पशु–पक्षी, झाडे, वेली इ. चर व अचर वस्तू म्हणजे या संपूर्ण ब्रह्मांडाचा भाग आहे.

भारतीय संस्कृतीचा या विश्वाकडे, या ब्रह्मांडाकडे पाहण्याचा दृष्टीकोन अतिशय वेगळा, भव्य आणि उदात्त आहे. आपल्या ऋषी–मुनिंनी या चराचर विश्वातील, निसर्गातील, ब्रह्मांडातील मनुष्यप्राणी हा एक जबाबदार घटक मानून साऱ्या विश्वाला आपल्या ज्ञानाने व तत्त्वज्ञानाने मार्गदर्शन केले. मात्र बुद्धिमत्तेचे वरदान लाभले आहे म्हणून या सृष्टीवर आपलाच अधिकार आहे अशा तोऱ्यात वावरणारा आजचा माणूस आणि याउलट निसर्गाशी संतुलन राखूनच स्वत:चा योग्य विकास करावा, असे मानणारी आपली संस्कृती पहाता मन विचारात पडते. ज्या विश्वात आपण राहतो, त्या विश्वातील ग्रह, तारे, नक्षत्रे, निसर्ग या सर्वांचा आपल्या व्यक्तिमत्वावर, स्वभावावर प्रभाव पडतो. याचा आपल्या ऋषी–मुनींनी अतिशय साकल्याने, सूक्ष्मपणे विचार केला व त्याचे शास्त्र बनविले. प्राचीन काळच्या ज्ञानाच्या संरक्षणाच्या पद्धतीनुसार या अत्यंत शास्त्रीय ज्ञानाशी त्यांनी थोडीशी धार्मिकता जोडली. यामागे उद्देश होता तो धर्माच्या भीतीने का असेना, लोक याचे पालन करतील!

ज्योतिषशास्त्र म्हणजे थोडेसे गूढ, धार्मिक पण तरीही ग्रह–तारे–नक्षत्रांची अचूक माहिती देणारे एक शास्त्र आहे. ज्या ग्रह–ताऱ्यांच्या छायेत आपण राहतो त्यांचा आपल्यावर, निसर्गावर आणि या तरू–वेलींवर प्रभाव पडतो, या गृहीतकावर आधारलेले हे शास्त्र आहे.

मनुष्य जेंव्हा जन्माला येतो तेव्हा आकाशातील ग्रह–ताऱ्यांची जशी स्थिती असते त्यावरून माणसांची राशी निश्चित होते. या राशीमधलाच महत्वपूर्ण असा घटक म्हणजे नक्षत्र. नक्षत्रांचा समूह म्हणजेच राशी. या नक्षत्रांवर अधिपत्य असणारा नक्षत्राचा स्वामी असतो तसेच त्या नक्षत्राची एक देवतादेखील असते. नक्षत्रांचा स्वामी हा सूर्यमालेतील एखादा ग्रह असतो तर त्याची देवता ही एखादी देवता म्हणून वेदात ज्यांचे वर्णन येते, त्यापैकी एखादी असते. उदा. अश्विनी, यम, निऋती, अग्नी इ.

प्राचीन भारतीय हिंदू कालगणना चंद्र भ्रमणावर आधारित आहे. कोणत्याही रात्री आकाशात चंद्राकडे पाहिले असता असे लक्षात येते, की तारे आपापल्या जागांवर स्थिर आहेत आणि चंद्र पुढे मार्गक्रमण करत आहे. जर आपण गांभीर्याने काही महिने रात्री आकाशाचे नीट निरीक्षण केले तर असे दिसून येईल, की जवळपास २७ दिवसांमध्ये सर्व तारकासमूहामधून चंद्राची एक फेरी पूर्ण होते. आज ज्या तारकासमूहात चंद्र आहे तेथे तो पुन्हा सत्तावीस दिवसानंतर दिसून येतो. चंद्राची पृथ्वीभोवतीची एक प्रदक्षिणा २७ दिवस आणि ८ तासांमध्ये पूर्ण होते. चंद्राच्या या प्रदक्षिणा मार्गाचे प्राचीन भारतीय ऋषिमुनींनी (प्राचीन वैज्ञानिकांनी) २७ भाग पाडले आहेत. त्यांनी या प्रत्येक भागामध्ये असणाऱ्या विशिष्ट तारकांचा एक समूह तयार केला आणि त्या विशिष्ट तारकांच्या आकारावरून त्या

तारकासमूहाला एक विशिष्ट नाव दिले. त्या तारकासमूहाच्या भागालाच नक्षत्र असे म्हटले जाते. नक्षत्र याचा अर्थ न चालणारा म्हणजे स्थिर, एकाच ठिकाणी राहणारा, असा आहे. ही नक्षत्रे म्हणजे चंद्राचा प्रदक्षिणा मार्ग असून तो स्थिर आहे आणि त्यामधून चंद्र देव भ्रमण करीत असतात, अशी ही नक्षत्रांची कल्पना आहे. त्याही पुढे जाऊन चंद्र हा प्रियकर आणि २७ नक्षत्रे म्हणजे त्याच्या २७ सख्या आहेत. रोज प्रत्येक सखीला भेटून, तिच्या सहवासात राहून दुसऱ्या दिवशी पुढे जाणारा हा अनोखा प्रियकर, अशी ही अद्‌भुत रोमांचकारी कल्पना पौराणिक कथांमधून मांडण्यात आलेली आहे.

नक्षत्रांची व्याख्या ही खरेतर ग्रहांची स्थिती निश्चित करण्यासाठी केली गेली आहे. भारतीय मान्यतेनुसार संपूर्ण सूर्यमंडलामध्ये सूर्य, चंद्र, ग्रह, तारे इ. सर्व एकाच कुटुंबाचे सदस्य आहेत. मात्र सूर्य, चंद्र, ग्रह हे पृथ्वीच्या जवळ असल्याने त्यांची आकाशातील स्थिती (जागा) सतत बदलत असते. मात्र नक्षत्रे आणि तारकासमूह हे पृथ्वीपासून खूप दूर असल्याने त्यांची स्थिती फारशी बदलत नाही. म्हणूनच या तारकासमुहांना नक्षत्र असे म्हटले गेले आहे. चंद्राची एक पृथ्वी प्रदक्षिणा ३६० अंशातून होते. एका नक्षत्रामध्ये तो सुमारे १३ अंश एवढी प्रदक्षिणा पूर्ण करतो. पृथ्वीवरून आकाशामध्ये पाहिले असता सर्व ग्रहांचा प्रवास कमीअधिक प्रमाणात नक्षत्रांजवळूनच होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे कोणत्याही ग्रहाचे वर्णन करताना यावेळी हा ग्रह या नक्षत्रामध्ये आहे किंवा या दिवशी विशिष्ट वेळी तो या विशिष्ट नक्षत्रामध्ये असेल असे वर्णन केले जाते. भारतातील महिन्यांची नावे ही या नक्षत्रांच्या नावावरून दिली गेली आहेत. भारतात हजारो वर्षांपासून प्रचलित असणाऱ्या पंचांगामध्ये प्रत्येक दिवसाचे पंचांग दिलेले असते. याच पंचांगामध्ये 'अवकहडा' चक्र दिलेले असते. यामध्ये कोणताही विषय फक्त सूत्ररूपाने किंवा आद्याक्षरांवरून जाणून घ्यावा अशी कल्पना आहे. जसे ताकावरून ताकभात किंवा शितावरून भाताची परिक्षा असे म्हटले जाते. या 'अवकहडा ' चक्रावरून नक्षत्र, नाडी, गण, आराध्यवृक्ष, दान, देवता, तत्व, अक्षरे इ. अनेक गोष्टी सांगितल्या जातात. पंचांगातील या चक्राला 'अवकहडा ' असे नाव पहिल्या चार राशिंमधील नक्षत्रांची चरणाक्षरे एकत्र करून देण्यात आले आहे. पूर्वी ही सर्व माहिती वर्तुळाकार चक्राकृतीत दिली जात असे. आता ती उभ्या आडव्या रकान्यांमध्ये टेबलाच्या स्वरूपात दिली जाते. (परिशिष्ट ७ पहा) त्या नक्षत्रांदरम्यानच्या वातावरणीय बदलांवरून तसेच काही पौराणिक कथांवरूनही नक्षत्रांची नावे ठरविण्यात आली आहेत. प्रत्येक नक्षत्रातील तारकासमूहातील ताऱ्यांची संख्या वेगवेगळी आहे. काही नक्षत्रांमध्ये एकच तारा आहे तर काही नक्षत्रांमध्ये तीन तारे, नऊ तारे किंवा त्याहूनही जास्त तारे आहेत. त्यातील काही तारे खूपच तेजस्वी किंवा खूपच अंधुक आहेत.

चंद्रभ्रमणाबरोबरच सूर्याचेही नक्षत्रांबरोबर एक मनस्वी नाते आहे. चंद्र आणि त्याच्या सख्यांच्या मनमोहक खेळाचा तटस्थ तरीही भावुक साक्षीदार म्हणून सूर्य आपली जबाबदारी डोळ्यात तेल घालून पार पाडत असतो! प्रत्येक नक्षत्रामध्ये सूर्य १५ दिवस असतो. सूर्य ज्या नक्षत्राजवळून उगवतो, ते नक्षत्र सुरू आहे असे म्हणण्याची प्रथा आहे. ते नक्षत्र सूर्याबरोबर उगवते आणि सूर्यास्ताच्या वेळी मावळते. एका नक्षत्राचे आकाशातील कार्यक्षेत्र १३ अंशाचे असते. त्याचेही चार उपविभाग केलेले असून त्यांना त्या त्या नक्षत्राचे चरण असे म्हटले जाते. चंद्राचे आणि सूर्याचे प्रदक्षिणा मार्ग एकमेकांच्या जवळून जातात. नक्षत्रे चंद्राच्या प्रदक्षिणामार्गावर आणि राशी सूर्याच्या प्रदक्षिणामार्गावर वस्ती करून आहेत असे मानले जाते. एकूण नक्षत्रे २७ आणि राशी १२ मानल्या गेल्या आहेत. सुमारे सव्वा दोन नक्षत्रांची मिळून एक रास तयार होते. नक्षत्र आणि राशी या ज्योतिषशास्त्राच्या अविभाज्य

भाग आहेत. प्रत्येक व्यक्तिंची जन्मावेळेची तिथी, वेळ, जन्म स्थळ, त्याचे अक्षांश यांचा एकमेकांशी असलेल्या संबंधाचा मनोज्ञ मेळ घालून नक्षत्र ठरविले जाते आणि अशा सव्वा दोन नक्षत्रांमधील परिभ्रमणामधून राशी ठरविली जाते. म्हणूनच जन्माच्या वेळी आकाशामध्ये असलेले ग्रहमंडळ, नक्षत्रे आणि राशी याचे ज्योतिषशास्त्रामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे.

जन्माच्या वेळी चंद्र ज्या नक्षत्रामध्ये आहे ते त्या व्यक्तिंचे जन्म नक्षत्र आहे असे मानले जाते. एखाद्या व्यक्तिचा जन्म झाला त्यावेळी जर चंद्र रोहिणी नक्षत्रांमध्ये असेल, तर त्याचे जन्म नक्षत्र रोहिणी आहे असे मानले जाते. प्रत्येक नक्षत्रामध्ये म्हणजे तारकासमूहामध्ये एक विशिष्ट दैवी शक्ती वास करत असते, अशी प्राचीन ऋषिमुनींची धारणा होती. या देवतांचे स्वरूप स्थळ आणि काळाच्या पलिकडचे आहे. संपूर्ण विश्वाचे संचलन एका विशिष्ट नियंत्रित आणि नियमबद्ध पद्धतीने होते. त्यालाच ऋत असे म्हटले जाते. हे संचलन निर्मिती, विकास आणि विनाश अशा विविध स्तरावर अनादी अनंत काळापासून निरंतर सुरू आहे, असे मानलेले आहे. त्या विश्वचालकाच्या म्हणजे ऋताच्या ज्या विविध प्रकारच्या शक्ती आहेत, त्यांनाच देवता असे म्हटले जाते. यामध्ये निर्मितीपासून संहारापर्यंत अनंत प्रकारच्या शक्ती आहेत. त्या प्रत्येक शक्तिला देवता मानले गेले आहे. त्यामध्ये सुष्ट आणि दुष्ट अशा दोन्ही प्रकारच्या शक्तिंचा समावेश होतो. देवतांचे विविध प्रकार आणि कार्ये वर्णन केलेली आहेत. गावाच्या रक्षणासाठी ग्रामदेवता, कुळाच्या रक्षणासाठी कुलदेवता, शेतीच्या रक्षणासाठी कृषिदेवता, वनाच्या रक्षणासाठी वनदेवता, वास्तुच्या रक्षणासाठी वास्तुदेवता, न्यायाच्या रक्षणासाठी न्यायदेवता, मृत्युची देवता मृत्युदेवता अशाच प्रकारे संपूर्ण विश्वाच्या आणि एकूणच ब्रह्मांडाच्या कल्याणासाठी प्रत्येक नक्षत्रामध्ये एक दैवी चेतना म्हणजेच देवता कार्यरत असते अशी कल्पना ज्योतिषशास्त्रामध्ये मान्य केली गेली आहे. प्रत्येक नक्षत्राच्या अशा आराध्य देवतेचे ध्यान आणि उपासना केली असता ऐहिक, पारलौकिक आणि पारमार्थिक कल्याण होते अशी श्रद्धा आणि अनुभव आहेत.

पृथ्वी आणि पृथ्वीभोवतीचे आकाश यांच्यावरील भागात द्यु लोक आहे. तेथे या देवता वास करून असतात. त्यांच्या योगावर जन्म घेतलेल्या प्रत्येक मनुष्यप्राण्यावर त्यांचे बारीक लक्ष असते. जणू मातेच्या ममतेने पण अदृश्यपणे त्या त्याची काळजी घेत असतात. या शक्तिंमध्ये कर्तृत्व, सामर्थ्य, उदारता, दानशूरता अशा विविध दैवी गुणांचा समुच्चय असतो. अशी शक्ती म्हणजे देवता अंशात्मकरित्या मनुष्यप्राण्यावर सतत कृपा करीत असतात. अशा देवतांची उपासना केली असता, त्यांचे ध्यान व प्रार्थना केली असता, श्रद्धा आणि भक्तिभावाने त्यांचे चिंतन, मानसपूजा केली असता, त्यांच्या मंत्राचा, नामाचा जप केला असता, त्यांच्या गुणांचे आचरण केले असता त्या प्रसन्न होतात आणि आपल्या कृपेचा वर्षाव करतात. अशी ही नक्षत्र देवतांविषयीची मूळ कल्पना आहे.

याचाच पुढचा भाग म्हणजे नक्षत्रवृक्ष. आकाशामध्ये द्युलोकांमध्ये विविध तारकासमूहांच्या स्वरूपामध्ये रहात असणाऱ्या या नक्षत्र देवतांनी सर्वांचे कल्याण व्हावे म्हणून विविध वृक्षांच्या रूपामध्ये पृथ्वीवर जन्म घेतलेला आहे. अशा प्रकारे ऋषिमुनींनी नक्षत्रांचा वृक्षांशी संबंध जोडलेला आहे. प्रत्येक नक्षत्रासाठी त्यांनी एका आराध्यवृक्षाची योजना केली असून त्या वृक्षामध्ये त्या नक्षत्राची देवता अंश रूपाने वास करत असून त्या नक्षत्राचे चैतन्यरूपी अस्तित्व त्या वृक्षामध्ये असते, असे अनुभवांती प्रतिपादित केले आहे. त्यामुळे नक्षत्राच्या आराध्यवृक्षाची उपासना केली असता त्या नक्षत्राची आणि नक्षत्रदेवतेची पूजा केली जाते आणि ते नक्षत्र प्रसन्न होते आणि उपासकावर भरभरून

कृपा करते असा विश्वास आहे. ही नक्षत्रे मनुष्यजीवनावर आपला प्रभाव पाडत असतात. त्यामुळेच रत्नशास्त्रात या नक्षत्रांवरून वा राशिच्या स्वामीवरून एखादे रत्न धारण करण्याचा सल्ला दिला जातो. रत्नांमध्ये या ग्रह–ताऱ्यांना / नक्षत्रांना आकर्षित करण्याची शक्ती असते तशीच शक्ती वृक्षांमध्येही असते. शेवटी वृक्ष काय किंवा रत्ने काय, एकाच भूमीच्या उदरातून बाहेर पडतात. त्याच भूमीतील अन्नद्रव्ये, पोषकद्रव्ये शोषून घेऊन ते ते गुणधर्म त्यांच्यामध्ये तयार होतात. जी खनिजे (minerals) रत्नांमध्ये सूक्ष्म प्रमाणात असतात, तीच वृक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात सापडतात. जसे प्रत्येक नक्षत्राच्या स्वामीचे एखादे विशिष्ट रत्न असते, तद्वतच त्यांचा एखादा विशिष्ट वृक्ष देखील असतो. त्या वृक्षांमधून बाहेर पडणाऱ्या उत्सर्जनादी क्रियांद्वारे वेगवेगळे वायू वातावरणात पसरत असतात. प्रत्येक वृक्षाच्या प्रकृतिनुसार हे स्वरूप बदलत असते. नक्षत्राधिपती देवतेस वा स्वामीस प्रिय असणाऱ्या वृक्षांचे जतन व संवर्धन केल्यास त्या स्वामीच्या वा देवतेच्या अधिपत्याखालील मनुष्यास त्याचा चांगला उपयोग होवू शकतो. ही प्राथमिक संकल्पना नक्षत्रवृक्ष उपासना पद्धतीमागे आहे.

ज्या नक्षत्रावर व्यक्तिचा जन्म होतो त्याचा त्याच्या जीवनावर, व्यक्तिमत्वावर, आरोग्यावर, कार्यावर, स्वभावावर, जीवनशैलीवर अभूतपूर्व असा ठसा उमटलेला असतो. आकाशात जाऊन नक्षत्रांची पूजा करणे शक्य नाही. म्हणून नक्षत्ररूपी नक्षत्रवृक्षाची उपासना करणे हा अनुभवसिद्ध मार्ग प्राचीन ऋषिमुनिंनी सांगून ठेवला आहे. आपल्या नक्षत्रवृक्षाचे पालन, पोषण आणि संरक्षण केल्याने सर्व प्रकारचे कल्याण होते हे सांगतानाच या ऋषिमुनिंनी या आपल्या आराध्यवृक्षांची हानी केली, तोडली, नष्ट केली तर त्याचा सर्वनाश होतो हेही बजावले आहे.

प्राचीन भारतामध्ये आजारांवर उपचार करणाऱ्या आयुर्वेदिक वैद्यांना ज्योतिषशास्त्राचेही ज्ञान होते. आजारी व्यक्तिंची माहिती घेत असताना (केस पेपर तयार करताना) ते त्यांचे जन्मनक्षत्र, रास यांचीही माहिती घेत असत. त्याकाळी वैद्य कोणत्याही रोग्याला त्याच्या नक्षत्रावरील आराध्य–वृक्षापासून बनविलेले औषध देत नसत. याचबरोबर बरे होण्यासाठी औषधांबरोबर नक्षत्रवृक्षांची उपासना करण्याचा सल्लाही न चुकता देत असत. मनुष्यप्राण्यासह सर्व प्रकारच्या सजीवांचे संपूर्ण पालनपोषण निसर्ग करीत असतो. यामध्ये वृक्ष, लता, वेली यांचा वाटा फार मोलाचा आहे. एकूणच सजीव सृष्टीमध्ये संतुलन राखण्याचे अतिशय महत्वाचे कार्य वृक्ष आणि अरण्ये करीत असतात. नक्षत्रवृक्ष कल्पनेमध्ये एकूणच निसर्ग, वृक्ष, मानव आणि समस्त सजीवांच्या जीवनाचे संतुलन राखण्याचे एक मार्मिक सुस्पष्ट कार्य अलगदपणे गुंफलेले दिसून येते.

पुराणकाळात आपल्या पूर्वजांचा निवास हा वृक्ष आणि वेलींच्या सानिध्यात होता. आपल्या संस्कृतीचा विकास त्यातूनच झाला आहे. आजच्या आधुनिक माणसांनी प्रगती करताना आपल्या जंगलांचा नाश केला. वृक्षांशी असलेला संबंध क्रूरपणे संपवला. जडीबुट्टी तसेच वनस्पती आणि वृक्षांची ओळख व माहिती आता राहिलेली नाही. हिंदू संस्कृतीमध्ये एकूणच निसर्गस्नेही जीवनशैलीचा अंगीकार केला गेला आहे. मनुष्य हा कितीही बुद्धिमान, सामर्थ्यशाली असला तरी तो एकूण निसर्ग व्यवस्थेतील एक घटक आहे, आणि एकात्मपद्धतीचे सहजीवनच त्याच्या सर्व प्रकारच्या उन्नत्तीसाठी त्याला पोषक आहे, असा ठाम सिद्धांत या विचारधारेच्या मुळाशी आहे. त्यामुळे फक्त पृथ्वीवरील निसर्ग, वृक्ष, वेली, समुद्र, नद्या, तलाव, पर्वत एवढेच नव्हे तर अंतरिक्षातील सुर्य, चंद्र, ग्रह, तारे या सर्वांबरोबर नाते जुळवून घेऊन त्यांच्याशी संतुलन साधूनच मानवी जीवनामध्ये प्रगती करता येते आणि मानवाचा शाश्वत उत्कर्ष होतो अशी ही मूलभूत संकल्पना आहे. मात्र आज

विज्ञानाच्या आणि विकासाच्या महास्फोटामध्ये जणूकाही निसर्ग आणि पृथ्वी म्हणजे आमची शत्रू आहे आणि तिच्यावर आपल्याला विजय मिळवायचा आहे हीच विचारधारा अधिक दिसते. ज्यामुळे माणूस सोडून इतरांना पृथ्वीवर जगण्याचा अधिकारच नाही, अशा वृत्तीतून आजचा प्रगत माणूस नैसर्गिक संसाधनांचे अमानुष लचके तोडताना दिसतो आहे, त्याचाच परिणाम म्हणून आज तो सर्वनाशाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचला आहे. निसर्गप्रेमी, पर्यावरण स्नेही, सृष्टीची काळजी घेणारी विचारधाराच यातून आपल्याला बाहेर काढू शकते. त्यातच सर्वांचे हीत आहे, रक्षण आहे, हे आता नीट लक्षात घ्यायला हवं.

आपल्या पूर्वजांनी प्राचीन काळीच ह्या विषयाचा गहन अभ्यास करून त्याची माहिती लिहून ठेवली आहे. वृक्षांची उपयुक्तता समजावून घेऊन त्यांची कायम पूजा होईल ह्या हेतूने त्यांनी ज्योतिष आणि वृक्षमहात्म्याचे संयोजन केले आहे. शुभप्रसंगी कोणत्या वृक्षाचे रोपण शुभ, कोणत्या जन्मराशिच्या व्यक्तिने कोठल्या जातीच्या वृक्षाची लागवड केल्यास लाभ होईल त्याची माहिती ज्योतिषशास्त्रात उपलब्ध आहे. प्राचीन परंपरागत नक्षत्रवृक्ष पूजा विसरून आधुनिक काळात आपण किंमती खडे तसेच रत्न वापरण्याची सवय केली आहे.

पर्यावरणीय असंतुलन आणि त्याचे भयावह स्वरूप पाहिल्यावर आता सर्वांना वृक्षारोपणाची गरज आणि महत्व समजू लागले आहे. या परिस्थितीचा विचार करता नक्षत्रवृक्ष पूजनाची प्राचीन परंपरा पुर्नजिवित करणे ही काळाची गरज आहे. वृक्ष संवर्धनाचे सामाजिक, आर्थिक आणि प्राकृतिक महत्व आपण जाणतो. पण वृक्षांविषयीचे प्रेम, आदर आणि मानवजीवनाच्या भूमिकेचे स्वरूप आपण मन:पूर्वक समजून घेणे आवश्यक आहे. रोप लावणाऱ्याचे जन्मनक्षत्र आणि आराध्यवृक्ष किंवा रोपणाच्या दिवशी असणरे नक्षत्र आणि आराध्यवृक्ष ह्यांचा समन्वय साधून होणारे भावनापूर्ण वृक्षारोपण यशस्वी होईल, योग्य पद्धतीने सांभाळले जाईल व चिरायु होईल. ते प्रत्येक व्यक्तिच्या जीवनामध्ये अद्भुत आनंद आणि दैवी अनुभूती यांचा साक्षात्कार घडवून आणेल. श्रद्धेला समर्पणाची आणि पर्यावरण रक्षणाची जोड दिली तर स्वत:बरोबरच विश्वाचे कल्याण साधेल, यात शंका नाही.

नक्षत्रवृक्षांचे प्राचीन ग्रंथांमधील संदर्भ

चंद्राच्या प्रदक्षिणेनुसार आणि भ्रमणमार्गानुसार दैनंदिन शास्त्रांचे नियोजन ही फार प्राचीन सनातन भारतीय कल्पना आहे. सूर्यभ्रमणावर आधारित राशिचक्राची कल्पना ही पाश्चात्य जगतातील कल्पना आहे. त्यामुळे पाश्चात्यांनी सूर्यभ्रमण मार्गाचे १२ भाग करून राशी कल्पना मांडली. मात्र भारतीय शास्त्र अधिकाधिक सखोल आणि सूक्ष्मतर पातळीवरचे आहे. २७ नक्षत्रे त्यातही प्रत्येक नक्षत्रातील प्रत्येकी चार चरणांचा स्वतंत्र आणि सूक्ष्म विचार हे भारतीय शास्त्राचे वैशिष्ट्य आहे. नक्षत्र आणि नक्षत्रवृक्षांचे संदर्भ आणि उल्लेख अनेक प्राचीन भारतीय साहित्यामध्ये सापडतात. वेद, उपनिषदे, ब्राह्मणे, आरण्यके यांपासून पुराणे, ज्योतिष ग्रंथ, तांत्रिक ग्रंथ, संहिता, कर्मकाण्ड यामध्ये नक्षत्रे आणि नक्षत्रवृक्ष यांची वर्णने आढळतात. भारतीय संस्कृतीतील प्राचीन धर्मग्रंथांमध्ये ज्योतिष्याचे स्थान अव्वल दर्जाचे होते. एकूण १८ मुख्य पुराणांपैकी ९ वे पुराण हे ज्योतिषपुराण आहे. त्यामध्ये नक्षत्रांचे सविस्तर वर्णन आले आहे. चौदा विद्या आणि चौसष्ठ कला यामध्येही १४ वी विद्या ही ज्योतिषविद्या आहे. वेदांची उपांगे असणाऱ्या वेदांगातील सहावे वेदांग ज्योतिष्य हे आहे. वेदांचे अर्थ समजेनासे झाले आणि जणू काही ते लुप्त होण्याची परिस्थिती निर्माण झाली तेव्हा ज्योतिष्य या वेदांगानेच वेदांचे आणि त्याच्या अर्थाचे रक्षण केले अशी मान्यता आहे. वेदांमध्ये यज्ञांसाठी करावयाची विविध प्रकारची कर्मे दिवसाच्या विशिष्ट वेळी विशिष्ट काळापर्यंत करावीत अशी वर्णने आहेत. त्यामध्ये नक्षत्रांची स्थिती महत्वपूर्ण आहे. अर्वाचीन साहित्यातील ज्ञानेश्वरी, दासबोध, याचबरोबर गुरुचरित्रामध्येही नक्षत्र आणि वृक्ष यांचे विहंगम उल्लेख आणि दाखले आढळतात.

याचबरोबर ज्योतिषाचार्य वराह मिहिर याने लिहिलेल्या बृहत संहिता या ग्रंथातील 'कुसुमलता' या प्रकरणामध्ये नक्षत्रवृक्षांची, वृक्ष आणि कृषी उत्पन्नांची सविस्तर माहिती दिलेली आहे. आचार्य हेमचंद्र यांनी लिहिलेल्या भूमिजल विद्या या ग्रंथातही वृक्ष आणि जलस्तोत्र यासंबंधी सविस्तर चर्चा केली आहे. आयुर्वेदात मान्यता पावलेल्या वैद्य शाळीग्राम यांच्या बृहत निघंटु रत्नाकर, वैद्य पदेशास्त्री यांची वनौषधी गुणधर्म तसेच द्रव्य गुण विज्ञान, द्रव्य गुण रसशास्त्र, चिकित्सा प्रभाकर इ. ग्रंथातही नक्षत्रांचे आराध्यवृक्ष आणि नक्षत्राची धार्योषधी यांची माहिती दिलेली आहे.

यातील काही संदर्भांची माहिती आपण करून घेऊ या.

■ १. नारद पुराण : नारदपुराणमध्ये नक्षत्रवृक्षासंबंधी खालील उल्लेख आहे.

वृषोवृक्षोश्वभायाम्यधिष्णये यमकरतरु । उडुंम्बरश्चाग्निधिष्ण्ये रोहिण्यां जम्बुकस्तरुः ।।
इन्दुभात्खदिरो जातः कृष्णप्लक्षश्च रौद्रभात् । संभूतोऽदितिभाद्वंशः पिप्पलः पुष्यसंभव ।।
सर्पधिष्ण्यान्नागवृक्षो वटः पितृभसंभवः । पालाशो भाग्यभाज्जातः अक्षश्चार्यम संभवः ।।
अरिष्टवृक्षो रविभाच्छ्रीवृक्षस्त्वाष्ट्रसंभवः । स्वात्यृक्षजोऽर्जुनो वृक्षो द्विदैवत्याद्विकंकतः ।।

मित्रभाब्दकुलो जातो विष्टि: पौरंदरर्क्षज: । सर्ज्जवृक्षो मूलभाच्च वंजुलो वारिधिष्णयज: ।।
पनसो वैश्वभाजातश्चार्कवृक्षवृक्षश्च विष्णुभात् । वसुधिष्ण्याच्छमीवृक्ष: कदंबों वारूणर्क्षज: ।।
अजाहेश्चूतवृक्षोभूब्दुध्न्यज: पुचिमन्दक: । मधुवृक्ष: पौष्णधिष्याद्धिष्ण्यवृक्षा प्रकीर्तिता: ।।
यस्मिञ्छनैश्चरो धिष्ण्ये तद्वक्षोऽर्च्य:प्रयत्नत: ।

अर्थ : अश्विनी नक्षत्राचा विषवृक्ष, यम नक्षत्राचा यमकर वृक्ष, अग्नि नक्षत्राचा औदुंबर, रोहिणीचा जांभूळ, चंद्राच्या (मृग) नक्षत्राचा खैर, रुद्र (आर्या) नक्षत्राचा कृष्णागरू हा नक्षत्रवृक्ष आहे. आदिती (पुनर्वसु) नक्षत्राचा बांबू, पुष्पाचा पिंपळ, सर्प (आश्लेषा) नक्षत्राचा नागवृक्ष, पित्तर (मघा) नक्षत्राचा वड, भग (पूर्वा) नक्षत्राचा पळस, उत्तरा नक्षत्राचा पायरी, सूर्य (हस्त) नक्षत्राचा जाई, त्वष्टा (चित्रा) नक्षत्राचा बेल, स्वातिचा अर्जुन, विशाखाचा नागकेशर, अनुराधाचा बकुळ, ज्येष्ठाचा सांबर, मूळ नक्षत्राचा वसू (घनिष्ठा) नक्षत्राचा शमी, वरूण (शततारका) नक्षत्राचा कदंब, अजैक पाद (पूर्वाभाद्रपदा) नक्षत्राचा आंबा, अहिरबुध (उत्तराभाद्रपदा) नक्षत्राचा कडुलिंब आणि पुष्पा (रेवती) नक्षत्राचा मोह यांना नक्षत्रांचे वृक्ष असे म्हटले जाते. ज्या नक्षत्रामध्ये शनीचा वास आहे, त्याच्या नक्षत्रवृक्षाची विशेषत्वाने पूजा केली पाहिजे.

■ २. नारदसंहिता : हा ज्योतिषशास्त्रातील एक महत्वपूर्ण ग्रंथ आहे. त्यामध्ये नक्षत्रवृक्षांचे खालीलप्रमाणे वर्णन केले आहे.

वृषवृक्षोऽश्विभाद्याम्यधिष्णयेयं सकलस्तत: । उदुम्बरोह्यग्निधिष्ण्याद्रोहिण्याजम्बुकस्तरु: ।।
इन्दुभातखदिरो जात: कलिवृक्षश्च रौद्रभात् । सम्भूतोदितिभाद्वंश: पिप्पल: पुष्यसम्भव ।।
सर्पधिष्ण्यान्नावृक्षो वट: पितृभसम्भव: । पालाशो भाग्यजातश्च प्लक्षश्चार्यमसम्भव: ।।
अरिष्टवृक्षो रविभात् श्रीवृक्षस्त्वाष्ट्रसम्भव: । स्वात्यृक्षादर्जुनोवृक्षो द्विदैवात्पाहिकं तत: ।।
मित्रभात् वकुलोजातो विष्टि: पौरन्दरर्क्षज: । सर्जवृक्षो मूलभाच्च वंजुलो वारिधिष्ण्यज: ।।
पनसो विश्वभाजातो ह्यर्कवृक्षस्तु विष्णुभात् । वसुधिष्ण्याच्छमीजाता कदम्बो वारुणर्क्षज: ।।
अजैकपाच्चूतवृक्षोऽहिर्वुध्न्यात् पिचुमन्दक: । मधुवृक्ष: पौष्णधिष्ण्यादेवं वृक्षं प्रपूजयेत् ।।

अर्थ : अश्विनी नक्षत्राचा विषवृक्ष, यम नक्षत्राचा यमकर वृक्ष, अग्नि नक्षत्राचा औदुंबर, रोहिणीचा जांभूळ, चंद्राच्या (मृग) नक्षत्राचा खैर, रुद्र (आर्या) नक्षत्राचा कृष्णागरू हा नक्षत्रवृक्ष आहे. आदिती (पुनर्वसु) नक्षत्राचा बांबू, पुष्पाचा पिंपळ, सर्प (आश्लेषा) नक्षत्राचा नागवृक्ष, पित्तर (मघा) नक्षत्राचा वड, भग (पूर्वा) नक्षत्राचा पळस, उत्तरा नक्षत्राचा पायरी, सूर्य (हस्त) नक्षत्राचा जाई, त्वष्टा (चित्रा) नक्षत्राचा बेल, स्वातिचा अर्जुन, विशाखाचा नागकेशर, अनुराधाचा बकुळ, ज्येष्ठाचा सांबर, मूळ नक्षत्राचा वसू (घनिष्ठा) नक्षत्राचा शमी, वरूण (शततारका) नक्षत्राचा कदंब, अजैक पाद (पूर्वाभाद्रपदा) नक्षत्राचा आंबा, अहिरबुध (उत्तराभाद्रपदा) नक्षत्राचा कडुलिंब आणि पुष्पा (रेवती) नक्षत्राचा मोह यांना नक्षत्रांचे वृक्ष असे म्हटले जाते. ज्या नक्षत्रामध्ये शनीचा वास आहे. त्याच्या नक्षत्रवृक्षाची विशेषत्वाने पूजा केली पाहिजे.

■ ३. राजनिघण्टु : इ.स. १४ व्या/१५ व्या शतकामधील काश्मिरमधील श्रीनरहरी या राजाने आयुर्वेद शास्त्रातील हा एक अतिशय महत्वपूर्ण असा ग्रंथ लिहिला आहे. यातील 'धरण्यादिवर्ग ' या अध्यायामध्ये नक्षत्रवृक्षांचे खालीलप्रमाणे वर्णन आले आहे.

अ) *अथ वक्ष्यामि नक्षत्रवृक्षानागमलक्षितान् । पुज्यानायुष्प्रदांश्चैव वर्द्धनात्पानादपि ।*
विषद्रु: धात्री तरु हेऽमदुग्धा जम्बू स्तथा खादिर कृष्णवंशा: ।
अश्वत्थनागौ च वट: पलाश: प्लक्षस्तथाऽम्बष्ठतरु: क्रमेण ।।
विल्वार्जुनौ चैव विकडकंतोऽथ सकेसरौ: शम्वरसर्जवञ्जुला: ।
सपानसार्काश्च शमीकदम्बा स्तथाऽऽम्रनिम्बौ मधुकद्रुम: क्रमात् ।।
अमी नक्षत्र दैवत्या वृक्षा: स्युस्सप्तविंशति: ।
अश्विन्यादिक्रमादेषामेषा नक्षत्र पद्धति: ।।

अर्थ : शास्त्रानुसार नक्षत्रवृक्षांचे नावे सांगतो. हे नक्षत्रवृक्ष लावल्याने आणि त्यांचे पालन, पोषण, संरक्षण आणि पूजन केल्यामुळे हे वृक्ष पूज्य बनतात, आपल्यावर कृपा करतात आणि आपले आयुष्य वाढवतात. विषवृक्ष आणि मोह हे सर्व क्रमाने अश्विनीपासून सत्तावीस नक्षत्रांचे आराध्यवृक्ष आहेत.

ब) *यस्त्वेतेषामात्मजन्मर्क्षमाजां मर्त्य: – कुर्यादभेषजादीन्मदान्ध ।।*
तस्यायुष्यं श्री:कलत्रं च पुत्रो नश्यत्येषां – वर्द्धते वर्द्धनाद्यै: ।।

अर्थ : जी गर्विष्ठ अहंकारी व्यक्ती आपल्या नक्षत्रवृक्षांपासून बनविलेल्या औषधांचा दुरूपयोग करते त्याचे आयुष्य, त्याची संपत्ती, स्त्री आणि त्याचे पुत्र या सर्वांचा नाश होतो. आपल्या जन्म नक्षत्रवृक्षांची लागवड आणि त्याची जोपासना करणाऱ्या व्यक्तिचे आयुष्य, आरोग्य, संपत्ती आणि कुटुंब इत्यादी सर्वांची निरंतर वाढ आणि प्रगती होत राहते.

क) *आचार्य्योत्कौ स्फुटमथ बृहत्सुश्रुते नारदीये। नारायण्णां क्वाचिदपि तथाऽन्यत्र तन्त्रान्तरेषु ।।*
ज्ञात्वाऽपीह प्रथितभिषजां नातिदृष्टोपयोगं । नैवास्माभिर्विशिदितमिदं गौरवाद्ग्रन्थभीते: ।।

अर्थ : बृहत्सुश्रुत, नारदीय, नारायणीय ग्रंथात आणि काही तंत्रांमध्ये आचार्यांनी अगदी स्पष्टपणे याचे वर्णन केलेले आहे. येथे उल्लेख असलेल्या प्रसिद्ध वैद्यांच्या औषध योजनांची माहिती करून घेऊन (आपल्या) नक्षत्रवृक्षांपासून बनविलेल्या औषधांचा उपयोग करून घेऊ नये.

■ ४. **शारदातिलक :** लक्ष्मण देशिकेंद्र या लेखकाने इ.स. १३०० पूर्वी लिहिलेला हा एक तंत्रशास्त्रावरचा ग्रंथ आहे. मात्र तंत्रशास्त्राबरोबरच धर्मशास्त्रामध्येही या ग्रंथाचा आदरपूर्वक उल्लेख केला जातो.

कारस्करोऽथधात्री स्यादुदुम्बरतरु: पुन: । जम्बूखदिरकृष्णाख्यौ वंशपिप्पलसंज्ञकौ ।।
नागरोहिणनामानौ पलाशप्लक्षसंज्ञकौ । अम्बष्ठविल्वार्जुनाख्या विकङ्कतमहीरूहा: ।।
वकुल:सरल:सर्जो वञ्जुल: पनसार्ककौ । शमीकदम्बनिम्बाम्रमधूका रिक्षशाखिन: ।।

अर्थ : कुचला, धोतरा, औदुंबर, जांभूळ, खैर, बांबू, पिंपळ, नाग, पलाश, आंबा, बेल, अर्जुन, नागकेशर, बकुळ, सांबर, राळ, बेल, फणस, रूई, शमी, कदंब, आंबा, कडुलिंब, मोह हे नक्षत्रांचे आराध्यवृक्ष आहेत.

■ ५. **विद्यार्णव तंत्र :** श्री विद्यारण्ययती या संन्याश्याने विद्यार्णव तंत्र हा ग्रंथ लिहिला आहे. यातील उत्तराखंडामध्ये 'विचित्र नित्यप्रयोग विधी' या प्रकरणामध्ये नक्षत्रवृक्षांचे वर्णन आलेले आहे.

कारस्करश्चामलकोदुम्बरौ जम्बुकस्तथा । खदिर: कृष्णवंशश्च पिप्पलो नागरोहिणौ ।।

पलाशप्लक्षकाम्बष्ठबिल्वार्जुनविककं ताः । वकुलः सरलः सर्जो वंजुलः पनसस्तथा ।।
अर्कः शमी कदम्बश्च चूतोनिम्बस्तथान्तिमः । मधूकश्चेति सम्प्रोत्का वृक्षा भानां क्रमादमी ।।

अर्थ : कुचला, धोतरा, औदुंबर, जांभूळ, खैर, बांबू, पिंपळ, नाग, पलाश, आंबा, बेल, अर्जुन, नागकेशर, बकुळ, सांबर, राळ, बेल, फणस, रूई, शमी, कदंब, आंबा, कडुलिंब, मोह या क्रमाने २७ नक्षत्रांचे २७ आराध्यवृक्ष आहेत.

■ **६. धन्वतरिय निघण्टु :**

नक्षत्रवृक्षाः क्रमशो विषमुष्टिरथाऽऽमली । औदुम्बरोजम्बुवृक्षः खदिरश्चागरूर्मतः ।।
वेणुश्च पिप्पलः प्रोक्तश्चम्पकश्च वटो मतः । पलाशः पायरी जाती बिल्वकश्चार्जुनः स्मृतः ।।
बब्बुली नागपुष्पं च मोचा च रालवृक्षकः । वेत्रो निचूलश्चार्कश्च शमी चैव कदम्बकः ।।
आम्रोऽरिष्टो मोहवृक्षोज्ञेया जन्मर्क्षतस्त्वमी । एतेषां पालनं कार्य तच्छ्रेयस्करमुच्यते ।।
हननं नाशकं प्रोक्तमेतेषां पूर्वसूरिभिः ।

अर्थ : नक्षत्रवृक्ष अनुक्रमे कुचला, धोतरा, औदुंबर, जांभूळ, खैर, बांबू, पिंपळ, नाग, पलाश, आंबा, बेल, अर्जुन, नागकेशर, बकुळ, सांबर, राळ, बेल, फणस, रूई, शमी, कदंब, आंबा, कडुलिंब, मोह या नावाने ओळखले जातात. आपल्या नक्षत्रवृक्षाची लागवड, पालन, पोषण आणि उपासना फलदायी ठरते. भाग्यशाली ठरते. नक्षत्रवृक्षांची हानी केल्यास सर्व प्रकारची हानी होते.

नक्षत्रे आणि भारतीय महिने

भारतीय महिन्यांची नावे आणि नक्षत्रे यांचा अन्योन्य संबंध आहे. सर्व भारतीय महिन्यांची नावे नक्षत्रांवरून पडलेली आहेत. जे नक्षत्र ज्या महिन्यामध्ये रात्रभर आकाशामध्ये दिसते त्या महिन्याचे नाव त्या नक्षत्रावरून देण्यात आलेले आहे. याचा अर्थ त्या महिन्याचे नक्षत्र सूर्यास्ताच्या वेळी आकाशामध्ये पूर्व दिशेला उगवते आणि सूर्योदयाच्या वेळी आकाशामध्ये पश्चिम दिशेला मावळते. कोणत्याही भारतीय महिन्यात सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल, की त्या महिन्यात पौर्णिमेचा चंद्र ज्या नक्षत्रामध्ये असेल त्या नक्षत्रावरून त्या महिन्याचे नाव पडलेले असते. भारतीय महिने आणि संबंधित नक्षत्र यांची यादी खालील प्रमाणे.

चैत्र	वैशाख	ज्येष्ठ	आषाढ	श्रावण	भाद्रपद	अश्विन	कार्तिक	मार्गशीर्ष	पौष	माघ	फाल्गुन
चित्रा	विशाखा	ज्येष्ठा	पूर्वाषाढा	श्रवण	भाद्रपदा	अश्विनी	कृत्तिका	मृगशीर्ष	पुष्य	मघा	फाल्गुनी

पितरांच्या तृप्तीसाठी पिंपळाला पाणी घालून पूजा केली जाते. ज्येष्ठ महिन्याच्या अमावास्येला स्त्रिया वटसावित्रीचे व्रत उपवास तसेच वटपूजन करतात. पुत्रप्राप्तीसाठी स्त्रिया ४० दिवसांपर्यंत पिंपळाची पूजा करतात. स्त्रियांच्या मासिक धर्माचे शुद्धकरण करण्याची शक्ती पिंपळ वृक्षात आहे असा समज आहे. पतीच्या आयुष्यासाठी वडाचे पूजन लाभदायक आहे, त्यामुळे मंगळाचा दोष असलेली किंवा वैधव्य योग असलेल्या स्त्रियांनी वटसावित्रीचे व्रत श्रद्धापूर्वक करावे. तसेच संतानप्राप्तीसाठी पिंपळाचे पूजन करावे असे शास्त्रात म्हटले आहे.

दसऱ्याच्या दिवशी शमीपूजन तसेच कार्तिक महिन्याच्या एकादशीला तुलसी विवाह करण्यात येतो. आपल्या प्रत्येकाच्या घरी तुळशी वृंदावन किंवा तुळस कुंडीत लावलेली पाहावयास मिळते.

वेदांत वृक्षदेवता आम्हाला मंगलमय हो, औषधी देवता आम्हाला मंगलमय हो अशा प्रार्थनेचा समावेश आहे. भारतीय संस्कृतीमध्ये वृक्ष उपासना वेदकाळापासून चालत आलेली परंपरा आहे. प्राचीन तांत्रिक ग्रंथांत ग्रहपिडा शांतीसाठी विविध वनस्पतींचे प्रयोग दिलेले आहेत. तसेच वृक्ष लागवडीसंदर्भात काही मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे दिल्या आहेत.

१) औषधी वनस्पती, औषधी वृक्ष शुभफळ देतात.

२) लहान फुलझाडे, तुळस, गुलाब, चमेली, केतकी, मालती, नागकेशर, चंदन, अशोक, डाळिंब वगैरे शुभफल देतात.

३) पूर्वदिशेला केळी, दक्षिणेला गुलमोहर, पश्चिमेला पिंपळ, उत्तर दिशेला अशोक वृक्ष शुभ मानला जातो.

४) घरात/अंगणात तुळशी वृंदावन ठेवावे संध्याकाळी आरती करावी. तुळस हवेमध्ये सतत ऑक्सिजन सोडते.

५) ज्या वृक्षाची पाने तोडली असता किंवा खोड चिरले / कापले असता चिकट पदार्थ (लेटेक्स) निघतो असे वृक्ष उदा. रबर, डिंक इ. वृक्ष स्त्रिवर्गाचे मासिकधर्म आणि मातृत्वाचे प्रश्न निर्माण करतात. त्यामुळे असे वृक्ष घराजवळ लावू नयेत.

६) अनोळखी वेलींचे मंडप तयार करू नयेत. मोठ्या वृक्षांच्या छायेमुळे सूर्याच्या किरणांना सकाळी ९ नंतर प्रवेशाला अडथळा निर्माण होतो. पिंपळाच्या वृक्षाला चतुर्दशी अथवा अमावास्येला श्रद्धापूर्वक पाणी दिल्याने मुलांचे प्रश्न, पितृदोषाचे निवारण होते.

७) चंद्र जेव्हा रोहिणी, मृगशीर्ष, रेवती, चित्रा, अनुराधा, हस्त, अश्विनी, पुष्य, शततारका, उत्तराषाढा तसेच उत्तर भाद्रपदा नक्षत्रात असतो, तेव्हा नवे वृक्ष रोप लावल्याने शुभफळे मिळतात. पंचांगात त्या दिवशी कोणते नक्षत्र आहे ते पाहून मग वृक्ष लागवड करावी.

८) नैऋत्य कोपऱ्यात काही झाले तरी खड्डा खोदून कोणताही वृक्ष लावू नये. नैऋत्याच्या वृक्षात दैत्य, यक्ष, अतृप्त आत्मा, भुतांचा वास राहतो.

९) हानिकारक झाड / वृक्षाचे पूजन-प्रार्थना-शांती केल्यावरच ते झाड उखडून टाकावे. ह्या वृक्षात जे भूतप्रेत, वेताळ, राक्षस, सर्प आदि अनिष्ट तत्त्वांचा वास असतो ते सर्व भगवान शंकर शिवाच्या आज्ञेने दूर जावेत, अशी प्रार्थना करावी.

कोणती वनस्पती घेऊ नये ?

शुभ हेतू अथवा कार्यासाठी स्मशानातील उकीरडा-घाण, गटार, वेश्यागृह अशा ठिकाणी उगवलेली, सडलेली, जीव-जंतूंनी खाल्लेली अशी वनस्पती आणू नये. मात्र राहू-केतू-शुक्र-मंगळ सारख्या ग्रहांसाठी वनस्पती वर नमूद वर्ज्य जागेतून आणल्यास त्या जास्त प्रभावी असतात. सूर्य-चंद्र-गुरू-बुध सारख्या ग्रहांसाठी नियमानुसारच वनस्पती घ्यावी. त्यातही मंदीर परिसर, नदी, आश्रम, शिवालय किंवा पवित्र स्थळी उगवलेली वनस्पती जास्त सुंदर आणि प्रभावी ठरते. अशा स्थानावरील वनस्पतींना प्रथम प्राधान्य द्यावे.

मंत्राशिवाय आणलेल्या वनस्पती चेतनाहीन आणि संस्कारहीन मानल्या जातात. कोणतीही वनस्पती आणताना प्रथम खालील प्रभावी मंत्रोच्चार करावा.

वेतालाश्य पिशाचाश्य राक्षसाच्यसरीसृपा: । अपसर्पन्यु ते सर्वे वृक्षादस्यात शिवाशया ।।

त्यानंतर मग खालील मंत्राचा जप करून प्रार्थना करावी.

नमस्तेमृतसंभूते बलवीर्य विवर्धित्न । बलमाद्युश्यमे देहि पापनमां त्राहि दूरत: ।।

वनस्पतीला नमस्कार करून खालीलप्रमाणे मंत्रोच्चार करून मग ती वनस्पती, पाने, फुले किंवा मुळे उखडावी (लहान वनस्पती आणि वेलीसाठी, मोठ्या वृक्षांसाठी नाही)

हींम चण्डेहु फट्स्वाहा! अथवा कापत असाल तेव्हा

हींम सौफ्ट्र स्वाहा! मंत्राचा पाठ करावा.

ह्याप्रमाणे मंत्र चेतनायुक्त वनस्पतीचाच ग्रहशांतीत उपयोग होतो.बाजारातून किंवा वाट्टेल तेथून मागवलेल्या वनस्पती इच्छित कामनेसाठी उपयोगी ठरत नाहीत.

नक्षत्रवृक्ष लावताना उपासना विधि

ग्रहांच्या शांतीसाठी वृक्ष उपासना करण्यासाठी, त्या ग्रह अथवा राशिसाठी असलेले तीन वृक्ष घराच्या अंगणात अथवा रस्त्याच्या कडेला अथवा अनुकूल स्थळी लावावेत.

वृक्ष लावण्याचा नियम ह्याप्रमाणे आहे. वर्षा ऋतुत किंवा चातुर्मासातील कोणत्याही महिन्यात शुक्ल पक्षाच्या पंचमीपासून कृष्णपक्षाच्या तेराव्यापर्यंत कोणत्याही तिथीला, शनिवार, मंगळवार, शिवायचे इतर वार आणि पूर्वा भाद्रपद, उत्तरा फाल्गुनी, विशाखा, रोहिणी किंवा शततारा नक्षत्र येत असेल त्या दिवशी पहाटे – शुभ ग्रहाचे केंद्र अथवा त्रिकोण येत असेल अशावेळी आणि लग्नेश बलवान बनत असेल त्या लग्नामध्ये वृक्ष लावावा .खोडाची यथाशक्ती पूजा करावी आणि खालीलप्रमाणे मंत्रोच्चार करून प्रार्थना म्हणावी.

नमस्तेमृतसंभूते बलवीर्य विवर्धित्न । बलमाद्युश्यमे देहि पापनमां त्राहि दूरत: ।।१।।
आयुर्बलं यशो वर्च: प्रजा पशुनवसूनि च । ब्रह्म प्रज्ञां च मेघां च त्वं नो देहि वनस्पते ।।२।।
अत्रैव तिष्ठ कल्याणि, मामकार्यकरी भव । ममकार्ये कृते सिद्धि, तत: स्वर्ग गमिष्यसि ।।३।।

अर्थ : हे अमृतोत्पन्न, बल आणि शक्तीवर्धक वनस्पती मला बळ आणि आयुष्य प्रदान कर, पापापासून माझी रक्षा कर ।।१।।

हे वनस्पती तू आम्हाला आयुष्य, शक्ती, कीर्ति, संपत्ती, संतती, तेजस्विता, धन्-धान्य आणि बुद्धी दे ।।२।।

हे मंगलमयी, तू येथेच निवास कर आणि आमच्या कार्यात सफलता देत रहा. माझे कार्य सिद्धीस गेल्यावरच तू स्वर्गात जावे ।।३।।

त्यानंतर त्या वृक्षाची रोज चांगल्या रीतीने देखभाल करावी. रोज सकाळी पाणी घालताना वरील मंत्रोच्चार करावा आणि नमस्कार करावा. जसजशी वृक्षाची वाढ होत जाईल त्याप्रमाणे ग्रहाची कृपा प्राप्त होत जाईल. ग्रह किंवा ग्रहभाव बलवान होत जातील आणि अडचणी दूर होत जातील. अशा रोपांची तीन वर्षांपर्यंत उपासना करावी आणि खोड चांगल्या रीतीने वाढेल ह्याची काळजी घ्यावी.कारण जोपर्यंत ते रोप वा वृक्ष जिवंत राहील तोपर्यंत तुमच्या सुखशांतीत वाढ होत राहील.

नक्षत्रवृक्ष कोठे आणि कसा लावावा?

अथ निवासा सन्नतरु शुभाशुभ लक्षणानि गृहस्थ पूर्व दिग्मागे न्य ग्राधां सर्व कामिक: ।।
उदुम्बरस्तथा याम्ये वारुण्यां पिप्पल शुभ: प्लक्ष श्चोतरतो धन्यो विपरीतांस्तु वर्जयेत् ।।
वर्जयेत्पूर्वतोश्वत्थां प्लक्ष: दक्षिण तो गृहात पश्चिमेचैव न्यग्रोधस्ततोदुम्बर उत्तरे ।।
देवदानव गन्धर्वा: किन्नरोरगराक्षसा: पशुपक्षिर्मनुष्याश्च: संश्रयन्ति सदा तरुन ।।
सर्वेषां वृक्ष नीतीनां छापा वर्ज्या गृहे सदा अपि सौवर्णिको वृक्षो गृह द्वारे न रोपरोत् ।।
बदरी कदली रौव दाडिमं बीजपूरकम प्ररोहित गृहे यस्य तद्गृहं प्ररोहति ।।
पलाशा: काग्वनाराश्य तथा श्लेश्यातकार्जुना करजश्चेत्यमी वृक्षा: न रोप्या सुखिना गृहे ।।
असना कंटाकिनो रिपु भयदा: क्षिरोणीऽर्थ नाशाय फलीन: प्रजा क्षमा करा: दारुण्य पिवर्जये देषाम् ।।
नीलां हरिद्राश्च नर: स दोह्या पुत्रे धनेश्च क्षय मप्युपेयत ।।

वृक्ष लावण्यामुळे कोणती फळे मिळतात त्याचा उल्लेख हजारो वर्षांपूर्वी लिहिलेल्या वरील श्लोकांमधून वाचण्यास मिळतो. पूर्व दिशेत वडाचे झाड असल्यास मनाच्या अपेक्षा पूर्ण होतात. दक्षिण दिशेस उंबर आणि पश्चिम दिशेतील पिंपळ शुभदायी ठरतो. त्याविरूद्ध पूर्व दिशेतील पिंपळ, पश्चिम दिशेतील वड आणि उत्तर दिशेतील उंबर चांगली फळे देत नाहीत.

वृक्षांवर देव, दानव, गंधर्व, राक्षस, पशुपक्ष्यांचा वास असतो, त्याखाली माणसे, प्राणी, सर्प तसेच जीवजंतु आश्रय घेतात. तरी वृक्षाखाली घर, निवास, उद्योग, व्यवसाय सुरू करू नये. घरावर वृक्षाची सावली पडावयास नको. सूर्यकिरणांना अडथळा नको. पळस, चाफा इ. वृक्ष सुखशांती इच्छुकांनी आपल्या अंगणात लावू नये. बाभळी, बोर, कॅक्टससारखे काटे असणारे वृक्ष शत्रू निर्माण करतो. ज्या वृक्षामधून दुधासारखा पदार्थ (लेटेक्स) निघत असेल तसे वृक्ष उदा. रबराचे झाड, ताड वृक्ष हे धनहानी सूचवितात.

जास्त फळ देणाऱ्या वृक्षांच्या प्रभावाने संतती विषयीची चिंता किंवा हानी होते. अशा फळांच्या झाडाच्या लाकडाचा उपयोग घरातील फर्निचरसाठी करू नये. घराजवळ कडूनिंब,हळद,पळसाचे वृक्ष लावू नये.

वास्तुशास्त्रात वृक्षाला अतिशय महत्त्व आहे. उत्तर बाजूला लॉन किंवा दुर्वा किंवा हिरवे गवत

असेल तर डोक्याला थंडपणा मिळतो. दूधी, काकडी, मिरची, पडवळ, चवळी, गवार, वांगी, भेंडी, पालक, फ्लॉवर, टोमॅटो, फरसबी, गाजर, मूळा, बीट इ. भाजीपाला घराच्या अंगणाच्या उत्तर बाजूस किंवा पूर्व बाजूस लावावा. वृक्ष घराच्या पायाला नुकसान करणार नाही अशी काळजी घेऊन पश्चिम आणि दक्षिण दिशेस मोठे वृक्ष लावावेत. त्या बाजूस गवताचे लॉन,काट्याशिवायचे वेल लावावे. ईशान्य दिशेत कधीच मोठा वृक्ष लावू नये. अशा बाजूस गवत लॉन, काट्याविरहीत वेल, मेंदी, मोगरा, कृष्णकमळाची वेल, चमेली, जाई-जुई, माधवीलता, मालती, मधुमालतीचे वेल लावावेत. ज्यामुळे सुगंधाचा फायदा होईल आणि त्या सुगंधामुळे मेंदू आणि मन प्रसन्न राहील.

Prayer of the forest MAN !

I am warmth of your home in the cold winter nights and the protective shade when summer's sun is strong. I am the frame work of the roof to your house and the top of your tacle. The bed in which you sleep and the timer which you fashion your coats, I am the handle to your home and the door to your hut. I am the wood of your cradle and the boards of your coffin. I am the cread of kindness and the flower of beauty. Pl hear my prayer.

" DESTROY ME NOT "

वृक्षाची माणसाकडे प्रार्थना...

तुझ्या घराची मी उबदार सावली आहे. हिवाळ्यातल्या बोचऱ्या गार वाऱ्यात माझी उबदार शाल मी तुझ्यावर पांघरतो. आग ओकणाऱ्या सूर्यापासून माझं छत्र देऊन मी तुझं रक्षण करतो. तुझ्या घराच्या छतासाठी माझीच चौकट तर वापरली आहे. ज्या दिवाणावर तू झोपतोस आणि आपल्या कोटाची शोभा वाढवणारं कालनियंत्रक साधन तू वापरतोस त्यासाठीदेखील माझाच उपयोग केलेला आहे. तुझ्या घराचा कडी-कोयंडा, दारंखिडक्या यातदेखील मीच सामावलेला आहे. हा तुझा पाळणा ज्या लाकडापासून बनविलेला आहे, ते लाकूडसुद्धा माझंच आहे. इतकंच काय, तुझ्या शवपेटीसाठी देखील माझाच वापर केला गेला आहे. मी तर दयेचा अथांग सागर आहे. सौंदर्याचं पुष्पदेखील मीच आहे. माझी प्रार्थना तू लक्षपूर्वक ऐक, अव्हेरू नकोस.

"मला नष्ट करू नकोस, मला उखडून टाकू नकोस!"

नक्षत्र आणि नक्षत्रवृक्ष : परिचय आणि उपासना

१. अश्विनी

तेजस्वी आणि कर्तबगार

अश्विनी हे नक्षत्रमालेतील पहिले नक्षत्र आहे. देवांचे वैद्य म्हणून मान्यता पावलेल्या अश्विनीकुमारांच्या नावावरून या नक्षत्राचे अश्विनी हे नामकरण केलेले आहे. अश्विनीकुमार ही युग्म (Dual) देवता म्हणून वेदांमध्ये वर्णिलेली आहे. ऋग्वेदातील मंडलांमधील सूक्ते अश्विनीकुमारांचे वर्णन करणारी आहेत. अश्विन महिन्यात रात्रभर हे नक्षत्र आकाशामध्ये दिसत असते. अश्विनी नक्षत्राचा स्वामी ग्रहमालेतील केतु हा ग्रह आहे. तसेच याची देवता अश्विनीकुमार ही आहे.

आकाशात हे नक्षत्र इंग्रजी J प्रमाणे दिसते, तर प्राचीन ग्रंथकारांना ते घोड्याच्या तोंडाप्रमाणे दिसले. याचं शास्त्रीय नाव strychnos nuruomica हे होय. संस्कृतात ते कारस्कर, विषतिन्दुक, मूषकविष, काकनेत्र अशा विविध वर्णनात्मक नावांनी ओळखलं जातं. ह्याचे चारही चरण मेष राशीत येतात. याचा आराध्यवृक्ष कुचला आहे.

अश्विनी नक्षत्राचं तत्व आहे अग्नी. अग्नी म्हणजे तेजस्विता, प्रखरता. त्यामुळेच की काय, अश्विनी नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्तिंची प्रकृतीही अग्नी महाभूतांचे प्राबल्य असणाऱ्या पित्त प्रकृतीचे प्राबल्य दर्शविणारी असते. उग्र अग्नीतत्वाच्या गुणांचे प्राबल्य असणाऱ्या या व्यक्ती बुद्धिमत्ता, धाडस, पराक्रमी, कर्तबगारी, महत्वाकांक्षा, स्वातंत्र्यप्रियता, अधिकार गाजविण्याची वृत्ती इ. गुण असणाऱ्या असतात. तसेच या व्यक्ती रागीट, मानी, उतावळ्या, सडेतोड बोलणाऱ्या व स्पष्टवक्त्या असतात.

उष्ण प्रकृती म्हणजेच पित्त प्रकृती असल्यामुळे डोकं दुखणं, डोळे जळजळणं, उष्माघात, चक्कर – भोवळ येणं, अपस्मार, अनिद्रा इ. विकार होवू शकतात. या रोगांचा प्रादुर्भाव हे नक्षत्र वा या प्रकारची प्रकृती असणाऱ्या सर्वांनाच होतील असे निश्चितपणे सांगता येत नाही. कुंडलीमध्ये असणारे ग्रह कोणत्या व्यक्तिला कोणते आजार होतील ते ठरवतात. उदा. केतू जर विशिष्ट स्थानी बसलेला असेल, तर मूळव्याधीचा संभव असतो असे म्हटले जाते.

कुचला वृक्ष हा कोकणात अधिक प्रमाणात आढळून येतो. कुचल्याचं बी पोटाच्या विकारांवर विशेषत: पचनक्रिया सुधारण्यासाठी उपयुक्त आहे. भूक लागण्याकरता ते उगाळून बाळगुटीत बाळाला दिलं जातं.

नक्षत्राप्रमाणे वृक्षांची रचना करत असताना प्राचीन ऋषि-मुनींनी वैद्यकशास्त्राचादेखील सूक्ष्मपणे अभ्यास केला असावा असे वाटते. अग्नितत्वाचा प्रभाव असणाऱ्या व्यक्तिंना आरोग्य शास्त्रानुसार जे रोग होतात त्यावर कुचलेचा उपयोग बऱ्याच प्रमाणात होतो. कुचला अग्निमा

आमाशयाचे विकार, ग्रहणी, मूळव्याध इ. विकारांवरही उपयुक्त आहे. ह्या विकारांवरच्या उपयुक्ततेमुळे तर अश्विनी नक्षत्राचा उपासनावृक्ष कुपिलु (कुचलेचे एक संस्कृत नाव) झाला नसेल ना?

या वृक्षाची उपासना पुढीलप्रमाणे करतात. वृक्षोपासना विधीमध्ये प्रामुख्याने नक्षत्रदेवतेचा मंत्र, नक्षत्रनामाचा मंत्र, नक्षत्राचा वेदोक्त मंत्र तसेच नक्षत्र स्वामीचा पौराणिक मंत्र इ. मंत्राचा समावेश या क्रमाने केलेला आहे. त्याचबरोबर नक्षत्राचा मंत्रदेखील दिलेला आहे. या सर्व मंत्रांची शक्ती हा स्वानुभवाचा भाग आहे. तसेच प्रत्येक मंत्राची शक्तीदेखील भिन्न–भिन्न अशी आहे. आता क्रमाने या मंत्राची ओळख करून घेऊया.

१) नक्षत्र देवता मंत्र – *। अश्विन्यों नमः ।।*

२) नक्षत्र नाम मंत्र – *। अश्वयुगःभ्या नमः ।*

३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टि वर्धनम् ।*
ऊर्वारूकबिव बन्धनात् मृत्योर्मुक्षियमामृताम् ।।

४) नक्षत्र स्वामी मंत्र (पौराणिक) – *पलाश पुष्पसंकाशं तारकाग्रहमस्तकम् ।*
रौद्रं रौद्रात्मकं घोरं तं केतुं प्रणमाम्यहम् ।।

पूजा : पहिले चरण असताना मंगळवारी पूजा सुरू करून ती ९ दिवस करावी. दुसरे चरण असताना पूजा मंगळवारी सुरू करून १० दिवस करावी. तिसरे चरण असताना पूजा बुधवारी सुरू करून ७ दिवस करावी. चौथे चरण असताना पूजा सोमवारी सुरू करून ७ दिवस करावी.

पूजा संपल्यानंतर गरीब गरजू व्यक्तिला शिधा द्यावा व अन्नदान करावे.

- नक्षत्राचे नाव : **अश्विनी**
- इंग्रजी नाव : **एरिस (Aries)**
- तारकासंघाचे नाव : **मेष**
- ताऱ्यांची संख्या : **२**
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : **मेष मंडलातील बीटा आणि गामा तारे**
- आयनांश : **0° ते १३° २'**
- राशी : **मेष**
- सूर्याचा निवास : **१४ एप्रिल ते २७ एप्रिल (सुमारे)**
- नक्षत्राकृती : **अश्वमुख**
- नक्षत्रस्वामी : **केतू**
- नक्षत्रदेवता : **अश्विनीकुमार**
- शुभ अंक : **१, ७, ८**
- शुभ रंग : **पांढरा, तांबूस**
- शुभ रत्न : **पोवळे, वैडुर्य / लसण्या**
- नक्षत्राक्षरे : **चू, चे, चो, ला**
- आराध्यवृक्ष : **कुचला**

- बोटॅनिकल नेम : **Strychnos nux-vomica L**
- क्षेमकर वृक्ष : जांभूळ
- धार्योषधी : आघाडा
- जपासाठी मंत्र : । अश्विनीकुमाराभ्यां नमः । (जपाची संख्या : ५०००)
- नक्षत्र स्तुती : पदश्विनावश्व्युजोपयाताम् । शुभं गमिष्ठौ सुयमेभिरश्वैः ।।
  स्वं नक्षत्रं हविषायजन्तौ । मध्वा संप्टक्तौ यजुषा समक्तौ ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ वाजता सुमारे) नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यात पूर्वेला, जानेवारी–फेब्रुवारी महिन्यांत डोक्यावर, मार्च–एप्रिल महिन्यात पश्चिमेकडे.

२. भरणी
उदार आणि परावलंबी

या नक्षत्राचे मालिकेतील स्थान दुसरे आहे. या नक्षत्रामध्ये ३ तारे असतात. हे तारे अधिक तेज:पुंज नसल्यामुळे हे नक्षत्र आकाशामध्ये ठळकपणे दिसत नाही. इंग्रजीमध्ये ते **Evitus** नावाने ओळखले जाते. याचे चारही चरण मेष राशीत येतात.

नक्षत्राचा आकार त्रिकोणासारखा अथवा योनीमुखासारखा दिसतो. या नक्षत्राचा स्वामी शुक्र हा ग्रह आहे, तर या नक्षत्राची आराध्यदेवता यम आहे. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष आवळा हा आहे. संस्कृतमध्ये आमलकी, धात्री अशा सार्थ नावांनी हा वृक्ष ओळखला जातो.

या नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्ती मध्यम उंचीच्या, सडपातळ, स्वभावाने उदार, परंतु दुसऱ्यांवर विसंबून राहणाऱ्या असतात. या त्यांच्या स्वभावामुळे त्या स्वत:चं नुकसानदेखील करून घेतात. कोणत्याही कामाची सुरूवात करताना त्या आरंभशूराप्रमाणे पुढे–पुढे करतात. परंतु हाती घेतलेले काम तडीस नेण्याची महत्त्वाकांक्षा असतेच असे नाही. त्यामुळे कमी श्रमात भरपूर धन मिळविण्याची इच्छा त्यांच्यामध्ये दिसून येते. ही प्रवृत्ती थोडीफार जुगार, सट्टा इत्यादी गोष्टींकडे झुकणारी वाटते.

या नक्षत्रामध्ये जन्मलेल्या व्यक्तिंवरही अग्नीतत्वाचं प्राबल्य अधिक प्रमाणात असते. त्यामुळे पित्ताचे विकार जसे आम्लपित्त, कावीळ, दंतरोग, पित्ताच्या उलट्या होणं, वारंवार ताप येणं, रक्ताचे विकार इ. रोग होण्याची शक्यता अधिक असते. पण बहुतेक वेळा हे रोग या व्यक्तिंनी स्वत:हून ओढवून घेतलेलेही असू शकतात. खाण्यापिण्याचा अतिरेक आणि व्यसनांच्या आहारी जाणं हे भरणी नक्षत्राचे वाईट गुण आहेत.

या नक्षत्राचा आराध्यवृक्ष, आमलकी अथवा आवळा होय. **Emcica Officinalis** हे याचं शास्त्रीय परिभाषेतील नाव होय. आवळा हा बहुगुणी व बहुपयोगी म्हणून आरोग्यशास्त्रात मान्यता पावलेला वृक्ष होय. आवळा हा पित्तशामक, रोगप्रतिकार शक्ती वाढविणारा असा आहे. आवळ्याला आयुर्वेदामध्ये रसायन म्हणून ओळखले जाते. ज्या तऱ्हेचे रोग भरणी हे जन्मनक्षत्र असणाऱ्या व्यक्तिंना होण्याची शक्यता असते त्या रोगांवर आवळा हा अत्यंत गुणकारी आहे. मळमळ, उलटी यासारख्या दोषांवर आवळा सुपारी किंवा आवळा काठी म्हणून खाल्ली जाते. रसायन असल्यामुळे



जुनाट रोगांवर देखील उपयोगी ठरते. ॲसिडिटीवर तर आवळ्याचे सरबत, मोरावळा इ. गोष्टी हमखास उपयोगी ठरणाऱ्या आहेत.

‘जरा व्याधि नाशनम् इति रसायन:’ म्हणजेच वृद्धत्व व आजार यांना दूर ठेवणाऱ्या या पदार्थांना रसायन असे म्हणतात. च्यवनप्राश, त्रिफळा चूर्ण यात आवळा हा मुख्य घटक द्रव्य असतो.

भरणी नक्षत्राच्या लोकांच्या पित्त प्रकृतीकडे झुकणाऱ्या प्रवृत्तीकडे पाहून प्राचीन आचार्यांनी [illegible] आवळ्याची आराध्यवृक्ष म्हणून केलेली रचना विशेष भावते.

या वृक्षाच्यासाठी उपासना मंत्र.

१) नक्षत्र नाम मंत्र – *। अपभरणिभ्यो नम: ।*
२) नक्षत्र देवता मंत्र – *। यमाय नम: ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। यमाय त्वेत्ति मंत्र: ।*
४) नक्षत्र स्वामी मंत्र – *हिमकुंदमृणालाभं दैत्यानां परमं गुरूम् ।*
(पौराणिक) *सर्वशास्त्रप्रवक्तारं भार्गवं प्रणमाम्यहम् ।।*

पूजा : पहिले चरण असताना रविवारी पूजा सुरू करून ती १० दिवस करावी. दुसरे चरण असताना पूजा बुधवारी सुरू करून १० दिवस करावी. तिसरे चरण असताना पूजा शुक्रवारी सुरू करून १० दिवस करावी. चौथे चरण असताना पूजा मंगळवारी सुरू करून २१ दिवस करावी.

पूजा संपल्यानंतर पक्षांना अन्न दाणे द्यावेत.

■ नक्षत्राचे नाव	:	भरणी
■ इंग्रजी नाव	:	ट्रॅंग्युलम (Triangulum)
■ तारकासंघाचे नाव	:	त्रिकोण
■ ताऱ्यांची संख्या	:	३
■ ताऱ्यांची वैज्ञानिक नावे	:	मेष मंडलातील ३५, ३९ आणि ४१ क्रमांकाचे तारे
■ आयनांश	:	१३°२०’ ते २६°४०’
■ राशी	:	मेष
■ सूर्याचा निवास	:	२७ एप्रिल ते ११ मे (सुमारे)
■ नक्षत्राकृती	:	योनी
■ नक्षत्रस्वामी	:	शुक्र
■ नक्षत्रदेवता	:	यम
■ शुभ अंक	:	२, ६
■ शुभ रंग	:	पांढरा, निळा
■ शुभ रत्न	:	हिरा, नीलम
■ नक्षत्राक्षरे	:	ली, लू, ले, लो
■ आराध्यवृक्ष	:	आवळा
■ बोटॅनिकल नेम	:	Phyllanthus emclica L
■ क्षेमकर वृक्ष	:	खैर
■ धार्योषधी	:	हदगा

ये नमः ।।

- जपासाठी मंत्र : । यमदेवाय नमः । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : अप पाप्मानं भरणीर्भरन्तु । तद्यमो राजा भगवान्विचष्टाम् ।। लोकस्य राजा महतो महान्हि । सुगं नः पन्थामभयं कृणोतु ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यात पूर्वेला, जानेवारी–फेब्रुवारी महिन्यांत डोक्यावर, मार्च–एप्रिल महिन्यात पश्चिमेकडे.

३. कृत्तिका

टोकदार आणि स्थिरचित्त

नक्षत्रांच्या मालिकेत अत्यंत तळपणारे असे हे नक्षत्र आहे. सुरीच्या आकाराचे सहा तारे असलेले हे नक्षत्र संपूर्ण कार्तिक महिनाभर आकाशात तळपत असते. याचा आकार कविमनाच्या खगोलशास्त्रज्ञांना मुलींच्या कानातील डुलासारखा वाटतो, तर काहींना सुरीसारखा वाटतो. सुरीसारखे दोन रेषांत असणाऱ्या ६ ताऱ्यांची रचना खरोखरीच कृत्तिका हे नाव सार्थ ठरविते. संस्कृतात कृत्त म्हणजे कापणे असा अर्थ होतो. त्यामुळेच त्या नक्षत्राचे हे नाव अगदी अन्वर्थक वाटते. इंग्रजीत ते **ktatary** या नावाने ओळखलं जातं.

या नक्षत्राचा पहिला चरण मेष राशीत तर उर्वरित तीन चरण वृषभ राशीत असतात. या नक्षत्राचा स्वामी सूर्य असून आराध्यदेवता अग्नी आहे. या नक्षत्रासाठी आराध्यवृक्ष म्हणून औदुंबर सांगितला आहे. **Ficus glomelata** असं ज्याला शास्त्रीय परिभाषेत म्हटले जाते तो उंबर अथवा औदुंबर हा अतिशय पवित्र वृक्ष म्हणून मान्यता पावलेला आहे. श्री दत्तात्रेयांच्या संप्रदायाशी या वृक्षाचे अतूट नाते जोडलेले आहे. पावित्र्याच्या या कल्पनेमुळेच औदुंबराच्या फांद्या समिधा म्हणून यज्ञाकरिता वापरल्या जातात.

कृत्तिका नक्षत्रावर अग्नी या महाभूताचे प्राबल्य असते. या नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्तिंच्या प्रकृतीमधूनही ते प्रत्ययास येते. अग्नितत्त्वाच्या प्रबलतेमुळे होणारे म्हणा किंवा पित्त प्रकृतीचे असणारे गुण किंवा दोष या नक्षत्रावरील व्यक्तिंच्या स्वभावातून प्रकर्षाने जाणवतात. पुरुष उंच व मध्यम बांध्याचे, भव्य कपाळाचे असतात. पुरुषांची अंगकाठी घट्ट व पीळदार शरीराची, आकर्षक अशा प्रकारची असते. तर स्त्रियादेखील सौंदर्यवती, पण गर्विष्ठ, मानी, रागीट व दुराग्रही असतात. या व्यक्ती महत्त्वाकांक्षी, पराक्रमी, कर्तृत्ववान अशा असतात. या व्यक्तिचे अग्निजन्य म्हणजेच पित्तज विकार हे अंगाचा दाह, मूत्रदाह, नाकातून अथवा इतर मार्गातून रक्तस्त्राव, जळजळ इ. प्रकारचे असतात. कृत्तिका नक्षत्राचा आराध्यवृक्ष म्हणून प्राचीन ग्रंथकारांनी औदुंबराचीच केलेली निवड ही अत्यंत संयुक्तिक आहे. कारण औदुंबर आणि पाणी यांचे सख्य तर सर्वश्रुत आहे. दकार्गल या प्राचीन जलविज्ञानाच्या ग्रंथात याविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे. उंबराचं झाड ज्या भागात असतं, त्याच्या आसपास पाण्याचा स्त्रोत हमखास सापडतो. अग्नीशी सामना करायला नाहीतरी शस्त्र म्हणून पाण्याचाच उपयोग होतो, त्यामुळे अग्नीदग्ध कृत्तिकेसाठी जलप्रिय उंबराची आराधना अगदी सुयोग्य वाटते.

औदुंबराची प्रकृती थंड (शीतवीर्य) आहे आणि दाह कमी करण्यासाठी उंबराइतकं उत्तम दुसरे औषध नाही. पौराणिक संदर्भानुसार, हिरण्यकश्यपूच्या वधामुळे नरसिंहाच्या बोटांचा होणारा दाह शमविला तो या औदुंबराच्या फळांनीच. उष्णतेच्या विकारांवर उंबराचे फळ खडीसाखर घालून खातात किंवा याच्या फळांचा रस डोक्याला चोळतात. काही जण ह्या फळात साखर, वेलची, मिरपूड इ. घालून तुपात तळून रोज सकाळी खातात.

वृक्षाचा पूजेचा विधी पुढीलप्रमाणे आहे. या वृक्षाची पूजा कमीत कमी १२ दिवस सलगपणे करावी. पूजे पूर्वी मनामध्ये संकल्प करावा. नक्षत्रदेवता, नाम, वेदोक्त किंवा पुराणोक्त इ. मंत्रापैकी कोणताही १ मंत्र १०८ वेळा म्हणावा. वृक्षाला पाणी घालून पिवळे गंध लावून, पिवळे फूल वहावे (हळद-कुंकु वाहू नये), केळी किंवा फळांचा नैवेद्य दाखवावा.

लग्नाबाबत अडचण असलेल्यांनी ७ पाने व ७ फळे ह्याची पूजा करावी. प्रकृतीसंबंधीच्या तक्रारींसाठी ५ पाने व ५ फळे पूजावीत.

१) नक्षत्र नाम मंत्र – *। कृत्तिकाभ्यो नमः ।*

२) नक्षत्र देवता मंत्र – *। अग्नये नमः ।*

३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। अग्निर्भ्यो धेति मंत्रः ।*

४) नक्षत्र स्वामी मंत्र (पौराणिक) – *जपाकुसुमसंकाशं काश्यपेयं महद्द्युतिम् ।*
तमोरिं सर्वपापघ्नं प्रणतोऽस्मि दिवाकरम् ।।

पूजा : कृत्तिका नक्षत्राचे पहिले चरण असताना गुरूवारी पूजा सुरू करून ती १२ दिवस करावी. दुसऱ्या चरणात जन्मलेल्यांनी रविवारी पूजा सुरू करून १२ दिवस करावी. तिसऱ्या चरणासाठी शनिवारी पूजेचा प्रारंभ करावा व पुढे १७ दिवस पूजा करावी. चौथे चरण असताना गुरूवारी प्रारंभ करावी व २० दिवस करावी.

पूजा संपल्यावर ज्या व्यक्तिसाठी पूजा केली असेल त्यावरून लिंबू ७ वेळा उतरवून ते वाहत्या पाण्यात सोडावे.

■ नक्षत्राचे नाव	:	कृतिका
■ इंग्रजी नाव	:	प्लीडीज (Pleides)
■ तारकासंघाचे नाव	:	वृषभ
■ ताऱ्यांची संख्या	:	६ हून अधिक
■ ताऱ्यांची वैज्ञानिक नावे	:	प्लीएडस तारे
■ आयनांश	:	२६°४०' ते ४०°००'
■ राशी	:	मेष / वृषभ
■ सूर्याचा वास	:	११ मे ते २५ मे (सुमारे)
■ नक्षत्राकृती	:	वस्तरा
■ नक्षत्रस्वामी	:	सूर्य
■ नक्षत्रदेवता	:	अग्नी
■ शुभ अंक	:	१, ३

- शुभ रंग : लाल, पांढरा, पिवळा
- शुभ रत्न : माणिक, पोवळे
- नक्षत्राक्षरे : अ / ई, उ, ए
- आराध्यवृक्ष : औदुंबर
- बोटॅनिकल नेम : Ficus racemose L
- क्षेमकर वृक्ष : कृष्णागरू
- धार्योषधी : कापूस
- जपासाठी मंत्र : । अग्निदेवाय नमः । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : अर्ग्नि पातु कृत्तिकाः । नक्षत्रं देवमिन्द्रियम् ।।
  इदमासां विचक्षणम् । हविसप्तं जुहोतन ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यात पूर्वेला, डिसेंबर–जानेवारी महिन्यांत डोक्यावर, मार्च–एप्रिल महिन्यात पश्चिमेकडे.

४. रोहिणी
ऐश्वर्यसंपन्न

नक्षत्रांच्या रांगेत रोहिणी येते ती कृत्तिकेच्या मागे. हे या मालेतील चौथे नक्षत्र होय. या नक्षत्राची आकृती इंग्रजीत अक्षराच्या जवळपास जाणारी असते. तर या नक्षत्राची आकृती प्राचीन ग्रंथामध्ये शकटाप्रमाणे म्हणजेच गाडग्यासारखी सांगितली आहे. नक्षत्रामध्ये पाच तारे असतात. ते तारे ठळक आणि तेजस्वी असतात. या पाचांमधील लाल तारका सर्वांत श्रेष्ठ अर्थात आरोहण करणारी म्हणूनच रोहिणी हे नाव सार्थ वाटते. हे नक्षत्र कार्तिक महिन्यात रात्रभर आकाशात तळपताना दिसत असते. याचे चारही चरण वृषभ राशित येतात.

रोहिणी हे जन्मनक्षत्र असलेल्या व्यक्ती आकर्षक, मोहक अशा असतात. विशेषकरून रोहिणीच्या स्त्रिया या लावण्यतीच म्हणाव्या इतक्या सुंदर असतात. या सौंदर्याला कृत्तिकेतील सौंदर्यासारखा गर्व, उन्मतपणा माहित नसतो तर ते स्वच्छ, सात्विक, द्वेषरहित असं सौंदर्य असतं. या व्यक्तिंची अभिनय क्षेत्राकडे अधिक गती असते. या व्यक्ती स्वभावाने शांत, सालस, आनंदी आणि रसिक मनोवृत्तीच्या असतात. कधी कधी ही रसिकता थोडीशी विलासाकडे झुकणारी अशी असते. भावनाप्रधान स्वभाव हा या नक्षत्रावरील व्यक्तिंचे विशेष, पण भावना प्रधानतेबरोबर दुर्मिळपणे असणारा विवेकही यांची सोबत करतो.

रोहिणी नक्षत्राचे तत्त्व आहे पृथ्वी. पृथ्वी तत्त्व म्हणजे कफाकडे झुकणारी प्रकृती. बांधा सुरेख, सशक्त असला तरी जरा आडवेपणाकडे झुकलेला असतो. त्यामुळे आहार–विहारातील नियमितता कमी झाली, की मेद वाढलाच म्हणून समजावा. रोहिणी इंग्रजीत –aldecaram म्हणून ओळखली जाते. या नक्षत्राचा स्वामी चंद्र तर नक्षत्र देवता ब्रह्मा होय. याचा आराध्यवृक्ष जम्बुवृक्ष अर्थात जांभूळ किंवा जांभळीचा वृक्ष होय.

पृथ्वी तत्त्वाच्या या व्यक्तिंना आहारावर नियंत्रण ठेवणे अगदी जड़ जाते. प्रकृती मूळचीच कफाची असते. प्रकृती जरी रोगट नसली तरी सामान्य रोग होत असतात. घशाचे, सर्दीचे विकार आणि विशेष करून प्रमेह (मधुमेह) इ. होण्याची शक्यता अधिक असते. आहारावर नियंत्रण नाही, गोडाची आणि प्रमेहाची अधिक शक्यता यामुळे व्यक्तिंच्या राशिचा उपासना वृक्षदेखील ग्रंथकारांनी अगदी सुयोग्य असा शोधून काढला आहे.

रोहिणीचा नक्षत्रवृक्ष आहे जांभूळ (Eugenia Jamcolana). मधुमेह प्रधान नक्षत्रासाठी जांभळाची उपासना मन अगदी थक्क करायला लावणारी आहे. कारण जांभूळ हा डायबेटीस सारख्या रोगांवर अत्यंत औषधी वृक्ष आहे. जांभळाची बी मधुमेहात अत्यंत उपयोगी असते. मधुमेह यकृतात बिघाड निर्माण करतो. त्याला नीट करण्याचे काम करते जांभूळ. कारण ते यकृतोत्तेजक आहे. बियांचं चूर्ण यकृतातील शर्करेचं पाचन करतं. पचनसंस्थेत जेव्हा बिघाड निर्माण होतो, जसे पचनशक्ती कमी होणं, अग्निमांद्य किंवा अग्नीमांद्यामुळे अजीर्ण होतं, अतीसार होतो तेव्हा देखील जांभूळच मदतीला येतं. ग्रहणी प्रवाहिका (कोलायटिस) मध्ये देखील जांभूळातील कषाय (तुरट) रस उपयोगी ठरतो. पाचक व रुचकर तसेच वीर्यवृद्धीकारक जांभूळ केवळ रोहिणी नक्षत्रवाल्यांनीच काय सर्वांनीच उपासना करावा असा वृक्ष आहे.

१) नक्षत्र नाम मंत्र	–	। रोहिण्ये नमः ।
२) नक्षत्र देवता मंत्र	–	। प्रजापतये नमः ।
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र	–	। ब्रह्मयज्ञेति मंत्रः ।
४) नक्षत्र स्वामी मंत्र (चंद्र)	–	दधिशंखतुषाराभं क्षीरोदार्णवसंभवम् ।
(पौराणिक)		नमामि शशिनं सोमं शम्भोर्मुकुटभूषणम् ।।

आराध्यवृक्षाची पूजा अनिष्ट काळात करावी. ही पूजा कमीत कमी १६ दिवस करावी. संकल्प करून प्रार्थना करावी व नक्षत्रदेवतेचा मंत्र १०८ वेळा म्हणावा. किंवा चंद्राचा पौराणिक मंत्र ११२ वेळा म्हणावा. वृक्षाला पाणी घालून हळद–कुंकू वहावे. दूध–साखरेचा नैवेद्य दाखवावा. पांढरे फूल वहावे.

पूजा : रोहिणी नक्षत्राचे पहिले चरण असता, मंगळवारी पूजा सुरू करून १६ दिवस करावी. दुसरे चरण असताना शुक्रवारी पूजा सुरू करून १६ दिवस करावी. तिसरे चरण असता बुधवारी पूजा सुरू करून २० दिवस करावी. चौथे चरण असताना सोमवारी पूजा सुरू करून २८ दिवस करावी.

पूजा काल संपल्यावर शेवटच्या दिवशी ७ मुलांना पोटभर दूध पाजावे आणि तृप्त करावे.

- नक्षत्राचे नाव : रोहिणी
- इंग्रजी नाव : अल्डेबेरन (Aldeceran)
- तारकासंघाचे नाव : वृषभ
- ताऱ्यांची संख्या : ५
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : वृष मंडलातील अल्फा, थीटा, गॅमा, डेल्टा आणि एप्सिलोन तारे
- आयनांश : ४०°००' ते ५३°२०'
- राशी : वृषभ

- सूर्याचा वास : २५ मे ते ८ जून (सुमारे)
- नक्षत्राकृती : शकट
- नक्षत्रस्वामी : चंद्र
- नक्षत्रदेवता : ब्रह्म
- शुभ अंक : २, ६
- शुभ रंग : पांढरा, मोतिया
- शुभ रत्न : मोती, हिरा
- नक्षत्राक्षरे : ओ, बा, बी, बू
- आराध्यवृक्ष : जांभूळ
- बोटॅनिकल नेम : **Syzygium cuminii L Skeels**
- क्षेमकर वृक्ष : बांबू
- धार्योषधी : आघाडा
- जपासाठी मंत्र : । ब्रह्मदेवाय नमः । (जपाची संख्या : ५०००)
- नक्षत्र स्तुती : प्रजापते रोहिनी वेतु पत्नी । विश्वरुपा बृहती चित्रभानु ।।
  सा नो यज्ञस्य सिविते दधातु । यथा जीवमे शरदः सवीराः ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे)
  ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यात पूर्वेला, डिसेंबर–जानेवारी महिन्यांत डोक्यावर, मार्च–एप्रिल महिन्यात पश्चिमेकडे.

५. मृग
मूर्तीमंत नजाकत

मिरगाचा पहिला पाऊस म्हणजे शेतीची भरभराट असं जणू काही समीकरणच जमलेलं आहे. शेतकऱ्यांच्या शेतीकामाशी संबंधित असं हे नक्षत्र असल्यामुळे अगदी सामान्यातल्या सामान्यांनाही हे ओळखता येणारं असं नक्षत्र आहे. इंग्रजीत **Orion** म्हणून हे नक्षत्र ओळखलं जातं. दरवर्षी ७ जूनला हे नक्षत्र आकाशात दिसते. नक्षत्रात एकूण ११ तारे असतात. चार पाय, तोंड, शेपूट आणि पोटातला बाण. यापैकी पाय आणि बाण अगदी स्पष्टपणे ओळखायला येते.

मृग नक्षत्राचं तत्त्व आहे वायू. त्यामुळे या नक्षत्रावरील व्यक्ती नाजूक असतात. मृगाचे पहिले २ चरण वृषभ राशीत, तर नंतरचे २ चरण मिथुन राशीत येतात. या नक्षत्रावरील व्यक्तिंच्या स्वभावात चपळता, हुशारी, बोलकेपणा इ. गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. त्याचबरोबर या व्यक्ती सुशील, चारित्र्यसंपन्न, ईश्वरभक्तित रममाण असणाऱ्या, संतुष्ट आणि परोपकारी असतात. याच्या बरोबरीनेच कलाकौशल्याची आवड व त्यात पारंगत असतात तसेच खेळाडू, व्यवहारी, अभ्यासू वृत्तीच्या असतात.

वाताच्या प्रबलतेमुळे उंच शिडशिडीत बांधा असतो. शारीरिक क्षमतेच्या दृष्टीने शरीर फारसे साथ देत नसताना देखील या व्यक्तिंना व्यवस्थितपणा, नीटनेटकेपणा, स्वच्छता यांची आवड असते.

प्रकृती नाजूक, शक्ती कमी यामुळे शरीराला अजिबात श्रम झेपत नाहीत. तसेच हवामानातले बदलदेखील सोसवत नाहीत. श्वसनसंस्थेशी संबंधित विकार यांना प्रामुख्यानें होतात. हवामानात बदल झाला रे झाला, की मृग नक्षत्राची व्यक्ती आजारी पडलीच म्हणून समजावी. मज्जासंस्थादेखील दुर्बल असते. श्वसनासंबंधीचे म्हणजेच सर्दी–पडसे, दमा, धाप लागणं, पक्षाघात (Paralysis) इ. विकार यांच्यात आढळून येतात.

आपले पूर्वज असणारे पौराणिक, ज्योतिष विषयक, ऋषिमुनी, आयुर्वेद तज्ज्ञ असले पाहिजेत. प्रमेहावर मात करणारा जांभूळ त्यांनी रोहिणी नक्षत्रवाल्यांसाठी वापरला तर कफघ्न, पित्तघ्न खैरवृक्ष त्यांनी मृग नक्षत्राचा आराध्यवृक्ष म्हणून सांगितला आहे. कफाच्या विरुद्ध गुणांचे रस म्हणजे तिक्त, कषाय, कटू (कडू, तुरट, तिखट) हे होत. आम्ल, मधुर व लवण (आंबट, गोड व खारट) रसांनी कफ वाढतो. खैरातील कफदघ्न तेच नेमके हेच गुण त्यांनी नेमके हेरले व हा वृक्ष आराध्यवृक्ष म्हणून सांगितला आहे.

खैरापासूनच कत्या अथवा कात तयार केला जातो. कात हा कफघ्न, मुखशुद्धिकारक व रुची वाढविणारा आहे. खोकल्याची येणारी उबळ थांबविण्यासाठी असो किंवा कफामुळे तोंडाला येणारा चिकटा असो, यांच्यावर उपयोगी, उपकारी ठरतो तो कातच. घसा साफ करण्याच्या त्याच्या गुणामुळेच की काय तब्येतीनं गाणाऱ्या गायकांच्या व श्रोत्यांच्या डब्यांमध्ये व मुखातील तांबुलामध्ये याचा लीलया संचार होतो. खैर हा रक्तवर्धक व रक्त स्थापक देखील आहे.

बाभळीच्या कुळीचं नातं सांगणारा खैर अथवा खदिर वृक्ष दिसतोही तसाच. शास्त्रीय परिभाषेत याला **Acacia Catechu** म्हणतात. खोडापासून कत्या (कात) काढतात किंवा तेलही काढता येतं. या तेलाला 'इरिमेदादि' तेल असे म्हणतात जे चरबीचा नाश करतं. त्याचबरोबर पित्तामुळे तोंडात आलेल्या व्रणांवरदेखील हे तेल उपयोगी आहे.

खैराची उत्पत्ती साक्षात् प्रजापतीपासून झाली असे मानले जाते. म्हणून ते इतकं महत्त्वपूर्ण असं झाड मानलं गेलं आहे. पाने शमीच्या झाडासारखी, लाकूड टिकाऊ व मजबूत असते. याच्या पांढऱ्या सालीपासून उकडून कात तयार करतात. खैराचं झाड तसे भारतभर सापडते. पण उत्तर भारतात या झाडापासून मिळणाऱ्या काताचं अधिक प्रस्थ आहे. खैराच्या झाडाच्या मूळ, साली, पान, फूल, फळ, डिंक इ. सर्वांचाच उपयोग विविध रोगांवर (विशेषत: कुष्ठरोगांवर) केला जातो.

आता क्रमाने पूजाविधी व वृक्ष पूजेच्या वेळच्या मंत्रांची ओळख करून घेऊ या.

१) नक्षत्र नाम मंत्र	–	*। मृगशीर्षभ्य नम: ।*
२) नक्षत्र देवता मंत्र	–	*। सोमाय नम: ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र	–	*। इमंदेवेति मंत्र: ।*
४) नक्षत्र स्वामी मंत्र (पौराणिक)	–	*धरणीगर्भसंभूतं विद्युत्कांतिसमप्रभम् । कुमारं शक्तिहस्तं च मंगलं प्रणमाम्यहम् ।।*

या वृक्षाची पूजा १८ दिवस करावी. प्रथमत: संकल्प करून प्रार्थना करावी. नक्षत्र देवतेचा किंवा पुराणोक्त किंवा वरील पैकी कोणताही मंत्र १०८ वेळा जपावा. वृक्षाला पाणी घालून पुजावे. हळद, कुंकू वाहून पांढरे किंवा लाल फूल वहावे. खिरीचा नैवेद्य दाखवावा.

पूजा : मृग नक्षत्राच्या पहिल्या चरणात पूजकाचा जन्म झाला असल्यास रविवारी पूजा सुरू करून ३० दिवस करावी. दुसऱ्या चरणात जन्म झाला असेल तर बुधवारी पूजा सुरू करून १८ दिवस

करावी. तिसरे चरण असेल तर शुक्रवारी पूजा सुरू करून २१ दिवस करावी. चौथे चरण असताना मंगळवारी पूजा सुरू करून २१ दिवस करावी.

पूजेच्या कालावधीनंतर गुरुवारी खीर भात व १ केळे वाहत्या पाण्यात सोडावे.

- नक्षत्राचे नाव : मृग
- इंग्रजी नाव : ओरायन (Orion)
- तारकासंघाचे नाव : ओरायन
- ताऱ्यांची संख्या : ३
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : मृग मंडलातील लेम्डा, फाई–१ आणि फाई–२ तारे
- आयनांश : ५३°२०' ते ६६°४०'
- राशी : वृषभ/मिथुन
- सूर्याचा वास : ८ मे ते २२ जून (सुमारे)
- नक्षत्राकृती : हरणाचे डोळे
- नक्षत्रस्वामी : मंगळ
- नक्षत्रदेवता : चंद्र
- शुभ अंक : ५, ६
- शुभ रंग : पांढरा, मोतिया, हिरवा
- शुभ रत्न : मोती, पाचू
- नक्षत्राक्षरे : बे,बो / का,की
- आराध्यवृक्ष : खैर
- बोटॅनिकल नेम : Acacia Catechu L.F. Wild
- क्षेमकर वृक्ष : पिंपळ
- धार्योषधी : शेवरी
- जपासाठी मंत्र : । चंद्रदेवाय नमः । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : सोमो राजा मृगशीर्षेन आगन् । शिवं नक्षत्रं प्रियमस्य धाम ।। आप्यायमानो बहुधा जनेषु । रेतः प्रजां यजमाने दधातु ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) डिसेंबर–जानेवारी महिन्यात पूर्वेला, फेब्रुवारी–मार्च महिन्यात डोक्यावर, एप्रिल–मे महिन्यात पश्चिमेकडे.

६. आर्द्रा
स्वार्थासहित चातुर्य

मृगाचा पाऊस सर्वत्र पडतो आणि सारी पृथ्वी आल्हादून जाते आणि मग जिकडे–तिकडे आर्द्रता निर्माण करणारं आर्द्रा नक्षत्र येतं. इंग्रजीत हे Grama geminorum (गॅमा जेमिनोरम) या

नावानं ओळखलं जातं. या नक्षत्रात एकच तेजस्वी तारा असतो. दागिन्यातील पदकाप्रमाणे असणाऱ्या तारकांच्या या समूहात एकूण सात तारे असतात. लालसर रंगाचं हे नक्षत्र कार्तिक, मार्गशीर्ष व पौष महिन्यात रात्रभर आकाशात दिसतं.

ह्याचे चारही चरण मिथुन राशित येतात. हे नक्षत्र विद्वत्तेचं आणि बुद्धिमत्तेचं द्योतक आहे. पण एखाद्या जातिवंत शिक्षकालाच शोभावं अशा थाटात ह्या जन्मनक्षत्राचे लोक अचूकपणे दुसऱ्याचे दोष शोधतात किंवा दोषावर बोट ठेवतात. त्याच्या बरोबरीनं स्वत:मधील असलेल्या विद्वत्तेमुळे की काय, पण त्यांच्यात घमेंडखोरपणा देखील असतो. संशोधन, नाजूक कलाकुसरीची कामे, कोरीव काम, फोटोग्राफी, स्थापत्यकला (Architecture) इ. यांची कार्यक्षेत्रे असू शकतात. कलेला गती व वाव देणारं असं हे नक्षत्र त्याच्या स्वभावाच्या अगदी विरुद्ध अशा डॉक्टरकीच्या व्यवसायातही त्यांना यश देतं.

मिथुन राशिचा असणारा हळवेपणा, संवेदनशीलता, दुसऱ्यांबद्दलची काळजी, स्वच्छतेची आवड इ. गुण या जन्म नक्षत्रवाल्यांमध्ये प्रकर्षाने दिसून येतात. शरीराची ठेवण उंच, सडपातळ, थोडीफार कृशतेकडेच झुकलेली अशी असते. कृश असूनही या व्यक्ती काटक असतात. क्वचितच आजारी पडतात. सहनशीलता, सोशिकपणा या त्यांच्या स्वभावातील आणखी काही महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

या व्यक्तिंची आकलन व ग्रहणशक्तिही उत्तम असते. पाठांतर आणि स्मरणशक्तिस वाव देणारे असे हे नक्षत्र आहे. यामुळेच या जन्मनक्षत्रवाल्या व्यक्तिंना कोणतीही गोष्ट समजून घ्यायला व पुढे आत्मसात करायला फारशी अवघड जात नाही. रोगप्रतिकारक शक्ती उत्तम असल्यामुळे फारसे रोग होत नाहीत. परंतु वाणीचे विकार जसे वाणीत दोष असणे– तोतरेपणा, अडखळत बोलणे, अस्पष्ट शब्दोच्चार इ. असतात. त्या बरोबरीनेच कानाचे रोग, संधिवात, दमा,पक्षाघात व स्त्रियांना मासिक पाळीच्या संबंधित विकार इ. रोग होऊ शकतात.

आर्द्राचा आराध्यवृक्ष सांगितला आहे, कृष्णागुरू अथवा कृष्णअगरु. Daicergia Sissoo असं याचं शास्त्रीय परिभाषेतील नामकरण. प्रत्यक्षात चंदनाशी साधर्म्य दाखविणारा हा वृक्ष कफघ्न म्हणून खोकला, दमा, उचकी इ. वर उपयोगी आहे. तसेच सांध्यांच्या दुखण्यावरदेखील परिणामकारकपणे उपयोगी ठरणारा आहे. शास्त्रकार या वृक्षाच्या ऐवजी चंदन हा देखील आर्द्रा नक्षत्रासाठीचा आराध्यवृक्ष म्हणून सांगतात.

चंदनासारखीच शीतलता आणि सुगंध देणारा हा वृक्ष आहे. कृष्णागुरू वृक्षाच्या खोडाचा आतील भाग खूप कठीण असतो. त्यामानाने त्याची साल खूपच पातळ असते. गाभ्याचा भाग जाळल्यानंतर सुगंध दरवळतो. त्यामुळेच धूपात, अगरबत्तीत, उटण्यात, पावडरीत तसेच सुगंधी द्रव्यांमध्ये अगरू वापरलं जातं. दक्षिणेकडे तर याची कमी प्रतीचे चंदन म्हणून वर्गवारी केली जाते. कित्येकदा जाणकार नसलेल्या आपल्यासारख्या सामान्य पर्यटकाला दक्षिणेत या अगरूचंच खोड चंदनी खोड म्हणून दिलं जातं. अगरूच्या वापरामुळेच की काय उदबत्ती ही अगरु/अगरबत्ती म्हणून ओळखली जात असावी.

कृष्णागरुच्या सालीचा लेप शीतलता प्रदान करणारा असतो. सालीची पूडही कानाच्या, डोळ्यांच्या, त्वचेच्या विकारांवर गुणकारी असते. कृष्णअगरूची साल च्यवनप्राशातही वापरतात. ही साल वात व कफाचा नाश करते तसेच अग्निमांद्य (जठराग्नीला आलेले मंदपण) देखील नष्ट करते.

आयुर्वेदिय ग्रंथ याच्या सालीला आमवात वातवृद्धी यावर उपयोगी आहे असं प्रतिपादन करतात. त्यामुळेच संधिवातावरदेखील ही साल उपयोगी पडणारी आहे.

कृष्णागुरूत हाडांना बळकटी देणारी मूलद्रव्ये विपुल प्रमाणात असतात. हा वृक्ष आयुर्वेदिय उल्लेखातील पुत्रंजीवासारखा दिसणारा आहे. हा वृक्ष उत्तरेच्या तुलनेत दक्षिणेकडे अधिक आढळतो. स्वतः झिजून दुसऱ्याचं जीवन शीतल आणि सुगंधी करणाऱ्या चंदनाचा गुण सहनशीलता बाळगणाऱ्या आर्द्रा नक्षत्रवाल्यांच्या स्वभावाशी अगदी जवळचं नाते सांगणारा वाटतो. साधवो न हि सर्वत्र चन्दनं न वने वने।' अर्थात् साधुपुरुष सर्वत्र नसतात, जसे सर्वच वनांमध्ये चंदन आढळून येत नाही. या श्लोकपंक्ती प्रमाणे अशी सहनशीलतेची भावना असणारी मंडळीही तशी दुर्मिळच असं वाटतं! दम्यासारखे कफविकार आणि संधिवात, पक्षाघात, तोतरेपणा असे वातविकार होण्याची शक्यता असलेल्यांसाठी त्यावर मात करणाऱ्या कृष्णागरूची उपासना अगदी सुयोग्य वाटते.

कृष्णागरूच्या वैविध्यपूर्ण उपयोगितेला जाणून घेतल्यानंतर क्रमाने आता याचा पूजाविधी व विविध मंत्र जाणून घेऊ या.

१) नक्षत्र नाम मंत्र – *। आर्द्रायै नमः ।*

२) नक्षत्र देवता मंत्र – *। रुद्राय नमः ।*

३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। नमस्ते रुद्रेति मंत्रः ।*

४) नक्षत्र स्वामी मंत्र – *अर्धकायं महावीर्यं चंद्रादित्यविमर्दनम् ।*
सिंहिकागर्भसंभूतं तं राहुं प्रणमाम्यहम् ।।

कृष्णागरूची पूजा कमीत कमी सात दिवस करावी. हा वृक्ष न मिळाल्यास चंदनवृक्षाची पूजा करावी. संकल्प करून पूजा करावी. पूजा करताना नक्षत्र देवता मंत्र किंवा नक्षत्र नाम मंत्र किंवा वरीलपैकी कोणताही एक मंत्र १०८ वेळा जपावा. तो न जमल्यास राहूचा पौराणिक मंत्र १२१ वेळा म्हणावा. पूजा करताना वृक्षाला पाणी घालावे. हळद, कुंकू, निळे फूल वहावे. तिळाचा नैवेद्य दाखवावा.

पूजा : आर्द्रा हे जन्मनक्षत्र प्रथम चरणामध्ये असणाऱ्यांनी पूजा गुरूवारी सुरू करून ७ दिवस करावी. दुसऱ्या चरणात जन्म झाला असेल तर पूजा शनिवारी सुरू करून १५ दिवस करावी. तिसरे चरण असेल तर शनिवारी पूजा सुरू करून ७ दिवस करावी. चौथ्या चरणासाठी गुरूवारी पूजेचा प्रारंभ करावा व सलग ७ दिवस करावी.

पूजा काल संपल्यानंतर बुधवारी किंवा शनिवारी पूजकाच्या अंगावरून काळी लोकर उतरवून अग्नीत टाकावी.

- नक्षत्राचे नाव : **आर्द्रा**
- इंग्रजी नाव : **गॅमा जेमिनोरियम (Gama Geminoriom)**
- तारकासंघाचे नाव : **मिथुन**
- ताऱ्यांची संख्या : **१**
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : **मृग मंडलातील अल्फा तारा**
- आयनांश : **६६°४०' ते ८०°००'**
- राशी : **मिथुन**
- सूर्याचा वास : **२२ जून ते ६ जुलै (सुमारे)**

- नक्षत्राकृती : रत्न
- नक्षत्रस्वामी : राहू
- नक्षत्रदेवता : शंकर
- शुभ अंक : ६, ८
- शुभ रंग : मळकट पिवळा, तपकिरी हिरवा
- शुभ रत्न : गोमेद, पाचू
- नक्षत्राक्षरे : कु,घ,ड,छ
- आराध्यवृक्ष : कृष्णागरू
- बोटॅनिकल नेम : **Daicergia Sissoo Roxc.**
- क्षेमकर वृक्ष : नागचाफा
- धार्योषधी : पिंपळ
- जपासाठी मंत्र : । ॐ नमः शिवाय । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : आर्द्रया रुद्रः प्रथमान एति । श्रेष्ठो देवानां पतिरघ्नियानाम् ।। नक्षत्रमस्य हविषा विधेम । मा नः प्रजाँ, रीरिषन्मोत वीरान् ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) जानेवारी–फेब्रुवारी महिन्यात पूर्वेला, मार्च–एप्रिल महिन्यात डोक्यावर, मे–जून महिन्यात पश्चिमेकडे.

७. पुनर्वसु
स्वर्गाचे महाद्वार

काही नावं खरंच किती आशयघन असतात! आता या नक्षत्राचेच नाव बघा. अत्यंत तेजस्वी आणि सुंदर म्हणून चित्रा नक्षत्र, तर कुठे एखाद्या नक्षत्रातील ताऱ्यांमध्ये स्वतःचे तेज ठळकपणे दाखविणारी किंवा आरोहण करणारी म्हणून रोहिणी हे नाव पहा. धरणं आणि मोठाले प्रकल्प यांमुळे विस्थापित होणाऱ्यांचं पुनर्वसन केलं जातं हे आपण पाहतो पण प्रत्यक्षात ग्रह–ताऱ्यांनादेखील पुनर्वसनाची गरज असते असे वाचल्यावर मनुष्य आणि ग्रह तारे यांच्यात खरेच काही संबंध असतात हे प्रकर्षानं जाणवतं.

या नक्षत्राचा म्हणजे पुनर्वसुचा आकार घरासारखा असतो. हे नक्षत्र म्हणजे स्वर्गाचं महाद्वार समजलं जातं. सर्व ग्रह या नक्षत्रातून जातात. प्रत्यक्ष देवाचं पुनर्वसन करणारं हे नक्षत्र म्हणून याचे नाव पुनर्वसु असे आहे. इंग्लिशमध्ये पोलक्स (Polux) किंवा बीटा जेमिनोरम म्हणून ओळखले जाते. या नक्षत्राचे ३ चरण मिथुन राशित व चौथा कर्केत येतो. नक्षत्रात ४ तारे असतात.

या नक्षत्राची देवता आहे देवमाता अदिती. अष्टवसुंची आणि १२ आदित्यांची जन्मदात्री अदिती. ब्रह्माच्या दिती आणि अदिती या दोघी पत्नी. दिती अथवा दनुपासून जे पुत्र झाले ते दैत्य किंवा दानव या उलट अदितीचे पुत्र ते आदित्य. हिच्याच पोटी ३ पावले व्यापणाऱ्या वामनाच्या रूपाने विष्णुचा अवतार झाला.

या नक्षत्रावरील व्यक्तिंमध्ये अगदी दुर्मिळ असे गुण एकत्र नांदताना आढळतील. जसे अदिती मातेचं औदार्य, गुरूची/ बृहस्पतीची बुद्धीमत्ता, बुधाची स्मरणशक्ती आणि चंद्राचा स्वप्नाळूपणा इ. खरे तर हे गुण एकमेकांना घातक अथवा गोंधळ निर्माण करणारे आहेत. पण पुनर्वसुमध्ये मात्र ते गुण्यागोविंदानं एकत्र नांदताना दिसतात.

हे नक्षत्र खरे पाहता सात्विक अथवा शुभलक्षणी आहे. हे जन्मनक्षत्र असणारे पुरुष उंच बांध्याचे, सडपातळ, उभट चेहऱ्याचे असतात. तर स्त्रियादेखील उंच, रेखीव व प्रमाणबद्ध असतात. कला-कौशल्यात वाकबगार स्त्रियांचं हे जन्मनक्षत्र असते. गायक, वादक, चित्रकार, आर्किटेक्ट, शिक्षक, कलाकार, अकांऊटंट यांची या नक्षत्राशी अधिक जवळीक असते. समृद्धीच्या दृष्टीने सफल ठरविणारं हे नक्षत्र मात्र प्रकृतीच्या दृष्टीनं मध्यम स्वरूपाचं आहे. कफविकारांचा प्रभाव हे जन्म नक्षत्रवाल्यांच्या बाबतीत अगदी ठरल्यासारखं आहे. अपचन, मळमळ, गॅसेस यांचा प्रादुर्भाव कायम होतो. किडनीजन्य मूत्रविकार, दमा, खोकला, ताप, चक्कर, भोवळ ह्या रोगांचा त्रासदेखील या व्यक्तिंना होण्याची शक्यता असते. चंद्राचा व कर्क राशिचा प्रभाव म्हणूनच की काय, ह्या नक्षत्राच्या व्यक्ती भावनाप्रधान असतात.

या नक्षत्राचा आराध्यवृक्ष आहे बांबू अथवा वंश. आपल्या नावाप्रमाणे गुणधर्म असणारा हा वृक्ष खरंच अनेक पिढ्या (अनेक वर्षे) जगतो. *वेळू अथवा वंशापासूनच मधुर स्वर निर्माण करणारी, श्रीकृष्णाच्या ओठांवर विराजणारी वंशी अथवा बासरी निर्माण होते.*

यज्ञासाठीचा मंडप, विविध यज्ञपात्रे तसंच वेदी निर्माणासाठी फार प्राचीन काळापासून आपले ऋषि-मुनी या वंशाचा वापर करत असत. आजही आसाम, प.बंगाल इ. भागात बांबूची बेटं सापडतात. याच भागात बनविले जाणारे बांबूच्या कोवळ्या कोंबांचं लोणचं अत्यंत प्रसिद्ध आणि स्वादिष्ट असतं.

ज्वरघ्न, श्वासहन अशी बांबूची प्रसिद्धी आहे. पुनर्वसु नक्षत्रावरील व्यक्तिंना होणारी कफाची लक्षणे विचारात घेता, कफहन बांबूची या नक्षत्रासाठी आराध्यवृक्ष म्हणून योजना अगदी संयुक्तिक वाटते. सितोपलादी चूर्णातला बांबू हा एक महत्त्वाचा घटक आहे. शौचासंबंधीच्या तक्रारींवर हे चूर्ण म्हणजे हमखास इलाज आहे. तसेच अस्थिभंगावर सिलिकायुक्त वेळूचा (बांबूचा) उपयोगही केला जातो.

पाण्यामध्ये कित्येक वर्षे न कुजता उभा असणारा बांबू अत्यंत उपयोगी आहे. केवळ आराध्यवृक्ष म्हणून पूजेसाठीच नव्हे तर व्यावसायिक दृष्टीनेही याचं पुनर्वसन आवश्यक आहे.

बांबूच्या वृक्षाची एक खासियत आहे, की त्याच्या कोंबापासून नवनवीन बांबू तयार होतात व हे झाड वाढत रहाते. तसाच आपल्याही कुळाचा विस्तार व्हावा म्हणून या झाडाला व आपल्या कुळालाही वंश हे नाव दिले गेले. बांबूच्या बेटांचं गाव म्हणून प्रसिद्ध अशा वेणुग्रामाचा अर्थात् बेळगा वसविणारा कोणी पुनर्वसुवाला तर नसेल? केवळ पूजा म्हणूनच नव्हे तर आर्थिकदृष्ट्या फायदेशीर बांबूचे पुनर्वसन' पुनर्वसुंप्रमाणेच सर्व उद्योजकांनी करायला हवे.

आराधनेसाठी या नक्षत्राशी संबंधित वृक्षपूजेची माहिती करून घेऊ या.

१) नक्षत्र नाम मंत्र – *। पुनर्वसुश्याम् नमः ।*
२) नक्षत्र देवता मंत्र – *। अदित्यै नमः ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। आदिति द्योरिति मंत्रः ।*

४) नक्षत्र स्वामी मंत्र – *देवा नां च ऋषी नां च गुरूं कांचनसंन्निभम् ।*
बुद्धिभूतं त्रिलोकेशं तं नमामि बृहस्पतिम् ।।

या वृक्षाची किंवा पानांची कमीत कमी १४ दिवस पूजा करावी. संकल्प करून प्रार्थना करावी. नक्षत्रदेवतेचा मंत्र १०८ वेळा म्हणावा किंवा गुरूचा पौराणिक मंत्र १२१ वेळा म्हणावा.

पूजा : पुनर्वसु नक्षत्राच्या प्रथम चरणात जन्मलेल्यांनी मंगळवारी पूजा सुरू करून ती सलग १४ दिवस करावी, दुसऱ्या चरणात जन्मलेल्यांनी शुक्रवारी पूजा सुरू करून ती सलग २१ दिवस करावी. जन्म नक्षत्राचे तिसरे चरण असणाऱ्यांनी बुधवारी पूजा सुरू करून ३० दिवस करावी तर चौथ्या चरणात जन्मलेल्यांनी सोमवारी पूजेचा प्रारंभ करून २२ दिवस करावी.

पूजा संपल्यावर २ मुठी उडीद व १ मूठ तीळ त्या व्यक्तिच्या अंगावरुन एकदाच उतरवून ३ वेगवेगळ्या रस्त्यांवर टाकाव्यात.

- नक्षत्राचे नाव : पुनर्वसू
- इंग्रजी नाव : कॅस्टर व पोलक्स (Castor Pollux)
- तारकासंघाचे नाव : मिथुन
- ताऱ्यांची संख्या : २
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : मिथुन मंडलातील अल्फा आणि बीटा तारे
- आयनांश : ८०°०' ते ९३°२०'
- राशी : मिथुन / कर्क
- सूर्याचा वास : ६ जुलै ते २० जुलै (सुमारे)
- नक्षत्राकृती : घर
- नक्षत्रस्वामी : गुरू
- नक्षत्रदेवता : आदिती
- शुभ अंक : ३,७
- शुभ रंग : पिवळा, हिरवा, पांढरा
- शुभ रत्न : पुष्कराज, ओपल, पाचू
- नक्षत्राक्षरे : के, को, हा / हि
- आराध्यवृक्ष : बांबू
- बोटॅनिकल नेम : इराले
- क्षेमकर वृक्ष : वड
- धार्योषधी : रूई
- जपासाठी मंत्र : । अदितीमाताय नमः । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुति : पुनर्नो देव्यदितिः स्पृणोतु । पुनर्वसु नः पुनरेतां यज्ञम् ।।
पुनर्नो देवा अभियन्तु सर्वे । पुनः पुनर्वो हविषा यजामः ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे)
जानेवारी–फेब्रुवारी महिन्यात पूर्वेला, मार्च–एप्रिल महिन्यात डोक्यावर, मे–जून महिन्यात पश्चिमेकडे.

८. पुष्य
नक्षत्रसम्राट

पोषण करणारे अथवा पोषक वातावरण निर्माण करणारं ते पुष्य. पौष महिन्यात हे नक्षत्र रात्रभर आकाशात दिसू शकतं. पालन-पोषणाशी संबंधित नावावरून की काय ठावूक नाही, पण पुष्य नक्षत्राला नक्षत्राचा राजा म्हणायला हवा. तरीही प्रसिद्धीच्या झगमगाटापासून शब्दश: अगदी दूर असलेलं असं हे नक्षत्र आहे. तसं ते ओळखायला कठीण पण, बहुधा महिलांना हे निश्चितपणे ओळखता येत असावं. कारण गुरूवारी चंद्र पुष्य नक्षत्रात असतो तेव्हा गुरूपुष्यामृताचा योग असतो आणि सोनं खरेदीसाठी हा उत्तम दिवस म्हणून मानला जातो.त्यामुळं सुवर्णसंचय करणाऱ्या महिलांना हे नक्षत्र अधिक प्रिय असावं.

या नक्षत्राचे चारही चरण कर्क राशित येतात. या नक्षत्राची देवता आहे बृहस्पती. ब्रहती अर्थात् वाणी व तिचा हा स्वामी. भाषेचे किंवा वाणीचे महत्त्व त्याने सर्वप्रथम जाणले. त्यामुळेच तो देव गुरू व ऋषिंचाही गुरू ठरला. हा मंत्र द्रष्टा महातेजापासून उत्पन्न झाला. तो ब्रह्मणस्पती अर्थात् मंत्रांचा जाणकार अथवा त्यांचा द्रष्टा आहे. नभोमंडलात सूर्याखालोखाल गुरूंचे महत्त्व आहे. हे इतक्या विस्ताराने सांगण्याचे कारण म्हणजे या नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्ती देखील विद्यावान, अधिकारसंपन्न अशा असतात. आपापल्या क्षेत्रात उच्चपदावर पोहोचलेल्या या व्यक्ती उदात्त, न्यायी व समतोल व्यक्तिमत्वाच्या असतात. या नक्षत्रावर जन्मणारे पुरुष उंच, भारदस्त प्रमाणशीर बांध्याचे तर स्त्रियाही लावण्यवती म्हणाव्या अशा मोहक आणि आकर्षक असतात. एखाद्या खानदानी, पिढीजात श्रीमंताच्या चेहऱ्यावर विलसणारं समाधान, आनंद, तृप्तता या गोष्टी या नक्षत्रवाल्यांची ओळख ठरावी. राजे- रजवाडे, न्यायाधीश, सोन्या-हिऱ्याचे व्यापारी, राजकीय नेते (बहुधा बुद्धिवान्) असे लोक पुष्यनक्षत्राचे असण्याची शक्यता अधिक असते.

या नक्षत्राचा आराध्यवृक्ष आहे पिप्पल अथवा पिंपळ. वेदांच्या यजुर्वेदाशी संबंधित पैप्पला शाखा ही पिप्पल + अह म्हणजेच पिंपळाची फळे खाऊन जगणाऱ्या व ज्ञानसाधना करणाऱ्या ऋषिंची म्हणून श्रेष्ठ गणली जाते. ज्ञानाशी या वृक्षाचा खूप निकटचा संबंध आहे असं वाटतं. गौतमाला महात्म बुद्ध बनवणारा, आत्मज्ञान मिळवून देणारा हा वृक्ष आहे. सर्वात जास्त कार्बन डाय-ऑक्साइड शोषू घेण्याच्या या वृक्षाच्या गुणधर्मामुळेच तपस्येसाठी, आत्मचिंतनासाठी पूर्वापार आपले ऋषि-मुनी या झाडाखाली बसत असावेत.

पवित्र अशा या वृक्षाचे अनेक औषधी उपयोग आहेत. बोबडेपणा घालविण्यासाठी व वाणी शुद्ध होण्यासाठी पिंपळाची सुकलेली फळे उपयोगी ठरतात. तसेच पिंपळाची फळे हृदयाला ब देणारी आहेत. कफ-पित्तनाशक असलेल्या या वृक्षाचा उपयोग विषमज्वर, कृमी, कुष्ठ, दाह, क्षय इ विकारांमध्ये केला जातो. उदर वंदना व पोटाचे अन्य विकार यांवर पिंपळफळे उपयोगी आहेत. गू दुधासोबत पानांचं चूर्ण करून घेतल्यास मलावरोधात उपयोगी ठरते. अनेक पिढ्यांचा साक्षीदा ठरणाऱ्या दीर्घायुषी वटवृक्षाप्रमाणेच पिंपळ हादेखील दीर्घायुषी आहे. जगातील सर्वात जुना पिंप श्रीलंकेत अनुराधापूर येथे आढळतो. हा वृक्ष सम्राट अशोकाच्या कन्येने, संघमित्रेने बोधगयेतील मू बोधिवृक्षापासून रोप तयार करून तिथं लावला आहे, असे बौद्धधर्मीय मानतात.

दीर्घायुषी अशा या पिंपळ वृक्षाशी काही अशुभ घटकही जोडलेले आहेत. बारा पिंपळावरचा मुंजा असो की भुताखेतांचा निवास असो, दीर्घायुषी जुन्या पुराण्या वाड्यांशी जशा अनेक दंतकथा जोडल्या जातात त्याचप्रमाणे पिंपळाबरोबरही अनेक दंतकथा जोडल्या गेलेल्या दिसतात.

दीर्घायुषी असणारा हा वृक्ष दीर्घ मुदतीचा कफ व श्वासाच्या विकारांवरदेखील उपयोगी आहे. यावरून पूर्वीच्या काळी ज्योतिषशास्त्रज्ञांना आयुर्वेदाचे ज्ञान होते हे लक्षात येते. गीतेत भगवंतांनी अश्वत्थः सर्व वृक्षाणाम (सर्व वृक्षांमध्ये मी अश्वत्थ / पिंपळ वृक्ष आहे) असे म्हणून त्याच्या पवित्रतेची जणू साक्षच दिलेली आहे. अशा या झाडाचा पूजाविधी असा.

१) नक्षत्र नाम मंत्र – *। पुष्यायै नमः ।*

२) नक्षत्र देवता मंत्र – *। बृहस्पतये नमः ।*

३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। बृहस्पतेति मंत्रः ।*

४) नक्षत्र स्वामी मंत्र – *नीलांजनसमाभासं रविपूत्रं यमाग्रजम् ।।*
छायामर्तंडसंभूतं तं नमानि शनैश्चरम् ।।

या वृक्षाची पूजा कमीत कमी ११ दिवस करावी. वृक्ष जवळ नसेल तर ७ पाने आणून पूजा करावी. पुष्य जन्म नक्षत्र असलेल्यांनी याची पूजा करताना वृक्षास पाणी घालावे. हळद–कुंकू व लाल फूल वहावे. गुळ खोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा.

पूजा : या जन्म नक्षत्राच्या प्रथम चरणात जन्म झालेल्यांनी शनिवारी पूजा सुरू करून ११ दिवस करावी, दुसऱ्या चरणात जन्म झालेल्यांनी बुधवारी पूजा सुरू करून ११ दिवस करावी, तिसरे चरण असणाऱ्यांनी शुक्रवारी पूजेचा प्रारंभ करून ११ दिवस करावी. तर चौथ्या चरणात जन्मलेल्यांनी मंगळवारी पूजा सुरू करून २० दिवस करावी. पूजा काल संपल्यानंतर तांबडे फूल, १ मूठ तांदूळ, खडेमीठ हे सर्व घेऊन नदीकाठच्या पिंपळाची पूजा करावी किंवा पिंपळाच्या पानांची या साहित्याने पूजा करून या पूजा साहित्यासह पाने नदीत विसर्जन करावीत.

- नक्षत्राचे नाव : पुष्य
- इंग्रजी नाव : कॅन्सर (Cancer)
- तारकासंघाचे नाव : कर्क
- ताऱ्यांची संख्या : ३
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : कर्क मंडलातील गॅमा, डेल्टा आणि थीटा तारे
- आयनांश : ९३°२०’ ते १०६°४०’
- राशी : कर्क
- सूर्याचा वास : २० जुलै ते ३ ऑगष्ट (सुमारे)
- नक्षत्राकृती : बाण
- नक्षत्रस्वामी : शनी
- नक्षत्रदेवता : बृहस्पती
- शुभ अंक : ४,८
- शुभ रंग : पिवळा, सोनेरी, पांढरा, मोतिया
- शुभ रत्न : पुष्कराज, मोती

- नक्षत्राक्षरे : हु, हे, हो, डा
- आराध्यवृक्ष : पिंपळ
- बोटॅनिकल नेम : Ficus religiosal
- क्षेमकर वृक्ष : पळस
- धार्योषधी : कापूस
- जपासाठी मंत्र : । बृहस्पतये नमः । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : नक्षत्र स्तुतिः बृहस्पतिः प्रथमं जायमानः।
  तिष्य नक्षत्रमभि संबभूव ।।
  श्रेष्ठो देवानां पृतनासु जिष्णुः ।
  दिशो नु सर्वा अभयं नो अस्तु ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) फेब्रुवारी–मार्च महिन्यात पूर्वेला, एप्रिल–मे महिन्यात डोक्यावर, जून–जुलै महिन्यात पश्चिमेकडे.

९. आश्लेषा

हळवे, अवखळ, आसक्त

नक्षत्रमालेतील नववे नक्षत्र आश्लेषा हे आहे. आश्लेषा याचा अर्थ ज्याने आपल्या डोक्याव मोठा भार पेललेला आहे तो. ही उपमा नागाला किंवा सर्पाला लागू होते. साऱ्या पृथ्वीचा भार ज आपल्या फण्यावर ज्याने पेललेला आहे असा शेषशा नाग म्हणजे आश्लेषा या शब्दाचे चपख वर्णन आहे. आश्लेषा हा ५ तारकांचा एक समूह अ यातील एक तारा तेजस्वी आहे. इंग्रजीमध्ये य नक्षत्राला झिटा हैड्री असे म्हणतात. राम लक्ष्मणातील लक्षणाचे नक्षत्र आश्लेषा होते. म्हणून याल लक्ष्मण नक्षत्र असेही म्हणतात. या नक्षत्राचे चारही चरण कर्क राशीमध्ये येत असून प्रत्येक चरणा गुरू, शनी, शनी आणि गुरू यांचे स्वामित्त्व आहे. ग्रह मालिकेतील बुध हा ग्रह आश्लेषा नक्षत्रा स्वामी आहे. आश्लेषा नक्षत्राचा राशी स्वामी चंद्र असूनही चंद्र या नक्षत्राशी जरा फटकूनच अस असे दिसते. पुष्प नक्षत्रावर जीवापाड प्रेम करणारा चंद्र आश्लेषाजवळून जाताना थोडीशी डोळेझाक करतो. याचे कारण कदाचित चंद्राच्या भ्रमण मार्गापासून थोड्या दूर अंतरावर आश्लेषा नक्षत्राचे ता आहेत. कश्यप ऋषी आणि कद्रू यांना सर्प संतती झाली होती. त्यामध्ये अनंत, वासुकी, शे पद्मनाभ, कंबल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालिया असे प्रमुख नऊ सर्प होते. आणखी इत सर्प होते. सर्व धर्मामध्ये नागांबद्दल भक्ती असून त्यांना नागदेवता मानले जाते. अनेक मंदिराम आपल्याला नागाची मंदिरे दिसतात. नागपंचमीचा सणही उत्साहाने साजरा केला जातो. या नक्षत्र आकृती आकाशामध्ये नागाप्रमाणे फणा काढून वेटोळे घालून बसलेली दिसते. तिचे स्वरूप सु चक्रासारखे आणि ९ या आकड्यासारखेही दिसते. पौष पौर्णिमेनंतर आणि माघ महिन्यामध्ये आश्ले नक्षत्राचे आकाशामध्ये दर्शन होते.

हे नक्षत्र गंडात ताऱ्यातील नक्षत्र असून या नक्षत्राच्या व्यक्तिंवर जीवनामध्ये अनेक मोठी सं



नम: ||

आणि गंडांतरे येतात. त्यामुळे या नक्षत्राच्या कोणत्याही चरणावर जरी जन्म झाला तरी त्यांची शांती केली जाते. या नक्षत्राच्या व्यक्तिंच्या डोक्यावर कार्याचा मोठा भार पडतो आणि मोठमोठ्या जबाबदाऱ्या त्यांना पार पाडाव्या लागतात. अत्यंत भावनाशील असा त्यांचा स्वभाव असतो आणि मोठी कार्यक्षमता त्यांच्यामध्ये असते. अनेकदा त्या खूप कार्यमग्न असतात, तर काही वेळा त्या अत्यंत आळशी आणि निवांत पहुडलेल्या असतात. जणू नागाप्रमाणे किंवा अजगराप्रमाणे त्या अनेकदा वेटोळे घालून सुस्त पडलेल्या असतात. मात्र त्यांना डिवचले किंवा आव्हान दिले तर त्या अत्यंत वेगवान हालचाली करून आपली कार्यक्षमता सिद्ध करतात. संकटे ओढवून घ्यायची आणि त्यातून तावून सुलाखून बाहेर पडायची त्यांना सवय असते. या व्यक्ती चंचल मनाच्या, सुखासीन आणि हळव्या असतात. त्यांना चैनीची आणि आरामाचीही आवड असते. या व्यक्तिंना फार मोठी महत्त्वाकांक्षा नसते, मात्र अशक्यप्राय कार्य करून दाखवण्याची त्यांची क्षमता असते. या व्यक्ती स्वभावाने दिलदार, उदार मनाच्या आणि दानशूर असतात. मात्र त्यांना स्वत:च्या मतावर ठाम राहता येत नाही. अनेकदा दुसऱ्याच्या सांगण्याप्रमाणे त्या वागतात आणि त्यांचा स्वभाव बदलणारा असतो. जीवनाचा उपभोग घ्यायची त्यांना आवड असते.

आश्लेषा नक्षत्राचे दैवत नाग म्हणजे सर्प हे आहे. या व्यक्ती ऐहिक जीवनामध्ये अनेकदा यशस्वी आणि भाग्यवान असतात. संपत्ती, सत्ता आणि ऐश्वर्य याबाबतीत या व्यक्ती वरच्या स्थानावर असतात. काही वेळा संशयी, मनोराज्यामध्ये रमणाऱ्या आणि आळशी अशाही दिसतात. न्यूनगंडाची किंवा अहंगंडाची सीमारेषा यांच्यामध्ये पुसट झालेली दिसते. या नक्षत्रावरील व्यक्तींना फारसे दाहक रोग होत नाहीत. मात्र झालेले रोग दीर्घकाळ राहतात. यांची प्रकृती बहुधा कफ प्रवृत्तीची असते. हवेतील बदलांमुळे त्रास होतो. वातविकार, पोटाचे विकार, अपचन, शीत विकारांपासून त्रास होतो.

आश्लेषा नक्षत्राचा वृक्ष नागचाफा हा आहे. याचे इंग्रजी नाव – गट्टफेरी (मेसुआ फेरिया) असे आहे. यालाच आयर्न वूड ट्री किंवा कोब्राज सॅफ्रॉन असेही म्हणतात. हा एक मोठ्या आकाराचा वृक्ष असून याची फुले तळहाताएवढी असतात. फुलांना चार ते पाच पाकळ्या असतात. फुले सुवासिक असून आकर्षक रंगाची आणि नागाच्या फण्यासारखी असतात. नागचाफ्याची पानेही मोठ्या आकाराची असतात. नागचाफ्याचे मूळ, पाने, फुले, साल आणि बिया औषधी असतात. हृदयरोगावर, कफ, वायुदोषावर, मूळव्याध, अंगदुखी, जळजळ इ. आजारांवर नागचाफ्याचा उपयोग होता. नागचाफ्यातील फुलांमध्ये नागकेशर असते. ते पीडाशामक, पाचक, रक्तसंग्राहक आणि शीतल असते. अनेक आयुर्वेदिक कल्प तसेच च्यवनप्राश यामध्ये नागकेशराचा वापर केला जातो.

नागचाफ्याची पूजा करताना त्याची पाने किंवा फुले आणून पूजा करावी किंवा वृक्षाजवळ जाऊन पूजा करावी.

१) नक्षत्र देवता यंत्र : *। सर्पेभ्यो नम: ।*
२) नक्षत्र नाम यंत्र : *। अश्रणोयै नम: ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र : *। नमोस्तु सर्पेती मंत्र: ।*
४) पौराणिक मंत्र : *प्रियंगुकलिकाश्यामं रुपेणाप्रतिमं बुधम् ।*
सौम्यं सौम्यगुणोपेतं बुध प्रणमाम्यहम् ।।

पूजा : पुजेसाठी हळद कुंकू आणि पांढरे फूल वहावे. दुधाचा किंवा तिळाचा नैवेद्य दाखवावा.

नक्षत्र देवता मंत्र १०८ वेळा म्हणावा. आश्लेषा नक्षत्राच्या पहिल्या किंवा चौथ्या चरणावर जन्म झाला असेल तर गुरवारी पूजा सुरू करून पुढे १५ दिवस करावी. दुसरे आणि तिसरे चरण असल्यास शनिवारी पूजा सुरू करून पुढे १५ दिवस करावी. पूजा झाल्यावर देशी गाईला चारा घालावा. तसेच मुंग्यांना साखर घालावी.

- नक्षत्राचे नाव : आश्लेषा
- इंग्रजी नाव : झिटा हैड्री (Zita Hydri)
- तारकासंघाचे नाव : वासुकी
- ताऱ्यांची संख्या : ५ ते ६
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : महासर्प मंडलातील डेल्टा, एप्सिलोन, एटारो, सिग्मा आणि इतर तारे
- आयनांश : १०६°४०' ते १२०°००'
- राशी : कर्क
- सूर्याचा वास : ३ ऑगष्ट ते १७ ऑगष्ट (सुमारे)
- नक्षत्राकृती : चक्र
- नक्षत्रस्वामी : बुध
- नक्षत्रदेवता : सर्प
- शुभ अंक : २, ९
- शुभ रंग : हिरवा, मोतिया, पांढरा
- शुभ रत्न : पाचू, मोती
- नक्षत्राक्षरे : डी,डू,डे,डो
- आराध्यवृक्ष : नागचाफा
- बोटॅनिकल नेम : Mesua nagassarium (Burm F.)
- क्षेमकर वृक्ष : पायरी
- धार्योषधी : कडू पडवळ
- जपासाठी मंत्र : । अनंतनागाय नमः । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : इद् सर्पेभ्यो हविरस्तु जुष्टम् । आश्रेषा येषांमनुयन्ति चेतः ॥
ये अन्तरिक्षं पृथिवीं क्षियन्ति । ते नः सर्पासो हवमागमिष्ठाः॥
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) फेब्रुवारी–मार्च महिन्यात पूर्वेला, एप्रिल–मे महिन्यात डोक्यावर, जून–जुलै महिन्यात पश्चिमेकडे.

१०. मघा

पुरुष प्रिय

कोयता किंवा विळ्याच्या आकाराचं हे नक्षत्र पाच किंवा सहा ताऱ्यांपासून बनलेले असते. या नक्षत्राचे चारही चरण सिंह राशीत येतात. माघ महिन्यात हे नक्षत्र रात्रभर आकाशात दिसते. मघाच्या या अस्तित्वावरूनच तो महिना माघ म्हणून ओळखला जात असावा. हे नक्षत्र **Regulas** म्हणून इंग्रजीत ओळखलं जातं.

या नक्षत्रावर जन्म घेणाऱ्या व्यक्ती उंच–सडसडीत बांध्याच्या असतात. देखण्या चेहऱ्यावर करारी भाव व रागीटपणा ह्यांची झाक असते. इंग्रजी संस्काराच्या बोर्डिंग स्कूलची हेड मिस्ट्रेस कशी वागेल! साधारण कल्पना करून बघा! तसाच काहीसा चेहरा (बहुधा देखणा) आणि वृत्तीने कडक असा असतो. या नक्षत्रावरील व्यक्ती रागीट, मानी, शिस्तप्रिय, आज्ञाधारक, उदार, स्पष्टवक्त्या स्वभावाच्या असतात. कोणतीही चुकीची गोष्ट मी केली नाही किंवा त्याची जबाबदारी माझी आहे, असं म्हणण्याची किंवा मानण्याचीही या व्यक्तिंची तयारी नसते. त्यात पुन्हा महत्वाकांक्षी स्वभाव! त्यामुळे अधिकाराची, सत्तेची लालसा असते. स्वभाव थोडाबहुत मीपणाकडे, अहंमन्यतेकडे जाणारा अगदी गकाराची बाधा झाल्यासारखा वाटावा असा असतो.

स्वभावाच्या या गुणवैशिष्ट्यांना (Traits) शोभणारे म्हणूनच की काय, उष्णतेचे, दाहकतेचे विकार या व्यक्तिंना होत असतात. रोगाची तीव्रता प्रखर व दाहक असते. नक्षत्राच्याच प्रकृतीचा विचार केला तर हे उष्ण प्रकृतीचं नक्षत्र असं म्हणता येईल. त्यामुळेच अंगाची लाही लाही होणं, डोळे जळजळणे, लाल पुरळ इ. प्रकारच्या तक्रारी उद्भवू शकतात. डोकेदुखी विशेष करून अर्धशिशी हे विकार होण्याची शक्यता अधिक असते. याच्याच बरोबरीने कापणे, भाजणे, हाड मोडणे, ऑपरेशन यांचीही शक्यता जास्त असते. स्त्रियांना मासिक पाळीचा त्रास होवु शकतो.

मघा नक्षत्राचा आराध्यवृक्ष आहे वड. अर्थात सर्व परिचित, चिरकालीन जगणारा असा वटवृक्ष. वट– पौर्णिमेला केली जाणारी पूजा तर सर्वश्रूतच आहे. सावित्रीने आपल्या पतीचे प्राण याच वटवृक्षाखाली परत मिळविले. म्हणून या वृक्षाचे महत्त्व सौभाग्यवतींसाठी अधिक मानले गेले आहे. सात जन्म सोबतीला हाच पती असावा हे नेमकं वडालाच का मागणं मागायचं? थोडा विचार केला तरी कळेल. वर्षानुवर्षे (अगदी काही शेकडो वर्षे) टिकून राहणारा, विस्तारणारा बहुधा हाच एकमेव वृक्ष आहे. म्हणूनच आपल्या पूर्वजांनी अक्षय साथीच्या आराधनेसाठी ह्या वृक्षाची निवड केली असावी. यज्ञाची पात्रंदेखील वटवृक्षापासूनच बनविली जातात. त्यामुळे हा वृक्ष अत्यंत पवित्र, यज्ञीय असा वृक्ष मानला गेला आहे.

इतकी सारी धार्मिक आणि पवित्र पार्श्वभूमी लाभलेल्या वडाचे औषधी गुणधर्म मात्र काहीसे दुर्लक्षित राहिल्यासारखे आहेत. वड हादेखील एक चांगला औषधी वृक्ष आहे, हे अनेकांना माहितच नसते. प्रमेह, जखमा, दाह, त्वचाविकार ह्यावर वडाची योजना केली जाते. मूळव्याध, पायांच्या भेगा यांवरही वडाचा चीक उपयोगी ठरतो. डोक्यावरील केशकलपाचे मुळापासून संरक्षण करण्यासाठी पारंब्या खूपच उपयोगी आहेत. ह्याच वृक्षापासून बनवलेले तेल वट जटादी तेल या नावाने ओळखले जाते.

अगदी सहजपणे उपलब्ध होणाऱ्या या वृक्षाचे पूजन कसे करायचे यासंबंधी जाणून घेवूया. या वृक्षाची पूजा कमीत कमी १४ दिवस करावी. मघा नक्षत्राची देवता आहे, *'पितर'. आता याच्या पूजनासाठी क्रमाने मंत्राची ओळख करून घेऊया.*

१) नक्षत्र नाम मंत्र – *। मघायै नमः ।*

२) नक्षत्र देवता मंत्र – *। पितृभ्यो नमः ।*

३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। पितृभ्यो इती मंत्रः ।*

४) नक्षत्र स्वामी मंत्र – *पलाशपुष्पसंकाशं तारकाग्रहमस्तकम् ।*
रौद्रं रौद्रात्मकं घोरं तं केतुं प्रणमाम्यहम् ।।

आराध्यवृक्षाची पूजा करताना प्रथम वटवृक्षाला पाणी घालावे. हळद–कुंकू लावावे. संकल्प करून प्रार्थना करावी. गुळ खोबऱ्याचा नैवेद्य दाखवून प्रार्थना करावी. नंतर पांढरे फूल वहावे.

पूजा : मघा हे जन्मनक्षत्र पहिल्या चरणात असलेल्यांनी मंगळवारी पूजा सुरू करून २७ दिवस करावी. दुसरे चरण असलेल्यांनी शुक्रवारी पूजा सुरू करून १४ दिवस करावी. नक्षत्राच्या तिसऱ्या चरणात जन्म असलेल्यांनी बुधवारी पूजा सुरू करून १७ दिवस करावी व चौथ्या चरणात जन्मलेल्यांनी सोमवारी पूजा सुरू करून ३० दिवस करावी. पूजा काल संपल्यानंतर शनिवारी पीठ व गुळ हे दान करावे.मारुतीला रुईच्या ११ पानांची माळ घालणे हेही त्यांच्यासाठी हितकारक असते.

अनेक पिढ्यांचा साक्षीदार असणाऱ्या वट वृक्षाची पूजा करण्यासाठी मघा जन्मनक्षत्राची देवता असलेल्या पितृदेवतेसाठीचा 'पितृभ्यो नमः' या मंत्राचा जप नेहमी करावा. नक्षत्र देवता मंत्र रोज १०८ वेळा म्हणावा किंवा केतुचा पौराणिक मंत्र १०८ वेळा जपावा.

- नक्षत्राचे नाव : मघा
- इंग्रजी नाव : रेग्युलस (Regulus)
- तारकासंघाचे नाव : सिंह
- ताऱ्यांची संख्या : ६
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : सिंह मंडलातील अल्फा, एटा, गॅमा,जेटा, म्यू आणि एप्सिलोन तारे
- आयनांश : १२०°००' ते १३३°२०'
- राशी : सिंह
- सूर्याचा वास : १७ ऑगष्ट ते ३० ऑगष्ट (सुमारे)
- नक्षत्राकृती : शाला
- नक्षत्रस्वामी : केतू
- नक्षत्रदेवता : पितर
- शुभ अंक : १, ८
- शुभ रंग : लाल, सोनेरी
- शुभ रत्न : माणिक, लसण्या
- नक्षत्राक्षरे : मा, मी, मू, मे
- आराध्यवृक्ष : वड

- बोटॅनिकल नेम : **Ficus cenghalensis L.**
- क्षेमकर वृक्ष : जाई
- धार्योषधी : माका
- जपासाठी मंत्र : । पितृभ्यो नम: । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : उपहूता: पितरा ये मघासु । मनोजवस: सुकृत: सुकृत्या: ।।
  ते नो नक्षत्रे हवमागमिष्ठा: । स्वधाभिर्यज्ञं प्रयतं जुषन्ताम् ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे)
  मार्च–एप्रिल महिन्यात पूर्वेला, मे–जून महिन्यात डोक्यावर,
  जुलै–ऑगस्ट महिन्यात पश्चिमेकडे.

११. पूर्वा फाल्गुनी

कल्याणकारी ऐश्वर्य

पूर्वा फाल्गुनीचे दोन तारे असतात. उत्तरा फाल्गुनी इतके ते तेजस्वी नसले तरी ते फिक्कट असतात. पूर्वा आणि उत्तराचा मिळून काटकोन तयार होतो. तो एखाद्या पाटासारखा अथवा शय्येसारखा वाटतो. फाल्गुन महिन्यात रात्रभर या नक्षत्राचं दर्शन आकाशात घडतं. याचं इंग्रजी नाव **Thita Leonis** (थीटा लिओनीस) या नक्षत्राचे चारही चरण सिंह राशीत येतात.

या नक्षत्राची देवता भग आहे. ही देवता म्हणजे १२ आदित्यांपैकी सहाव्या क्रमांकाचा आदित्य, तर ११ रुद्रांपैकी दहावा रुद्र ही आहे. या दोन्ही देवतांना भग असे म्हणतात. 'भग' म्हणजे ऐश्वर्य, सामर्थ्य किंवा तेज. म्हणूनच असे तेज असणारा तो भगवान अर्थात सामर्थ्यशाली असे म्हटले जाते. अदितीच्या १२ पुत्रांपैकी हा एक आहे. म्हणूनच तो १२ आदित्यांमध्ये गणला जातो. सूर्याचे उदयापूर्वीचे सौम्य व आल्हाददायक स्वरूप म्हणजेच 'भग' होय. जगाचे कल्याण करणारा, त्यांना ऐश्वर्य देणारा म्हणून वैदिक ऋषिंनी त्याला आपली देवता मानले आहे. भग देवतेचे एक सुक्त ऋग्वेदात सापडते. 'भगवते नम:' हा मंत्र पूर्वा फाल्गुनी हे जन्मनक्षत्र असणाऱ्यांनी नित्य जपावा.

जशी या नक्षत्राची देवता ऐश्वर्यशाली भग ही आहे तसेच या नक्षत्राचा आराध्यवृक्ष पळस आहे, रसरसत्या लालभडक ज्वाळांसारख्या असणाऱ्या फुलांचा पळस. व्यवहारात पळसाला पाने तीनच म्हणून जरी पळस प्रसिद्ध असला तरी या वृक्षाच्या इतर उपयुक्ततेबद्दल आपण अनभिज्ञच असतो. याच्या पानाचा उपयोग सूज,गळू इ. वर बांधण्यासाठी होतो. तसेच ह्याच्या पत्रावळीदेखील तयार करतात. या वृक्षाला फळ म्हणून लांब शेंगा येतात, ज्यामध्ये एकच बी असतं. हे बी कृमी व कफनाशक असतं. पळसाची फुले अतिशय सुरेख असून केशरी व चित्ताकर्षक असतात. पारंपारिक नैसर्गिक केशरी रंग तयार करण्यासाठी त्यांचा वापर करतात. ह्या फुलांच्या रंगावरूनच या झाडाला संस्कृतात किंशुक अर्थात् पोपटासारखा दिसणारा असं अतिशय सुंदर नाव आहे. पळसाला संस्कृतात प्लक्ष तर वैज्ञानिक भाषेत **Beautea Monosperma** म्हणतात. बोलीभाषेत किशुंकासारखं नाव असणाऱ्या या झाडाचं वनस्पतीशास्त्रातील नावदेखील 'ब्युटीआ'. म्हणजे सौंदर्याशी संबंधित आहे. फुलांचा औषधी उपयोग म्हणजे ती ज्वरनाशक, दाहनाशक तसेच कफ–पित्त शामक आहेत.

या नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्तिंच्या स्वभावाच्या बाबत संमिश्र असे म्हणता येईल. बुद्धिमान, व्यवहारकुशल अशा या व्यक्ती थोड्याशा सुखविलासी, आळशीपणाकडे झुकलेल्या असतात. या व्यक्ती स्वकर्तृत्वावर पुढे येतात. हा गुण उत्तरा फाल्गुनीच्या अगदी विरुद्ध; कारण उत्तराच्या व्यक्ती थोरा–मोठ्यांच्या आश्रयाने पुढे येतात. क्रीडापटूंसाठी हे शुभ गुणधर्मी नक्षत्र आहे. कुशल कारागीर, अभियंते, उच्चपदस्थ अधिकारी इ. या नक्षत्रांचे असू शकतात.

या व्यक्तिंना होणाऱ्या रोगांबाबत बोलायचं तर, त्यांना होऊ शकणारे रोग हे दाहक स्वरूपाचे असतात. उष्णतेचे विकार, पित्तविकार, ऑपरेशन इ.चा यांना संभव असतो.

या व्याधींवर उपयोगी ठरणारा प्लक्ष हा वृक्ष या व्यक्तिंसाठी निश्चितच सुयोग्य आराध्यवृक्ष वाटतो. पलाशक्षार, ब्रह्ममूलार्क इ. औषधांमध्ये पळसाचा उपयोग होतो. पळसवृक्षाला ब्रह्ममूल म्हणतात. त्यामुळेच संस्कारानेच 'द्विज' अर्थात् ब्राह्मण होण्याच्या विधीत म्हणजेच उपनयन संस्कारात याच वृक्षाचा दंड बटूच्या हातात देतात. कारण हा वृक्ष ब्रह्मतेजाचे प्रतिक आहे. पळसाच्या समिधा यादेखील यज्ञासाठी वापरल्या जातात. पांढऱ्या फुलांचा पळसदेखील असतो पण अतिशय दुर्मिळ! भग देवतेला आवाहन करूनं ऐश्वर्यसंपन्न होण्यासाठी या आराध्यवृक्षाचा पूजन विधी जाणून घेऊया.

१) नक्षत्र नाम मंत्र	–	*। पूर्वा फाल्गुनीभ्या नमः ।।*
२) नक्षत्र देवता मंत्र	–	*। भगाय नमः।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र	–	*। भगप्रणमेती मंत्रः ।*
४) नक्षत्र स्वामी मंत्र	–	*हिमकुंदमृणालाभं दैत्यांना परमं गुरूम् ।* *सर्वशास्त्रप्रवक्तारं भार्गव प्रणमाम्यहम् ।।*

पळस या आराध्यवृक्षाची पूजा कमीत कमी १९ दिवस करावी. पूजन करताना वर दिलेल्या मंत्रांपैकी कोणताही मंत्र १०८ वेळा जपावा.

वृक्षाची पूजा करताना संकल्प करून प्रार्थना करावी. प्रथम वृक्षाला पाणी घालावे. हळदी–कुंकू वाहून पांढरे फूल वहावे. दही–भाताचा नैवेद्य दाखववावा.

पूजा : पूर्वा नक्षत्राच्या प्रथम चरणावर जन्मलेल्यांनी रविवारी पूजा सुरू करून २० दिवस करावी. दुसऱ्या चरणावर जन्मलेल्यांनी बुधवारी पूजा सुरू करावी व सलगपणे १९ दिवस करावी. तिसऱ्या चरणावर जन्मलेल्या व्यक्तिंनी शुक्रवारी पूजा सुरू करून १९ दिवस करावी व चौथे चरण असणाऱ्यांनी शुक्रवारी पूजा सुरू करून ३० दिवस करावी.

पूजा समाप्तीनंतर घोड्याच्या नालेची पूजा करून ती नाल पाण्यात सोडून द्यावी.

■ नक्षत्राचे नाव	:	**पूर्वा फाल्गुनी**
■ इंग्रजी नाव	:	**थीटा लिओनीस (Thita Leonis)**
■ तारकासंघाचे नाव	:	**सिंह**
■ ताऱ्यांची संख्या	:	**२**
■ ताऱ्यांची वैज्ञानिक नावे	:	**सिंह मंडलातील डेल्टा आणि थिटा तारे**
■ आयनांश	:	**१३३°२०' ते १४६°४०'**
■ राशी	:	**सिंह**
■ सूर्याचा वास	:	**३० ऑगष्ट ते १३ सप्टेंबर (सुमारे)**

- नक्षत्राकृती : शय्या
- नक्षत्रस्वामी : शुक्र
- नक्षत्रदेवता : भग
- शुभ अंक : ६
- शुभ रंग : पांढरा
- शुभ रत्न : हिरा
- नक्षत्राक्षरे : मो, टा, टी, टू
- आराध्यवृक्ष : पळस
- बोटॅनिकल नेम : Butea monosperma (Lamk) Tauc
- क्षेमकर वृक्ष : बेल
- धार्योषधी : रिंगणी
- जपासाठी मंत्र : । भगवते नमः । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : श्रेष्ठो देवानां भगवो भगासि । तत्त्वा विदुःफल्गुनीस्तस्य वित्तात्।।
  अस्मभ्यं क्षत्रमजरँ सुवीर्यम् । गोमदश्ववदुप संनुदेह ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे)
  मार्च–एप्रिल महिन्यात पूर्वेला, मे–जून महिन्यात डोक्यावर,
  जुलै–ऑगस्ट महिन्यात पश्चिमेकडे.

सौंदर्य, आरोग्य आणि धार्मिकता अशा कोणत्याही बाबीचा विचार करून पलाश वृक्षाची लागवड सर्वांनीच करायला हवी, असे प्रामाणिकपणे नमूद करावेसे वाटते. आपल्या पृथ्वीमातेला पुन्हा एकदा ऐश्वर्य संपन्न करण्यासाठी पूर्वा नक्षत्राच्या पळसाची लागवड अत्यंत उपयुक्त ठरेल, यात शंका नाही.

१२. उत्तरा फाल्गुनी

शुभसंकर करणारे

एखाद्या पाटाच्या आकाराचे पूर्वा आणि उत्तरा फाल्गुनी नक्षत्राचे चार तारे असतात. यातील दोन पूर्वाचे तर दोन उत्तराचे असतात. तरीही उत्तरा फाल्गुनीचे तारे पूर्वापेक्षा अधिक ठळक आणि तेजस्वी असतात. नक्षत्रातील पहिला चरण सिंह राशीत तर तीन चरण कन्या राशीत येतात. इंग्रजीत हे Denicella (डेनिबेला) नावानं ओळखलं जातं. फाल्गुन महिन्यात हे नक्षत्र आकाशात दिसू शकतं.

हे जन्मनक्षत्र असणाऱ्या व्यक्ती नम्र, शांत, सात्विक वृत्तीच्या असतात. सिंह हा जसा वनाचा राजा तसे काहीसे यांच्याबाबतीत घडून येते. सिंह राशीच्या प्रभावामुळे म्हणा किंवा काय, ह्या व्यक्तिंना अधिकाराची, सत्तेची लालसा असल्यासारखी वाटते. तरीदेखील सात्विक वृत्तीमुळे अधिकार असले तरी तळमळीनं काम करण्याची प्रवृत्ती असते. या व्यक्तिंना मोठे होण्यासाठी

कोणाच्या तरी आधाराची, सहाय्याची आवश्यकता असते. थोरा-मोठ्यांच्या आश्रयाने या नक्षत्राखालील व्यक्ती प्रगती करतात.

या व्यक्ती अधिकारपदावरील असल्या तरी रसिकता, विद्वत्ता, हौस-मौज हेही काही सद्गुण यांच्यामध्ये असतात. स्त्री-पुरुष दोघांनाही हे नक्षत्र अनुकूल आहे.

या नक्षत्राची देवता आहे आर्यमा. भगवद्गीतेतील विभूती योग या अध्यायात स्वत: भगवान श्रीकृष्ण आर्यमा ही माझी विभूती आहे असे सांगतात. ऋग्वेदात आर्यमाचा उल्लेख मित्र-वरुण या देवतेसह आलेला आढळतो. मित्र-वरुण व आर्यमा यांचे एक मंडल बनते. वास्तुच्या निर्माणाच्या वेळी आर्यमाची पूजा केली जावी असे पुराणे सांगतात. यमाच्या अनुपस्थितीत आर्यमा यमाचा मृत्युचा अधिपती हा अधिकार सांभाळतो. बारा आदित्यांपैकी एक आर्यमा हादेखील आहे. तो सूर्याप्रमाणे जगताचा मित्र आहे.

उत्तरा फाल्गुनी नक्षत्राच्या अंमलाखालील व्यक्तिंची प्रकृती उंच सडसडीत, काटक, मजबूत अशी असून रोगप्रतिकारक शक्ती चांगली असते. याच्या नावाप्रमाणे उत्तर आयुष्यात काही व्याधी जडण्याचा संभव असतो. पित्तविकारांचं प्राबल्य यांच्यामध्ये दिसून येते. डोकेदुखी, पोटाचे विकार, चक्कर, उलट्या, रक्तदाब वाढणं इ. सोबत यकृताचे रोग, कंबरदुखीसारख्या समस्यांनाही यांना सामोरे जावे लागते.

या नक्षत्रासाठी पायरी अथवा पिंपरी या आराध्यवृक्षाची उपासना शास्त्र सांगते. संस्कृतात तो प्लक्ष म्हणून ओळखला जातो. तर वनस्पतीशास्त्रानुसारचे नाव **F&custs²&ela or wave leaved fig tree** असे आहे. ही प्रजाती वड-पिंपळासारखी असते. नावानं जरी पायरी म्हणजे आंब्याचा प्रकार वाटत असली तरी याचा आंब्याशी दुरान्वयानेही संबंध नाही. पंच वल्कलातील एक म्हणजे पायरी. पण तरीही फळांच्या बाबतीत पायरी आंबा काय किंवा पायरीची फळं काय, दोन्ही सारखीच असतात. पक्षी ही फळं आवडीने खातात. शीत, तुरट अशी ही फळे औषधी आहेत.

उत्तरा फाल्गुनीच्या लोकांना होवू शकणाऱ्या रोगांचा विचार करता पायरीची योजना योग्य वाटते. दाह,पित्त, कफ व रक्तदोष तसेच मूर्च्छा, अतिसार इ. सारख्या रोगांवर हा वृक्ष उपयोगी आहे. सदापर्णी असा हा वृक्ष वटवृक्षाप्रमाणेच डेरेदार, सावली देणारा असतो. पानांचा उपयोग प्राण्यांना चारा म्हणूनही होतो. सामाजिक वनीकरणामधून खरंतर या वृक्षाची लागवड रस्त्याच्या दुतर्फा केली पाहिजे. पाठीच्या विकारांवर तसेच रक्तस्रावावरही पायरीच्या (फळांचा) रस उपयुक्त ठरतो.

१) नक्षत्र नाम मंत्र	–	*। उत्तरा फाल्गुन्यो नम: ।*
२) नक्षत्र देवता मंत्र	–	*। आर्यम्णे नम: ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र	–	*। दध्या वर्धेती मंत्र: ।*
४) नक्षत्र स्वामी मंत्र	–	*जपाकुसुमसंकाशं काश्यपेयं महदद्युतिम् ।* *तमोरिं सर्वपापघ्नं प्रणतोऽस्मि दिवाकरम् ।।*

या वृक्षाची पूजा करताना प्रथम संकल्प करून प्रार्थना करावी. वृक्षाला पाणी घालावे. हळद,कुंकू लावावे व लाल फूल वहावे. खाली दिलेल्या मंत्रांपैकी नक्षत्र देवतेचा मंत्र पूजा करतेवेळी १०८ वेळा जपावा किंवा त्याऐवजी नक्षत्रस्वामी सूर्यदेवतेचा पौराणिक मंत्र १०८ वेळा म्हणावा.

पूजा : उत्तरा फाल्गुनी नक्षत्राच्या प्रथम चरणावर जन्मलेल्यांनी गुरूवारी पूजा सुरू करावी व ३७ दिवस करावी. दुसऱ्या चरणावर जन्मलेल्यांनी शनिवारी पूजा सुरू करून ३७ दिवस करावी. तिसऱ्या चरणावर जन्मलेल्यांनी गुरूवारी पूजेचा प्रारंभ करून २२ दिवस करावी. चौथ्या चरणावर जन्मलेल्यांनी गुरूवारी पूजा सुरू करून २२ दिवस करावी.

पूजा समाप्तीनंतर सोमवारी ५ विनाछिद्र मोती आणून पूजावे. दही भाताचा नैवेद्य दाखवावा व संपूर्ण पूजा वाहत्या पाण्यात विसर्जित करावी.

वड किंवा पिंपळासारखे औषधी गुण असलेल्या पायरी (प्लक्ष) वृक्षासह सूर्यदेवतेची पूजा करणारा तेजस्वी होईल. दीर्घायुषी प्लक्षाचे गुण त्याची पूजा करणाऱ्याला दीर्घायुषी बनवतील यात शंकाच नाही.

■ नक्षत्राचे नाव	:	उत्तरा फाल्गुनी
■ इंग्रजी नाव	:	डेल्टा लिओनिस **(Delta Leonis)**
■ तारकासंघाचे नाव	:	सिंह
■ ताऱ्यांची संख्या	:	२
■ ताऱ्यांची वैज्ञानिक नावे	:	सिंह मंडलातील **बीटा** आणि ९३ क्रमांकाचा तारा
■ आयनांश	:	१४६°४०' ते १६०°००'
■ राशी	:	सिंह / कन्या
■ सूर्याचा वास	:	१३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर (सुमारे)
■ नक्षत्राकृती	:	पलंग
■ नक्षत्रस्वामी	:	सूर्य
■ नक्षत्रदेवता	:	आर्यमा
■ शुभ अंक	:	१, ३
■ शुभ रंग	:	लाल, हिरवा
■ शुभ रत्न	:	माणिक, पाचू
■ नक्षत्राक्षरे	:	टे/टो,पा,पी
■ आराध्यवृक्ष	:	पायरी
■ बोटॅनिकल नेम	:	**Ficus Virens -it**
■ क्षेमकर वृक्ष	:	अर्जुन
■ धार्योषधी	:	कडू पडवळ
■ जपासाठी मंत्र	:	। अर्यम्णे नमः । (जपाची संख्या : १०,०००)
■ नक्षत्र स्तुती	:	गवां पतिः फल्गुनीनामसि त्वम् । तदर्यमन्वरुण मित्र चारु ॥ तं त्वा वयँ सनितारँ सनीनाम् । जीवा जीवन्तमुपसंविशेम् ॥
■ आकाशात केव्हा दिसते	:	सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) मार्च–एप्रिल महिन्यात पूर्वेला, मे–जून महिन्यांत डोक्यावर, जुलै–ऑगस्ट महिन्यात पश्चिमेकडे.

१३. हस्त

अधात न मध्यात

पुराणांमध्ये हस्त नक्षत्राचा उल्लेख प्रजापतिच्या हाताचा पंजा म्हणून येतो. साधारणत: मानवी हाताच्या तळव्याप्रमाणे भासणारं हे नक्षत्र आहे. नक्षत्रात ५ तारे असतात तेही स्वच्छ आणि मध्यम तेजस्वी. हिन्दु नववर्षाच्या मासापासून अर्थात् चैत्रात हे नक्षत्र आकाशात दिसू शकते. ह्याला इंग्रजीत **Delta Carvy** असं म्हणतात. याचे चारही चरण कन्या राशीत येतात.

हे जन्मनक्षत्र असणाऱ्या व्यक्ती सुंदर, बहुश्रुत, व्यवहारकुशल आणि खेळकर असतात. सौंदर्याचे उपासक असणारी ही माणसं परजीवी अर्थात दुसऱ्या कुणाच्या तरी सहाय्यानं पुढे आलेली दिसतील. या नक्षत्राचा स्वामी आहे चंद्र. तो स्वत: परप्रकाशित तेव्हा त्याच्या स्वामित्वाखालील या नक्षत्राची माणसंदेखील अशीच थोरा–मोठ्यांच्या आश्रयानं पुढे येणारी असतात. पराक्रम, धैर्य, धाडस या गुणांचा पुरुषांमध्ये अभाव असतो. चंद्र स्वामी असणारी नक्षत्रे स्त्रियांना अधिक अनुकूल, नीटनेटकेपणा, आदरातिथ्य, स्वच्छता या सर्वांच्या जोडीनं एखादं कला– कौशल्य या नक्षत्राच्या स्त्रियांमध्ये आढळते. या स्त्रिया व पुरुषदेखील सुंदर, विद्वान, व्यवहारकुशल, आनंदी असतात. सेवाभावी, आज्ञापालक आणि निर्व्यसनी हे तर यांचे अंगभूत गुण असतात.

या नक्षत्राचा आराध्यवृक्ष (वनस्पती) आहे जाई. संस्कृतात ती मल्लिका तर हिंदीत चमेली म्हणून प्रसिद्ध आहे. नक्षत्रवृक्षांच्या यादीत खरं तर एखाद्या वल्ली अर्थात वेलसदृश वनस्पतीचा उल्लेख थोडा चमत्कारिक वाटतो. या नक्षत्रावरील व्यक्तिंच्या प्रकृतीचा आणि त्यांना होणाऱ्या संभाव्य रोगांचा विचार करता जसे मुखरोग, त्वचारोग, जखमा, थंडी, कफ, अर्धशिशी, मळमळ, अपचन, भोवळ तसेच शौचाचे विकार यांसारख्या विकारांवर या वेलीचा बराच उपयोग होतो. उष्णतेमुळे जिभेवर येणाऱ्या फोडांवर या वेलाचा वापर करतात. जाईचे मूळ गजकर्ण, नायट्या सारख्या त्वचारोगांवर उपयोगी पडते. फुले नेत्ररोगांवर उपयोगी आहेत. तसेच अॅचरोमा थेरपीत या फुलांचा आणि फुलांपासून मिळणाऱ्या तेलाचा उपयोग करतात.

हे जन्मनक्षत्र असणाऱ्यांमध्ये शौचासंबंधीचे विकार अधिक असतात. त्यामुळे कायम चूर्णासारख्या रेचक औषधांमध्ये जाईचा वापर आढळतो. काही शास्त्रीय ग्रंथात हस्तनक्षत्राचा वृक्ष अंबष्ट अथवा पहाडवेल सांगितली आहे. तंत्रराज निघटुमध्ये याच वनस्पतीचा उल्लेख येतो. व्रण, विषबाधा, कृमीदोष, कफदोष, दाह इ. रोगांवर तसेच अजीर्ण, पोटदुखी इ.वर उपयोगी ठरणारी आहे. कुटजाष्ट काढा, विविध चूर्णे याच्यामधून याचा वापर केला जातो.

हस्तनक्षत्राच्या बाबतीत खरं तर नक्षत्रवृक्ष म्हणून नेमक्या कशाची उपासना करावी असा प्रश्न पडण्यासारखाच आहे. जाई, अंबष्ठ या वल्ली तर काही ग्रंथकार या नक्षत्राचा वृक्ष अरिष्ट अर्थात् रिठा असा सांगतात. केसांच्या विकारांवर बहुगुणी असा रिठा (म्हणजे त्याची फळं) कफघ्न असतो. उवा, लिखा, चाई, कोंडा यासारख्या केसांच्या रोगावर हमखास उपाय म्हणून रिठा परिचित आहे. या फळांमध्ये चरबीचा अंश ३०% इतका असतो. पाण्यात याच्या पावडरीमुळे फेस निर्माण होतो व त्याने सोन्या–चांदीच्या वस्तू लख्ख उजळून काढता येतात. विषघ्न गुणामुळे उलटी करविण्याकरिता याचा वापर करतात. तसेच विंचू, मधमाशी इ.च्या विषावर त्याचा लेप उगाळून लावतात. लहान मुलांना दृष्ट लागू नये

म्हणून रिठ्याचे फळ दोऱ्यात ओवून गळ्यात बांधतात. याच्या पिकलेल्या फळाचा वापर औषधांमधून केला जातो. नक्षत्रवृक्षांच्या यादीमध्ये हस्तनक्षत्रासाठीचा वृक्ष म्हणून रिठा अधिक सुसंगत वाटतो.

वृक्षाचे/वेलीचे दोन्हींचेही पूजन शास्त्राला धरून आहे. तेव्हा वरीलपैकी जाई, अंबष्ठ किंवा रिठा यांपैकी कशाचेही पूजन हस्तनक्षत्रवाल्यांनी करण्यास हरकत नाही.

१) नक्षत्र नाम मंत्र	–	*। हस्ताय नमः ।*
२) नक्षत्र देवता मंत्र	–	*। सवित्रे नमः।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र	–	*। उदत्यंम् जात वेद्येती नमः ।*
४) नक्षत्र स्वामी मंत्र	–	*दधिशंखतुषाराभं क्षीरोदार्णवसंभवम् ।* *नमामि शशिनं सोमं शंभोर्मुकूटभूषणम् ।।*

पूजन करताना संकल्प करून प्रार्थना करावी. मग पाणी घालावे. हळद–कुंकु,पांढरे किंवा गुलाबी फूल वहावे. दूध साखरेचा नैवेद्य दाखवावा. नक्षत्रदेवता मंत्र १०८ वेळा म्हणावा किंवा नक्षत्रस्वामी पौराणिक मंत्र ११२ वेळा म्हणावा.

पूजा : हस्तनक्षत्राच्या पहिल्या चरणावर जन्मलेल्यांनी मंगळवारी पूजा सुरू करून १८ दिवस करावी. दुसऱ्या चरणात जन्म झालेल्यांनी बुधवारी पूजा सुरू करून १८ दिवस करावी. तिसऱ्या चरणात जन्म झालेल्यांनी बुधवारी पूजा सुरू करून १८ दिवस करावी. चौथ्या चरणवाल्यांनी सोमवारी पूजा सुरू करून ५२ दिवस सलगपणे करावी.

पूजा समाप्तीनंतर ब्रह्मचाऱ्याला अन्नदान करावे. शुभलक्ष्मी अशा हस्तनक्षत्रावरील स्त्री जर संसाराला लाभेल तर संसाराचं सोनं होईल. तेव्हा लग्नेच्छुंनी (अर्थात मुलांनी) या वृक्षाचं पूजन आतापासूनच करावं हे श्रेयस्कर नाही का?

■ नक्षत्राचे नाव	:	हस्त
■ इंग्रजी नाव	:	**कॉर्वस (Corvus)**
■ तारकासंघाचे नाव	:	हस्त
■ ताऱ्यांची संख्या	:	५
■ ताऱ्यांची वैज्ञानिक नावे	:	हस्तमंडलातील अल्फा, बीटा, गॅमा, डेल्टा आणि एप्सिलोन तारे
■ आयनांश	:	१६०°००' ते १७३°२०'
■ राशी	:	कन्या
■ सूर्याचा वास	:	२७ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर (सुमारे)
■ नक्षत्राकृती	:	हाताचा पंजा
■ नक्षत्रस्वामी	:	चंद्र
■ नक्षत्रदेवता	:	सूर्य
■ शुभ अंक	:	२,५
■ शुभ रंग	:	पांढरा, मोतिया, हिरवा
■ शुभ रत्न	:	मोती, पाचू
■ नक्षत्राक्षरे	:	पू, प, ण, ठ

- आराध्यवृक्ष : जाई
- बोटॅनिकल नेम : **Sapindus mukorrossi Gaertn**
- क्षेमकर वृक्ष : प्राजक्त
- धार्योषधी : जाई
- जपासाठी मंत्र : । श्रीसवितृ सूर्यनारायणाय नमः । (जपाची संख्या : ७०००)
- नक्षत्र स्तुती : आयातु देवः सवितोपयातु । हिरण्ययेन सुवृता रथेन ।।
  वहन्हस्तँ सुभगं विह्नापसम् । प्रयच्छन्तं पपुरिं पुण्यमच्छ ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे)
  एप्रिल-मे महिन्यात पूर्वेला, जून-जुलै महिन्यात डोक्यावर, ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात पश्चिमेकडे.

१४. चित्रा

नित्ययौवन

नक्षत्र मालिकेत चित्रेचा क्रमांक आहे १४ वा. चित्र म्हणजेच सुरेख सुंदर असा अर्थ होतो. त्याप्रमाणेच चित्रा नक्षत्रातील एकच तारा अत्री हा अतिशय तेजस्वी आणि आकर्षक दिसतो. हा एकुलता एक ठळक तारा असलेलं हे नक्षत्र काहींना मोत्यासारखं वाटतं. इंग्रजीत **Virgines Spica** नावानं ते ओळखलं जातं. हे नाव याचं एकलेपण दाखवायला पुरेसं आहे. नक्षत्राचे २ चरण कन्याराशीत तर दोन चरण तुळ राशीत येतात. डोक्याच्या म्हणजेच शीर्षभागावर हस्तनक्षत्र असलेलं तर त्याच्या बाजूला सुवर्णरंगी स्वाती नक्षत्र असते. त्यामुळे हे नक्षत्र ओळखायला अगदी सोपे आहे.

स्वतःच्या अंगातील रग दाखवणे म्हणजे काय, हे चित्रा नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्तिंच्या स्वभावाकडे बघून थोड्याफार प्रमाणात ठरवता येते. या व्यक्ती बुद्धिमान, धडपड्या किंवा चळवळ्या स्वभावाच्या असतात. स्वतःच्या कर्तबगारीने जे मिळेल त्यावरच आनंदी, समाधानी राहणे हा ह्यांच्या स्वभावातील महत्त्वाचा गुण आणि काही ठिकाणी दोषही आढळून येतो.

कन्या राशीचा भाबडेपणा, साधेपणा पण थोडीशी संशयी वृत्ती, स्वच्छतेची आवड या काही गोष्टी यांच्यात जाणवतात. तर तुळेचा संमजसपणा, समानता, सारासार विवेक अशा जमेच्या बाजूही आढळतात. वागण्यात संतुलितपणा राखण्याकडे यांचा अधिक कल असतो.

स्वभाव थोडासा हट्टी, रागीट, हम करे सो कायदा सारखा वाटणारा,पण तरीही खुनशीपणा, राग मनात ठेवून कुढत रहाणं यासारख्या गोष्टी आढळतात. परोपकार, सदाचारी वृत्ती, अडल्या-नडल्याला मदत करणं यासारख्या काही अत्यंत चांगल्या गोष्टी या लोकांचा जणू स्वभावधर्मच असतात. सुंदर किंवा देखणं रूप ही यांची संपत्ती, हेही कमी म्हणूनच काय चित्रावाल्यांना चिरतारुण्याचं जणू वरदानच लाभलेलं असतं. उंच, सडपातळ, हाडा-पेरानं मजबूत अशी शरीराची ठेवण आढळते. स्त्रीवर्गाला जसं हस्तनक्षत्र मानवणारं, तसेच काहीसे या नक्षत्राच्या बाबतीतही आहे. रसिक, हौशी, कलाप्रिय, आनंदी अशा एक ना अनेक उपाधी या स्त्रियांना द्याव्यात तेवढ्या थोड्याच पडतील. पण शॉपिंगच्या आवडीपायी नवरोजींचा खिसा रिकामा करायलादेखील या जन्मनक्षत्रवाल्या

स्त्रिया मागेपुढे पाहणार नाहीत. शॉपिंगची खूप आवड या स्त्रियांना असू शकते. स्वत: कलेत पारंगत असणाऱ्या या नक्षत्रावरील व्यक्ती, विशेषत: स्त्रिया या 'गुणी गुणिनं वेत्ति' प्रमाणे दुसऱ्यांतील कलागुण ओळखणाऱ्या, हेरणाऱ्या अशाही असतात.

या नक्षत्राखाली येणारा वर्ग हा बराचसा श्रीमंत, सुखवस्तू या घरात मोडणारा असतो. यांना होणारे रोग हे मोठे नसले तरी दाहक, जळजळणारे अशा स्वरूपाचे असतात. डोळ्यांची जळजळ, लघवीचा त्रास, मूतखडा, कावीळ, डोळ्यांचे विकार इ.गोष्टी यांतील प्रमुख होय. विशेषकरून यातील बरेचसे रोग त्यांनी ओढवून घेतले आहेत असं वाटण्यासारखे असतात. धूम्रपान, मद्यपान इ.ची यांना अधिक आवड असते. व्यसनाधीनतेमुळे होणाऱ्या रोगांची संख्याच यांच्याबाबतीत अधिक असते. जखमा झाल्यानंतर लवकर बऱ्या न होणाऱ्या खेळात ज्याला 'चिडका बिब्बा' असं काहीतरी म्हणतात, त्यासारखं यांचे शरीर जखमा चिघळवतं, लवकर बरं करीत नाही. स्त्रियांना मासिक पाळीचे विकार असू शकतात.

या नक्षत्राचा आराध्यवृक्ष सांगितला आहे अर्थात बेल. दाहक आणि संहारक अशा महादेवास आपल्या गुणांनी 'आशुतोष' (त्वरित आशम) देणाऱ्या शंकराला हे बिल्वपत्र अतिशय प्रिय. आपले पूर्वज केवढे निसर्गप्रिय, निसर्गपूजक होते बघा! प्रत्येक देवतेशी त्यांनी मोठ्या खुबीने एखाद्या वृक्षाची, वृक्षावयवाची योजना केली आहे. शंकराला बेल, विष्णुला तुळस, ब्रह्मदेवाला कमळ, गणपतीला दुर्वा, शमी, जास्वंद इ. यासारखी आणखी कितीतरी उदाहरणे देता येतील. वडाची पूजा, पिंपळवृक्ष आणि ध्यानधारणा या सर्वांबद्दल ही माहिती असते. या पूजेच्या माध्यमातून का होईना लोकांना वृक्ष लागवडीचे, संगोपनाचे महत्त्व कळावे, अशीच त्यांची भावना होती.

चित्रेचा आराध्यवृक्ष बिल्व वा बेल या नक्षत्रावरील व्यक्तिंची प्रकृती, त्यांना होऊ शकणारे संभाव्य रोग यांच्याशी अगदी मिळता-जुळता असा आहे. बेलफळाचा आव पडणे, अतिसार यांसारख्या उष्णतेच्या विकारांवर उपयोग सर्वश्रुतच आहे. बेलफळाचं सरबत किंवा मुरंबा हे या विकारांवरील पारंपारिक औषध आहे. नेत्रदाह (डोळ्यांची जळजळ) शमविण्यासाठी बेलाची पानं वाटून त्यांचा लेप लावतात. बेलपत्रे ही डोळे व मज्जातंतू यांना बल देणारी आहेत. बिल्वपत्रांचा काढा हा रक्तदाब वाढींवर (**High Blood Pressure**) व मधुमेहावर उपयोगी पडणारा आहे. बेलाचं मूळ हे ज्वर, वांती, पित्त, कृमी इ. विकारांवर आणि वातविकारांवरदेखील उपयोगी पडणारं आहे. बिल्व हा शोथ (सूज) नाशक असल्याने गर्भाशयाला येणाऱ्या सूजेवरही उपयोगी ठरतो.

आता या आराध्यवृक्षाच्या उपासनेविषयी माहिती करून घेऊ या. या नक्षत्राचा स्वामी आहे मंगळ तर नक्षत्र देवता आहे त्वष्टा. क्रमाने यांचे मंत्र जाणून घेऊ या.

१) नक्षत्र नाम मंत्र – *। चित्रायै नमः।*

२) नक्षत्र देवता मंत्र – *। त्वष्ट्रे नमः।*

३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। त्वाच तुरियेति मंत्रः ।*

४) नक्षत्र स्वामी मंत्र – *धरणीगर्भसंभूतं विद्युत्कांतिसमप्रभम् ।।*
शक्तिहस्तं च मंगलं प्रणमाम्यहम् ।।

या नक्षत्राची पूजा करताना संकल्प करून प्रार्थना करावी. बेलाच्या झाडाला पाणी घालावे. हळद-कुंकू वाहून पिवळे फूल वहावे. गूळ खोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा. वरीलपैकी कोणत्याही मंत्राचा जप १०८ वेळा करावा किंवा नक्षत्र स्वामी मंगळाचा पौराणिक मंत्र १२८ वेळा जपावा.

पूजा : चित्रा नक्षत्राच्या प्रथम चरणात जन्म झाला असेल तर रविवारी पूजा सुरू करून १७ दिवस करावी. दुसऱ्या चरणात जन्म असेल तर बुधवारी पूजा सुरू करून ती १७ दिवस करावी. तिसऱ्या चरणात असेल तर शुक्रवारी पूजेचा प्रारंभ करून १७ दिवस करावी. चतुर्थ चरणात असताना सोमवारी पूजा सुरू करून ५२ दिवस करावी. चतुर्थ चरणात जन्मलेल्यांसाठी विष्णुला बेलफळ वाहण्याची उपासनादेखील फलप्रद म्हणून सांगितली गेली आहे.

पूजाकाल संपल्यानंतर पिवळी फूले, हरभरा डाळ, नारळ यांच्या सहाय्याने वाहत्या जलाचे पूजन करावे व वाहत्या पाण्यात ही पूजासामग्री अर्पण करावी.

बिल्व अथवा बेलवृक्षाचे दुसरे एक नाव श्री वृक्ष असेही आहे. वृक्षाच्या उपासनेमुळे की काय, चित्रा नक्षत्रावर जन्मलेल्यांना ऐश्वर्य, सुख इ. लाभलेले असावे.

■ नक्षत्राचे नाव	:	चित्रा
■ इंग्रजी नाव	:	स्पिका (Spica)
■ तारकासंघाचे नाव	:	कन्या
■ ताऱ्यांची संख्या	:	१
■ ताऱ्यांची वैज्ञानिक नावे	:	कन्या मंडळातील अल्फा तारा
■ आयनांश	:	१७३°२०’ ते १८६°४०’
■ राशी	:	कन्या / तूळ
■ सूर्याचा वास	:	१० ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर (सुमारे)
■ नक्षत्राकृती	:	मोती
■ नक्षत्रस्वामी	:	मंगळ
■ नक्षत्रदेवता	:	त्वष्टा
■ शुभ अंक	:	६, ९
■ शुभ रंग	:	पांढरा, हिरवा
■ शुभ रत्न	:	हिरा, पाचू
■ नक्षत्राक्षरे	:	पे, पो/रा, री
■ आराध्यवृक्ष	:	बेल
■ बोटॅनिकल नेम	:	egle marmelos (L.)
■ क्षेमकर वृक्ष	:	बकूळ
■ धार्योषधी	:	गेळफळ
■ जपासाठी मंत्र	:	। विश्वकर्मण्ये नमः । (जपाची संख्या : १०,०००)
■ नक्षत्र स्तुती	:	सुभ ससं युवति रोचमानाम् । निवेशयन्नमृतान्त्यां श्च । रुपाणि पि श्रभुवनानि विश्वा ।
■ आकाशात केव्हा दिसते	:	सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) एप्रिल–मे महिन्यात पूर्वेला, जून–जुलै महिन्यात डोक्यावर, ऑगस्ट–सप्टेंबर महिन्यात पश्चिमेकडे.

१५. स्वाती

सुवर्णाची झळाळी

ह्या नक्षत्राचा आकार साधारण मोत्यासारखा असतो. चित्रा नक्षत्राप्रमाणे यातही एकच तेजस्वी तारा असतो. तो उठून दिसतो तो त्याच्या तेजस्वितेमुळे. इंग्रजीत **Alpha Butis** या नावाने ओळखलं जाणारं हे नक्षत्र वैशाख महिन्यात रात्रभर आकाशात दिसतं. या नक्षत्राचे चारही चरण तुला राशीत येतात. नक्षत्राचं तेज अगदी सोन्यासारखं पिवळं दिसते. पांडवांमधील महापराक्रमी भीमाचं हे जन्मनक्षत्र असल्याचा उल्लेख आहे.

स्वातीच्या अधिपत्याखाली विद्वत्ता, सदाचार, धार्मिकवृत्ती, विनयशीलता, आत्मसंयम, रसिकता, विवेक असे बरेच सद्‌गुण येतात. उतावळेपणा हा मात्र यांच्या स्वभावातील एक दोष म्हणावा असा असतो. इतके सारे सद्‌गुण एकत्र असूनही स्वभावातील उतावळेपणामुळे बऱ्याचदा या व्यक्ती स्वत:चे नुकसान करून घेतात. त्याचबरोबर अधिकार, सत्तासंपादन, नेतृत्त्व अशा काही गोष्टींमध्ये मात्र हे नक्षत्र फारसे कामाचे नाही. या नक्षत्रावरील व्यक्ती एखाद्या गोष्टीकडे अगदी तोलून मापून बघतात.

खरे तर हे नक्षत्र स्त्रिया व पुरुष या दोघांसाठी चांगले असले तरी हे नक्षत्र स्त्रियांसाठी अधिक लाभदायक आहे. परस्परविरोधी असे कितीतरी गुण या जन्मनक्षत्राच्या स्त्रियांमध्ये आढळून येतात. लक्ष्मी (अर्थात् धन, ऐश्वर्य) रूप किंवा सौंदर्य आणि त्याहूनही उत्तम म्हणजे सरस्वतीचं वरदान अर्थात् बुद्धिमत्ता या सर्वांची मुक्त बरसात या नक्षत्रावर झालेली असते. हे इतके गुण कमी म्हणून की काय, वात्सल्य, प्रेमभावना, संगोपनवृत्ती देणारे असे हे नक्षत्र आहे. एक आदर्श स्त्री म्हणवून घ्यायला आणखी काय हवं?

हे नक्षत्र शुभ व देवगुणी असल्यानं मुहूर्तशास्त्रात ह्या नक्षत्राचं महत्त्व खूप आहे. ह्या नक्षत्रातील सर्व ग्रह निरनिराळे फलादेश देतात.

प्रकृतीच्या दृष्टीनं मात्र हे एक नक्षत्र अगदीच खराब म्हणावं असं आहे. रोगदाहक नसले तरी क्रॉनिक स्वरुपातील असतात. विशेषत: मूत्रपिंडाचे विकार, रक्तदाब, मधुमेह, दमा या प्रकारातील सर्दी, कफ आणि वातव्याधी होण्याची शक्यतादेखील अधिक असते. काविळीसारखे यकृताचे विकार होण्याची शक्यताही असते. म्हणून स्वाती नक्षत्राच्या व्यक्तिंनी वाताची काळजी घ्यायला हवी.

स्वाती नक्षत्राचा आराध्यवृक्ष आहे अर्जुन किंवा अर्जुन सादडा. याचं शास्त्रीय परिभाषेत नाव आहे **Terminalia -rjuna**. अर्जुन सादडा वातरोगावर अतिशय गुणकारी आहे. रक्तवाहिन्या, हृदयाचे स्नायू यांना जोम देणारा आहे. हृदय दौर्बल्यता, रक्तदाब, धमनी काठिण्य या विकारांमध्ये अर्जुनापासून बनविलेली औषधे उपयुक्त ठरतात. अर्जुनवृक्ष प्रमेह म्हणजेच मेदाचा नाश करणाराही आहे. मूत्रदोषांवरही अर्जुनसादडा उपयोगी आहे.

या वृक्षाला पर्यायी वृक्ष म्हणून तुळसदेखील सांगितलेली आहे. वृक्षपूजन संकल्प करून प्रार्थना करावी. पाणी घालावे. हळद, कुंकू व लाल फूल वहावे. गूळ खोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा. नक्षत्रदेवतेचा मंत्र १०८ वेळा म्हणावा किंवा राहूचा पौराणिक मंत्र १२१ वेळा जपावा.

आता नक्षत्र उपासनेचे मंत्र व पूजाविधी जाणून घेऊ या.

१) नक्षत्र नाम मंत्र – । स्वात्यै नमः ।

२) नक्षत्र देवता मंत्र – । वायवे नमः ।

३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – । वायोरग्णेति मंत्रः ।

४) नक्षत्र स्वामी मंत्र – अर्धकायं महावीर्यं चन्द्रादित्यविमर्दनम् ।
सिंहीकागर्भसंभूतं तं राहुं प्रणमाम्यहम् ।।

पूजा : स्वाती नक्षत्राच्या पहिल्या चरणाव्र जन्म झालेला असेल तर गुरूवारी पूजा सुरू करून ९ दिवस करावी. दुसऱ्या चरणावर जन्मलेल्यांनी शनिवारी पूजा सुरू करून १७ दिवस करावी. तिसरे चरण असेल तर शनिवारी पूजा सुरू करून २१ दिवस करावी. चौथे चरण असल्यास गुरूवारी पूजा सुरू करून ९ दिवस करावी.

पूजाकाल संपल्यावर एक सुपारी घेऊन ती जातकावरून उतरवून गरिबाला खाण्यास द्यावी.

- नक्षत्राचे नाव : स्वाती
- इंग्रजी नाव : आर्च्युरस (Arcturus)
- तारकासंघाचे नाव : भुतप
- ताऱ्यांची संख्या : १
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : अल्फा बोतीज
- आयनांश : १८६°४०' ते २००°००'
- राशी : तूळ
- सूर्याचा वास : २४ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर (सुमारे)
- नक्षत्राकृती : पोवळे
- नक्षत्रस्वामी : राहू
- नक्षत्रदेवता : वायू
- शुभ अंक : ६, ८
- शुभ रंग : पांढरा, निळा
- शुभ रत्न : हिरा, नीलम
- नक्षत्राक्षरे : रू, रे, रो, ता
- आराध्यवृक्ष : अर्जुन
- बोटॅनिकल नेम : Terminalia arjuna (Roxc)
- क्षेमकर वृक्ष : सावर
- धार्योषधी : जाई
- जपासाठी मंत्र : । वायुदेवाय नमः । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : वायुर्नक्षत्रमभ्येति निष्ट्याम् । तिग्म शृङ्गो वृषभो रोरुवाणः ।।
समी रयन्भुवना मातरिश्वा । अप द्वेषां सि नुदतामरातीः ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे)
मे–जून महिन्यात पूर्वेला, जुलै–ऑगस्ट महिन्यात डोक्यावर, सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यात पश्चिमेकडे.



१६. विशाखा

जगण्यासाठी जन्म आपुला

नक्षत्रमालेतील सोळावे नक्षत्र विशाखा हे असून त्याला राधा किंवा तराजूचा दांडा या नावानेही ओळखले जाते. विशाखा याचा अर्थ दोन शाखा करणारे म्हणजे दोन भाग करणारे असाही आहे. या नक्षत्रामध्ये एकूण चार तारे असून त्यातील दोन तारे तेजस्वी असून दोन तारे काहीसे फिक़्कट आहेत. हे नक्षत्र दरवाजाभोवती लावलेल्या तोरणासारखे दिसते. तसेच ते तराजूसारखेही दिसते. वैशाख महिन्याचे नाव विशाखा नक्षत्रावरून पडलेले आहे. वैशाख महिन्यात म्हणजे फेब्रुवारी महिन्याच्या सुमारास हे नक्षत्र आकाशामध्ये रात्रभर दिसते. वैशाख पौर्णिमेचा चंद्र या नक्षत्रामध्ये दिसतो. विशाखा नक्षत्राचे इंग्रजी नाव अल्फा लिब्री असे आहे. विशाखा नक्षत्राचे पहिले तीन चरण हे तूळ राशीमध्ये येतात आणि चौथा चरण हा वृश्चिक राशीमध्ये येतो.

विशाखा नक्षत्राची देवता इंद्राग्नी ही आहे. इंद्र आणि अग्नी या दोन देवतांचे गुण एकत्र येऊन इंद्राग्नी ही देवता बनली आहे. विशाखा नक्षत्राचे वैशिष्ट्य म्हणजे आकाशामध्ये विशाखा हेच एकमात्र नक्षत्र फक्त डोळ्यांनी नीट पाहता येते. ते गर्द हिरव्या रंगाचे दिसते. या नक्षत्राच्या दोन तेजस्वी ताऱ्यांमधून अनेकदा चंद्राचे भ्रमण होत असते. राम आणि लक्ष्मण यांच्या मधोमध चालणाऱ्या सीतेची उपमा या नक्षत्राला दिली गेली आहे. कालीदासानेही शकुंतला या अजरामर काव्यामध्ये अनुसूया आणि प्रियंवदा या दोन जीवलग सख्यांच्या मधून चालणाऱ्या शकुंतलेला विशाखा नक्षत्राची उपमा बहाल केली आहे. इंद्र आणि अग्नी या जोड देवतांमधून जाणाऱ्या राधेचीही उपमा विशाखा नक्षत्राला दिली गेली आहे. इंद्र आणि अग्नी या दोन्ही देवता उग्र स्वभावाच्या आहेत. मात्र त्या तितक्याच उदार मनाच्या आहेत. त्यांची मनापासून प्रार्थना आणि स्तुती केल्यास त्या भरभरून आशिर्वाद देतात.

विशाखा नक्षत्राचा स्वामी गुरू हा आहे. गुरू हा विद्येचे माहेरघर आणि ज्ञान देणारा आहे. गुरूच्या कृपेने विशाखा नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्ती हुषार आणि बुद्धिमान असतात. त्या दिसायला देखण्या असल्या तरी त्यांचे दर्शन अनेकदा उग्र असते. त्यांच्या मनात नक़्की काय चालते आहे त्याचा थांगपत्ता लागत नाही. अनेकदा त्या भांडणे लावून देतात, कलहप्रीय असतात आणि काहीवेळा तर दुष्टपणाकडे झुकलेल्या असतात. बचत करणे, संपत्ती कमविणे यापेक्षा त्यांचा कल उधळेपणाकडे असतो. त्या खर्चिक आणि चैनी वृत्तीच्या असतात. विशाखा नक्षत्रातील व्यक्तिचा स्वभाव हट्टी आणि चिडका असतो. पण त्या हौशी आणि रसिकही असतात. त्या गोड बोलणाऱ्या असून काहीवेळा स्त्रीलंपटही असतात. त्यांना फार महत्त्वाकांक्षा नसते. खावे, प्यावे, मजा करावी अशी त्यांची वृत्ती असते. त्या पराक्रमी, धाडसी असून स्वावलंबी असतात. निश्चित ध्येय ठरवून मार्गक्रमणा न केल्यामुळे अनेकदा विशाखा नक्षत्राच्या व्यक्तिंची अपेक्षित प्रगती होत नाही असे दिसते. विशाखा नक्षत्राच्या व्यक्तिंना मधुमेह, रक्तदाब, फिट येणे, हिस्टेरिया, त्वचा विकार, रक्तदोष, लैंगिक विकार, गळवे सूज, पित्त, अंगदुखी, इ. रोग होण्याची शक्यता असते. अनेकदा मानसिक ताणामुळे येणारे विकार विशाखा नक्षत्राच्या व्यक्तिंना होतात. नकारात्मक वृत्तीचा शारीरिक त्रास होण्याची शक्यता असते.

विशाखा नक्षत्राचा आराध्यवृक्ष पारिजातक म्हणजे प्राजक्त हा आहे. प्राजक्त हा स्वर्गातील

नंदनवनातील वृक्ष असून श्रीकृष्णाची पत्नी सत्यभामा हिच्या हट्टाखातर हा वृक्ष पृथ्वीवर आल्याची कथा प्रसिद्ध आहे. त्यातही प्राजक्ताचे झाड सत्यभामेच्या अंगणात आणि फुले रुक्मिणीच्या अंगणात अशीही कथा आहे. त्यामुळे विशाखाची द्विशाखा कहाणी प्राजक्तालाही लागू पडते. प्राजक्ताचे इंग्रजी नाव ओलिएसी असे असून त्याला नाईट जस्मीन असेही म्हणतात. प्राजक्ताचे झाड संपूर्ण भारतात सर्वत्र आढळून येते. मूळव्याध, भूक न लागणे, त्वचारोग, रक्ताविकार, मूत्ररोगावर प्राजक्ताची पाने, साली आणि चूर्ण उपयोगी आहे. कफ, वात, पित्त शुद्ध करण्याचे काम प्राजक्ताचा काढा करतो. थंडीतापावर पाने आणि गूळ एकत्र करून दिली जातात. महासुदर्शन काढ्यामध्ये प्राजक्ताचा वापर होतो. प्राजक्ताच्या पानांच्या देठापासून खाण्याचा रंग तयार केला जातो.

प्राजक्ताची पूजा करताना लहान झाडाची किंवा वृक्षाची पूजा करावी. संकल्प करून प्रार्थना करावी. झाडाला पाणी घालावे. हळद कुंकू आणि पिवळी फुले वहावीत. दही–भाताचा नैवेद्य दाखववावा. नक्षत्रदेवतेचा यंत्र १०८ वेळा म्हणावा.

१) नक्षत्र देवता मंत्र – । इंद्राग्निय्याय नमः ।
२) नक्षत्र नाम मंत्र – । विशाखाय्याय नमः ।
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – । इंद्राग्नि इति मंत्रः ।
४) पौराणिक मंत्र – देवा नां च ऋषी नां च गुरूं कांचनसंन्निभम् ।
बुद्धिभुतं त्रिलोकेशं तं नमामि बृहस्पतिम् ।।

पूजा : विशाखा नक्षत्राच्या पहिल्या चरणावर जन्म झालेला असल्यास मंगळवारी पूजा सुरू करून ती पुढे १५ दिवस करावी. दुसरे चरण असल्यास शुक्रवारी पूजा सुरू करून ती पुढे १८ दिवस करावी. तिसरे चरण असल्यास बुधवारी पूजा सुरू करून ती पुढे १५ दिवस करावी. चौथे चरण असल्यास सोमवारी पूजा करून ती पुढे १३ दिवस करावी.

पूजा कालावधी संपल्यावर दही आणि पीठाचे एकत्र करून मुटके करावे. घराबाहेरून सर्व दिशांना फिरवून आणून शेवटी दक्षिण दिशेला टाकून द्यावेत.

- नक्षत्राचे नाव : विशाखा
- इंग्रजी नाव : लिब्रा (Libra)
- तारकासंघाचे नाव : तुला
- ताऱ्यांची संख्या : २
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : तुला मंडलातील अल्फा आणि बीटा तारे
- आयनांश : २००°००' ते २१३°२०'
- राशी : तूळ / वृश्चिक
- सूर्याचा वास : ७ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर (सुमारे)
- नक्षत्राकृती : तोरण
- नक्षत्रस्वामी : गुरू
- नक्षत्रदेवता : इंद्राग्नी
- शुभ अंक : ३, ६

- शुभ रंग : पिवळा, सोनेरी
- शुभ रत्न : पुष्कराज
- नक्षत्राक्षरे : ती,तू,ते/तो
- आराध्यवृक्ष : प्राजक्त
- बोटॅनिकल नेम : Flacourtia indica (Burm. F) Merr
- क्षेमकर वृक्ष : राळ
- धार्योषधी : गुंजा
- जपासाठी मंत्र : । इंद्राग्निभ्यां नमः । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : दूरमस्मच्छात्रवो यन्तु भीताः। तदिन्द्राग्नी कृणुतां तद्विशाखे ।।
तन्नो देवा अनुमदन्तु यज्ञम् । पश्चात्पुरस्तादभयं ना अस्तु ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे)
जून-जुलै महिन्यात पूर्वेला, ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात
डोक्यावर, ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात पश्चिमेकडे.

१७. अनुराधा

मैत्रीचे अनोखे बंधन

विशाखा नक्षत्राचे एक नाव राधा असेही आहे. राधेपाठोपाठ येणारे म्हणून अनुराधा हे नक्षत्रमालेतील १८ वे नक्षत्र आहे. आकाशातही विशाखा पाठोपाठ अनुराधा हे नक्षत्र दिसू लागते. अनुराधानक्षत्र हे भाग्यवान असून ते मित्र जोडणारे, माणसे जोडणारे जणू सेतूप्रमाणे कार्य करते. या नक्षत्रामध्ये एकूण ४ तारे असून ते सरळ एका रेषेमध्ये मागे-पुढे असे दिसतात. जणू तांदळाचे चार दाणे किंवा अक्षतांचे चार ढीग असे हे नक्षत्र दिसते. मित्र म्हणजे सुहृदय सर्वकाली साथ देतो तो मित्र. मरणापासून, विनाशापासून वाचवणारा, अचानक येऊन रक्षण करणारा तो मित्र. अनुराधा नक्षत्राच्या व्यक्ती या सहकार्य करणाऱ्या, मदत करणाऱ्या आणि मित्रांचा गोतावळा निर्माण करणाऱ्या असतात. मागून येऊनही खंबीरपणे साथ देणाऱ्या असतात. त्या कार्य पुढे नेतात. माणसांना उद्योगी बनवतात. हे नक्षत्र देवगणाचे आणि शुभ लक्षणांचे आहे. याचे इंग्रजी नाव डेल्टा स्कॉर्पि हे आहे. अनुराधा याचा अर्थ शुभ आणि समृद्धी प्रदान करणारे असेही आहे. मैत्री आणि सहकार्य यांची वृद्धी करणारे हे नक्षत्र आहे. राक्षसांवर विजय मिळवण्यासाठी सर्व देवता, यक्ष, किन्नर, गंधर्व यांनी ज्या नक्षत्रावर एकत्र येऊन प्रार्थना आणि संकल्प केला ते हे अनुराधा नक्षत्र आहे. अनुराधा नक्षत्राच्या व्यक्ती आनंदी, मौज मस्ती करणाऱ्या, जीवनाचा विविध प्रकारांनी आनंद लुटणाऱ्या असतात. शौकीन, करमणूक प्रधान, सौख्यासीन, कलासक्त अशाही असतात. त्या अनेकदा खवैय्या किंवा खादाड या प्रकारातही मोडतात. त्यांना नाट्य, संगीत, नृत्य, उंची वस्त्रे, सुगंधी द्रव्ये यांची आवड असते. वाहन सौख्य आणि फिरणे त्यांना हवेहवेसे वाटते. त्यांचे मन काही वेळा चंचल आणि उदास असते. मात्र अनेकदा त्या ठाम निश्चयी, प्रामाणिक, विश्वासपात्र आणि स्थिर बुद्धीच्या असतात. हे नक्षत्र अतिशय मोहक असून ते कुणालाही आकर्षित करून घेते. विशेषतः या नक्षत्रावरील स्त्रिया या अतिशय मादक, आकर्षक

बांध्याच्या आणि कुणालाही आपल्या मोहपाशात सहजपणे बांधून घेणाऱ्या असतात. त्या कामुक असून त्यांचे डोळे आणि भुवया रेखीव असतात. या नक्षत्रामध्ये पराक्रम, महत्वाकांक्षा, स्वावलंबी व धाडसीपणा हे गुण कमी प्रमाणात असतात. अधिकार गाजवण्याच्या वृत्तीपेक्षा त्या थोड्याशा मवाळ आणि सहमतीच्या स्वभावाच्या असतात. कला, सौंदर्य आणि संपत्ती या नक्षत्राला अनुकूल आहे. मात्र साहस, कार्यक्षमता, शौर्य यांची कमी असते. हे नक्षत्र थोडेसे कामातूर, अवखळ आणि विषयोपभोगी लोलूप असे आहे. हे शुभ नक्षत्र असून जर ते बिघडले तरी व्यसनी, बाहेरख्यालीपणा इ. दुर्गुणांची शिकार बनण्याची शक्यता असते. प्रेम करण्यामध्ये हे नक्षत्र आघाडीवर असून सुखसाधनांकडे नेहमी ओढा असतो. मोहाला बळी पडून ते भरटकण्याची शक्यता असते.

अनुराधा नक्षत्राचा स्वामी शनी हा आहे. सर्वांना ज्या शनीची भिती वाटते तो शनी अनुराधा नक्षत्रावर मात्र कृपादृष्टी ठेवून आहे. अनुराधा नक्षत्राचे दैवत मित्र म्हणजे सूर्य हे आहे. सूर्य ज्याप्रमाणे सर्वांच्या जीवनामध्ये समृद्धीची बरसात करतो त्याप्रमाणे हे नक्षत्र समृद्धी देणारे असे आहे. या नक्षत्रावर होणारे रोग फारसे दाहक नसतात. मूत्ररोग, मूतखडा, सर्दी, खोकला, नाक कान घसा, मानसिक चिंता, पाळीचे विकार, गर्भाशयाचे विकार, मधुमेह, संसर्गजन्य रोग, व्यसनातून होणारे रोग, नैराश्य, चिंता, मानसिक विकार इ. आजारांचा त्रास होऊ शकतो.

अनुराधा नक्षत्राचा आराध्यवृक्ष बकुळ हा आहे. त्याला सॅपॉटॅसी (मायम्यूसोप्स एलिंगी) मायूमसाप्स असे म्हणतात. कोकणात आणि सर्वत्र आढळणारा हा वृक्ष बकुळ फुलांसाठी प्रसिद्ध आहे. लहानशी पण देखणी आणि अतिशय सुगंधी अशी बकुळीची फुले असतात. इतर फुले कोमेजतात मात्र बकुळ फुले वाळल्यानंतरही त्यांचा सुवास येत राहतो. कोमेजल्यावरही देवाला वाहले जाणारे बकुळाचे फूल हे एकमात्र फूल असावे. दृढ मैत्रीचा हवाला देणारे आणि मैत्रीचा सुगंध सतत दरवळत ठेवणारे बकुळाचे फूल अनुराधा नक्षत्राच्या स्वभावाशी अगदी मिळते-जुळते आहे. बकुळाला केसर असेही म्हटले जाते. बकुळाच्या फुलामधील परागकण हे केसरासारखेच असतात. बकुळाच्या सालीलाही सुगंध येतो. बकुळाची फुले भगव्या रंगाची तुरट गोड लागतात. फुलांचे चूर्ण डोकेदुखी, अर्धशिशीवर गुणकारी आहे. काढा सर्दी खोकल्यावर उपयोगी पडतो. बकुळाच्या सालीचा उपयोग दंतचूर्णामध्ये करतात आणि त्यामुळे दात बळकट होतात. बकुळ फुलांचा वास हृदयरोगांवर गुणकारी आहे. फुलांचे सरबत मूत्र विकारांवर गुणकारी आहे.

बकुळाची पूजा करताना त्याची फुले, पाने किंवा छोटी फांदी घ्यावी. वृक्ष किंवा पानाफुलांवर पाणी वहावे. निळ्या रंगाची फुले वहावीत. पांढरी किंवा पिवळी फुलेही वाहतात. दूध साखरेचा नैवेद्य दाखवावा. नक्षत्र देवता मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

१) नक्षत्र देवता मंत्र	–	*। मित्राय नम: ।*
२) नक्षत्र नाम मंत्र	–	*। अनुराधाय्यो नम: ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र	–	*। मित्रेति मंत्र: ।*
४) पौराणिक मंत्र	–	*नीलांजनसमाभासमं रविपुत्रं यमाग्रजम्।* *छायामार्तंण्डसंभूतं तं नमामि शनैश्चरम् ।।*

पूजा : अनुराधा नक्षत्राच्या पहिल्या चरणावर जन्म झाला असल्यास रविवारी पूजा सुरू करून पुढे ती १६ दिवस करावी. दुसरे चरण असल्यास बुधवारी पूजा सुरू करून पुढे ती १६ दिवस करावी.

तिसरे चरण असल्यास शुक्रवारी पूजा सुरू करून पुढे ती ३५ दिवस करावी: चौथे चरण असल्यास मंगळवारी पूजा सुरू करून पुढे ती २४ दिवस करावी.

पूजाकाळ संपल्यावर घरातील जुनी वस्त्रे गरजू गरीब माणसाला दान करावीत.

- नक्षत्राचे नाव : अनुराधा
- इंग्रजी नाव : बेटा, डेल्टा व पी. स्कॉर्पि (Beta, delta pi scorpi)
- तारकासंघाचे नाव : वृश्चिक
- ताऱ्यांची संख्या : ४
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : वृश्चिक मंडलातील बीटा, डेल्टा, पाई आणि रो तारे
- आयनांश : २१३°२०' ते २२६°४०'
- राशी : वृश्चिक
- सूर्याचा वास : १९ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर (सुमारे)
- नक्षत्राकृती : बली
- नक्षत्रस्वामी : शनी
- नक्षत्रदेवता : मित्र
- शुभ अंक : ८,९
- शुभ रंग : लाल, निळा, पांढरा
- शुभ रत्न : पोवळे, हिरा
- नक्षत्राक्षरे : ना, नी, नू, न
- आराध्यवृक्ष : बकुळ
- बोटॅनिकल नेम : Mimusops elengi L.
- क्षेमकर वृक्ष : वेत
- धार्योषधी : रूई
- जपासाठी मंत्र : । मित्राय नमः । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : ऋध्यास्म हव्यैर्नमसोपसद्य । मित्रं देवं मित्रधेयं नो अस्तु ।।
  अनुराधान्हविषा वर्धयन्तः । शतं जीवम शरदः सवीराः ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे)
  जुलै-ऑगस्ट महिन्यात पूर्वेला, सप्टेंबर-ऑक्टोबर
  महिन्यात डोक्यावर, नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात पश्चिमेकडे.

१८. ज्येष्ठा

अधाशी कर्तृत्वाच्या शोधात

ज्येष्ठ म्हणजे मोठा. अर्थातच नावाप्रमाणे या नक्षत्राच्या बाबतीत सर्व बाबी मोठेपणाच्या (चांगुलपणाच्या) लागू होतीलच याची खात्री नाही. ज्येष्ठा नक्षत्रात ३ अंगठीच्या आकाराचे खडे

असून ज्येष्ठ महिन्यात याचं दर्शन होते. नक्षत्राचे ४ ही चरण वृश्चिक राशित येतात. इंग्रजीत हे अँनटारिस (Antaris) म्हणून ओळखलं जातं.

हे नक्षत्र स्त्रियांपेक्षा पुरुषांना अधिक लाभप्रद आहे. राग,दोष, कपटीपणा, हेकेखोरपणा यासारखे अवगुण या व्यक्तिंमध्ये अधिक असतात. धाडसीपणा, पराक्रम, स्वकर्तृत्व दाखविणं इ. सद्गुण असले तरीही 'खलस्य शक्तिः परपीडनाय' या उक्ती प्रमाणं गुणांचा उपयोग दुसऱ्यांशी भांडणे, वाद-विवाद इ. साठी करण्याची प्रवृत्ती अधिक प्रमाणात दिसून येते. पराक्रमी मुष्टीयोद्धा दुर्योधनाचं हे नक्षत्र होते. खरं तर महाभारतात दुर्योधनाचं मूळ नाव 'सुयोधन' असेच होते, असे उल्लेख आहेत. अंगभूत दुर्गुणांमुळेच की काय तो 'दुर्य अर्थात् दुष्ट' योद्धा म्हणजेच कपटानं युद्ध करणारा ठरला. मूलतः शेतीसाठी पाट काढून शेती समृद्ध करणारा तो एक आदर्श प्रशासक म्हणून **'कियतार्जुनीयम्'** मध्ये वर्णिला गेला आहे. हे इतकं इतंभूत सांगण्याचं कारण म्हणजे या नक्षत्राच्या व्यक्ती असेच गुण आणि दुर्गुण यांच्यात अस्पष्ट सीमा रेषा घेऊन वागताना दिसतील.

स्त्रियांना हे नक्षत्र अनुकूल नाही. कारण वात्सल्य, दाक्षिण्य, ऋजुता इ.गुणांचा अभावच या नक्षत्राखाली दिसून येतो.

ज्येष्ठा नक्षत्राची देवता आहे इंद्र. सर्व देवांचा तो अधिपती म्हणूनच देवेंद्र. वेदकाळातील इंद्रही सर्वाधिकतम लोकप्रिय देवता होती. वृत्रासारख्या असुरांना ठार मारणारा, सोमरसाचे घडेच्या घडे पिणाऱ्या इंद्राच्या स्तुती प्रितर्थ्य ऋग्वेदादी वेदांमधून जवळपास दोनशे सुक्ते गायली गेली आहेत. इंद्र ही वेदकाळातील सर्वोच्च, पराक्रमी व राष्ट्रीय देवता होय. इंद्राचे वर्णन तो पीळदार शरीरयष्टीचा, गोरापान, देखणा, बलवान अनेक अस्त्र-शस्त्रांमध्ये प्रविण असलेला असे केलेले आढळते. पण पृथ्वीतलावरील एखाद्या पुण्यवान आत्म्याने स्वतःच्या पुण्याईने इंद्रपद पटकावण्याचा प्रयत्न करताच त्याच्यातील दुष्ट वृत्ती जागृत होते. त्यामुळेच जन्मभर सत्य बोलणारा युधिष्ठिर नरो वा कुंजरो वा अशी कुंपणावरची भूमिका घेऊन इंद्रपदापासून ढळतो.

ज्येष्ठा जन्मनक्षत्रवाल्यांची प्रकृती खरं तर काटक आणि कणखर अशी असते. शरीरस्वास्थ्य असलं तरी होणारे रोग हे जाचक व दाहक असतात. अंगभूत गर्मीमुळे होणारे अपघात, शस्त्रांचे घाव, विषारी प्राण्यांचे दंश, गुप्तरोग, मूळव्याध, मूत्रदोष, हृदयरोग इ. रोगांची शक्यता असते.

ज्येष्ठा नक्षत्राचा आराध्यवृक्ष आहे सावर (काटेसावर). शाल्मली हे त्याचे संस्कृत नाव आहे. शेवरीचा कापूस अत्यंत मऊ असून गाद्या, उशा इ. साठी याचा वापर करतात. झाडाला काटे असल्यामुळे काटेसावर असं नाव पडलं आहे. सावरीची फळे,फुले व मूळ इ. वातपित्तशामक असतात. याच्या डिंकाला मोचरस असे म्हणतात. वर उल्लेखलेल्या मूळव्याध, मूत्ररोग, उष्णतेचे विकार, दंश, घाव इ. सर्वांवर हा मोचरस अत्यंत उपयोगी आहे. जळजळ, सूज इ. साठी सावराच्या सालीचा लेप लावतात.मुखरोग, दंतमंजन इ. मध्येही मोचरसाचा उपयोग होतो.

ज्येष्ठा नक्षत्रासाठी खरंतर प्रत्येक ग्रंथामध्ये वेगवेगळ्या आराध्यवृक्षाचा उल्लेख आढळतो. नक्षत्रावरील व्यक्ती, त्यांना होऊ शकणारे संभाव्य आजार आणि ते टाळण्यासाठी त्या त्या प्रकारच्या आराध्यवृक्षाची उपासना, असा विषय सर्व नक्षत्रवृक्षांमध्ये मांडलेला आहे. पण. काही ठिकाणी संभाव्य रोगांवर उपचार करण्यास उपयोगी अशा अन्यही काही वृक्षांचे उल्लेख आहेत.

खरं म्हणजे आराध्यवृक्षांमधून वृक्ष संवर्धन मानसिक समाधान , शांती इ. सारखे अनेक हेतू साध्य करणं ही उद्दिष्टं आपल्या पूर्वजांची असावीत.

वृक्षपूजनाचा विधी जाणून घेऊया

१) नक्षत्र नाम मंत्र – । ज्येष्ठायै नमः ।

२) नक्षत्र वेदोक्त मंत्र – । त्राकार मिंद्रेति मंत्रः ।

३) नक्षत्र देवता मंत्र – । इंद्रायेण नमः ।

४) नक्षत्र स्वामी मंत्र – *प्रियंगुकलिकाश्यामं रुपेणाप्रतिमं बुधम् ।*
सौम्यं सौम्यगुणोपेतं तं बुधं प्रणमाम्यहम् ।।

या वृक्षाची पूजा कमीत कमी २३ दिवस करावी. संकल्प व प्रार्थना करावी. वृक्षाला पाणी घालावे. हळद–कुंकू व पांढरे फूल वहावे. गूळ–खोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा. वरील पैकी कोणताही एक मंत्र १०८ वेळा जपावा. न जमल्यास नक्षत्रस्वामी बुधाचा पौराणिक मंत्र ११३ वेळा जपावा.

पूजा : ज्येष्ठा नक्षत्राच्या प्रथम चरणावर जन्मलेल्यांनी गुरूवारी पूजा सुरू करून ती २३दिवस करावी. दुसऱ्या चरणात जन्म झालेल्यांनी शनिवारी पूजा सुरू करून २३ दिवस करावी. तिसरे चरण असणाऱ्यांनी शनिवारी पूजा सुरू करावी व सलग २६ दिवस करावी. चौथ्या चरणात जन्म असलेल्यांनी गुरूवारी पूजेचा प्रारंभ करावा व ५६ दिवस विनाखंड पूजा करावी.

पूजा समाप्तीनंतर पादरज (पायाखालची माती) दान द्यावी. शंकराच्या देवळात तेलाच्या दिव्यात तेल घालावे.

■ नक्षत्राचे नाव	:	ज्येष्ठा
■ इंग्रजी नाव	:	अँमटारिस (Amtares)
■ तारकासंघाचे नाव	:	वृश्चिक
■ ताऱ्यांची संख्या	:	३
■ ताऱ्यांची वैज्ञानिक नावे	:	वृश्चिक मंडलातील सिग्मा, अल्फा आणि टौ तारे
■ आयनांश	:	२२६°४०' ते २४०°००'
■ राशी	:	वृश्चिक
■ सूर्याचा वास	:	३ डिसेंबर ते १६ डिसेंबर (सुमारे)
■ नक्षत्राकृती	:	कुंडल
■ नक्षत्रस्वामी	:	बुध
■ नक्षत्रदेवता	:	इंद्र
■ शुभ अंक	:	९
■ शुभ रंग	:	लाल, हिरवा
■ शुभ रत्न	:	पोवळे, पाचू
■ नक्षत्राक्षरे	:	नो, या, यी, यू
■ आराध्यवृक्ष	:	सावरी
■ बोटॅनिकल नेम	:	Pinus roxcurghi Sarg.
■ क्षेमकर वृक्ष	:	फणस
■ धार्योषधी	:	आघाडा
■ जपासाठी मंत्र	:	। इंद्रदेवाय नमः । (जपाची संख्या : १०,०००)

■ नक्षत्र स्तुती : इन्द्रो ज्येष्ठामनु नक्षतमेति । यस्मिन्वृत्रं वृत्रतूर्ये ततार ।।
तस्मिन्वयममृतं दुहानाः । क्षुधं तरेम दुरुतिं दुरिष्टिम् ।।

■ आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) जुलै–ऑगस्ट महिन्यात पूर्वेला दक्षिणेकडे, सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यांत डोक्यावर दक्षिणेकडे, नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यात पश्चिमेला दक्षिणेकडे.

१९. मूळ
शोधू नये ते

घराण्यातला दिवा अथवा दिवटा जेव्हा बापाच्या विरुद्ध बोलू लागतो तेव्हा सहजच तोंडून उद्गार बाहेर पडतात. पोरगं अगदी आमच्या 'मूळा' वर उठलंय. या नक्षत्रावरं जन्मलेल्याबाबत का कोण जाणे पण एक भीती, धास्तीचं वातावरण प्रत्येकाच्याच मनात असतं. कृष्णपक्षात अमावस्येला जन्म झालेल्या मूळ नक्षत्रवाल्यांना अगदी अशुभातील अशुभ ठरवलं गेलं आहे.

खरं तर हे नक्षत्र शुभगुणधर्मी आहे. पण जन्म शांती आणि इतर गैरसमजुतींमुळे या नक्षत्राभोवती एक वेगळीच भीती दाटली आहे. या जन्मनक्षत्रावरील व्यक्ती उच्च पदावर पोहोचणाऱ्या आणि महत्त्वाकांक्षी असतात. अंगानं सशक्त, दणकट अशा या व्यक्ती नम्र,न्यायी आणि परोपकारी देखील असतात. राजकारण, समाजकारण, उच्चपदस्थ अधिकारी यांना अनुकूल असं हे नक्षत्र आहे. खेळाडू, शरीर सौष्ठव गाजवणारे खेळाडू या सर्वांना हे नक्षत्र लाभदायक आहे.

उष्णतेच्या विकारांचं भय या व्यक्तिंना असतं. शस्त्रांचे आघात, आगीमुळे होणारी जळजळ, अस्थिभंग यासारखे आजार यांना संभवतात.

या नक्षत्राचे चारही चरण धनु राशीत येतात. या नक्षत्राचे ११ तारे असतात. कुणाला त्यांचा आकार सर्पमुखासारखा वाटतो तर, कोणी याला 'सिंह पुच्छ' असेही म्हणतात. इंग्रजीत हे 'लामडा' स्कॉरपी (Lamda Scorpi) म्हणून प्रसिद्ध आहे.

हे नक्षत्र स्त्रियांपेक्षा पुरुषांना अधिक अनुकूल आहे. या व्यक्ती खरे तर स्वतःच्या क्षेत्रात उच्चस्थानी पोहोचलेल्या अशा दिसतील. धनसंचय करणे, घराण्याचा नावलौकिक वाढवणे, महत्वाकांक्षी असणे हे यांना सहज जमतं.

ह्या नक्षत्राची देवता 'निऋति' ही आहे. ही देवता एक वैदिक देवता असून काही वैदिक संहितांमध्ये याचा उल्लेख मृत्युदेवता यमाबरोबर केलेला आढळतो. 'निऋती' चा शब्दकोशानुसार अर्थ नाश, हानी, आपत्ती, विनाश असा होतो. बहुधा या देवतेच्या स्वरूपानुसार या नक्षत्राशी अशुभाचा संबंध जोडला गेला असावा. दक्षिण–पश्चिम यामधील दिशेचा निऋती हा स्वामी आहे. म्हणूनच या दिशेला नैऋत्य दिशा म्हणतात. ही देवता बलाढ्य असून नग्न खड्ग (तलवार) घेऊन गर्दभावर आरूढ असणारी आहे. ११ रुद्रांपैकी एक निऋति रुद्र होय. ह्या नक्षत्राचा उपासना वृक्ष राळ वृक्ष किंवा साल वृक्ष होय. वनस्पतीशास्त्रानुसार चे नाव **Boswellia Serrata** या झाडाच्या सालीपासून मिळणारा चीक राळ म्हणून उपयोगी पडतो. आगीच्या संबंधित रोगांवर जसे डोळ्यांची आग, मूळव्याध, अल्सर

या सारख्या रोगांवर हा वृक्ष अत्यंत उपयोगी आहे. त्वचारोग जसे खरूज, गजकर्ण, नायटे, खांडके, इसब इत्यादींवर देखील राळ हितकारक आहे.

राळेचा उपयोग बाह्य आणि अभ्यंतर म्हणजे पोटात (अगदी सूक्ष्म प्रमाणात) घेण्यासाठी करता येतो. राळ उष्ण गुणधर्माची असल्याने शैल्यकारक दूध, तूप इत्यादींसह त्याचा पोटात घेण्यासाठी उपयोग केला जातो. उष्णतेच्या, भाजण्याच्या रोगांवर उपयोगी राळेमुळे कैलास जीवन, विपादिका मलम इ. थंडावा देणाऱ्या मलमांमध्ये राळ हाच प्रमुख घटक असतो. काही आयुर्वेदिक ग्रंथ हा वृक्ष ग्रहबाधा नाशक असल्याचा उल्लेख करतात हे विशेष!

१) नक्षत्रनाम मंत्र	–	*। मूलयै नमः ।*
२) नक्षत्र देवता मंत्र	–	*। निवृश्तये नमः ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र	–	*। माता पुत्रेति मंत्रः ।*
४) नक्षत्र स्वामी मंत्र	–	*पलाशपुष्पसंकाशं तारकाग्रहमस्तकम् ।* *रौद्रं रौद्रात्मकं घोरं तं केतुं प्रणमाम्यहम् ।।*

साल वृक्षाला पाणी घालावे, हळद, कुंकू लावावे. दूध–साखरेचा नैवेद्य दाखवावा. नक्षत्र देवतेचा मंत्र १०८ वेळा जपावा अन्यथा नक्षत्र वेदोक्त मंत्र किंवा नक्षत्र स्वामी केतुचा पौराणिक मंत्र यांपैकी कोणत्याही मंत्राचा जप १०८ वेळा करावा.

पूजा : मूळ नक्षत्राच्या प्रथम चरणावर जन्मलेल्यांनी मंगळवारी पूजा सुरू करून ती ९ दिवस करावी. दुसऱ्या चरणात जन्मलेल्यांनी शुक्रवारी पूजा सुरू करून १५ दिवस करावी. जन्मा वेळी मूळ नक्षत्राचे तिसरे चरण असेल तर पूजेचा प्रारंभ बुधवारी करून १५ दिवस करावी. चौथ्या चरणात जन्मलेल्यांनी सोमवारी पूजा सुरू करून ८ दिवस करावी.

पूजाकाल संपल्यानंतर दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करावी. त्यानंतर उच्च प्रतिचे लोखंड दान म्हणून द्यावे असे शास्त्रकार सांगतात. हे अयस्न गंजणारे असे दिल्ली येथील लोह स्तंभासारखे असते. मूठभर मिरच्या व मूठभर पीठ पूजा करणाऱ्याच्या अंगावरून उतरवून अग्नीत टाकावे. हे कार्य घरातच करावे.

ग्लोबल वॉर्मिंगच्या या जमान्यात सौम्यता आणि शीतलता प्रदान करणाऱ्या सालवृक्षांची उपासना मोठी संयुक्तिक ठरेल यात शंकाच नाही.

- नक्षत्राचे नाव : मूळ
- इंग्रजी नाव : स्कॉर्पी (Scorpi)
- तारकासंघाचे नाव : वृश्चिक
- ताऱ्यांची संख्या : २
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : वृश्चिक मंडलातील लम्बडा आणि एप्सिलोन तारे
- आयनांश : २४०°००’ ते २५३°२०’
- राशी : धनु
- सूर्याचा वास : १६ डिसेंबर ते २९ डिसेंबर (सुमारे)
- नक्षत्राकृती : सिंहपुच्छ
- नक्षत्रस्वामी : केतू
- नक्षत्रदेवता : निऋती

■ शुभ अंक	:	३,९
■ शुभ रंग	:	लाल, पिवळा
■ शुभ रत्न	:	पुष्कराज, माणिक
■ नक्षत्राक्षरे	:	ये, यो, भा, भी
■ आराध्यवृक्ष	:	राळ
■ बोटॅनिकल नेम	:	Shorea rocusta Gaertn. F
■ क्षेमकर वृक्ष	:	रूई
■ धार्योषधी	:	रूई
■ जपासाठी मंत्र	:	। निऋत्ये नमः । (जपाची संख्या : ७000)
■ नक्षत्र स्तुती	:	मूलं प्रजां वीरवतीं विदेय । पराच्येतु निऋतिः पराचा ।। गोभिर्नक्षत्रं पशुभिः समक्तम् । अहर्भूयाद्यजमानाय मह्यम् ।।
■ आकाशात केव्हा दिसते	:	सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) जुलै-ऑगस्ट महिन्यात पूर्वेला दक्षिणेकडे, सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात डोक्यावर दक्षिणेकडे, नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात पश्चिमेला दक्षिणेकडे.

२०. पूर्वाषाढा

गुणांचा संगम

नक्षत्रमालिकेत २० व्या क्रमांकावर पूर्वाषाढा येते. दोन ठळक तारे व दोन किंचित क्षीण तारे असणारं हे नक्षत्र. एखाद्या चौकोनी तुकड्याप्रमाणे वाटणारं हे नक्षत्र आषाढ महिन्यात रात्रभर आकाशात दिसते. इंग्रजीत ते **Delta Sagitary** म्हणून ओळखलं जाते. नक्षत्राचे चारही चरण धनु राशित येतात. आषाढस्य प्रथम दिवसे या कालिदासाच्या मेघदूतातील हे नक्षत्र आषाढ महिन्यात आकाशात दिसू लागतं. धनु राशिच्या चिन्हासारखं बाण खेचणाऱ्या व्यक्तिसारखं, याचं लक्ष आपल्या उद्दिष्टावर खिळल्यासारखं असतं. सरळमार्गी, स्वतःच्या आनंदात मौज-मजा करणाऱ्या व्यक्ती हे या जन्म नक्षत्रवाल्यांचं वैशिष्ट्य. विद्या आणि बुद्धिच्या दृष्टीनं हे जन्मनक्षत्र फारसं अनुकूल नाही. महत्त्वाकांक्षेची आणि उच्चपद, मान-सन्मान इ.ची फारशी लालसा नसते. असं असूनही स्त्रियांना ते फारसं चांगलं नाही तर पुरुषांना ते अनुकूल असते.

पूर्वाषाढाच्या व्यक्ती दणकट बांध्याच्या, मजबूत हाडापेराच्या असतात. मात्र तरीही उष्ण प्रकृतीकडे झुकलेल्या तब्येतीमुळे उष्णतेशी संबंधित विकार या व्यक्तिंना होण्याची शक्यता अधिक असते. जसं कृत्तिकेचं अग्नीतत्त्व ओळखून शीतल औदुंबराची उपासना सांगितली जाते, तशीच याही नक्षत्राचे आराध्यवृक्ष आहे वेत वंजूल अर्थात् **Calamus Rotony**. पाण्याच्या आधाराने वाढणाऱ्या वेताची या नक्षत्रासाठीची उपाययोजना समर्पक अशी वाटते.

मध्यममार्ग किंवा आपल्या पूर्वजांनी सांगितलेला धोपटमार्ग सोडू नको असा बाणा म्हणजे जणू पूर्वाषाढा नक्षत्राचं विशेषणच म्हणावे लागेल. त्यामुळं या नक्षत्रांच्या व्यक्तिंचे तीव्र किंवा एकांगी

विचार नसतात. त्यामूळे मग वादविवादही नसतात. सुखा-समाधानात आयुष्य कंठावं हा यांचा मुख्य विचार असतो. मध्यममार्गी विचार, खावं, प्यावं, मजा करावी. स्वत:पुरता (पण स्वार्थी नव्हे) विचार करावा, विद्या, बुद्धीनेदेखील आखडता हात घेतलेला! त्यामुळे या जन्म नक्षत्रवाल्यांमध्ये महत्त्वाकांक्षी वृत्तीचा अभाव आढळतो.

हे नक्षत्र स्त्रियांपेक्षा पुरुषांना अधिक लाभदायक आहे. अधिकार किंवा उच्च पद देणारं म्हणून हे नक्षत्र प्रसिद्ध नाही.

हे नक्षत्र असणाऱ्या व्यक्तिंचा बांधा उत्तम सुदृढ असतो. अंगकाठी ही हाडा-पेरानं मजबूत आणि शरीर प्रकृती चांगली असते. उष्ण प्रकृतीचा अधिकाधिक प्रभाव या व्यक्तिंवर असल्याचं जाणवतं. त्यामुळे उष्णतेशी संबंधित विकार, जसे अंगाची लाही लाही होणं, अंग खाजणं, भाजणं, मूळव्याध विकार तसेच कापणं, अपघात, कावीळ यासारखे दीर्घकालीन टिकणारे आजार यांच्या सोबतीला असतात.

'लोहा लोहे को किंवा जहर जहर को काटता है' असे संवाद चित्रपटांमध्ये कितीही सांगितले तरी आरोग्य- शास्त्रात हे असं समीकरण जमणारं नाही. त्याप्रमाणे उष्णतेच्या कोणत्याही विकारावर त्याच्या विरूद्धधर्मी अर्थात् शीतलता प्रदान करणाऱ्या पाण्याचीच योजना शास्त्रकार सांगतात.

या नक्षत्राची देवताच मुळी उदक देवता अर्थात आप ही आहे. ज्याला साक्षात् जीवन म्हणतात. उदक अर्थातच आपाचा उल्लेख वैदिक साहित्यात वैविध्यपूर्णरित्या येतो. आप देवतेची ४ सुक्ते ऋग्वेदात आहेत. आयुर्वेदिय मतानुसार पाणी हे सर्वश्रेष्ठ औषध आहे. आंतर आणि बाह्य अशा दोन्ही उपचारांवर पाण्याचा उपयोग केला जातो. पंचमहाभूतांमध्येही हे तत्त्व आहेच. उदक म्हणजे पाणी व यात सर्वच देवांचा असतो. सर्व औषधांचे मूलभूत द्रव्य म्हणून जलच असते. स्वभावत:च शांत अशा जलाचा प्रकोप मात्र मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी करणारा ठरू शकतो. शांत स्वभावामुळेच की काय, भूतबाधा व सर्व प्रकारच्या अमंगलाचा नाश करण्यासाठी उदकशांत केली आहे.

वेत - वंजुल पाण्याच्या साथी-सोबतीनं वाढणारा आहे. शास्त्रीय परिभाषेत ज्याला **Ratten Cane** अर्थात् **Calamus Reltag** या नावानं ओळखलं जातं. सामान्यत: वाचकांच्या मनात संभ्रम होईल तो म्हणजे वेत म्हणजेच वेळू किंवा बांबू की काय असा. परंतु वेत हा बांबूपेक्षा खूपच शिडशिडीत असा असतो. याची उंची ५० ते ६० फूट इतकी असू शकते. वेत गुणांनी शीतल व स्वादु आहे. व्रणशोधक अर्थातच जखमांना शुद्ध करणारा हा याचा मुख्य गुण आहे. त्याचबरोबरीनं कफ, वाताचादेखील तो नाश करतो. आमनाशक, पित्तशामक हे त्याचे आणखी काही पैलू आहेत.

अंग खाजणं, कावीळ अशा रोगांपासून मुक्तता मिळवायची असल्यास वेताचा योग्य तो वापर अत्यंत लाभदायक ठरतो. तसाच तो जखमांवरदेखील प्रभावी आहे. या वृक्षाची आराधना कमीत कमी ६ दिवस करावी.

१) नक्षत्र नाम मंत्र – *। पूर्वाषाढाय्या नम: ।*
२) नक्षत्र देवता मंत्र – *। अभ्द्यो नम: ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। आपो धर्येती मंत्र: ।*
४) नक्षत्र देवता मंत्र – *हिमकुंदमृणालाभं दैत्यानां परमं गुरूम् ।*
सर्वशास्त्रप्रवक्तारं भार्गवं प्रणमाम्यहम् ।।

आराध्यवृक्षाची संकल्प करून प्रार्थना करावी. वेत वृक्षाला पाणी घालावे. हळद-कुंकू, पांढरे

फूल वहावे. दूध साखरेचा नैवेद्य दाखवावा. नक्षत्रदेवतेचा किंवा वरीलपैकी कोणताही एक मंत्र १०८ वेळा जपावा. ते न जमल्यास नक्षत्रदेवता शुक्राचा पौराणिक मंत्र १०८ वेळा जपावा.

पूजा : पूर्वाषाढा नक्षत्राच्या प्रथम चरणात जन्म झालेला असल्यास रविवारी पूजा सुरू करून ६ दिवस करावी. दुसऱ्या चरणात जन्म झालेल्यांनी बुधवारी पूजा सुरू करून ९ दिवस करावी. तिसऱ्या चरणात जन्मलेल्यांनी शुक्रवारी पूजा सुरू करून ७ दिवस करावी. चौथ्या चरणावर जन्म झालेल्यांनी मंगळवारी पूजा सुरू करून ९ दिवस करावी.

पूजा समाप्तीनंतर काळी लोकर, बिब्बा,सुई या सर्व वस्तु व्यक्तिच्या अशुभाचे प्रतिक म्हणून हातावर घेऊन ३ वेळा फुंकर मारून पश्चिम दिशेकडे, घराबाहेर फेकून द्याव्यात.

- नक्षत्राचे नाव : पूर्वाषाढा
- इंग्रजी नाव : डेल्टा सॅजिटरिस (Delta Sagittarius)
- तारकासंघाचे नाव : धर्नुधारी
- ताऱ्यांची संख्या : २
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : धनु मंडलातील डेल्टा आणि एप्सिलोन तारे
- आयनांश : २५३°२०' ते २६६°४०'
- राशी : धनु
- सूर्याचा वास : २९ डिसेंबर ते ११ जानेवारी (सुमारे)
- नक्षत्राकृती : पलंग
- नक्षत्रस्वामी : शुक्र
- नक्षत्रदेवता : उदक
- शुभ अंक : ३,६
- शुभ रंग : पांढरा, पिवळा
- शुभ रत्न : पुष्कराज, हिरा
- नक्षत्राक्षरे : भू, धा, फा, ढा
- आराध्यवृक्ष : वेत
- बोटॅनिकल नेम : Salix terasperma Roxc.
- क्षेमकर वृक्ष : शमी
- धार्योषधी : कापूस
- जपासाठी मंत्र : । उदकदेवताय नमः । (जपाची संख्या : ७०००)
- नक्षत्र स्तुती : या दिव्या आपः पयसा संबभूवुः । याअन्ततिक्ष उत पार्थिवीर्याः । यासामषाढा अनुयन्ति कामम्। ता न आपः शँ, स्योना भवन्तु।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) ऑगस्ट–सप्टेंबर महिन्यात पूर्वेला दक्षिणेकडे, ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांत डोक्यावर दक्षिणेकडे, डिसेंबर–जानेवारी महिन्यात पश्चिमेला दक्षिणेकडे.

२१. उत्तराषाढा

विनम्र, कष्टाळू आणि आज्ञाधारक

मुहूर्तशास्त्रामध्ये सर्व शुभकार्यांना चांगले असणारे एकमेव नक्षत्र म्हणजे उत्तराषाढा हे होय. हे नक्षत्र शुभ आणि स्थिर आहे. नक्षत्रमालेतील २१ वे नक्षत्र उत्तराषाढा असून त्यामध्ये दोन तारे आहेत. जुलै किंवा आषाढ महिन्यामध्ये सुरवातीच्या आठवड्यामध्ये रात्री ९ च्या सुमाराला हे नक्षत्र आकाशामध्ये दक्षिण दिशेला रात्रभर दिसते. या नक्षत्राच्या दोन ताऱ्याची आकृती हत्तीच्या सोंडेप्रमाणे किंवा पलंगाप्रमाणे दिसते. हे तारे शुभ्र पांढऱ्या रंगाचे आणि अतिशय तेजस्वी दिसतात. उत्तराषाढा नक्षत्राचे इंग्रजी नाव सिग्मा सॅजिटरी असे आहे. या नक्षत्राचा पहिला चरण धनु राशीमध्ये आणि पुढचे तीन चरण मकर राशीमध्ये येतात. आषाढ महिन्याचे नाव याच नक्षत्रामुळे पडले आहे. आपल्या सूर्यमालेतील आकाशगंगेचे केंद्र उत्तराषाढा नक्षत्राच्या दिशेला आहे. उत्तराषाढा नक्षत्राच्या दिशेला अनेक ब्लॅकहोल आणि सघन तारकापुंज आहेत. या दिशेला जाणे अशक्यप्राय असल्यानेच जणू या नक्षत्राला आषाढ म्हणजे ज्याला पार करता येणे शक्य नाही असे नाव मिळाले असावे. अथर्वसंहितेमध्ये या नक्षत्राकडे तेज आणि शक्ती प्रदान करण्यासाठी प्रार्थना केली गेली आहे. मान्सूनमध्ये उत्तराषाढा नक्षत्र येते. त्यामुळे शेती, शेतकरी आणि पशुंसाठीही उत्तराषाढा नक्षत्र अतिशय महत्त्वाचे आहे. उत्तराषाढा नक्षत्राचा स्वामी रवि म्हणजे सूर्य हा आहे. त्यामुळे सूर्याचे तेज या राशीमध्ये आढळून येते. उत्तराषाढा नक्षत्राची देवता विश्वेदेव ही आहे. प्रत्येक यज्ञामध्ये विश्वेदेवाचे आवाहन केले जाते. सर्व देवदेवतांचे प्रतीक म्हणजे विश्वेदेव ही देवता आहे. या देवतेला आवाहन केले म्हणजे सर्व देवतांना आवाहन केले असे मानले जाते. जणू ब्रह्मांडाची उत्पत्ती ज्या देवतांमुळे झाली त्यांचा प्रमुख म्हणजे विश्वेदेव हा देव आहे.

खरतर विश्वेदेव हा एक यज्ञीय देवतांचा समूह आहे. सर्व देवांचे प्रतिनिधी म्हणून विश्वेदेवाची पूजा करतात. ऋग्वेदामध्ये विश्वेदेवाविषयी चाळीसहून अधिक सूक्ते आहेत. यज्ञांप्रमाणेच निरनिराळ्या श्राद्धांमध्येही विश्वेदेवांना प्राधान्य दिले जाते. पुरुरव, आर्द्रव, धूरी, लोचन, सत्य, वसु इ. विश्वेदेवांची प्रातिनिधिक नावे आहेत. धनुराशिचा स्वामी गुरू आहे. त्यामुळे उत्तराषाढा नक्षत्रामध्ये रविचे तेज, गुरूची विद्वत्ता आणि शनीची चिकाटी यांचा मिलाफ झालेला दिसून येतो. सात्विक आणि सद्गुणी गुणांनी युक्त असे हे प्रभावशाली नक्षत्र आहे. उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्ती या धाडसी आणि कलासक्त असतात. त्यांचा स्वभाव मेहनती असतो. त्या स्थिर बुद्धीच्या आणि चिकाटीने जगणाऱ्या असतात. त्या धार्मिक असून उदार आणि कृतज्ञ स्वभावाच्या असतात. प्रामाणिकपणा, नम्रता, विनयशीलता हे त्यांचे विशेष गुण असतात. त्यांचा मित्र परिवार खूप मोठा असतो. त्या बुद्धिमान, हुषार आणि प्रगल्भ व्यक्तिमत्वाच्या असतात. थोड्याशा रागीट आणि मानीही असतात. त्यांचे वागणे न्यायपूर्ण आणि उदारमतवादी असते. त्या मोठ्या मनाच्या असून क्षमाशील असतात. त्या दुसऱ्यांना मदत करतात. सेवाभावी वृत्तीच्या असतात. कामात तत्पर आणि व्यवहारकुशल असतात. आपल्या कुटुंबावर त्यांचे अधिक प्रेम असते. त्या समाधानी वृत्तीच्या, रसिक आणि कलाप्रेमी असतात. मात्र अनेकदा त्यांना प्रगतीसाठी इतरांचा आश्रय घ्यावा लागतो. त्यांना यश मिळायला उशीर लागतो आणि जीवनामध्ये चढउतारांचा सामना करावा लागतो. या नक्षत्रावर

जन्मणाऱ्या व्यक्ती सडसडीत, उंच, सडपातळ, हाडापेराने मजबूत आणि कणखर असतात. भव्य कपाळ, रूंद चेहरा, काटक शरीर आणि तेजस्वी चेहरा हे त्यांचे वैशिष्ट्य असते. मात्र त्यांचे दर्शन हे थोडेसे प्रौढपणाकडे झुकलेले असते. यांचे वागणे मोकळेढाकळे आणि दिलखुलास असते. त्यांना स्वच्छता, टापटीप आणि नेटकेपणा यांची आवड असते.

या व्यक्ती फारशा दिखावू आणि फॅशनेबल नसल्या तरी त्यांना व्यवस्थितपणाची आवड असते. या नक्षत्राला होणारे रोग चिवट असतात आणि लवकर बरे होत नाहीत. त्वचाविकार, संधिवात, गुडघेदुखी, सर्दी पडसे, मणक्याचे विकार इत्यादी आजार होण्याचा संभव असतो. उत्तराषाढा नक्षत्राचा आराध्यवृक्ष फणस हा आहे. त्याला इंग्रजीमध्ये आर्टिकेसी (आर्टोकार्पस – हेटरोफयलस) असे म्हणतात. यालाच जॅक फ्रूट असेही म्हटले जाते. फणसाला वरून काटे असले तरी आतमध्ये अत्यंत रसाळ आणि गोड असे गरे असतात. फणस हा एक अत्यंत महत्त्वाचा वृक्ष असून पूर्वीच्या काळी न्यायालयामध्ये जामिन म्हणून फणसाचे झाड लिहून देण्याची प्रथा होती. याचे कारण फणसाचे झाड एकदा उत्पन्न देऊ लागले की ते शेकडो वर्षे निरंतर उत्पन्न देते. तसेच त्याच्या फळांचा, गरांचा, बियांचा, सालीचा, डिंकाचा, लाकडाचा सर्वांचाच उपयोग होतो. फणस पचण्यास कठीण असला तरी भरपूर शक्ती प्रदान करणारा आहे. फणस त्रिदोषनाशक आहे. वजन वाढविण्यासाठी आणि शारीरिक शक्ती मिळवण्यासाठी फणसाचा उपयोग होतो. पानांचा काढा आव, खरूज, अतिसार, गाठी यावर उपयुक्त आहे. पिकलेले फणस वात आणि पित्तशामक आहेत. फणसाच्या फळाची भाजी औषधी आहे. फणसामुळे मुत्राशयाचे कार्य सुधारते. यज्ञामध्ये देवांसाटी फणसांच्या समिधा वापरल्या जातात. तसेच विविध वाद्यांमध्ये फणसाच्या लाकडाचा वापर केला जातो. फणसापासून केशरी रंग तयार केला जातो. फणसाची पूजा करताना वृक्षाला पाणी द्यावे. हळदकुंकू वहावे. गुलाबी आणि पिवळ्या रंगाची फुले वहावीत. दही–भाताचा नैवेद्य दाखवावा. नक्षत्र देवता मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

१) नक्षत्र देवता मंत्र – *। विश्वेभ्यो देवोभ्यो नमः ।*
२) नक्षत्र नाम मंत्र – *। उत्तराषाढाय्या नमः ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। विश्वे देवेनि मंत्रः ।*
४) पौराणिक मंत्र – *जपाकुसुमसंकाशं काश्येपयं महदद्युतिम् ।*
तमोरिं सर्वपापघ्नं प्रणतोऽस्मि दिवाकरम् ।।

पूजा : उत्तराषाढा नक्षत्राच्या पहिल्या चरणावर जन्म झालेला असल्यास गुरूवारी पूजा सुरू करून ती पुढे ३१ दिवस करावी. दुसरे किंवा तिसरे चरण असल्यास शनिवारी पूजा सुरू करून ती पुढे १५ दिवस करावी. चौथे चरण असल्यास गुरूवारी पूजा सुरू करून ती पुढे १५ दिवस करावी.

पूजाकाल संपल्यावर गरीब आणि गरजूंना धान्य दान करावे. शक्यतो ७ किंवा अधिक व्यक्तिंना पुरेसे धान्य द्यावे.

- नक्षत्राचे नाव : **उत्तराषाढा**
- इंग्रजी नाव : **सिग्मा सॅजिटरी (Cigma Sagittarius)**
- तारकासंघाचे नाव : **धर्नुधारी**

- ताऱ्यांची संख्या : २
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : धनु मंडलातील सिग्मा आणि झीटा तारे
- आयनांश : २६६°४०' ते २८०°००'
- राशी : धनु
- सूर्याचा वास : ११ जानेवारी ते २४ जानेवारी (सुमारे)
- नक्षत्राकृती : हस्तिदंत
- नक्षत्रस्वामी : सूर्य
- नक्षत्रदेवता : विश्वेदेव
- शुभ अंक : १,३
- शुभ रंग : लाल, पिवळा
- शुभ रत्न : माणिक, पुष्कराज
- नक्षत्राक्षरे : भे/भो,जा,जी
- आराध्यवृक्ष : फणस
- बोटॅनिकल नेम : Artocarpus **heterophyllus** Lamk.
- क्षेमकर वृक्ष : कदंब
- धार्योषधी : कापूस
- जपासाठी मंत्र : । विश्वेभ्यो देवेभ्यो नमः । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : तन्नो विश्वे उपश्रुण्वन्तु यज्ञम् । तदषाढा अभिसंयन्तु यज्ञम् ।।
  तन्नक्षत्रं प्रथतां पशुभ्यः । कृषिर्वृष्टिर्यजमानाय कल्पताम् ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे)
  ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात पूर्वेला दक्षिणेकडे,
  ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात डोक्यावर दक्षिणेकडे,
  डिसेंबर-जानेवारी महिन्यात पश्चिमेला दक्षिणेकडे.

२२. श्रवण
सुख दुःखांचा उत्सव

श्रावण महिन्यात पौर्णिमेच्या सुमारास संध्याकाळी आकाशात दिसणारे तीनच तारे असणारं हे नक्षत्र. मधला तारा अत्यंत तेजस्वी असणारं असं हे नक्षत्र काहीजणांना ते तिन्ही लोक व्यापणाऱ्या वामनावतार बटुचं पाऊल वाटतं, तर काहींना आपल्या वृद्ध आणि अंध आईवडिलांना कावडीतून काशीयात्रा घडविणाऱ्या श्रावण बाळाचं प्रतिक वाटतं. मधला तेजस्वी तारा हा श्रावण बाळ व दोन्ही बाजूचे क्षीण तारे म्हणजे श्रावणाचे वृद्ध आईवडिल.

तसे तर भारतीय लोक उत्सव प्रियच आहेत. परंतु सगळे महत्वाचे धार्मिक उत्सव, व्रत वैकल्ये जणू श्रावण महिन्यात एकत्र केलेली असल्याप्रमाणे वाटतात. त्याच श्रावण मासाचं नाव या नक्षत्राच्या दर्शनावरून पडले आहे.

हे नक्षत्र तसं देवगणाचं आणि देव गुणाचंही! ह्या नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्ती सदाचारी, ईश्वरभक्त, धार्मिक, सत्छिल व परोपकारी असतात. विद्वत्ता आणि कर्तव्यनिष्ठता हें गुणही या गुणसमुच्चयाशी जवळचं नातं सांगणारे आहेत. किंचित काहीसा दुराग्रही म्हणावा असा स्वभाव असतो. आपल्या अशा काही तत्वासाठी वाट्टेल तितके कष्ट करण्याची, खरंतर सोसण्याची यांची तयारी असते. 'स्वयमेव मृगेन्द्रता' अर्थात, स्वत:च्या कष्टाच्या जोरावर, कर्तृत्वाच्या बळावर त्या उच्चपदी पोहोचलेल्या असतात.

स्त्रियांना हे नक्षत्र रूप, गुण, बुद्धी आणि धन या सर्वच दृष्टीनं अनुकूल आहे. दुग्धशर्करा योगच जणु! कष्टाळू, धडपड्या स्वभावाच्या स्त्रिया कर्तव्यदक्ष, व्यवहारी अशा असतात. 'यत्न तो जाणावा' हे जरी ब्रीदवाक्य असले तरी धार्मिक किंवा श्रद्धाळू असे यांचे व्यक्तिमत्व असते.

श्रवण जन्मनक्षत्र असलेल्या व्यक्तिंची प्रकृती चांगली असते. त्यांची रोगप्रतिकारक शक्ती ही चांगली किंवा उत्तम असते. रोग दाहक, तीव्र नसले तरी चिवटपणे मुरणारे अशा स्वरुपाचे असतात. मुरणारी सर्दी, त्वचेचे रोग, सांधेदुखी, दमा, क्षय (**Tubroculosis**) अशा रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता अधिक असते.

श्रवण नक्षत्राचा आराध्यवृक्ष म्हणून शास्त्रकार अर्क किंवा रुई असा सांगतात. पांढरी रुई अथवा मंदार, जो श्री गणेशाला प्रिय आहे. या उलट रुई मारुतीला प्रिय म्हणून शनिवारी ११,२१,५१ अशा रुईच्या पानांची माला हनुमानाला वाहिली जाते. रुईचा असा संबंध जरी गणपती अथवा मारुतीशी असला तरी तो श्रवण नक्षत्राचा आराध्यवृक्ष आहे. विश्वाची पोषणकर्ता श्री विष्णु श्रवण नक्षत्राची देवता आहे.

रुई या श्रवण नक्षत्राच्या आराध्यवृक्षाचं संस्कृत नाव आहे अर्क. अर्थात अर्क हे नाव सूर्याचे आहे. सूर्याचं शास्त्रीय परिभाषेत त्याला **Calotronis gigantean** किंवा झीलशीर अशी नावं आहेत. अर्क ही वनस्पती सूर्यासारखीच जीवनोपयोगी व रोगहरण करणारी असते. रुईच्या मुळांनी पोटातील सर्व तक्रारी दमा,खोकला,गंडभाळा, कुष्ठ (त्वचारोग) बऱ्या होतात. सांधेदुखी, सूज ह्यांसारख्या विकारांवर रुईची पाने गरम करून बांधतात. त्वचारोगातील खरजेवर रुईच्या चिकाइतकं जालीम औषध दुसरं नाही.

ऋग्वेदातील एका संवादपर सूक्तात मंदाराच्या रोपट्याला उद्देशून खरूज म्हणते, हे भास्कर क्षीर,ज्या ठिकाणी आपण असाल तेथे मी जाणार नाही. रुईचा चीकदेखील औषधी असतो व बिब्ब्यासारखा तो अंगावर ऊठू देखील शकतो.

रुईच्या पानांच्या उपयोगाविषयी ज्योतिषादी शास्त्रेदेखील वर्णन करतात. श्वास अडकणे, खोकला, कर्णशूल, मस्तक दुखी इ. बाबतीत तिचा उपयोग केला जातो.

अशा या बहुगुणी मंदार वृक्षाच्या पूजेच्या विधिची माहिती करून घेऊया. श्रवण नक्षत्राची आराध्यदेवता आहे श्रीविष्णु तर नक्षत्रस्वामी आहे चंद्र. याच्या विविध मंत्रांची माहिती पुढीलप्रमाणे.

१) नक्षत्र नाम मंत्र – *। विष्णवे नम: ।*
२) नक्षत्र देवता मंत्र – *। श्रावणाय नम: ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। विष्णो राटेती नम: ।*
४) नक्षत्र स्वामी मंत्र – *दधिशंखतुषाराभं क्षीरोदार्णवसंभवम् ।*
नमामि शशिनं सोमं शंभोर्मुकुटभूषणम् ।।



पूजा : रुईची (मंदाराची) पूजा कमीत कमी १३ दिवस करावी. प्रथम संकल्प करून प्रार्थना करावी. आराध्यवृक्षावर, पानांवर पाणी घालावे. हळद-कुंकू वहावे. एखादे पांढरे फूल वहावे. दूध भाताचा नैवेद्य दाखवावा. नक्षत्र देवतेचा मंत्र १०८ वेळा म्हणावा किंवा नक्षत्रस्वामीचा पौराणिक मंत्र किंवा वरील पैकी कोणताही मंत्र १०८ वेळा जपावा.

श्रवण ह्या जन्मनक्षत्राच्या प्रथम चरणात जन्मलेल्यांनी मंगळवारी पूजा सुरू करून १३ दिवस करावी. दुसऱ्या चरणात जन्मलेल्यांनी शुक्रवारी पूजा सुरू करून २० दिवस करावी. तिसरे चरण असलेल्यांनी बुधवारी पूजा सुरू करून १३ दिवस करावी. चौथ्या चरणात जन्मलेल्यांनी सोमवारी पूजा सुरू करून २१ दिवस करावी.

पूजा काल संपल्यानंतर २ लहान मुलांना दूध-भाताचे भोजन द्यावे.

■ नक्षत्राचे नाव	:	श्रवण
■ इंग्रजी नाव	:	अल्टेर (Altair)
■ तारकासंघाचे नाव	:	गरूड
■ ताऱ्यांची संख्या	:	३
■ ताऱ्यांची वैज्ञानिक नावे	:	गरूड मंडलातील अल्फा, बीटा आणि गॅमा तारे
■ आयनांश	:	२८०°००' ते २९३°२०'
■ राशी	:	मकर
■ सूर्याचा वास	:	२४ जानेवारी ते ६ फेब्रुवारी (सुमारे)
■ नक्षत्राकृती	:	तीन पायर्या
■ नक्षत्रस्वामी	:	चंद्र
■ नक्षत्रदेवता	:	विष्णू
■ शुभ अंक	:	२, ८
■ शुभ रंग	:	पांढरा, मोतिया, निळा
■ शुभ रत्न	:	मोती, नीलम
■ नक्षत्राक्षरे	:	खी, खू, खे, खो
■ आराध्यवृक्ष	:	रूई
■ बोटॅनिकल नेम	:	Calotropis Procera Br.
■ क्षेमकर वृक्ष	:	आंबा
■ धार्योषधी	:	आघाडा
■ जपासाठी मंत्र	:	। नमो भगवते वासुदेवाय । (जपाची संख्या : १०,०००)
■ नक्षत्र स्तुती	:	शृण्वन्ति श्रोणाममृतस्य गोपाम्। पुण्यामस्या उपशृणोमि वाचम्। मही देवीं विष्णुपत्नीमजूर्याम् । प्रतीचोमना हविषा यजाम:।।
■ आकाशात केव्हा दिसते	:	सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात पूर्वेला, ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात डोक्यावर, डिसेंबर-जानेवारी महिन्यात पश्चिमेकडे.

२३. धनिष्ठा

घोर निश्चयी

धनिष्ठा नक्षत्राचा हाती घेईन ते तडीस नेईन हा स्वभावधर्म आहे. निश्चयी आणि कर्तबगार भीष्माचे हे नक्षत्र होते. इंग्रजीत हे **Delhinius** म्हणून ओळखलं जातं. या नक्षत्राचे एकूण ४ चरण असतात. त्यापैकी पहिले दोन चरण मकर राशित व नंतरचे दोन चरण कुंभ राशीत येतात. या नक्षत्रात एकूण ४ तारे असतात, ते पांढरट पण तेजस्वी असे असतात. नक्षत्राचा आकार साधारणत: मृदुंगासारखा असतो. भाद्रपद महिन्यात हे नक्षत्र रात्रभर आकाशात पाहता येते.

या जन्मनक्षत्रावरील व्यक्ती कष्ट करण्याची तयारी असलेल्या, चिकाटी, स्थिर व प्रगल्भ बुद्धीच्या व परोपकारी वृत्ती असणाऱ्या असतात. कधी कधी वेडं किंवा अविचारी साहस करण्यास देखील प्रवृत्त होण्याचा यांचा स्वभाव असतो. या व्यक्ती इतरांच्या मर्जीमुळे, कृपेमुळे नव्हे तर स्वकर्तृत्वाने श्रेष्ठपदाला पोचतात. सौंदर्य, रूप, कला याच जन्म नक्षत्राबाबत फारसं सख्य असल्याचं दिसत नाही. कोमलता, मार्दव या गोष्टींचाही बऱ्यापैकी अभावच असतो. या व्यक्तिचा बांधादेखील आडवा, बेढब असू शकतो.

खरं तर हे जन्मनक्षत्र असणाऱ्या व्यक्तिची प्रकृती चांगली असते. परंतु तरीही इतर रोगांची तीव्रता अधिक असते. कापणे, भाजणे, हाड मोडणे, गुडघे दुखणे. संधिवात, त्वचारोग, मुखरोग इ. रोग होतात व त्यांची तीव्रता जास्त असते. या नक्षत्रावर कफ आणि पित्ताचा अधिक प्रभाव आहे.

धनिष्ठा नक्षत्राकरिता शास्त्रकार शमी हा आराध्यवृक्ष म्हणून सांगतात. याचं शास्त्रीय परिभाषेतील नाव आहे, **Prosapis Specigera**. शमीच नातं महाभारतातल्या कथेशी अगदी जवळचं मानलं जातं. अज्ञातवासात जाण्यापूर्वी महापराक्रमी पांडवांनी याच वृक्षाच्या ढोलीत आपली दिव्य शस्त्रे दडवून ठेवली होती. वर्षभराच्या अज्ञातवासानंतर जेव्हा ते परत आले तेव्हा तो दिवस होता विजयादशमीचा, अर्थात दसऱ्याचा. म्हणूनच दसऱ्याच्या दिवशी शमी वृक्षाचे पूजन करून सीमोल्लंघन करतात व सोने म्हणून आपट्याची पाने वाटतात. शमी म्हणजेच शमन करणारी, अर्थात, दुष्टकृत्यांचा नाश करणारी, तो का करावा याची प्रेरणा देणारी शमी वृक्ष आहे. 'शमी शमयते पापम्' म्हणजेच पापाचा अमंगलाचा नाश करणारी म्हणूनही ती पूज्य आहे. त्यामुळेच शमी पत्रे श्री गणेशाची आवडती आहेत व त्याला भाद्रपदात वाहिल्या जाणाऱ्या १६ पत्रींपैकी शमीपत्रे ही महत्त्वपूर्ण आहेत.

या वृक्षाची साल, पाने, फळे औषधी उपयोगाची असतात. जुनाट उष्णतेच्या अर्थात कडकीच्या रोगावर उपयोगी ठरणारी असतात. शमीचा वृक्ष मध्यम उंचीचा, हिरवागार व काटेरी असतो. बाभूळ, खैर यांच्याप्रमाणेच शमीची पानं बारीक व नाजूक असतात. याला बारीक शेंगा येतात आणि कच्च्या शेंगाची भाजी गुजरातेत, मारवाड प्रांतात व पंजाबात खाल्ली जाते.

शमी वृक्षाचे पूजन करताना वृक्षाच्या पानांवर पाणी घालावे. हळदी-कुंकू वहावे. लाल फूल वहावे. गुळ खोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा. नक्षत्र देवतेचा मंत्र १०८ वेळा जपावा. नक्षत्र स्वामी मंगळाचा पौराणिक मंत्र १०८ वेळा जपावा.

धनिष्ठा नक्षत्राचा स्वामी मंगळ हा आहे, तर याची आराध्यदेवता वसु ही आहे. धनिष्ठा जन्म नक्षत्र असणाऱ्यांनी शमी वृक्षाची पूजा कमीत कमी १० दिवस करावी.

१) नक्षत्र नाम मंत्र – । धनिष्ठा यै नम: ।
२) नक्षत्र देवता मंत्र – । वसुभ्यो नम: ।
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – । वसो: पवित्रेती मंत्र: ।
४) नक्षत्र स्वामी मंत्र – धरणीगर्भसंभूतं विद्युत्कांतीसमप्रभम् ।
कुमारं शक्तिहस्तं तं मंगलं प्रणम्याहम् ।।

पूजा : धनिष्ठा या जन्म नक्षत्राच्या पहिल्या चरणात पूजा करणाऱ्याचा जन्म झाला असेल तर पूजा रविवारी सुरू करून ती १२ दिवस करावी. दुसऱ्या चरणात जन्म असणाऱ्यांनी बुधवारी पूजा सुरू करून २० दिवस करावी. तिसऱ्या चरणात जन्मलेल्यांनी शुक्रवारी पूजा सुरू करून १० दिवस करावी. चौथ्या चरणात जन्म झाला असेल, तर मंगळवारी पूजा सुरू करून १० दिवस करावी. पूजा समाप्तीनंतर सोमवारी ५ पानांचा विडा करून, नम:शिवाय असा १११ वेळा मंत्रघोष करावा व शंकराला हा तांबूल अर्पण करावा.

गुणांनी रुक्ष, रेचक, तिखट व शीतल असलेल्या शमीवृक्षाची कफ–पित्तनाशक म्हणून ख्याती आहे आणि म्हणूनच कफ–पित्ताचा प्रभाव असलेल्या धनिष्ठा नक्षत्रवाल्यांचे रक्तपिती, कफ, दमा, कंप इ. संभाव्य रोग टाळण्यासाठी म्हणूनच की काय शमीवृक्षाची योजना अगदी समर्पक ठरते.

- नक्षत्राचे नाव : धनिष्ठा
- इंग्रजी नाव : डेल्फिनियस (Delphinius)
- तारकासंघाचे नाव : तिमी
- ताऱ्यांची संख्या : ५
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : डॉल्फिन मंडलातील अल्फा, बीटा, गॅमा, डेल्टा आणि जीटा तारे
- आयनांश : २९३°२०' ते ३०६°४०'
- राशी : मकर / कुंभ
- सूर्याचा वास : ६ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी (सुमारे)
- नक्षत्राकृती : मृदंग
- नक्षत्रस्वामी : मंगळ
- नक्षत्रदेवता : वसू
- शुभ अंक : ९
- शुभ रंग : लाल, निळा
- शुभ रत्न : पोवळे, नीलम
- नक्षत्राक्षरे : गा, गी/गू, गे
- आराध्यवृक्ष : शमी
- बोटॅनिकल नेम : Prosopis cineraria (L) Druce
- क्षेमकर वृक्ष : कडुनिंब
- धार्योषधी : माका

- जपासाठी मंत्र : । वसुभ्यो नमः । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : अष्टौ देवा वसवः सोभ्यासः । चतस्रो देवीरजराः श्रविष्ठाः ।।
ते यज्ञं पान्तु रजसः परस्तात् । संवत्सरीणमृत स्वस्ति ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे)
सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यात पूर्वेला, नोव्हेंबर–डिसेंबर
महिन्यात डोक्यावर, जानेवारी–फेब्रुवारी
महिन्यात पश्चिमेकडे.

२४. शततारका

कौशल्य आणि हुषारीचा संगम

शततारका हे एक असे अद्‌भुत नक्षत्र आहे की त्यातून मोठ्या प्रमाणावर उल्कावर्षाव होतो. दरवर्षी विशिष्ट म्हणजे ५ मे, २० जुलै आणि ६ ऑगस्ट रोजी शततारका नक्षत्रामधून मोठ्या प्रमाणावर उल्का पडताना दिसतात. आकाशातून तारा पडणे हे आपण अनेकदा पाहतो. शततारकेच्या अवकाशातील स्थानामधून मोठ्या प्रमाणात तारे पडतात आणि ते तेजस्वी असतात, म्हणूनच या नक्षत्राचे नाव शततारका असे पडले असावे. नक्षत्रमालेतील चोवीसाव्या क्रमांकाचे हे नक्षत्र आहे. खरंतर याचा एकच मोठा तारा असतो. त्याच्याभोवती ८ ते १० फिक्कट तारे एखाद्या फुलांच्या गुच्छासारखे दिसतात किंवा वर्तुळामध्ये सामावलेले दिसतात. हे नक्षत्र कुंभ राशीमध्ये येते. इंग्रजीमध्ये या नक्षत्राला लँबडा ॲक्वेरियस या नावाने ओळखले जाते. या नक्षत्राला शतभिषा या नावानेही ओळखले जाते. शतभिषा म्हणजे शंभर वैद्य. या नक्षत्रातील शंभर तारे म्हणजे जणू शंभर वैद्य असून ते माणसांचे शंभर आजारांपासून संरक्षण करतात, अशी कल्पना केली आहे. यातील मुख्य तारा तांबडा आणि तेजस्वी असून तो अश्विनीकुमार या देवांच्या वैद्यांचा प्रतिनिधी आहे असे मानले आहे. कुंभ राशी जलराशि असून शततारकेचा मुख्य तारा म्हणजे जणू कुंभातून म्हणजे मडक्यातून पाणी ओतत आहे असे वाटते. शततारका नक्षत्राचा स्वामी राहू हा आहे. शततारका नक्षत्राचा पुरातन काळापासून पाण्याशी संबंध जोडला गेला आहे. म्हणूनच या नक्षत्राची देवता वरूण ही आहे. वरूण ही एक सामर्थ्यसंपन्न देवता आहे. वरूण पाण्याची देवता असून समुद्रासह आप म्हणजे पाणी या पंचमहाभूतावर वरूणाची सत्ता आहे. पाणी म्हणजे जीवन आहे. वरूणाशी कुणीही शत्रूत्व करू शकत नाही. त्याचे नियम देवसुद्धा टाळू शकत नाहीत. वरूण रात्रीचा स्वामी आहे आणि सूर्याइतकाच तो शक्तिशाली आहे. सूर्य नसताना कोट्यावधी ताऱ्यांच्या मदतीने तो सर्व पृथ्वीचे नियमन करतो. पुराणांमध्ये वरूणपुराण असून तो पश्चिम दिशेचा स्वामी आहे. वरूणाला सूर्याचाच एक अंश मानले गेले आहे. वरूण जसा स्वयंभू आहे त्याप्रमाणेच शततारका नक्षत्राच्या व्यक्ती स्वयंभू आणि स्वयंपूर्ण असतात. त्या कर्तृत्ववान आणि धडाडीच्या असतात. स्वतःच्या हिंमतीवर कठोर मेहनत करून यश मिळवण्याची त्यांच्यामध्ये धमक असते. त्यांना कुणाच्याही आधाराची गरज वाटत नाही. या व्यक्तिंकडे अफाट बुद्धी, कला, संशोधनाची वृत्ती, कष्ट करण्याची तयारी इ. गुण आढळतात. ज्या दिवशी शततारका नक्षत्र आकाशामध्ये सर्वाधिक काळ दिसते तेव्हा सर्वात जास्त पाऊस होतो असे

म्हणतात. या नक्षत्राभोवती पाण्यात राहणाऱ्या प्राण्यांची कल्पना केली गेली आहे. एका बाजूला मीन म्हणजे मासा, दुसरीकडे मकर म्हणजे मगर, खालच्या बाजूला डॉल्फीन मासा अशा जलचरांनी हे नक्षत्र वेढलेले आहे असे मानतात. कुंभ राशितून खाली पडणाऱ्या जलधारांच्या टोकाशी शततारका हे नक्षत्र वसलेले आहे. वरुणाचे मुख्य अस्त्र पाश म्हणजे बंधन आहे. सृष्टी नियमांविरूद्ध आचरण करणाऱ्यांना लगाम घालण्याचे काम वरूण करतो. वरुणामुळेच रोग होतात आणि त्याची प्रार्थना केल्यामुळेच रोगमुक्ती आणि पाशमुक्ती होते. या व्यक्ती ज्ञानाची लालसा असणाऱ्या, चौकस, महत्वाकांक्षी, धडपडणाऱ्या असतात. मात्र त्या बऱ्याचदा फार व्यवहारी आणि स्वत:चा मतलब साधणाऱ्या असतात. या व्यक्ती स्वत:ला इतरांपेक्षा काहीतरी उच्च दर्जाच्या समजणाऱ्या असतात. मात्र आपला कार्यभाग साधून घेण्यासाठी त्या सर्वांबरोबर हसतमुख राहून काम करून आपला स्वार्थ साधून घेतात. अशा व्यक्तिंच्या अंतर्मनाचा थांग लागत नाही आणि त्या व्यक्ती आपला पत्ता लागू देत नाहीत. या व्यक्तिंना अनेकदा पैशाचा, सत्तेचा, अधिकाराचा हव्यास असतो. या नक्षत्रावर जन्मणाऱ्या व्यक्तिंचा बांधा उंच, सडपातळ आणि हाडापेरांनी मजबूत असतो. चेहरा विचारी आणि काहीसा उदासीन असतो. शारीरिक सामर्थ्य आणि प्रतिकारक्षमता चांगली असते. कर्तबगार, कर्तृत्ववान, महत्वाकांक्षी, कष्टाळू, उत्तम स्मरण आणि आकलन शक्ती असणाऱ्या या व्यक्ती मात्र व्यावहारीक पातळीवर अधिक रेंगाळतात. कर्तृत्व गाजवताना स्वत:मधील अहंमच्या पडद्याखाली त्या सतत वावरत असतात. सर्वसामान्यांबरोबर त्या मिसळत नाहीत. त्यांची वृत्ती बहुधा कंजूषपणाची, कुणाला काही न देण्याची आणि सगळे स्वत:कडे ओढून घेण्याची अशा प्रकारची असते. त्यांची साधी राहणी हे त्यांच्या व्यवहारीपणाचे लक्षण असते. या व्यक्ती कला, करमणूक, रसिक म्हणून जीवनाचा आनंद उत्कटतेने घेताना आढळत नाहीत. या नक्षत्राला होणारे रोग फारसे त्रासदायक नाहीत. मात्र ते दीर्घ काळ अस्तित्व ठेवून असतात. रक्तदाब, रक्ताचे विकार, हृदयविकार, दमा, श्वसन विकार, संधिवात, त्वचारोग इ. आजार होण्याचा संभव असतो. योग्य काळजी घेतली असता या रोगांचा प्रतिकार करता येतो.

शततारका नक्षत्राचा आराध्यवृक्ष आहे कदंबवृक्षाला इंग्रजीमध्ये रूबीएसी (अँथोकेफॅलस – इंडिकस) असे म्हणतात. यालाच हरिप्रिय असेही नाव असून विष्णूला कदंबवृक्ष प्रिय आहे. हा वृक्ष भारतात सर्वत्र आढळतो. कदंबवृक्षाची फुले नारिंगी रंगाची आणि आकाराने लहान असतात. ही फुले सुगंधी असतात. याची फळे खात नाहीत. याचा पाला गुरांसाठी वापरला जातो. याची साल शक्तीवर्धक, विषनाशक, तापनाशक आहे. बौद्ध विहारांजवळ मोठ्या प्रमाणामध्ये कदंबवृक्ष आढळतात. डोळ्यांच्या विकारावर कदंबाची साल उपयुक्त आहे. कदंबाची पाने तोंडाच्या विकारावर उपयुक्त आहेत. कदंबवृक्ष विषाचे हरण करतो. म्हणूनच कालियामर्दनानंतर श्रीकृष्णाने कदंबवृक्षाचा आश्रय घेतला होता अशी कथा सांगितली जाते. कदंबवृक्षाचे उपयोग विविध अंगांनी आणि विविध विकारांवर केले जातात. कदंबवृक्ष हे सर्व प्रकारच्या समृद्धीचे लक्षण मानले जाते.

कदंब वृक्षाची पूजा करावी. संकल्प करून प्रार्थना करावी. वृक्षाला पाणी घालावे. हळद–कुंकू आणि पांढरे फूल वहावे, साखरेचा नैवेद्य दाखवावा. नक्षत्र देवतेचा मंत्र १०८ वेळा म्हणावा.

१) नक्षत्र नाम मंत्र – *। शंताभिजये नम: ।*
२) नक्षत्र देवता मंत्र – *। वरूणाय नम: ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। वरूण स्त्रोत मिती मंत्र: ।*

४) **पौराणिक मंत्र** – *अर्धकायं महावीर्यं चंद्रादित्यविमर्दनम् ।*
सिंहिकागर्भसंभूतं तं राहुं प्रणमाम्यहम् ।।

पूजा : शततारका नक्षत्राच्या पहिल्या चरणावर जन्म झालेला असल्यास गुरूवारी पूजा सुरू करून ती पुढे ११ दिवस करावी. दुसरे चरण असल्यास शनिवारी पूजा सुरू करून ती पुढे ७ दिवस करावी. तिसरे चरण असताना शनिवारी पूजा सुरू करून ती १२ दिवस करावी. चौथे चरण असल्यास गुरूवारी पूजा सुरू करून ती ८ दिवस करावी.

पूजा कालावधी संपल्यावर मुंग्यांना साखर घालावी.

- नक्षत्राचे नाव : **शततारका**
- इंग्रजी नाव : **ॲक्वारियस (Acquarius)**
- तारकासंघाचे नाव : **कुंभ**
- ताऱ्यांची संख्या : **१**
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : **कुंभ मंडलातील कुंभ तारा**
- आयनांश : **३०६°४०' ते ३२०°००'**
- राशी : **कुंभ**
- सूर्याचा वास : **१९ फेब्रुवारी ते ४ मार्च (सुमारे)**
- नक्षत्राकृती : **वर्तुळ**
- नक्षत्रस्वामी : **राहू**
- नक्षत्रदेवता : **वरूण**
- शुभ अंक : **६, ८**
- शुभ रंग : **मळकट पिवळा, निळा, जांभळा, काळा**
- शुभ रत्न : **गोमेद, नीलम**
- नक्षत्राक्षरे : **गो,सा,सी,सु**
- आराध्यवृक्ष : **कदंब**
- बोटॅनिकल नेम : **Anthocephalus chinesis (Lamk)**
- क्षेमकर वृक्ष : **मोह**
- धार्योषधी : **कमळ**
- जपासाठी मंत्र : **। वरूणाय नमः । (जपाची संख्या : १०,०००)**
- नक्षत्र स्तुती : **क्षत्रस्य राजा वरुणोधिराजः । नक्षत्राणा शतभिषग्वसिष्ठः ।।**
  तौ देवेभ्य कृणुतो दीर्घमायुः । शत सहस्रा भेषजानि धत्तः ।।
- आकाशात केव्हा दिसते : **सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे)**
  सप्टेंबर–ऑक्टोंबर महिन्यात पूर्वेला, नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यात डोक्यावर, जानेवारी–फेब्रुवारी महिन्यात पश्चिमेकडे.

२५. पूर्वा भाद्रपदा

कल्याणकारी उपासना

भद्रपाद अर्थात् कल्याणकारक पाऊल. मूळची नक्षत्रं २४ होती. पूर्व आणि उत्तर अशी ३ नक्षत्रांमध्ये भर पडल्यामुळे ती २७ झाली. या नक्षत्रात एकूण ४ तारे असतात. यापैकी २ पूर्वा भाद्रपदाचे तर २ उत्तरा भाद्रपदाचे. याचे इंग्रजी नाव **Beta Pegacy** असे आहे. नक्षत्राचे तीन चरण (पहिले) कुंभ राशीत येतात तर चौथा मीन राशीत येतो. भाद्रपद महिन्यात रात्रभर या नक्षत्राचे दर्शन होते.

समाजकारण, रचनात्मक कार्य करणाऱ्या व्यक्तिंचे जन्मनक्षत्र तपासून पाहिले तर ते बहुधा पूर्वाभाद्रपदा हे असते. नम्रता, सदाचार, व्यासंगी, विनयशीलता हे आणखी काही गुणविशेष पूर्वाभाद्रपदा जन्मनक्षत्र असणाऱ्यांचे म्हणून सांगता येतात. बडबडा स्वभाव, माणसं जोडण्याची वृत्ती यांच्यामध्ये दिसून येते.

स्त्रिया बुद्धिमान, सालस आणि चपळ असतात, इतके सद्गुण असूनही कलेच्या प्रांतात स्त्री–पुरुष दोघांनाही हे जन्मनक्षत्र फारसं गती देणारं नाही.

या नक्षत्राखालील व्यक्ती तशा निरोगी असतात तरीही दीर्घकाळ टिकणारे अथवा परिणाम दाखविणारे रोग या व्यक्तिंना होऊ शकतात. हे रोग कफरोग, सर्दी, दमा, संधिवात, रक्तदोष, हृदयविकार इ. स्वरूपाचे असू शकतात.

या नक्षत्राची देवता अजैकपाद आहे. या शब्दाची फोड केल्यास ३ चरण मिळतात ते असे अज + एक + पाद अज = न जन्मणारा एक = एक पाद = चरण/पाऊल. काही वैदिक ग्रंथ या एकपादालाच 'प्रकाशरेषा' असे म्हणतात. अवकाशात मेघगर्जनेआधी कडाडणारी सौदामिनी अर्थात् वीज हीच अजैक पाददेवता असावी असे एक सुंदर रूपक अनेक वैदिक संशोधक मांडतात. पृथ्वी आणि आकाशाला स्थिर करणारी अशी ही देवता अहिर्बुध्न्य देवतेशी संबंधित आहे. अजैक पाद ही अकरा रुद्रांपैकी एक देवता म्हणून प्रसिद्ध आहे. अजैक पाद हा अग्नीचे अपर (दुसरे) रूप मानला गेला आहे.

या नक्षत्राचा आराध्यवृक्ष आहे आंबा. म्हणजे वसंत ऋतुतील उन्हाळा सुसह्य करणारा फळांचा राजा आंबा. नगदी पीक म्हणून महाराष्ट्रात कोकण किनारपट्टीवर आंब्याचं उत्पादन केलं जातं. 'क' जीवनसत्वाचं भरपूर प्रमाण असणारा अत्यंत मधुर, रुचीवर्धक तसेच अग्नीवर्धक असे फळ म्हणजे आंबा. बहुगुणी आवळ्याप्रमाणे खरंतर आंबा या वृक्षाच्यादेखील प्रत्येक अवयवाचा वेगवेगळ्या (विशेषत: कफदोषांवर) दोषांवर उपयोग होतो. या झाडाची साल, मूळ, मोहर, पानं हे सारं कफ–पित्त शामक म्हणून उपयोगी आहे. कच्ची कैरी (फळ) लोणचं, सरबत यासाठी उपयोगी आहे तर कच्चा आंबा त्रिदोषहारक आहे. कैरीच्या कोयीच्या (बीच्या) आतील बाठ (गाभा) हे जंतांसाठी उत्तम औषध आहे.

पिकलेला आंबा रूचकर, भूक वाढवणारा, दाहशामक आणि हृदयासाठी बलदायक आहे. पाडाच्या आंब्याचा मुरंबा रक्तदोषांतक, रक्तवर्धक आहे. पूर्वा भाद्रपदा नक्षत्रवाल्यांना होणाऱ्या संभाव्य रोगांवर जसे सर्दी, थंडी, कफ इ. (पित्तदोष) वर आंब्याचा उपयोग होतो. आंब्याशी आपल्या संस्कृतीनं मांगल्याचं चिरंतन नातं जोडलेलं आहे. घरावर लावायच्या तोरणापासून ते मंगल कलशापर्यंत आंब्याची पाने शुभ म्हणून वापरली जातात.

आंब्याशी जोडलेलं अर्थकारण विचारात घेतले, तर कोणत्याही शेतकऱ्याने आंब्याची लागवड करणे त्याला लाभदायकच असते. त्याशिवाय सामान्य व्यक्तिंनाही या रसराजाची उपासना फळांसाठी म्हणून करायला काय हरकत आहे बरे?

आम्रवृक्षाची पूजा पूर्वाभाद्रपदा हे जन्मनक्षत्र असणाऱ्यांनी कमीत कमी २४ दिवस करावी.

१) नक्षत्र नाम मंत्र – *। पूर्व पृष्ठ पदभ्याम् नमः ।*
२) नक्षत्र देवता मंत्र – *। अजैकपादें नमः ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। अजैकपादे नमः ।*
४) नक्षत्र स्वामी मंत्र – *देवा नां च ऋषीं नां च गुरूं कांचनसंन्निभम् ।*
बुद्धिभूतं त्रिलोकेशं तं नमामि बृहस्पतिम् ।।

पूजा : आम्रवृक्ष पूजन करताना वृक्षाला पाणी घालावे. हळद–कुंकू व पांढरे फूल वहावे. दूध–साखरेचा नैवेद्य दाखवावा. पूर्वाभाद्रपदा नक्षत्राच्या प्रथम चरणावर जन्मलेल्यांनी वृक्षाची पूजा मंगळवारी सुरू करून २४ दिवस करावी. दुसऱ्या चरणात जन्मलेल्यांनी शुक्रवारी पूजा सुरू करून २४ दिवस करावी. तृतीय चरणवाल्यांनी बुधवारी पूजेचा प्रारंभ करावा व ३९ दिवस करावी. चौथ्या चरणात जन्मलेल्यांनी सोमवारी पूजा सुरू करून २९ दिवस करावी.

पूजा समाप्तीनंतर मीठ, मोहऱ्या, मिरच्या यांनी जातकाची दृष्ट काढावी व हे सर्व अग्नीत टाकावे.

अजैक पाद म्हणजेच वीज अर्थात् अग्निचेच एक स्वरूप आहे, त्यासाठी अग्निवर्धक आंब्याची उपासना अगदी संयुक्तिक वाटते.

- नक्षत्राचे नाव : पूर्वाभाद्रपदा
- इंग्रजी नाव : बिटा पेगॅसी (Beta Pegacy)
- तारकासंघाचे नाव : उच्चैश्रवा
- ताऱ्यांची संख्या : २
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : उच्चैश्रवा मंडलातील अल्फा आणि बीटा
- आयनांश : ३२०°००' ते ३३३°२०'
- राशी : कुंभ/मीन
- सूर्याचा वास : ४ मार्च ते १८ मार्च (सुमारे)
- नक्षत्राकृती : मंचक
- नक्षत्रस्वामी : गुरू
- नक्षत्रदेवता : अजैकपाद
- शुभ अंक : ३,८
- शुभ रंग : पिवळा, निळा
- शुभ रत्न : पुष्कराज, नीलम
- नक्षत्राक्षरे : से, सो, दा/दी
- आराध्यवृक्ष : आंबा
- बोटॅनिकल नेम : Mangifera indica L.

- क्षेमकर वृक्ष : कुचला
- धार्योषधी : माका
- जपासाठी मंत्र : । अजैकपादाय नम: । (जपाची संख्या : १०,०००)
- नक्षत्र स्तुती : अज एकपादुदगात्पुरस्तात् । विश्वाभूतानि प्रतिमोदमान: ।।
तस्य देवा: प्रसवं यन्तिसर्वे । प्रोष्ठपदासो अमृतस्य गोपा: ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात पूर्वला, डिसेंबर-जानेवारी महिन्यात डोक्यावर, फेब्रुवारी-मार्च महिन्यात पश्चिमेकडे.

२६. उत्तरा भाद्रपदा

कल्याणदायी

भद्रपदा अर्थात् भाद्रपदा म्हणजेच कल्याणकारक पाऊल. हे नक्षत्रदेखील कल्याणप्रद आहे. फक्त ते उत्तर अर्थातच थोड्या उतारवयात कल्याण करणारं असं आहे. पूर्वा आणि उत्तरा भाद्रपद मिळून 'तारकाचतुष्टय' अर्थात चौकडी किंवा चौकोन तयार होतो. भाद्रपद महिन्यात हे नक्षत्र आकाशात दिसू शकतं. या नक्षत्रामध्ये दोनच तारे असतात. याचे चारही चरण मीन राशित येतात. इंग्रजीमधलं हे **Gama Pegacy** या नावाने ओळखले जाते.

उत्तरा भाद्रपदा नक्षत्राची देवता आहे अहिर्बुध्न्य . ऋग्वेदात अहिर्बुध्न्य देवतेचे वर्णन येते. जलज अर्थात पाण्यात जन्म झालेला अहिर्बुध्य् आकाशातील नदीच्या तळाशी निवास करणारा असतो. अहिर्बुध्न्य ही खरं तर युगल देवता आहे असे मानतात. कारण अहि म्हणजे वृत्रासारखा बलाढ्य राक्षस आणि बुध्न्य म्हणजे अंतरिक्षाचा तळ. सुरभीचा पुत्र अहिर्बुध्न्य म्हणजे अकरा रुद्रांपैकी एक अशीदेखील मान्यता आहे. 'चाक्षुपोनिषदां 'चा कर्ता म्हणून अहिर्बुध्न्य प्रसिद्ध आहे.

हे जन्मनक्षत्र असणाऱ्या व्यक्ती विद्वान, स्थिर बुद्धीच्या, विनम्र आणि सेवाभावी असतात. महत्वाकांक्षा आणि ध्येय तत्परता ही त्यांची आणखीही काही गुणवैशिष्ट्ये आहेत. धाडसीपणा, निश्चयी स्वभाव, कर्तबगारी दाखविण्याची हौस व तयारी हेदेखील त्यांचे प्रकर्षाने दिसून येणारे गुणविशेष आहेत. या नक्षत्राचा स्वामी शनी हा आहे. शनी म्हटलं, की लोकांच्या डोळ्यासमोर येतो तो भयप्रद, भीतीदायक, साडेसाती मागे लावणारा शनी. पण तरीदेखील या नक्षत्रवाल्यांच्या बाबतीत शनिदेव काहीसे शांत आणि प्रसन्न असल्यासारखे वाटतात. रूप, बुद्धिमत्ता, गुण या सर्वांचाच मिलाफ या नक्षत्रामध्ये झालेला दिसून येतो.

सुंदर स्त्रिया आणि रूपवान पुरुष हे या नक्षत्रावर जन्मलेल्यांचं एक वैशिष्ट्य आहे. या व्यक्तिंना पोटाचे विकार, अपचन, गॅसेस, त्वचारोग, रक्तदोष इ. होवू शकतात. हे रोग फारसे दाहक नसले तरीही दीर्घकाळ टिकणारे असतात. या सर्व रोगांवर उपाय असणारा, अगदी सर्वसामान्यपणे ज्याचा वापर या सारख्या रोगांच्या निवारणासाठी केला जातो तो म्हणजे कडुलिंब. अर्थात् **Azadirecta Margoso / Neem' tree**. हा या नक्षत्राचा आराध्यवृक्ष आहे. दातांच्या बळकटीसाठी खेडो-पाडी गरिबांचा ब्रश म्हणून कडुलिंबाच्याच काडीचा उपयोग करतात. ह्या वृक्षाचे सर्वच अवयव शुद्धीकारक

म्हणजेच वातावरण आणि शरीर शुद्ध करणारे, रोगनिवारक असे आहेत. संस्कृतात याला 'परिभद्र' म्हणजे सर्वच बाजूंनी कल्याण करणारा असे म्हणतात.

शरीराच्या त्वचेच्या शुद्धीसाठी व तजेल्यासाठी कडुलिंबाचा वापर सर्वश्रुत व सर्वव्याप्त आहे. साबण, शाम्पू या सारख्या उत्पादनात कडुलिंबाचा वापर मोठ्या प्रमाणात करतात. अपचन, गॅसेस, मळमळ यांवर उत्तम उपाय असलेला कडुलिंब म्हणूनच नववर्षाच्या पहिल्या दिवशी (खरं तर या दिवसापासून रोज तो खावा अशी अपेक्षा असते.) म्हणजेच गुढीपाडव्याला खातात. कडुलिंब दीप्तीकर म्हणून अग्निमांद्यावर उपयोगी आहे. घामोळ्या, कांजिण्या यांवर कडुलिंबाची पाने पाण्यात उकळून त्या पाण्याने लहान मुलांना स्नान घालतात. घामोळ्याच्या पावडरमध्येही कडुलिंबाचा अर्क वापरला जातो.

भारताने जुन्या पौराणिक आणि ऐतिहासिक साधनांच्या आधारेच हळद, बासमती आणि कडुलिंबाच्या पेटंटची लढाई जिंकली म्हणून ठीक, नाही तर या अमृतोद्भव वृक्षाच्या उत्पादनांसाठी आपल्याला परक्या देशांकडे याचना करावी लागली असती.

या वृक्षाच्या सर्वांग परिपूर्ण औषधी गुणांमुळे याला खेड्यातील दवाखाना असे म्हणतात. ह्या कृमीघ्न, दीर्घायुप्रद, पारिभद्राची उपासना सर्वंनीच केली तर प्रदुषणमुक्ती, किटकांपासून मुक्ती, आरोग्यरक्षण असे अनेक हेतू साध्य होऊ शकतील.

प्रदुषणनिवारक शक्ती जास्त असल्यामुळे या वृक्षाची लागवड शेताच्या बांधावर,कंपन्यांमध्ये किंवा कारखान्यांमध्ये वगैरे अवश्य करावी. कडुलिंब विषघ्नदेखील आहे. रोज याची ४-५ पाने खाणाऱ्याला सर्पदंशापासून बाधा होत नाही, अशा या परिभद्राची उपासना उत्तरभाद्रपदा हे जन्मनक्षत्र असलेल्यांनी नेहमी करावी.

'अहिर्बुध्न्याय नम:' हा मंत्र यांच्यासाठी उपयुक्त आहे. या वृक्षाची पूजा कमीत कमी १४ दिवस करावी.

उत्तरा भाद्रपदात जन्मलेल्यांनी प्रथम संकल्प करून प्रार्थना करावी. वृक्षाला पाणी घालावे. हळद-कुंकू वहावे. शनीचे प्रिय निळे अथवा इतर कोणतेही पिवळे फूल वहावे. शेळीच्या दुधाच्या नैवेद्य दाखवावा. वरीलपैकी कोणताही एक मंत्र जपावा. नक्षत्रदेवता मंत्र १०८ वेळा किंवा शनीचा पुराणोक्त मंत्र १११ वेळा जपावा.

१) नक्षत्रनाम मंत्र – *। उत्तर पृष्ठ पदभ्याम् नम: ।*
२) नक्षत्र देवता मंत्र – *। अर्हिबुधाय नम: ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। अर्हिबुध्योती मंत्र: ।*
४) पौराणिक मंत्र – *नीलांजनसमाभासमं रविपुत्रं यमाग्रजम् ।*
छायामार्तण्डसंभूतं तं नमामि शनैश्वरम् ।।

पूजा : या नक्षत्राच्या प्रथम चरणात जन्मलेल्यांनी रविवारी पूजा सुरू करून ती सलग १४ दिवस करावी. द्वितीय चरणात जन्मलेल्यांनी गुरूवारी पूजा सुरू करावी व सलग २४ दिवस करावी. तिसऱ्या चरणात जन्म झालेल्यांनी शुक्रवारी पूजेचा प्रारंभ करून ती १४ दिवस करावी तर चौथे चरण असलेल्यांनी मंगळवारी पूजेची सुरूवात करून ती २२ दिवस सलगपणे करावी. पूजाकाल समाप्तीनंतर शेळीच्या दुधाने हनुमानास अभिषेक घालावा.

■ नक्षत्राचे नाव	:	उत्तराभाद्रपदा
■ इंग्रजी नाव	:	गॅमा पेगॅसी (Gama Pegacy)
■ तारकासंघाचे नाव	:	उच्चैश्रवा
■ ताऱ्यांची संख्या	:	२
■ ताऱ्यांची वैज्ञानिक नावे	:	उच्चैश्रवा मंडलातील गॅमा आणि डेल्टा
■ आयनांश	:	३३३°२०' ते ३४६°४०'
■ राशी	:	मीन
■ सूर्याचा वास	:	१८ मार्च ते ३१ मार्च (सुमारे)
■ नक्षत्राकृती	:	मंचक
■ नक्षत्रस्वामी	:	शनी
■ नक्षत्रदेवता	:	अहिर्बुध्न्य
■ शुभ अंक	:	३,८
■ शुभ रंग	:	निळा, पिवळा, जांभळा, काळा
■ शुभ रत्न	:	पुष्कराज, नीलम
■ नक्षत्राक्षरे	:	दु, थ, झ, त्र
■ आराध्यवृक्ष	:	कडुनिंब
■ बोटॅनिकल नेम	:	Azadirachta indica Juss.
■ क्षेमकर वृक्ष	:	आवळा
■ धार्योषधी	:	पिंपळ
■ जपासाठी मंत्र	:	। अहिर्बुध्न्याय नमः । (जपाची संख्या : १०,०००)
■ नक्षत्र स्तुती	:	अहिर्बुध्न्य प्रथमान एति । श्रेष्ठो देवानामुत मानुषाणाम् । तं ब्राह्मणाः सोमपाः सोभ्यासः। प्रोष्ठपदासो अभिरक्षन्ति सर्वे ।
■ आकाशात केव्हा दिसते	:	सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास(सायं. आठ सुमारे) ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यात पूर्वेला, डिसेंबर–जानेवारी महिन्यात डोक्यावर, फेब्रुवारी–मार्च महिन्यात पश्चिमेकडे.

२७. रेवती

देवतांचा वास

हे नक्षत्रमालेतील अंतिम नक्षत्र. खरंतर कुटुंबातील शेवटच्या मुलाला / मुलीला शेंडेफळ म्हणून जरा लाडा–कोडानं वाढवलं जातं. त्या अर्थानं वरच्या भावंडांमध्ये या शेंडेफळाचा तोरा आणि म्हणून वजन जरा जास्तच असतं. पण नक्षत्रमालेत तसं बहुधा नसावं. या अंतिम नक्षत्रामधील सामर्थ्य–ताकत तुलनेनं कमी असते.

रेवती नक्षत्रामध्ये ३२ तारे असतात. हे इंग्रजीत Zeta pecium म्हणून ओळखलं जातं. याचा आकार काहींना कुंभ (रांजण) वाटतो तर काहींना मृदुगांकृती वाटतो. नक्षत्राचे चारही चरण मीन

राशित येतात. हे नक्षत्र सात्विक व शुभलक्षणी असं आहे. हे जन्मनक्षत्र असणाऱ्या व्यक्ती सत्याची आवड असलेल्या, बुद्धिमान, चतुर व सद्गुणी असतात. दुसऱ्यांना मदत करण्याची वृत्ती त्याचबरोबर सर्वांसाठी समत्वाने वागण्याची वृत्ती ही आणखी या नक्षत्राची गुणविशेष आहेत. सर्वांशी यांचं चांगलं जमतं.

परंतु या व्यक्ती इतक्या सद्गुणी असूनही पराश्रित असतात. हस्त नक्षत्राप्रमाणे याही व्यक्ती कोणाचा तरी टेकू घेऊनच पुढे आलेल्या दिसतात. यात स्वकर्तृत्वाचा भाग फारच कमी असतो. आरोग्याच्या दृष्टीनेही हे नक्षत्र फारसं लाभप्रद नाही. प्रकृतीचा विचार करता कफ प्रकृतीचा प्रभाव जाणवतो. शरीराची ठेवण लहानसर, उंची कमी अशी असते. त्यामुळं रेवती हे तसं पुरुषांना अनुकुल नक्षत्र नाही. स्त्रियांच्या बाबतीत मात्र सौंदर्य, लावण्य, हुषारी, वैवाहिक सुख इ.च्या दृष्टीने हे नक्षत्र अगदी उत्तम आहे.

या नक्षत्राची देवता आहे 'पूषा'. पूषा म्हणजे भरणपोषण किंवा भरभराट, रक्षण असे अनेक अर्थ आहेत. ऋग्वेदात पूषा देवतेला उद्देशून 'मनुष्य जमातीची भरभराट कर' अशी प्रार्थना करणारी अनेक सूक्ते आहेत. ती (पूषा) अन्नाचा निर्माता व संरक्षक, पशुप्राण्यांचा सखा तसेच शत्रूला ओळखणारा आहे, अशी वर्णिलेली आहेत. त्यामुळे मनुष्यमात्रांच्या अन्नाचे रक्षण त्याने करावे व चांगले अन्न मिळून प्रजा ही सुप्रजा व्हावी, यासाठी त्याची प्रार्थना केली जाते. द्वादश आदित्यांपैकी एक पूषा आहे. पूष्णे नम: म्हणून सूर्यनमस्कारात तो आपल्या परिचयाचा आहे. अन्य एका ठिकाणी वनस्पती ही देवता कल्पून गृत्समद ऋषींनी करत पयस्वन्तं गोष्ठ (अर्थात आमचे गोठे दुधाने भरू देत) अशी प्रार्थना सूक्तात केलेली आहे. पूषा देवतेबाबत हे वर्णन अगदी योग्यपणे लागू पडते. पूषा देवता गोठ्यातील गायी, गुरांचे, अन्नाचे रक्षण तर करतेच पण एखाद्या चुकलेल्या, हरवलेल्या जनावराला ही ते शोधून देते. तसेच हरवलेल्या वस्तू परत मिळाव्यात यासाठीही पूषा देवतेला आवाहन करण्यात येते. अथर्ववेदातील विवाहसूक्तात पुरोहित नववधूला आशीर्वाद देताना पूषाची प्रार्थना करतात.

रेवती नक्षत्राचा आराध्यवृक्ष आहे मोह म्हणजेच **Madhaka Indica**. अतिशय देखणा आणि फुलांनी बहरलेला. ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार तसेच गुजरातमध्ये हा वृक्ष अधिक आढळतो. याच्या फुलांमध्ये एक प्रकारचा उन्मादक द्राव असल्याने त्याची दारू गाळून ती महुवा नावाने आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात प्राशन केली जाते. रेवती नक्षत्रवाल्यांना होणाऱ्या संभाव्य रोगांचा विचार करता मोहाचा उपयोग अगदी सुयोग्य वाटतो. कारण या नक्षत्रवाल्यांना होणारे रोग म्हणजे साथीचे रोग, सर्दी, खोकला त्याचबरोबरीनं आकडी येणं, उन्माद, आतड्याचे, शौचाचे विकार इ. असू शकतात. वाताचे आधिक्य त्यामुळे चरबी साठणं आणि त्यामुळे मग पाठोपाठ येणारे मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार हे यांचे अगदी सोबती असतात.

नेमका या सर्वांवर मोहाच्या झाडांचा उपयोग अगदी चपखल बसतो. मोहाची फुलं आणि खडीसाखर यांचं मिश्रण उष्णताशामक अगदी गुलकंदासारखं उपयोगी पडणारं असतं. मोहाची साल अपस्मार (आकडी येणं), उन्माद यांवर उपयोगी असते. तसेच सालीची पूड कफनाशक तसेच नस्य (नाकात घालण्यासाठी) म्हणूनही उपयोगी आहे. मोहाची फुले हृदयाला हितकारक आहेत पण फळे हृदयाला घातक आहेत. मोहाच्या बीच्या तेलाच्या अभ्यंगाने चरबी झडते. तसेच या तेलाचा वेदनाशामक म्हणूनही उपयोग होतो. याची पाने गोलाकार देखणी असतात. पत्रावळी तयार करण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. पोटातील कृमी, भूक मंदावणे यासाठी मोहाच्या सालीचा किंवा

सालीच्या आतील भागाचा (आंतरसालीचा) उपयोग होतो. बलवर्धक, क्षुधाव्रर्धक व शरीराला तरतरी आणणाऱ्या अशा या झाडाची फुले आदिवासी श्रमपरिहारासाठी मद्यनिर्मितीमध्ये वापरतात.

वृक्षाची पूजा करताना संकल्प करून प्रार्थना करावी. वृक्षाला पाणी घालावे. हळद-कुंकू वाहून पांढरे फूल घालावे. गुळ-खोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा. वरीलपैकी कोणत्यही मंत्राचा जप १०८ वेळा करावा किंवा नक्षत्र स्वामी बुधाचा पौराणिक मंत्र ११३ वेळा जपावा.

इतक्या देखण्या आणि उत्तम टॉनिक असलेल्या वृक्षाचा पूजाविधी खालीलप्रमाणे

१) नक्षत्र नाम मंत्र – *। रेवत्यै नमः ।*
२) नक्षत्र देवता मंत्र – *। पूष्णेन नमः ।*
३) नक्षत्र वेदोक्त मंत्र – *। पुणंतवय व्रेती मंत्रः ।*
४) नक्षत्र स्वामी मंत्र (बुध) – *प्रियंगुकलिकाश्यामं रुपेणाप्रतिमं बुधम् ।*
सौम्यं सौम्यगुणोपेतं तं बुधं प्रणमाम्यहम् ।।

वृक्षाची पूजा करताना संकल्प करून प्रार्थना करावी. वृक्षाला पाणी घालावे. हळद-कुंकू वाहून पांढरे फूल घालावे. गुळ-खोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा. वरीलपैकी कोणत्याही मंत्राचा जप १०८ वेळा करावा किंवा नक्षत्र स्वामी बुधाचा पौराणिक मंत्र ११३ वेळा जपावा.

पूजा : रेवती नक्षत्राच्या प्रथम चरणावर जन्मलेल्यांनी गुरूवारी पूजा सुरू करून २६ दिवस करावी. दुसऱ्या चरणावर जन्मलेल्यांनी शनिवारी पूजा सुरू करावी व सलगपणे २६ दिवस करावी. तृतीय चरणावर जन्म झालेल्यांनी शनिवारी पूजेचा प्रारंभ करून २६ दिवस करावी. चतुर्थ चरणावर जन्मलेल्यांनी गुरूवारी पूजा सुरू करून सलगपणे ६० दिवस करावी.

पूजाकाल समाप्तीनंतर एका सुवासिनीची ओटी भरावी.

- नक्षत्राचे नाव : रेवती
- इंग्रजी नाव : पिसेस (Pisces)
- तारकासंघाचे नाव : मीन
- ताऱ्यांची संख्या : ३२
- ताऱ्यांची वैज्ञानिक नावे : मीन मंडलातील जीटा आणि इतर ३१ तारे
- आयनांश : ३४६°४०' ते ३६०°००'
- राशी : मीन
- सूर्याचा वास : ३१ मार्च ते १४ एप्रिल (सुमारे)
- नक्षत्राकृती : मृदंग
- नक्षत्रस्वामी : बुध
- नक्षत्रदेवता : पूषा
- शुभ अंक : ५, ६
- शुभ रंग : पिवळा, पांढरा
- शुभ रत्न : पुष्कराज, हिरा
- नक्षत्राक्षरे : दे, दो, चा, चि
- आराध्यवृक्ष : मोह

- बोटॅनिकल नेम : **Madhuca indica Mac.**
- क्षेमकर वृक्ष : औदुंबर
- धार्योषधी : पिंपळ
- जपासाठी मंत्र : । पूष्णे नम: । (जपाची संख्या : ७०००)
- नक्षत्र स्तुती : पूषा रेवत्यन्वेति पन्थाम् । पुष्टिपती पशुपा वाजबस्त्यौ ।।
  इमानि हव्या प्रयता जुषाणां । सुगैर्नो यानैरुपयातां यज्ञम् ।।
- आकाशात केव्हा दिसते : सूर्यास्तानंतर सुमारे दोन तास (सायं. आठ सुमारे) नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यात पूर्वेला, जानेवारी–फेब्रुवारी महिन्यात डोक्यावर, मार्च–एप्रिल महिन्यात पश्चिमेकडे.

भारतात उष्णकटिबंधाच्या विस्तारात ३५० मीटर उंचीपर्यंत हा वृक्ष नैसर्गिक वनामध्ये आढळतो. उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, आंध्र, कर्नाटक, तसेच समुद्राकाठच्या प्रदेशात मोठ्या प्रमाणात सापडतो.

***

अठ्ठाविसावे नक्षत्र अभिजीत

प्राचीन भारतीय साहित्यामध्ये अनेक ठिकाणी नक्षत्रांचे उल्लेख आढळतात. ज्योतिष पुराणामध्ये नक्षत्रांविषयी सखोल माहिती देण्यात आलेली आहे. तसेच वेदांमधील ऋचा, उपनिषदे आणि आरण्यके यातही नक्षत्रांचा उल्लेख आढळतो. अगदी सुरवातीला एकूण नक्षत्रांची संख्या फक्त २४ एवढी होती. वर्षाला १२ महिने आणि प्रत्येक नक्षत्रामध्ये सूर्याचा १५ दिवस मुक्काम म्हणून एकूण नक्षत्रे २४ अशी ढोबळमानाने नक्षत्रांची कल्पना होती. कालांतराने ज्योतिषशास्त्र, तसेच खगोलशास्त्र इ. चा अधिक सूक्ष्मपणे आणि बारकाईने विचार झाला. ज्योतिषशास्त्राचे निष्कर्ष अधिक अचूक यावेत यासाठी नक्षत्र संकल्पना वर्षांऐवजी चंद्राच्या पृथ्वीभोवतीच्या प्रदक्षिणेशी जोडण्यात आली. चंद्र पृथ्वीभोवतीची एक प्रदक्षिणा २७ दिवसांमध्ये पूर्ण करतो म्हणून नक्षत्रांची एकूण संख्या २७ एवढी ठरविण्यात आली. त्यासाठी मग २४ नक्षत्रांपैकी फाल्गुनी, आषाढा आणि भाद्रपदा या नक्षत्रांची फोड करून त्यांचे पूर्वा आणि उत्तरा असे दोन भाग करण्यात आले. त्यामुळे नक्षत्रांची संख्या ३ ने वाढून ती २७ झाली. मात्र त्यानंतर चंद्राच्या पृथ्वीभोवतीच्या प्रदक्षिणेचा कालावधी अत्यंत अचूक पद्धतीने मोजला असता तो २७ १/३ म्हणजेच २७ दिवस आणि ८ तास एवढा आढळून आला. त्यातूनच मग उत्तर आषाढा आणि श्रवण या नक्षत्रांचा प्रत्येक एक चरण एकत्र करून फक्त दोन चरणांचे अभिजित हे नक्षत्र ठरविण्यात आले. मात्र असे असूनही प्रत्यक्ष व्यवहारात अभिजित नक्षत्र तितकेसे प्रचलित होऊ शकले नाही. त्यामुळे एकूण नक्षत्रे २७ एवढीच संख्या रूढ झाली आहे.

***

नक्षत्रांचे चरण, अंश आणि सूर्य प्रवेश

राशी संकल्पनेमध्ये सूर्याच्या एकूण भ्रमण मार्गाचे १२ भाग कल्पून रचना केलेली असते. एका राशीमध्ये सूर्याचा भ्रमणमार्गाचा ३० अंशाचा भाग समाविष्ट होतो. भारतीय ज्योतिषशास्त्र हे चंद्राच्या भ्रमणमार्गावर आधारीत आहे. त्यामध्ये अधिक सूक्ष्म पातळीवर नक्षत्र विचार केलेला आहे. प्रत्येक नक्षत्रामध्ये साधारणपणे १३.३३ अंश एवढा भाग येतो. या प्रत्येक नक्षत्राचे पुन्हा पश्चिमेकडून पूर्वेकडे असे चार विभाग करण्यात आले आहेत. या प्रत्येक भागाला नक्षत्राचा चरण असे म्हटले जाते. पश्चिमेकडून पूर्वेकडे अनुक्रमे पहिला चरण, दुसरा चरण, तिसरा चरण आणि चौथा चरण अशी रचना असते. या प्रत्येक चरणांमध्ये ३.३३ अंश एवढा भाग येतो. चंद्र एका नक्षत्रामध्ये सुमारे २४ तास असतो. नक्षत्राच्या प्रत्येक चरणामध्ये तो ६ तास एवढा काळ असतो. सूर्य एका नक्षत्रामध्ये सुमारे १३ ते १४ दिवस असतो. नक्षत्राच्या प्रत्येक चरणामध्ये सूर्य सव्वातीन ते साडेतीन दिवस एवढा काळ राहतो. एका राशीमध्ये साधारणपणे सव्वा दोन नक्षत्रे असतात. नक्षत्रांची विभागणी चार चरणांमध्ये केली असल्यामुळे, प्रत्येक राशीमध्ये असलेले नक्षत्रक्षेत्र सहजपणे ठरविता येते. उदा. मेष राशीमध्ये अश्विनी आणि भरणी ही दोन पूर्ण नक्षत्रे आणि कृतिका नक्षत्राचे पहिले चरण यांचा समावेश होतो.

सूर्य आणि चंद्राचे भ्रमणमार्ग आकाशामध्ये एकमेकांच्या अगदी जवळूनच जातात. चंद्र रोज एका नक्षत्रामधून दुसऱ्या नक्षत्रामध्ये जातो तर सूर्य १३ ते १४ दिवसांनंतर एका नक्षत्रातून दुसऱ्या नक्षत्रामध्ये जातो. एका नक्षत्रामधून बाहेर पडलेला चंद्र पुन्हा त्या नक्षत्रामध्ये २७ व्या दिवशी प्रवेश करतो. एका नक्षत्रामधून बाहेर पडलेला सूर्य पून्हा ३५१ दिवसांनी त्या नक्षत्रामध्ये प्रवेश करतो. पृथ्वी सूर्याभोवती दररोज सुमारे १ अंशांनी फिरते. सूर्य वर्षभरामध्ये नक्षत्रामध्ये प्रवेश करतो त्या तारखा जवळपास ठरलेल्या आहेत. सूर्य ज्या नक्षत्रामध्ये आहे ते नक्षत्र पहाटे सूर्य उगवतीच्या ठिकाणावर किंवा संध्याकाळी पश्चिमेकडे सूर्य मावळतीच्या ठिकाणी दिसून येते. सूर्य ज्या नक्षत्रामध्ये प्रवेश करतो ते नक्षत्र लागले असे म्हटले जाते. सूर्याच्या नक्षत्र प्रवेशाच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत. त्यात अत्यंत थोडा बदल होण्याची शक्यता असते.

क्र.	नक्षत्र	प्रवेश तारखा	क्र.	नक्षत्र	प्रवेश तारखा
१	अश्विनी	१४ एप्रिल	१४	चित्रा	१० ऑक्टोबर
२	भरणी	२७ एप्रिल	१५	स्वाती	२४ ऑक्टोबर
३	कृतिका	११ मे	१६	विशाखा	६ नोव्हेंबर
४	रोहिणी	२५ मे	१७	अनुराधा	१९ नोव्हेंबर
५	मृग	८ जून	१८	ज्येष्ठा	२ डिसेंबर
६	आर्द्रा	२२ जून	१९	मूळ	१६ डिसेंबर

७	पुनर्वसू	६ जुलै	२०	पूर्वाषाढा	२९ डिसेंबर
८	पुष्य	२० जुलै	२१	उत्तराषाढा	११ जानेवारी
९	आश्लेषा	३ ऑगस्ट	२२	श्रवण	२४ जानेवारी
१०	मघा	१६ ऑगस्ट	२३	धनिष्ठा	६ फेब्रुवारी
११	पूर्वा	३० ऑगस्ट	२४	शततारका	१९ फेब्रुवारी
१२	उत्तरा	१३ सप्टेंबर	२५	पूर्वाभाद्रपदा	४ मार्च
१३	हस्त	२७ सप्टेंबर	२६	उत्तराभाद्रपदा	१८ मार्च
			२७	रेवती	३१ मार्च

रोजच्या पंचांगामध्ये चंद्र कोणत्या नक्षत्रामध्ये आहे आणि सूर्याचे कोणते नक्षत्र लागलेले आहे, याची माहिती दिलेली असते. प्रत्येक नक्षत्र पूर्व क्षितिजावर एका विशिष्ट वेळी उगवते. ही वेळ दररोज ४ मिनिटांनी अलिकडे सरकत जाते. याचे कारण पृथ्वीला स्वत:भोवती एक अंश फिरण्यास ४ मिनिटे लागतात. एखाद्या नक्षत्रातील जे तारे एखाद्या दिवशी सायंकाळी ७ वाजता उगवतात तेच तारे पंधरा दिवसानंतर सायंकाळी ८ वाजता उगवतील. सहा महिन्यानंतर पुन्हा त्याच वेळी तेच तारे सायंकाळी त्याच ठिकाणी उगवताना दिसतात. सूर्यमंडलातील तारका, नक्षत्रे आणि ग्रह यांचा हा दैदिप्यमान तितकाच रोमहर्षक खेळ वेळात वेळ काढून अनुभवला पाहिजे, हे मात्र खरे.

नक्षत्र शांती

ज्योतिषशास्त्राप्रमाणे काही विशिष्ट नक्षत्रांवर जन्म झाला असल्यास त्याची शांती करावी असे शास्त्र सांगते, त्याप्रमाणे काही अनुभवसिद्ध गृहितके असावीत असे वाटते. नक्षत्र शांत करणे म्हणजे एका अर्थाने त्याची उपासना करणे आणि त्याचे संभाव्य वाईट परिणाम यांची तीव्रता कमी करणे असा उद्देश आहे. धर्मसिंधु या ग्रंथामध्ये नक्षत्रशांती जननशांती याची कारणमीमांसा दिली आहे.

मूळ नक्षत्राच्या प्रथम चरणावर पुत्रांचा जन्म झाल्यास पिता मरण पावतो. द्वितीय चरणी माता मरण पावते. तिसऱ्या चरणी धननाश व चतुर्थ चरणी कुळ नाश होतो. तसेच मूळ नक्षत्राच्या प्रथम चरणावर पुत्रीचा जन्म झाल्यास सासरा मरण पावतो. द्वितीय चरणी सासू मरण पावते. पुढील चरणाचे फल तसेच जाणावे. म्हणून मूळ नक्षत्राच्या कोणत्याही चरणावर जन्म झाला असल्यास शांती करावी. ज्येष्ठा नक्षत्राच्या शेवटच्या दोन घटिका म्हणजे ९६ मिनिटे व मूळ नक्षत्राच्या सुरूवातीच्या दोन घटिका म्हणजे ९६ मिनिटे या १९२ मिनिटांच्या कालावधीस अभुक्त मूळ असे म्हणतात. अभुक्त मूळ असताना जन्म झाल्यास ८ वर्षे बालकास अन्यत्र ठेवावे. (म्हणजेच त्याचा त्याग करावा) व त्यानंतर त्याची शांती करावी. मूळ नक्षत्राचा दोष ८ वर्षेपर्यंत असतो म्हणून इतका कालपर्यंत अर्ज्य करावे.

आश्लेषा नक्षत्राच्या द्वितीय चरणी धननाश, तिसऱ्या चरणी मातृनाश व चतुर्थ चरणी पितृनाश. तसेच सासू-सासरे यांचा नाश; याकरिता आश्लेषा नक्षत्राच्या कोणत्याही चरणावर जन्म झाला *असल्यास शांती करावी.*

ज्येष्ठा नक्षत्रावर कन्या जन्मल्यास ज्येष्ठ दिरास मारते. ज्येष्ठा नक्षत्राचे समान दहा भाग केल्यास पहिल्या भागात बालकाचा जन्म झाल्यास – मातेची आई, दुसरा भाग – आईचे वडील मरण पावतील, तिसरा भाग – मामा मरण पावेल, चौथा भाग – मातृनाश, पाचवा भाग – स्वत: मरण पावेल, सहावा भाग – गोत्रज मरण पावतील, सातवा भाग – पिता व माता अशा दोन्ही कुलांचा नाश, आठवा भाग – ज्येष्ठ बंधू मरण पावतो, नववा भाग – सासरा मरण पावेल व दहावा भाग – सर्वांना मारतो. याकरिता ज्येष्ठा नक्षत्रावर जन्मलेल्या बालकाची शांती अवश्य करावी.

चित्रा नक्षत्राचा पूर्वार्ध, पुष्य नक्षत्राचे मधले दोन चरण, पूर्वाषाढा – तिसरा चरण, उत्तरा फाल्गुनी – प्रथम चरण या नक्षत्रावर बालकाचा जन्म झाल्यास पिता, पुत्र, भ्राता व स्वत: यांचा नाश होतो. याकरिता – अ) चित्रा नक्षत्राचा पूर्वार्ध – गोप्रसवशांति करून नक्षत्रदेवतेची पूजा व अजा दान करावे. ब) पुष्य नक्षत्राचे मधले दोन चरण गोप्रसवशांति करून नक्षत्रदेवतेची पूजा व गाईचे दान करावे. क) पूर्वाषाढा – तिसरा चरण – नक्षत्रदेवतेची पूजा व सुवर्ण दान करावे. ड) उत्तरा फाल्गुनी प्रथम चरण – नक्षत्रदेवतेची पूजा व तीलपात्र दान करावे.

मघा नक्षत्राच्या पहिल्या चरणात जन्म झाल्यास मूळ नक्षत्राप्रमाणे फळ जाणावे त्या ठिकाणी गोप्रसवशांती, नक्षत्रदेवतेचे पूजन व ग्रहमखही करावी. मघा नक्षत्राच्या पहिल्या १९२ मिनिटांत जन्म झाला असल्यास नक्षत्र गंडांत शांती करावी.

रेवती नक्षत्राच्या शेवटच्या १९२ मिनिटांत व अश्विनी नक्षत्राच्या पहिल्या १९२ मिनिटांत जन्म झाला असल्यास नक्षत्र गंडांत शांती करावी. अन्यवेळी जन्म झाला असेल तर शांती नाही.

शांती करताना जन्म झाल्यावर बाराव्या दिवशी किंवा शुभ दिवशी शांती करावी. शांतीचा विधी करण्यासाठी स्थानिक धार्मिक कार्ये करणाऱ्या व्यक्तिंचे मार्गदर्शन घ्यावे. नक्षत्रशांती हा ज्याच्या त्याच्या वैयक्तिक श्रद्धेचा आणि निवडीचा विषय आहे. एक मात्र सुचवावेसे वाटते की, याप्रमाणे काही परंपरागत शास्त्र असावे. शांती केल्याने काही नुकसान होणार नाही. मानवी जीवनावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या परिणाम करणारे अनंत घटक असतात. त्यापासून संरक्षण म्हणून अशी शांती करायला हरकत नसावी.

वृक्षांच्या व फळाफुलांच्या आधारे शेती विषयीचे भाकीते

इसवी सनाच्या सहाव्या शतकातील ज्योतिषाचार्य वराह मिहीर यांनी बृहत संहिता नावाच्या ग्रंथात कुसुमलता नावाच्या अध्यायामध्ये वन, गडांवरील वनस्पती आणि कृषी उत्पन्नाचा स्वतंत्र अध्याय दिलेला आहे. त्याचे सिद्धांत भारताच्या विविध प्रदेशात कमी जास्त प्रमाणात परिणाम-कारकपणे जाणवतात.

वराह मिहीर म्हणतो की शेतीतील पीकांचे संबंध कोणत्यातरी वनस्पतीच्या गुणदोषाशी मिळणारे आहेत. भर उन्हाळ्यात उगवणाऱ्या वनस्पतींचा बहार बघून आपण येणाऱ्या खरीपातील किंवा रब्बी हंगामातील शेती उत्पन्नाविषयी पूर्वानुमान किंवा भाकीत करू शकतो. विविध वृक्ष वनस्पतींना विविध समयी येणारी फळे-फुले आणि पानांच्या आकार, रंगाचे प्रमाण, त्यांची अवस्था यांच्या आधारे शेतीतील वेगवेगळी पिके किती प्रमाणात उगवतील, त्याची भाकीते दर्शविता येतात. कुसुमलता अध्यायातील काही भाकीते खालीलप्रमाणे आहेत.

१) ज्यावर्षी पळसवृक्ष फुलतो, त्यावर्षी कोदरा आणि बंटीची शेती भरपूर पिकते.
२) वड खूप बहरला, तर जव भरपूर पिकते.
३) मृदुवर फुले पुष्कळ प्रमाणात आल्यास त्यावर्षी गहू पुष्कळ पिकतो.
४) जांभूळाच्या झाडाला पुष्कळ जांभळे लागली, तर त्यावर्षी तीळ आणि उडीद पुष्कळ पिकतो.
५) सुगंधी फूल जाई, मोगरा पुष्कळ बहरली तर त्यावर्षी कापसाचे उत्पन्न चांगले मिळते.
६) बोराच्या झाडावर बोरे जास्त लागल्यास कुळीथ जास्त पिकते.
७) ज्यावर्षी पिंपळ बहरतो, त्यावर्षी सर्वच अन्नधान्याचे (गहू, तांदूळ, बाजरी, जव, ज्वारी) चांगले उत्पन्न होते.
८) बेल वृक्ष बहरला तर मूग जास्त प्रमाणात पिकतात.
९) दाभडो (दर्भ) आणि दुर्वा जास्त झाल्या तर उसाचे पुष्कळ उत्पन्न येते.
१०) रक्त अशोकाला मोठ्या प्रमाणामध्ये फळे आणि फुले आल्यावर लाल रंगाच्या तांदुळाच्या उत्पादनामध्ये वृद्धी होते. दुधीच्या वृद्धीने पांडुक नावाचा भात मोठ्या प्रमाणामध्ये पिकतो.
११) कुचला, सिन्दुक, गोष वृक्षाच्या वाढीने तांदुळाच्या उत्पन्नामध्ये वाढ होते.
१२) शिरीष वृक्षाच्या वृद्धीने प्रियंगुच्या उत्पन्नामध्ये वाढ होते.
१४) सातविण वृक्षाच्या वृद्धीने जवाच्या उत्पदनात वाढ होते.
१६) आसननी / बिवळा या वृक्षाच्या वृद्धीने मोहरीच्या पिकामध्ये वाढ होते.
१७) बंजुलच्या झाडाला भरपूर फुले आली तर जवसाच्या उत्पन्नामध्ये वाढ होते.
१८) इंगुदवृक्षाच्या फळाफुलांनी तागाच्या उत्पन्नामध्ये वाढ होते.

■ अन्य भाकीते –

अ) पीलुडी (मेस्वाक) जास्त बहरली तर रोगराई थांबते. परिणामी पशु–पक्षी–मानवाच्या आरोग्यात वृद्धी पहावयास मिळते.

ब) हस्तीकंद, हस्तीकर्णीच्या वाढीने हत्तींच्या संख्येमध्ये वाढ होते आणि अश्वकर्णच्या वृद्धीने घोड्यांची पैदास वाढते. पामल पुष्पांनी गायींची पैदास वाढते. हदली वृक्षाच्या वृद्धीनी शेळी बोकडांची संख्या वाढते.

क) तिळवृक्ष (काळ्या तीळाचे झाड) च्या वाढीने शंख, मोती आणि चांदीमध्ये वाढ होते. चंपकपुष्पाच्या वृद्धीने सुवर्ण वाढते. कुरवड पुष्पांच्या वाढीने हिऱ्यांची वृद्धी होते. तर नन्दीकावृर्तचे वाढीने वैदुर्यमण्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होते.

■ वृक्षांवर आधारित राजा, प्रजा व पाण्याविषयीचे भाकिते

अ) निरगुंडीच्या वाढीने मोत्यांमध्ये वृद्धी होते, केशराच्या पुष्पांमधील वाढीने कारिगरांमध्ये वाढ होते. रक्त– कमळांनी राजाची प्रगती, नीलकमलांनी मंत्र्याची प्रगती, सुवर्णपुष्पांनी श्रेष्ठींची, अर्क पुष्पांच्या वाढीनी सुवर्णामध्ये वाढ होते. आम्रवृक्षाच्या फळाफुलांच्या वाढीने प्रजेच्या कल्याणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते.

ब) भीलामाच्या वाढीने भय उत्पन्न होते. ज्यावर्षी भीलामा जास्त फुलतात तेव्हा दुष्काळसदृष्य परिस्थिती निर्माण होते.

क) खैर आणि शमीवृक्षाच्या वाढीने दुष्काळ पडतो. कडुनिंब आणि नागकेशरच्या वृद्धीने पृथ्वीवर सुकाळाची नांदी येते. कपित्थ वृक्षाची वायुवृद्धी होते आणि निचुलच्या वाढीने अनावृष्टी होते.

ड) कंचनाद्र वृक्षाच्या वाढीने अग्नीभय वाढते. जेव्हा वृक्ष आणि वेली पूर्ण स्निग्ध आणि छिद्रविरहित असतील तेव्हा सुंदर वृष्टी होते. परंतु पूर्ण रुक्ष आणि छिद्र असलेल्या वृक्षांमुळे अल्पवृष्टी होते. कडुनिंब जास्त येतो, तेव्हा पाऊस चांगला होतो.

जलसंवर्धनाचे कार्य म्हणजे जणू यज्ञकार्यच!

प्राचीन ग्रंथांमधील श्लोकांमध्येही वनसंवर्धनाचे महत्व ठासून सांगितलेले दिसते. ते पाहूया.

मूल ब्रह्म त्वचा विष्णु शाखे रुद्र महेशव: । पत्रे पत्रे तु देवस्नाम वृक्षराज नमस्तुभ्यं ।।

अर्थात ज्याच्या मुळाशी जगद्पिता ब्रह्माचा वास आहे, शरीरात विष्णु भगवान, खांद्यामध्ये शंकर भगवानांचा वास आहे आणि प्रत्येक पानात देवांचे अस्तित्व आहे अशा वृक्षाला मी नमस्कार करतो.

यादव भूमंडलमधते सशैलम काननम । तावत तिष्ठति मे दिन्याम संतति पुत्रे पौत्रकी: ।।

जोपर्यंत पृथ्वी वनांद्वारे आच्छादित राहील, तोपर्यंत मनुष्याच्या पोशाखांच्या सर्व गरजा पूर्ण होत राहतील.

अन्नात भवंति भुतानि पर्जन्यादन्न संभव । यज्ञाद भवति पर्जन्या यज्ञ: कर्म समुदभव ।।

अन्नामुळे प्राणीमात्रांचे पोषण होते. अन्न उत्पादनासाठी पाण्याची गरज आहे आणि जलप्राप्ती वनांमुळेच होते. त्यामुळे वनसंवर्धनाचे कार्य हे जणू यज्ञकार्यासारखे आहे, हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे.

■ वृक्षांधारित हेमचंद्राचे जलविज्ञान

प्राचीन काळी राजा सिद्धराजाच्या समयी असलेल्या ज्योतिषमहर्षी हेमचंद्राचार्यांनी जमिनीत पाणी (जलस्त्रोत) कोठे आहे याचा भूमीजल विद्या ह्या पुस्तकात स्पष्ट उल्लेख केलेला दिसतो. या पुस्तकातील जलविज्ञानावर आधारित श्लोक हे विज्ञानाच्या कसोटीवर सत्य ठरले आहेत. त्याकाळी गज, फूट, मीटर इ. परिमाणे अस्तित्वात नव्हती. त्यामुळे हेमचंद्राचार्यांनी हाथपूर, माणसपूर, आंगळ आणि बिल्लास सारख्या शब्दांचा प्रयोग केला आहे.

जमिनीमध्ये पृथ्वी जल मात्रा किती आहे त्यावरून त्या स्थानाच्या प्रकृतीचा अंदाज येतो. जमिनीमध्ये पाणी कोठे, कोणत्या स्थळी मिळेल, किती खोलीवर मिळेल तसेच पाण्यात कोणकोणती तत्त्वे असतील, ते दर्शविणारे भूजल विज्ञान आश्चर्यकारक आहे. कारण पाण्याचे प्राप्तीस्थान, खोली अथवा प्रकृतीविषयी माहिती आपण वृक्षांद्वारे कशी मिळवू शकतो, याचे वर्णन त्यांनी जलविज्ञानामध्ये केलेले आहे.

वृक्षाचे खोड, पाने, रंग वगैरेंनी पाणी कोणत्या कोणत्या स्थळी आणि किती खोलीवर आहे ते समजू शकते.

हेमचंद्राचार्य यांनी पाण्यासंबंधी केलेली संशोधने/भाकीते खालीलप्रमाणे –

- जेथे कोमल पण लांब फांद्या असलेले लहान पण हिरवेगार वृक्ष पहावयास मिळतील, अशा ठिकाणापासून आसपास पंचवीस हात खोलवर जमीन खोदल्यास पाणी लागते.
- ज्या जमिनीत रिंगणी, सायेडी आणि वज्रदंती यांसारख्या वनस्पती होत असतील तेथून दक्षिण दिशेस तीस हात खोल खोदल्यावर तेथे गोड अमृतासारखे पाणी मिळते.
- सापाच्या बीळाच्या आसपास ताड,नारळ किंवा खजुराची झाडे असल्यांस त्याच्या पश्चिम दिशेस, जमिनीत ३२ हात खोलवर खणल्यास २५ हातावर पाणी मिळते.
- ज्या जमिनीच्या आसपास कोणतीही नदी किंवा ओढा नसेल, परंतु जर तेथील जमिनीवर हिरवा चारा, वेल आणि हिरवळ असल्यास तिथं सोळा हात खोल खणल्यास पाणी मिळते.
- ज्या ठिकाणी गायी रोज चरावयास जातात आणि तरीही तेथे हिरव्या चाऱ्यात कोणतीही कमी येत नाही, अशा ठिकाणी भरपूर पाणी मिळते.
- ज्या ठिकाणी घर, वस्ती नसेल तरीही किडे–मुंग्यांचे वारुळ तेथे दिसत असेल, तर अकरा हात खोलवर पाणी मिळते.
- अरण्यातील भूमी असेल, जेथे हिंसक पशु रहात असतील, पक्ष्यांचे थवेच्या थवे झाडांवर असतील, जिथली जमीन खोदताना मातीचा कमळासारखा सुगंध येत असेल अशा ठिकाणी पंधरा हात खोलवर पाणी मिळते.
- ज्या ठिकाणची जमीन कोरडी पडून तिला भेगा पडल्या असतील, परंतु तेथील मातीचा स्वाद गोड असेल आणि जवळपास सापांचे बीळ असेल, अशा खडकाळ जमिनीत पाणी मिळते.
- जिथे ओली वाळू आणि चढ–उताराची जमीन दिसत असेल, तेथे सहा हात खोल खोदल्यास पाणी मिळते.
- जेथे कणेरीची लाल फुले असतील, ज्यांच्या पानांमधून दुधासारखा पदार्थ मिळत असेल

आणि तेथील जमीन जर लाल रंगाची असेल तर तेथे खोदकाम केल्यास दगड [illegible] तर ते दगड फोडल्यावर त्याखाली पाणी मिळेल.

- जर जमिनीवर पाय आपटल्यावर जमिनीमधून गंभीर आवाज येत असेल, तर त्या जमिनीमध्ये नऊ हात खोदल्यावर पाणी मिळते.
- ज्या वृक्षाला फलधारणा होत नसेल, तरीही कित्येक वेळा प्राथमिक अवस्थेत [illegible] दिसल्यास आणि त्या वृक्षाच्या पूर्वेस हिरवा चारा किंवा सापाचे बीळ दिसल्यास तेथे दक्षिणेस पाच हात दूरवर ४१ हात खोलीवर पाणी मिळते.
- ज्या जमिनीमधून अग्नीचे अस्तित्व नसतानाही धूर निघत असेल किंवा गरम वाफ येत असेल किंवा जमीन गरम लागत असेल तर अशा ठिकाणी २१ हात खोल खोदल्यावर पाणी मिळते.
- कोणत्याही झाडाची एक डहाळी जमिनीच्या बाजूला वाकून जमिनीला स्पर्श करीत असेल आणि ती डहाळी वाकून पिवळी पडली असल्यास त्या ठिकाणापासून ३० हात खोलवर खणल्यास पाणी मिळते.
- पिलू झाडाच्या ईशान्य कोनात साप किंवा उंदराचे मोठे बीळ असेल तर तेथे ४० हात खोल पाणी मिळते.
- ज्या जमिनीमधून अग्नी किंवा धूर निघत असेल किंवा गरम वाफ येत असेल आणि त्या ठिकाणाच्या आसपास वड, आंबा, कदंब आणि आसोपाला सारखे वृक्ष असतील तर त्या जमिनीत २५ हात खोलवर पाणी मिळते.
- ज्या ठिकाणी वृक्षांची पाने छिद्र पडलेली असतील आणि तरीही वृक्षाच्या खालील बाजूस हिरवे गवत उगवले असेल, तर त्या ठिकाणी १५ हात खोलवर पाणी मिळेल.
- ज्या ठिकाणी सर्व झाडे काटे असलेली किंवा बाभळीची असतील आणि अशा ठिकाणी एकच वृक्ष बिनकाट्याचा उगवलेला असेल तर त्या वृक्षाच्या पश्चिम दिशेला पंधरा हात खोलवर पाणी मिळेल.
- जेथे गाठ असलेले खोड आणि डहाळ्या असतील, तसेच तेथे शमीचे झाड असेल आणि त्याच्या उत्तर दिशेत जमीन टेकाडाप्रमाणे असेल, तसेच सापाचे बीळ दिसेल तेथे पाणी खूप खोलवर मिळते.
- बोरांच्या झाडांना लपेटून एखादा वृक्ष उगवला असेल तर तेथे २१ हात खोलवर पाणी मिळते.
- बोर किंवा केवडा वृक्ष एकमेकांमध्ये सामावून उगवले असतील आणि त्यांच्यामध्ये हिरवेपणा असेल, तर त्याच्या दक्षिण पश्चिम दिशेला १०० हात खोल अमृतझरा मिळेल.
- रोहिडा वृक्षाच्या पश्चिमेस सापाचे बीळ असेल अथवा पाण्याशिवाय हिरवे गवत किंवा रोप असतील अशा ठिकाणी २१ हात खोलवर गोड पाणी मिळते.
- केवड्याच्या झाडाच्या उत्तरेला साप किंवा किडेमकोडे यांचे वारुळ असेल, तर त्याच्या पाच हात दूर दक्षिणेस ७० हातावर पाणी मिळेल.
- निचल वृक्षाच्या पश्चिम दिशेस तीन हात दूर, स्थळ निश्चित करून त्या जागेत वीस हात खोल खणल्यावर गोड पाणी मिळते.

- जी जमीन खणल्यावर सुरूवातीला पांढरे बेडूक मिळतील, नंतर पिवळी माती निघेल, त्याठिकाणी दगड आणि खडकाळ जमिनीनंतर गोड पाणी मिळते.
- निर्जन प्रदेशात पळस किंवा उंबराची दोन झाडे जवळजवळ असतील आणि त्यांची एक दुसऱ्यांची खोडे एकत्रित असतील आणि त्याच्या पश्चिमेस खुदाई केल्यावर काळ्या पाषाणासारखी जमीन असेल तर तेथे २७ हात खोलवर खुदाई केल्यास अमृतासारखे पाणी मिळते.
- बेल आणि उंबराचे वृक्ष खोडांनी जोडलेले असतील तर त्याच्या दक्षिण दिशेला तीन हात खोदल्यास काळा बेडूक मिळेल, नंतर लाल पिवळी माती मिळेल आणि त्याखाली पंधरा हातावर पाणी मिळेल.
- कोणत्याही झाडाच्या मुळाशी जास्त बेडूक रहात असल्यास त्या वृक्षाच्या उत्तर दिशेला दहा हात दूर, तीस हात खोलवर खणल्यावर अमृतासारखे पाणी मिळेल.
- जेथे रेताड जमीन असून काळी चोच असलेले पुष्कळ पक्षी टोळी करून रहात असतील, तर तेथे बावीस हात खोलवर पाणी मिळते.
- नगोड वृक्षाच्या तीन हात दूर दक्षिणेला सापाचे बीळ दिसल्यास, तेथे पंचवीस हात खोलवर पाणी मिळेल.
- पुष्कळ कडक उन्हातही ज्या जमिनीमध्ये बाष्प (ओलसरपणा)रहात असेल तेथे पाणी आहे असे समजावे.
- जमीन फक्त रेताड दिसत असेल पण तरीही ती जमीन नसेल, तर अशा ठिकाणी पुष्कळ पाणी असते.
- महू वृक्षाच्या उत्तर दिशेला सापाचे बीळ असेल, तर त्या जमिनीत दहा हात दूरवर पंचवीस हात खणल्यावर खोल पाणी मिळते.
- जांभळाच्या झाडाच्या पूर्व दिशेला सापाचे वारुळ असेल तर त्याच्या दक्षिण बाजूला साडे अकरा हात दूरवर पाणी आहे असे समजावे.

प्रत्येक माणूस स्वत:च्या आयुष्यामध्ये ७ वृक्षांद्वारे उत्पादित झालेला प्राणवायू वापरतो. म्हणून प्रत्येक माणसाने कमीत कमी सात वृक्षांची तरी लागवड करावी.

ग्रह आणि ग्रहवृक्ष

वनस्पती, वृक्ष आणि त्यापासून तयार केलेली औषधे यांचा प्रभाव माणसाची चैतन्यशक्ती, मज्जारज्जू आणि स्नायूंचे संचलन यावर पडतो. गौतम बुद्धाला पिंपळ वृक्षाखाली पूर्वज्ञान प्राप्त झाले होते. पिंपळाच्या झाडाला स्पर्श केल्यावर आपल्या मनामध्ये पवित्र भावना जागृत होतात. शमीवृक्षाला स्पर्श केल्यावर उत्साह आणि सकारात्मक मानसिकता यामध्ये वाढ होते. आपला मेंदू संपूर्ण शरीरावर नियंत्रण ठेवतो. मेंदूजवळच सहस्त्राधार चक्र असते. ग्रहांचा सर्वाधिक प्रभाव माणसाच्या मेंदूवर होतो. प्राचीन ऋषिमुनींनी याचे ज्ञान संपादन केले होते. ग्रहांचा दुष्प्रभाव कमी करण्यासाठी त्यांनी वनस्पतींच्या सहाय्याने उपचार पद्धती विकसित केली होती.

१. हवनाद्वारे गंध चिकित्सा

२. वनस्पती स्पर्श चिकित्सा

३. औषधी स्नान

यज्ञ ही संकल्पना म्हणजे यज्ञकुंडातील हवनाद्वारे गंधचिकित्सा होती. त्याला विशिष्ट मंत्राद्वारे ध्वनीचिकित्सा आणि मंत्र चिकित्साद्वारे सहाय्य होत असे. अग्नीमध्ये विशिष्ट वृक्षांची लाकडे (समिधा) विशिष्ट प्रमाणात देशी गाईच्या तुपामध्ये विशिष्ट वेळी प्रज्वलीत केली असता औषधी सुगंधाची निर्मिती होत असे. त्याद्वारे गंध चिकित्सा होत असते. वातावरण शुद्धी, पर्यावरण संतुलन आणि श्वसनाद्वारे मानवी शरीरावर उपचार असे त्याचे स्वरूप असे. पाश्चात देशात सध्या लोकप्रिय असलेली ॲरोमा थेरपी यज्ञाद्वारे उपचारांसाठी वापरली जात होती. याचप्रमाणे वनस्पती स्पर्श चिकित्सा म्हणजे विशिष्ट वृक्षांची लाकडे किंवा मूळे शरीराभोवती सतत स्पर्श होईल अशा प्रकारे बांधून ठेवणे. यामुळे ग्रहांचा कुप्रभाव कमी होत असे. याचप्रमाणे आंघोळीच्या पाण्यामध्ये वृक्षांची मुळे, साले, फुले विशिष्ट प्रमाणात मिसळून त्याला उष्णता देऊन किंवा इतर प्रकिया करून औषधी स्नान करणे हीदेखील एक चिकित्सा पद्धती होती. त्यामुळेही ग्रहांचे वाईट परिणाम कमी होत असत.

ग्रहशांतीसाठी किंवा यज्ञामध्ये सध्या वापरल्या जाणाऱ्या वनस्पती या योग्य पद्धतीने निवडल्या जात नाहीत. त्यामुळे अपेक्षित फायदा होत नाही. याचा दोष मात्र वरील उपचारपद्धतींना दिला जातो.

ब्रह्मांडामध्ये असंख्य आकाशगंगा असून अनंत तारे आहेत. सूर्य हासुद्धा एक तारा असून त्याच्या सभोवती बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ, गुरू, शनी, युरेनस, नेपच्युन आणि प्लूटो हे ग्रह भ्रमण करीत असतात. युरेनस ह्या अरुण म्हणून, नेपच्युन हा वरुण म्हणून आणि प्लुटो हा यज्ञ म्हणून ओळखला जातो. चंद्र हा पृथ्वीचा उपग्रह असून तो पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालत असतो. ब्रह्मांडातील हे असंख्य तारे प्रकाशकिरण आणि उर्जा बाहेर फेकत असतात. ही किरणे पृथ्वीवर येत असतात. मात्र पृथ्वी आणि आपल्या सूर्याभोवतीच्या सौरमंडलामध्ये प्रवेश केल्यावर त्यांचा प्रभाव कमी जास्त होतो. याचे कारण सौरमंडलातील प्रत्येक ग्रहामध्ये गुरुत्वाकर्षण शक्ती आणि चुंबकीय शक्ती असते. त्यांच्या खेचाखेची आणि समन्वयामधून हे किरण पृथ्वीवर पोहोचत असतात. अर्थात चंद्र हा पृथ्वीच्या सर्वांत

जवळचा ग्रह असून पृथ्वीवरील सर्व सजीवांवर सर्वांत जास्त प्रभाव चंद्राचा असतो. समुद्राला येणारी भरती ओहोटी असो, की सजीवांचे भरणपोषण असो, त्यामध्ये सर्वांत जास्त प्रभाव चंद्राचाच असतो. चंद्र विशेषत: माणसाच्या मनावर नियंत्रण ठेवीत असतो. अभ्यासाअंती असे दिसून आले की आत्महत्या, अपघात, नैसर्गिक दुर्घटना, उन्माद इ. घटना पौर्णिमेच्या आसपास घडून येतात. पृथ्वीवर पोहोचणाऱ्या विविध प्रकाशकिरणांवर सौरमंडलातील सूर्यासकट इतर ग्रहांचा प्रभाव पडत असतो. म्हणून जोतिषशास्त्रामध्ये सौरमंडलातील ग्रहांना, सूर्याला आणि चंद्राला पृथ्वीचे गृह असे म्हणतात. गुरूत्वाकर्षणाचा किंवा चुंबकीय शक्तिचा प्रभाव त्या ग्रहाचा आकार, त्याचे वजन आणि पृथ्वीपासूनचे अंतर यावर अवलंबून असतो. युरेनस्, नेपच्यून आणि प्लुटो हे ग्रह फार दूर अंतरावर असल्याने ज्योतिषशास्त्रामध्ये त्यांना ग्रह मानले जात नाही. भारतीय ज्योतिषशास्त्र मान्यतेनुसार मुख्य ग्रह म्हणून सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरू, शुक्र आणि शनी यांना मानले जाते. राहू आणि केतू हे ग्रह नाहीत. ग्रहांवरून पृथ्वीवर येणारे किरण ज्यावेळी दोन ग्रह एका सरळ रेषेत आल्यावर येतात तेव्हा अधिक प्रभावशाली होतात. यालाच ग्रहांची युती असे म्हणतात. यामध्ये एका ग्रहाची सावली दुसऱ्या ग्रहावर किंवा पृथ्वीवर पडते. सूर्य आणि चंद्र पृथ्वीला सर्वाधिक प्रभावित करतात. जेव्हा सूर्य आणि पृथ्वी यांच्यामध्ये चंद्र येतो तेव्हा पृथ्वीवरून सूर्य दिसेनासा होतो. याला सूर्यग्रहण असे म्हणतात. या परिस्थितीला केतू असे म्हणतात आणि त्याला ग्रह मानले आहे. सूर्यग्रहणावेळी केतूने सूर्याला गिळले आहे, असे म्हणतात. याचप्रमाणे चंद्र आणि पृथ्वी यामध्ये सूर्य येतो तेव्हा चंद्रग्रहण असे म्हणतात. पृथ्वीवरून चंद्र दिसेनासा होतो. या परिस्थितीला राहू असे म्हणतात. चंद्रग्रहणावेळी राहूने चंद्राला गिळले असे म्हणतात. चंद्र ज्या विशिष्ट अवकाश क्षेत्रामध्ये पोहोचल्याने चंद्रग्रहण आणि सूर्यग्रहण होतात, त्या क्षेत्राला राहू आणि केतू असे म्हणतात. खगोलिय दृष्टीने पाहिले तर राहू आणि केतू ही अवकाश क्षेत्रे परस्पराहून १८० अंशाच्या कोनामध्ये वसली आहेत. भारतीय ज्योतिषशास्त्रानुसार जे नवग्रह मानले आहेत त्यांचा श्लोक खालीलप्रमाणे आहे.

सूर्याचन्द्रो मंगलश्च बुधश्चापि बृहस्पतिः । शुक्रः शनश्चरो राहुः केतुश्चेति नवग्रहा ।।

ग्रहांचा दुष्ट प्रभाव कमी होण्यासाठी कोणकोणत्या वृक्षांची समिधा द्यावी याचे वर्णन करणारा श्लोक खालील प्रमाणे आहे.

अर्कः पलाशः खादिरश्चापामार्गोऽथ पिप्पलः ।
औडाम्बरः शमी दूर्वा कुशश्च समिधः कमात् ।।

रूई, पळस, खैर, आघाडा, पिपळ, औदुंबर, शमी, दुर्वा आणि कुश या वृक्षांच्या समिधांनी नवग्रहांची शांती केली जाते.

ग्रह आणि ग्रहवृक्ष यांची माहिती आता आपण घेऊया.

सूर्य

सूर्याची अनेक नावे प्रचलित असून त्याला रवि, भानू, मित्र, भास्कर, सविता इ. अनेक नावांनी ओळखले जाते. याचे वैज्ञानिक नाव **SUN** हे आहे. ऋग्वेदामध्ये असे वर्णन केले आहे की संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी सूर्यदेव स्वत: जळून दैवी किरणे सर्व आसमंतामध्ये प्रक्षेपित करतात. त्याचमुळे जल म्हणजे पाणी प्रवाहीत होते आणि शुद्ध वायूचे वहन होते. सूर्य हीच मूळ देवता आहे.

ग्रह वाटिका

पूर्व


ईशान्य			अग्नि
	ईशान्य – आघाडा बुध – (हिरवा) दिशेचा राजा – ईशान्य	पूर्व – औदुंबर शुक्र (पांढरा) दिशेचा राजा – इंद्र	अग्नी– पळस चंद्र (श्वेत) दिशेचा राजा – अग्नी
उत्तर	उत्तर – पिंपळ गुरू – (पिवळा) दिशेचा राजा – कुबेर	सूर्य (सोनेरी) रुई	दक्षिण – खैर मंगळ (लाल) दिशेचा राजा – यम
	वायव्य – दर्भ केतू – (काळा) दिशेचा राजा – वायू	पश्चिम – शमी शनि (काळा) दिशेचा राजा – वरुण	नैऋत्य – दुर्वा राहू (काळा) दिशेचा राजा – निऋती
वायव्य			नैऋत्य

दक्षिण

पश्चिम

नऊ ग्रहांची ग्रह वाटिका बनविण्यासाठी वरील नकाशात दाखविल्याप्रमाणे नऊ चौकोनात प्रत्येक ग्रहाच्या दिशेप्रमाणे वृक्ष दाखविलेल्या दिशेच्या ठिकाणी लावावेत. वृक्षांमध्ये कमीत कमी ३ मीटर अंतर असावे. प्रत्येक वृक्षामध्ये ५ X ५ मीटरचे अंतर ठेवले तर १० X १० म्हणजेच १०० चौ.मीटरचा प्लॉट होतो.


नक्षत्र वाटिका



पूर्व
ईशान्य
अग्नि
उत्तर
दक्षिण
वायव्य
नैऋत्य
पश्चिम
५
४
२७
२६
२५
मृगशीर्ष
रोहिणी
कृत्तिका
रेवती
उत्तराभाद्रपदा
पूर्वाभाद्रपदा
आर्द्रा
६
३
२
अश्विनी
२३
२४
भरणी
शततारका
पुनर्वसु
धनिष्ठा
पुष्य
७
८
१
२२
२१
श्रवण
आश्लेषा
९
उत्तराषाढा
मघा
स्वाती
२०
१०
११
१५
१६
पूर्वाषाढा
पूर्वा फाल्गुनी
१९
मूळ
उत्तरा फाल्गुनी
चित्रा
विशाखा
हस्त
ज्येष्ठा
अनुराधा
१२
१३
१४
१७
१८

चोवीस तिर्थंकर भगवानाच्या अधिष्ठित देवांचे

कल्पवृक्ष यंत्र



हे कल्पवृक्ष यंत्र रविपुष्य, गुरूपुष्य, रविअस्त किंवा रविमूळ या शुभदिवशी सोने, चांदीच्या पत्रामध्ये अष्टगंध आणि वासक्षेपणे पूजा करून वासक्षेप स्वत:च्या मस्तकावर टाकावे यामुळे मनुष्याला प्रत्येक ठिकाणी मानसन्मान सत्कार प्राप्त होतो. व्यापार, रोजगार यामध्ये आर्थिक प्राप्ती होते. कधीही दु:खी होत नाही. या मंत्राच्या एकेक शब्दामध्ये चोवीस तिर्थंकर देवांचे वास्तव्य आहे. हे अद्भूत आणि सत्य आहे.

तिलाच विष्णूचे रूप असेही मानले गेले आहे. सूर्याचा आकार ॐ सारखा असून त्यातूनच विश्वाची उत्पत्ती झाली आहे. सूर्याला ओंकार परब्रह्म असेही म्हटले जाते. सूर्य शब्दाचा अर्थ सर्वप्रेरक असा आहे. त्याचा प्रकाश सर्वांना प्रेरणा देणारा आणि सर्वांची निर्मिती करणारा असल्याने तो कल्याणकारक आहे, असे वर्णन मार्कंड पुराणामध्ये आहे. यजुर्वेदामध्ये चक्षो सूर्यो जायत: म्हणजे सूर्य हा भगवंताचा डोळा आहे असे म्हटले आहे. सूर्याचे एक स्वतंत्र उपनिषद असून त्याला सूर्योपनिषद असे म्हटले जाते. *प्रसिद्ध अशा गायत्री मंत्राची रचना आणि वर्णन सूर्याच्या महानतेचे आणि कार्याची महती गाणारे आहे. सूर्य सिंह राशीचा स्वामी असून* कृतिका, उत्तराषाढा आणि उत्तरा फाल्गुनी या नक्षत्रांचा स्वामी आहे. सूर्याचा पौराणिक मंत्र खालीलप्रमाणे आहे.

जपाकुसुमसंकाशं काश्यपेयं महद्दुतिम् ।
तमोरिं सर्वपापघ्नं प्रणतोऽस्मि दिवाकरम् ।।

सूर्य ग्रहाचा वृक्ष रूई हा आहे. पांढरी रूई अथवा मंदार श्री गणेशाला प्रिय आहे. तसेच रूई मारुतीला प्रिय आहे. रूई या श्रवण नक्षत्राच्या आराध्यवृक्षाचं संस्कृत नाव आहे अर्क. अर्थात सूर्याचं शास्त्रीय परिभाषेत त्याला **Calotronis gigantean** किंवा झीलशीर अशी नावं आहेत. अर्क ही वनस्पती सूर्यासारखीच जीवनोपयोगी व रोगहरण करणारी असते. रूईच्या मुळांनी पोटातील सर्व तक्रारी दमा, खोकला, गंडभाळा, कुष्ठ (त्वचारोग) बऱ्या होतात. सांधेदुखी, सूज ह्यांसारख्या विकारांवर रुईची पाने गरम करून बांधतात. त्वचारोगातील खरजेवर रूईच्या चिकाइतकं जालीम औषध दुसरं नाही. स्कंधपुराणामध्ये रूईची उत्पत्ती सूर्यापासून झाली आहे असे म्हटले आहे. रुईच्या मुळांमध्ये शंकराचा निवास असतो. पत्रिकेमध्ये वैधव्य योग असल्यास त्या स्त्रीचा प्रथम विवाह रूईबरोबर केला जातो, असे ज्योतिषशास्त्रात सांगितले आहे. सूर्यग्रहाच्या शांतीसाठी रूईच्या समिधा वापरतात.

चंद्र

याचे वैज्ञानिक नाव **MOON** हे आहे. चंद्राचा जन्म अत्रि ऋषी आणि अनुसया माता यांच्या पोटी झाला अशी पौराणिक मान्यता आहे. ती कथा अशी आहे. अनुसयेच्या पतिव्रत्याच्या प्रभावाने सर्व चराचर सृष्टी व्यापून गेली होती. नारदमुनी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्या पत्नी सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती यांना अनुसयेच्या सामर्थ्याचे वर्णन रंगवून सांगतात. त्यामुळे त्यांचा अहंकार दुखावला जातो आणि त्यांना अनुसयेचा मत्सर वाटू लागतो. म्हणून त्या तिघी आपल्या पतीदेवांना गळ घालतात की तुम्ही काही झाले तरी अनुसयेचे सत्वहरण करा. स्त्रीहट्टापुढे शरण जाऊन ब्रह्मा, विष्णू, महेश अतिथी रूपाने अत्रि ऋषिंच्या आश्रमामध्ये येतात. अत्रि ऋषी आश्रमामध्ये नाहीत अशी वेळ साधून ते अनुसयेकडे इच्छाभोजनाची मागणी करतात. या इच्छाभोजनाची प्रमुख अट म्हणजे अनुसयेने कोणतेही वस्त्र न घालता भोजन वाढावे ही मागणी असते. अतिथी देवो भव यामुळे अतिथींची इच्छा न पुरवावी तर संकट आणि इच्छा पुरवावी तर पतिव्रत्याच्या तपश्चर्येचा लोप अशा दुहेरी संकटात अनुसया सापडते. अशावेळी ती अत्रि ऋषिंचे स्मरण करते आणि अतिथींचे पाद्यपूजन करताना त्यांच्यावर जल शिंपडते. त्याक्षणी अतिथींचे रुपांतर सहा महिन्यांच्या बाळांमध्ये होते आणि ती तेथेच खेळू लागतात. अनुसयेला तेव्हा पान्हा फुटतो आणि ती त्या बालकांना दुग्धपान घडविते. त्याचवेळी

अत्रि ऋषी आश्रमामध्ये परत येतात. त्यांना सर्व घटना अनुसया कथन करते. अत्रि ऋषी अंर्तज्ञानाने सर्व समजून चुकतात आणि प्रत्यक्ष ब्रह्मा, विष्णू, महेश पुत्ररूपाने आपल्या घरी अवतरले याचा त्यांना मनस्वी आनंद होतो. इकडे सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती आपल्या पतीराजांना शोधत अत्रि ऋषिंच्या आश्रमामध्ये पोहचतात तर त्यांना आपले पती कुठेही सापडत नाहीत. पाळण्यात असलेल्या बाळांकडे पाहून कुठला विष्णू, कुठला शंकर आणि कुठला ब्रह्मा ते त्यांना ओळखता येत नाही. शेवटी त्या महापतिव्रता अनुसयेला शरण जातात आणि आपले पती परत मिळावेत अशी याचना करतात. तेव्हा अत्रि आणि अनुसयेच्या अनुमतीने तिघेही देव मूळ स्वरूपामध्ये येतात आणि आपला अंश प्रत्येक बाळामध्ये ठेवतात. यातील ब्रह्माचा अंश म्हणजे चंद्र, विष्णूचा अंश म्हणजे दत्त आणि शंकराचा अंश म्हणजे दुर्वास अशी कथा आहे. चंद्र सोळा कलांनी पूर्ण होता. भगवान श्रीकृष्णाने चंद्रवंशामध्ये जन्म घेतला होता. म्हणून तोही सोळा कलांनी युक्त होता.

हरिवंश पुराणामध्ये चंद्राचा विवाह २७ कन्यांबरोबर झाला होता असे वर्णन आहे. त्या कन्या म्हणजेच २७ नक्षत्रे आहेत. चंद्र हा पृथ्वीच्या सर्वांत जवळचा ग्रह असून त्याचा परिणाम सर्व सजीव सृष्टीवर होत असतो. माणसाच्या भावभावना आणि मनाचे नियंत्रण चंद्र करतो. चंद्र हा परप्रकाशी म्हणजे सूर्याकडून प्रकाशित होतो. चंद्र हा कर्क या राषीचा स्वामी असून रोहिणी, श्रवण आणि हस्त या नक्षत्रांचा स्वामी आहे. चंद्राचा पौराणिक मंत्र खालीलप्रमाणे आहे.

दधिशंखतुषाराभं क्षीरोदार्णवसंभवम् ।
नमामि शशिनं सोमं शम्भोर्मुकुटभूषणम् ।।

चंद्र या ग्रहाचा ग्रहवृक्ष पळस हा आहे. पळस या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. पळस म्हणजे पवित्र वृक्ष. पळसाच्या पानावर भोजन करणे अतिशय पवित्र मानले जाते. पळसाच्या बिया शरीरातील कृमी आणि किटाणू यांचा नाश करतात. तसेच ते वीर्यवर्धक असते. पळसाच्या वृक्षावर लाखेच्या किड्यांचे पालन केले जाते. उन्हाळ्यामध्ये संपूर्ण जंगलाची शोभा वाढवणारा पळस हा ऐश्वर्य प्रदान करणारा अतिशय संदर असा वृक्ष आहे. रसरसत्या लालभडक ज्वाळांसारख्या असणाऱ्या फुलांचा वृक्ष म्हणजे पळस हा वृक्ष आहे. पळसाच्या पानाचा उपयोग सूज, गळू इ. वर बांधण्यासाठी होतो. तसेच ह्याच्या पत्रावळीदेखील तयार करतात. पळसाचे बी कृमी व कफनाशक असतं. पळसाला संस्कृतात प्लक्ष तर वैज्ञानिक भाषेत **'Beautea Monosperma'** म्हणतात. फुलांचा औषधी उपयोग म्हणजे ती ज्वरनाशक, दाहनाशक तसेच कफ-पित्त शामक आहेत. पलाशक्षार, ब्रह्ममूलार्क इ. औषधांमध्ये पळसाचा उपयोग होतो. उपनयन संस्कारात पळस वृक्षाचा दंड बटूच्या हातात देतात.कारण हा वृक्ष ब्रह्मतेजाचे प्रतिक आहे. पळसाच्या समिधा चंद्र ग्रहाच्या शांतीसाठी समिधा म्हणून वापरल्या जातात.

मंगळ

भगवान विष्णूने वराह अवतार घेऊन पृथ्वीचे रक्षण केले होते. तेव्हा पृथ्वीने त्यांना आपला पती मानले. त्यांचा पुत्र म्हणजे मंगळ अशी पौराणिक कथा आहे. याचे वैज्ञानिक नाव **M-RS** हे आहे. पत्रिकेतील मंगळ हा सर्वांच्या चिंतेचा विषय असतो. खरंतर हा मंगळ भूमीपुत्र आहे. तो सर्वांचे कल्याण करणारा आहे. सौरमालेमध्ये पृथ्वीनंतर मंगळाचे स्थान आहे. मंगळाचा रंग लाल आहे. मंगळ हा मेष आणि वृश्चिक या राशींचा स्वामी आहे. मंगळाचा पौराणिक मंत्र खालीलप्रमाणे आहे.

धरणीगर्भसंभूतं विद्युत्कांतिसमप्रभम् ।
कुमारं शक्तिहस्तं च मंगलं प्रणमाम्यहम् ।।

मंगळ ग्रहाचा ग्रहवृक्ष खैर हा आहे. खैरापासूनच कत्या अथवा कात तयार केला जातो. कात हा कफघ्न, मुखशुद्धिकारक व रूची वाढविणारा आहे. खैर हा रक्तवर्धक व रक्तस्थापकदेखील आहे. खैर अथवा खदिर वृक्ष बाभळीच्या वृक्षासारखा दिसतो. याचे वैज्ञानिक नाव **Alacia Catechu** असे आहे. खैराच्या खोडापासून कात तयार करतात. तसेच त्यापासून तेलही काढता येतं. या तेलाला इरिमेदादि तेल असे म्हणतात. त्याच बरोबर पित्तामुळे तोंडात आलेल्या व्रणांवरदेखील हे तेल उपयोगी आहे.

खैराची उत्पत्ती साक्षात् प्रजापतीपासून झाली असे मानले जाते. म्हणून ते इतकं महत्त्वपूर्ण असं झाड मानलं गेलं आहे. पाने शमीच्या झाडासारखी, लाकूड टिकाऊ व मजबूत असते. याच्या पांढऱ्या सालीपासून उकडून कात तयार करतात. खैराचं झाड तसे भारतभर सापडते. पण उत्तर भारतात या झाडापासून मिळणाऱ्या काताचं अधिक प्रस्थ आहे. खैराच्या झाडाच्या मूळ, साली, पान, फूल, फळ, डिंक इ. सर्वांचाच उपयोग विविध रोगांवर (विशेषत: कुष्ठरोगांवर) केला जातो.

शतप्रथ ब्राह्मण या ग्रंथातील वर्णनानुसार खैर हा वृक्ष प्रजापतीच्या हाडापासून बनला आहे. तैतरिय संहितेमध्ये खैराच्या उत्पत्तीबद्दल असे वर्णन आहे की, एकदा एकाने गायत्रीचे डोके कापून टाकले. त्यामुळे तिचे रक्त जमिनीवर सांडले आणि जमिनीमध्ये झिरपून गेले. त्यापासून खैर वृक्षाची निर्मिती झाली आहे. मंगळग्रहाची शांती करताना खैर वृक्षाच्या समिधा वापरल्या जातात.

बुध

बुध हा सौरमंडलातील पहिला ग्रह असून तो सूर्याच्या सर्वाधिक जवळ आहे. याचे वैज्ञानिक नाव **MERCURY** हे आहे. बुध हा चंद्र आणि तारा यांचा पुत्र आहे. ब्रह्मदेवाने बुधाला सर्वाधिक योग्य मानून त्याला पृथ्वीचा प्रमुख बनविले आहे, असे सांगितले जाते. बुध हा मिथुन आणि कन्या राशींचा स्वामी आहे. तसेच आश्लेषा, ज्येष्ठा आणि रेवती या नक्षत्रांचा स्वामी आहे. बुधाचा पौराणिक मंत्र खालीलप्रमाणे आहे.

प्रियंगुकलिकाश्यामं रुपेणाप्रतिमं बुधम् ।
सौम्यं सौम्यगुणोपेतं बुध प्रणमाम्यहम् ।।

बुध या ग्रहाचा ग्रहवृक्ष आघाडा ही वनस्पती आहे. श्रावणात आघाड्याला विशेष महत्त्व आहे. जिवतीपूजन, मंगळागौरी, बुध–बृहस्पती, ज्येष्ठागौरी, हरतालिका तसेच गणपतीपूजनात आघाड्याचे विशेष महत्त्व आहे. ही वर्षायू औषधी ॲषमॅरँटेसी कुलातील असून तिचे वैज्ञानिक नाव **Achyranthes aspera** आहे. आघाड्याला अपांग, चिचरा, लटजिरा, उत्तरेणी, कंटरिका, खारमंजिरी, मरकटी, वासिरा, काटेरी फुलोरा अशी वेगवेगळ्या भाषांमध्ये नावे आहेत. ही वनस्पती सर्वत्र (समुद्रसपाटीपासून सुमारे १,००० मी. उंचीपर्यंत) मोकळ्या पडीक जागी किंवा कचऱ्याच्या ढिगाच्या आसपास तणाप्रमाणे वाढते.

आयुर्वेदामध्ये आणि अथर्ववेदात आघाडयाला 'अपामार्ग ' म्हणून ओळखतात. आघाड्यापासून क्षार तयार करतात. त्याला 'अपामार्ग क्षार' असे म्हणतात. याचा उपयोग मुतखड्यावर होतो. पूर्वी दात घासण्यासाठी आघाडयाच्या काडीचा उपयोग करीत. त्वचारोगावर आघाडयाच्या काढ्याचा

उपयोग करतात. हा खोकल्यावर गुणकारी आहे. याचे चाटण मधाबरोबर घेतात. या वनस्पतीची राख खोकला व दम्यावर उपयुक्त असते. आघाड्याच्या मुळांचा भिजवून काढलेला रस सौम्य स्तंभक (आकुंचन करणारा) असतो. पानांच्या भुकटीचा काढा मधाबरोबर अतिसारात व आमांशात उपयुक्त ठरतो. बिया वांतीकारक असतात. वनस्पतीचा रस तिखट, रेचक व मूत्रवर्धक असून मूळव्याध, गळवे, चर्मरोग, शूल इ. व्याधींवर देतात.

बुध ग्रहाची शांती करताना आघाड्याच्या मुळी आणि समिधा वापरतात.

गुरू

सौरमालेतील सर्वांत मोठा ग्रह गुरू हा आहे. याचे वैज्ञानिक नाव **JUPITER** हे आहे. गुरू म्हणजे बृहस्पती, यांना देवांचे गुरू मानले जाते. ज्ञान, विद्वता आणि हुषारी यांचे मूर्तिमंत रूप म्हणजे गुरू आहे. ज्याचा गुरू ग्रह उत्तम स्थितीमध्ये आहे, त्यांना संपत्ती आणि बुद्धी म्हणजे ज्ञान मोठ्या प्रमाणावर प्राप्त होते. ती ज्ञानवान आणि धनवान बनतात. गुरू हा सात्विक प्रवृत्तीचा ग्रह असून देवगुणी आहे. सद्‌गुण, ज्ञान आणि दैवी संपदेने मुक्त असा गुरू हा ग्रह आहे. तो देखणा असून औदार्य आणि ऐश्वर्य यांचे मूर्तिमंत रूप म्हणजे गुरू आहे. गुरू ग्रह धनु आणि मीन राशीचा स्वामी आहे. तसेच तो पुनर्वसू, विशाखा आणि पूर्वाभाद्रपदा या नक्षत्रांचा स्वामी आहे. गुरू ग्रहाचा पौराणिक मंत्र खालीलप्रमाणे आहे.

देवा नां च ऋषी नां च गुरूं कांचनसंन्निभम् ।
बुद्धिभूतं त्रिलोकेशं तं नमामि बृहस्पतिम् ।।

गुरू या ग्रहाचा ग्रहवृक्ष पिंपळ हा आहे. पिंपळ याचा अर्थ जल म्हणजे पाणी आहे. पिंपळ हा अतिशय पवित्र वृक्ष असून सर्व वृक्षांचा नायक असे पिंपळाला मानले जाते. वैधव्ययोग असल्यास ज्योतिषशास्त्राप्रमाणे कन्येचा प्रथम विवाह पिंपळवृक्षाबरोबर करण्याची प्रथा आहे. ज्ञानाशी या वृक्षाचा खूप निकटचा संबंध आहे. गौतमाला महात्मा बुद्ध बनवणारा, आत्मज्ञान मिळवून देणारा हा वृक्ष आहे. पिंपळाचे वैज्ञानिक नाव **Ficus religiosal** असे आहे. सर्वात जास्त कार्बन डाय-ऑक्साइड शोषून घेण्याच्या या वृक्षाच्या गुणधर्मामुळेच तपस्येसाठी, आत्मचिंतनासाठी पूर्वापार आपले ऋषि-मुनी या झाडाखाली बसत असावेत. पवित्र अशा पिंपळ वृक्षाचे अनेक औषधी उपयोग आहेत. वाणी शुद्ध होण्यासाठी पिंपळाची सुकलेली फळे उपयोगी ठरतात. पिंपळाची फळे हृदयाला बल देणारी आहेत. कफ-पित्तनाशक असलेल्या या वृक्षाचा उपयोग विषमज्वर, कृमी, कुष्ठ, दाह, क्षय इ. विकारांमध्ये केला जातो. उदर वंदना व पोटाचे अन्य विकार यांवर पिंपळफळे उपयोगी आहेत. गूळ, दुधासोबत पानांचं चूर्ण करून घेतल्यास मलावरोधात उपयोगी ठरते. हा वृक्ष दीर्घ मुदतीचा कफ व श्वासाच्या विकारांवर देखील उपयोगी आहे. गुरू ग्रहाच्या शांतीसाठी पिंपळवृक्षाच्या समिधा वापरतात.

शुक्र

सूर्यमंडळातील दुसरा ग्रह हा शुक्र असून तो अतिशय तेजस्वी आहे. याचे वैज्ञानिक नाव **VENUS** हे आहे. शुक्राचार्य हे दैत्यांचे गुरू होते. ते मोठे तपस्वी होते. त्यांनी फार मोठी तपश्चर्या

करून संजीवनी विद्या प्राप्त केली होती. त्यामुळे मृत दैत्यांना ते जिवंत करीत असत. देव आणि दानव युद्धामध्ये संजीवनी विद्येचा वापर करून त्यांनी दैत्यांना विजय मिळवून दिला होता. त्यांना अत्यंत प्रिय अशी एकच कन्या होती. तिचे नाव देवयानी. देवांनी कचाच्या आणि संजीवनी विद्या निष्प्रभ केली आणि त्यामुळे शुक्राचार्यांचे सामर्थ्य संपले. देवयानीच्या माध्यमातून शुक्राचार्यांचे सर्व शिष्य कुशल प्रशासक आणि वैभव संपन्न होते. शुक्र हा एक शुभ ग्रह आहे. तो जर जन्मकुंडलीमध्ये ८ व्या किंवा १२ व्या स्थानी असला तर ती व्यक्ती अतिशय ऐश्वर्यशाली आणि धनसंपन्न बनते. शुक्र वृषभ आणि तूळ या राशींचा स्वामी आहे. तसेच भरणी, पूर्वाषाढा आणि पूर्वाफाल्गुनी या नक्षत्रांचा स्वामी आहे. शुक्राचा पौराणिक मंत्र खालीलप्रमाणे आहे :

हिमकुंदमृणालाभं दैत्यानां परमं गुरूम् ।
सर्वशास्त्रप्रवक्तारं भार्गवं प्रणमाम्यहम् ।।

शुक्र या ग्रहाचा ग्रहवृक्ष औदुंबर हा आहे. औदुंबराचे वैज्ञानिक नाव **Ficus racemose** असे आहे. औदुंबराची प्रकृती थंड (शीतवीर्य) आहे. शरीराचा दाह कमी करण्यासाठी उंबराचा वापर करतात. हिरण्यकश्यपूच्या वधामुळे नरसिंहाच्या बोटांचा होणारा दाह औदुंबराच्या फळांनी शमविला. उष्णतेच्या विकारांवर उंबराचे फळ खडीसाखर घालून खातात किंवा याच्या फळांचा रस डोक्याला चोळतात. काही जण ह्या फळात साखर, वेलची, मिरपूड इ. घालून तुपात तळून रोज सकाळी खातात.

शुक्र ग्रहाच्या ग्रहशांतीसाठी औदुंबर वृक्षाच्या समिधा वापरतात.

शनि

शनि हा सौरमंडलातील गुरू नंतरचा म्हणजे सहावा ग्रह आहे. याचे वैज्ञानिक नाव **S-TURN** हे आहे.शनि ग्रहाबद्दल अनेक दंतकथा प्रसिद्ध असून शनिची साडेसाती भल्याभल्यांची झोप उडवते. शनी हा सूर्यपूत्र आहे. सूर्य आणि त्याची पत्नी छाया यापासून शनीदेवाची निर्मिती झाली आहे. सर्व ग्रहांमध्ये अतिशय बलवान असा शनी हा ग्रह आहे. या ग्रहाभोवती बाहेरच्या बाजूने एक कडे आहे.

शनीची चाल तिरकी आहे असे म्हणतात. तसेच तो सहसा दृष्टीस येत नाही. कारण तो नेहमी नजर बाजूला ठेवून चालत असतो असे म्हणतात. यामागची एक कथा अशी आहे की एकदा शनिदेव तपश्चर्येमध्ये मग्न होते. तेव्हा त्यांची पत्नी त्यांच्याकडे आली. शनीदेवांची तपश्चर्या भंग होईना आणि ती शेवटी कंटाळून गेली. तीने शनीदेवांना शाप दिला की तुम्ही ज्याच्याकडे पहाल त्याचा नाश होईल. शनी हा एक सामर्थ्यशाली ग्रह असून त्याचे आकाशातील दर्शन अतिशय विहंगम असे आहे. शनीचा पौराणिक मंत्र खालीलप्रमाणे

नीलांजनसमाभासं रविपूत्रं यमाग्रजम् ।
छायामार्तंडसंभूतं तं नमामि शनैश्चरम् ।।

शनी ग्रहाचा ग्रहवृक्ष शमी हा आहे. शमी हा संपूर्ण भारतात पूजन केला जाणारा अनोखा वृक्ष आहे. दसऱ्याला शमीची पाने वाटतात. याचे वैज्ञानिक नाव **Prosapis Specigera** हे आहे. शमी म्हणजेच शमन करणारी, अर्थात, दुष्ट कृत्यांचा नाश करणारा आणि तो का करावा याची प्रेरणा शमी वृक्ष देतो. शमी शमयते पापम् म्हणजेच पापांचा अमंगलाचा नाश करणारी म्हणूनही ती पूज्य आहे.

या वृक्षाची साल, पाने, फळे औषधी उपयोगाची असतात. जुनाट उष्णतेच्या अर्थात कडकीच्या रोगावर उपयोगी ठरणारी असतात. शमीचा वृक्ष मध्यम उंचीचा, हिरवागार व काटेरी असतो. बाभूळ, खैर यांच्याप्रमाणेच शमीची पानं बारीक व नाजूक असतात. शनीग्रहाच्या ग्रहशांतीसाठी शमी वृक्षाच्या समिधा वापरतात.

राहू

राहू हा सूर्यमालेतील वेगळा ग्रह नसून चंद्रग्रहणाच्या स्थितीला राहू असे म्हणतात. याचे वैज्ञानिक नाव **DR-GON'S HE-D** हे आहे.आकाशामध्ये भ्रमण करताना जेव्हा पृथ्वी आणि चंद्र यांच्यामध्ये सूर्य येतो आणि पृथ्वीवरून चंद्र दिसेनासा होतो, तेव्हा चंद्रग्रहण होते याच स्थितीला राहू असे ज्योतिषशास्त्राने मानले आहे. समुद्रमंथनामधून मिळालेले अमृताचे जेव्हा विष्णू देवतांमध्ये वाटप करीत होता तेव्हा राहू आणि केतू देवतांचे रूप घेऊन तेथे बसले होते. त्यांनी अमृताचे प्राशन केले. हे लक्षात आल्यावर विष्णूने राहूचे मस्तक धडावेगळे केले. राहू ग्रह कन्या राशीच्या अधीन असून मिथुन राशीबरोबरही संबंधित आहे. त्याचप्रमाणे आर्द्रा, स्वाती आणि शततारका या नक्षत्रांचा स्वामी राहू हा आहे. राहूचा पौराणिक मंत्र खालीलप्रमाणे

अर्धकायं महावीर्यं चंद्रादित्यविमर्दनम् ।
सिंहिकागर्भसंभूतं तं राहुं प्रणमाम्यहम् ।।

राहू ग्रहाचा ग्रहवृक्ष दुर्वा ही वनस्पती आहे. दुर्वाचे वैज्ञानिक नाव **Cynodn Dactylon** हे आहे. तिला हरितकी, अनंत, सहस्त्रवीर्या या नावांनीही ओळखले जाते. दुर्वा स्वत:हून जमिनीमध्ये उगवतात. विशेषत: पावसाळ्यानंतर त्या सर्वत्र दिसून येतात. दुर्वा थंड प्रवृत्तीच्या असून विभिन्न आजारांवर त्याचा औषध म्हणून उपयोग होतो. रक्त विकार आणि त्वचा विकारांवरही दुर्वा फार उपयुक्त आहेत. पौराणिक कथांनुसार वासुकी नागच्या पाठीवर दुर्वाची उत्पत्ती झाली आहे. भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील अष्टमी ही दुर्वाष्टमी म्हणून साजरी केली जाते. सर्व प्रकारच्या धार्मिक उपक्रमांमध्ये पवित्र म्हणून दुर्वांचा वापर केला जातो. दुर्वा वातावरणाची शुद्धी करतात. दुर्वांच्या मुळांमध्ये ब्रह्मदेव, शरीरामध्ये विष्णुदेव आणि पानांमध्ये शंकराचा निवास असतो अशी श्रद्धा आहे. राहू ग्रहाच्या शांतीसाठी समिधा म्हणून दुर्वांचा वापर केला जातो.

केतू

केतू हा राहूप्रमाणेच ज्योतिषशास्त्रात ग्रह मानला गेला आहे. याचे वैज्ञानिक नाव **DR-GON'S T-IL** हे आहे. जेव्हा सूर्यग्रहण होते, म्हणजे पृथ्वी आणि सूर्य यांच्यामध्ये चंद्र येतो आणि पृथ्वीवरून सूर्य दिसेनासा होतो तेव्हाच्या अवकाशातील स्थितीला केतू असे म्हणतात. केतू हा स्वतंत्र ग्रह नाही. केतू हा अश्विनी, मघा आणी मूळ नक्षत्रांचा स्वामी आहे. केतूचा पौराणिक मंत्र खालीलप्रमाणे आहे.

पलाशपुष्पसंकाशं तारकाग्रहमस्तकम् ।
रौद्रं रौद्रात्मकं घोरं तं केतुं प्रणमाम्यहम् ।।

केतू ग्रहाचा ग्रहवृक्ष कुश म्हणजे दर्भ ही वनस्पती आहे. तिचे वैज्ञानिक नाव Desnio-stachya Bipinnatra हे आहे. कुश वनस्पती सर्व पापांचा नाश करते असे मानले जाते. म्हणून तिला पवित्र आणि याज्ञिक या नावांनीही ओळखले जाते. कुश वनस्पतीला दर्भ असेही म्हणतात. रेताड आणि कमी पाण्याच्या ठिकाणी कुश ही वनस्पती आपोआप उगवते. जमिनीची धूप थांबवण्याचे महत्त्वाचे कार्य कुश ही वनस्पती करते. कुश त्रिदोषनाशक असून विविध रोगांवर तिचा उपयोग केला जातो. धार्मिक विधींमध्ये देवतांच्या प्रतिष्ठापना करण्यापूर्वी त्यांना कुश वनस्पतीच्या पाण्याने स्नान घालतात. कुशाच्या मुळामध्ये ब्रह्मदेव, मध्यभागी विष्णू आणि वरच्या भागामध्ये शंकर वास करून राहतात अशी श्रद्धा आहे. कुश वनस्पतीच्या सान्निध्यात वातावरण आणि व्यक्ती नेहमी शुद्ध राहते. रामायणामध्ये वनवासामध्ये प्रभू रामचंद्रांनी कुश या वनस्पतीची शैय्या बनवली होती. कुश वनस्पतीला जलरूपही मानले आहे. केतू ग्रहाच्या शांतीसाठी कुश वनस्पतीचा समिधा म्हणून वापर करतात.

ग्रह आणि रत्ने

राशी आणि नक्षत्रांप्रमाणेच सूर्य,चंद्र आणि ग्रहमंडळाचा प्रभाव मनुष्यजीवनावर होतो अशी अनेक उदाहरणे ज्योतिषशास्त्रात आहेत. आपल्यावर अनुकूल प्रभाव वाढावा आणि अनिष्ट प्रभाव कमी व्हावा यासाठी विविध उपाय सुचविले जातात. त्यासाठी रत्नांचा वापर करावा किंवा ती शरीरावर घालावीत असा उल्लेख आहे. परंतु माणिक, मोती, हिरे, नीलम खरेदी करणे सगळ्यांना परवडणारे नाही. मग काय करावे? अनादी काळापासून याचा विचार झालेला आहे. वृक्षांचे भौतिक आणि अध्यात्मिक महत्त्व पूर्वजांनी जाणले होते. नक्षत्रवृक्ष रत्नांप्रमाणेच अमूल्य आहेत. रत्नांची उणीव ते भरून काढतात, असे दृढ मत आहे.

ग्रह प्रभावाच्या संदर्भात विशिष्ट वृक्षांची मुळे शरीरावर धारण करावीत असा निर्देश आहे. वनवासी, देवीपूजक सारख्या प्रकृतीच्या सान्निध्यात राहणाऱ्या लोकांच्या हातात, गळयात, कमरेला किंवा शरीरावर वृक्षांची मुळे अथवा खोडाचा भाग बऱ्याच वेळा बांधलेला पाहावयास मिळतो. ह्या प्रथेचा उगम ज्योतिषशास्त्रातील संकेतांमधूनच झालेला आहे. नक्षत्र आणि संबंधित ग्रह ह्यांचा संयुक्त प्रभाव पडतो असे मानण्यात येते. आयुर्वेदिक गुणधर्मामुळे विशिष्ट वनस्पती वापरणाऱ्या व्यक्तिंना त्याचा चांगला परिणाम मिळण्याची शक्यता आहे. पाण्यात वनस्पतींचे औषधीयुक्त गुणधर्म मिळविल्याने आणि ते पाणी स्नानासाठी वापरल्याने फायदे होतात. हवनामध्ये विशिष्ट वनस्पतींच्या ज्वालांमधून उज्वलन होणारा सुगंध श्वासोच्छवासाद्वारे शरीरात जाण्याने विविध विकारांचा नाश होण्यास उपयोगी होतो. वनस्पतींची मुळे शरीराला बांधण्यानेही असेच परिणाम होतात.

रत्नांच्या बदल्यांत वेगवेगळ्या हेतूसाठी वापरावयाच्या रोजच्या वनस्पतींची माहिती खाली दिलेली आहे.

ग्रहांच्या शांतीसाठी

खाली दिलेल्या ग्रहशांतीसाठी ज्या प्रकारे आपण रत्ने, खडे अंगावर परिधान करतो त्याप्रमाणे विधिवत वृक्षांची मुळे शरीरावर परिधान करावी अथवा बांधावी त्यामुळे फायदा होतो असे शास्त्रात म्हटले आहे. अडणाऱ्या किंवा नडणाऱ्या ग्रहांप्रमाणे वनस्पतींची मुळे दर्शविलेल्या रंगाच्या दोऱ्याबरोबर किंवा अन्य रितीने बांधून किंवा जाणकार ज्योतिषाने सुचविल्याप्रमाणे वापरावीत.

१) सूर्य – बेलाचे मूळ –
ह्या वृक्षाच्या मुळाला गुलाबी रंगाच्या दोऱ्यात (धाग्यात) बांधून रविवारी सकाळी धारण केल्याने सूर्य दोष शांत होतात.

२) चंद्र – खेराचे मूळ,अनंतबला किंवा महाबलाचे मूळ
पांढऱ्या धाग्यात सोमवारी सकाळी किंवा रात्री धारण केल्याने लाभ होतो.

३) मंगळ – अनंत मूळ – धुरीवेल – कुंधेर
ह्याच्या मुळाला लाल रंगाच्या धाग्यात बांधून मंगळवारी परिधान करावे.

४) बुध – त्रिधारा
ह्याचे मूळ दोऱ्यात बुधवारी सकाळी किंवा विजय मुहूर्तावर दुपारी बांधावे.

५) गुरू – केळ किंवा रिंगणी (श्वेत लक्ष्मण) मूळ
विधीपूर्वक पिवळ्या किंवा केशरी रंगाच्या दोऱ्यात बांधले असता ग्रहपीडा शांत होते.

६) शुक्र – उन्हाळी मूळ (शरपुंख)
पांढऱ्या दोऱ्यात विधीपूर्वक धारण केल्याने ग्रहदोष नेस्तनाबूत होतात.

७) शनि – शमी वृक्ष, निर्गुंडी किंवा रामबाण नावाच्या रोपट्याचे मूळ.
ह्याचे मूळ काळ्या दोऱ्यात शनिवारी संध्याकाळी ते स्वत: बांधावे. ग्रहांची शांती होते.

८) राहू – पांढरे चंदन मूळ
हिरव्या रंगाच्या दोऱ्यात बांधून धारण केल्याने राहू दोषातून मुक्तता मिळते.

९) केतू – अश्वगंधा मूळ
आकाशी रंगाच्या दोऱ्यात बांधून धारण केले असता ग्रहदोष दूर होतात.

नवग्रहांची पूजा करताना पूजेमध्ये कोणत्या रंगाचे फूल वापरावे?

	ग्रहाचे नाव	पूजेसाठी वापरावयाचे फूल
१)	सूर्य	लाल रंगाचे फूल
२)	चंद्र	पांढऱ्या रंगाचे फूल
३)	मंगळ	लाल रंगाचे फूल
४)	बुध	हिरव्या रंगाचे फूल
५)	गुरू	पिवळ्या रंगाचे फूल
६)	शुक्र	पांढऱ्या (सफेद) रंगाचे फूल
७)	शनि	लवंगाचे फूल
८)	राहू	लवंगाचे फूल
९)	केतू	हिरव्या रंगाचे फूल

बारा राशी कोणत्या वृक्षांच्या अधिपत्याखाली आहेत?

१.	मेष	विषारी कुंचला, आवळा, उंबर
२.	वृषभ	उंबर, जांभुळ, खैर
३.	मिथुन	खैर, कृष्णगुरू, बांबू
४.	कर्क	बांबू, नागकेशर, पिंपळ
५.	सिंह	पिंपळ, वड, पळस
६.	कन्या	पिंपळ, जुई, बेल
७.	तुला	बेल,अर्जुन, नागकेशर
८.	वृश्चिक	नागकेशर, सीमल, साल वा राळ
९.	धनु	राळ, बंजुल, वेतस, फणस
१०.	मकर	फणस, मंदार, शमी
११.	कुंभ	शमी, कदंब, आंबा
१२.	मीन	आंबा, कडुनिंब, महु

ज्या ग्रह आणि राशी वृक्षाची उपासना करायची आहे तो वृक्ष घर–ऑफिस–उद्योग–व्यवसायाच्या ठिकाणी, रस्त्यावर, गावामध्ये उद्यानात, बागेमध्ये, वेशीवर, अनुकूल असेल त्या ठिकाणी लावावा. वर्षाऋतुमध्ये कोणत्याही महिन्याच्या पंचमीपासून कृष्णपक्षाच्या त्रयोदशीपर्यंतच्या कोणत्याही तिथीत रवि, सोम, बुध, गुरू, शुक्रवारी, पूर्वा भाद्रपद, उत्तर फाल्गुन, विशाखा, रोहिणी किंवा नशतारा नक्षत्र असेल त्या दिवशी चांगल्या मुहूर्तावर किंवा चांगले ग्रह पाहून वृक्ष लावावा, खोडाची पूजा करावी व खालीलप्रमाणे प्रार्थना करावी.

ॐ नमस्तेमृत संभूते बलवीर्य विवर्धित्न ।
बलमाद्युश्यमे देहि पापनमां त्राहि दुरत: ।।
आयुर्बलं यशो वर्च: प्रजा पशुनवसुनि च ।
ब्रह्म प्रज्ञां च मेधां च त्वं नो देहि वनस्पते ।।
अत्रेव तिष्ठ कल्याणि, मामकार्यकरी भव ।
ममकार्ये कृते सिद्धि, तत: स्वर्ग गमिष्यसि ।।

हे अमृतोत्वन बल आणि शक्ती वृद्धींगत करणाऱ्या औषधी मला बळ, आयुष्य दे
हे वनस्पती तुम्ही मला शक्ती, कीर्ती, संपत्ती, तेजस्विता, धन–धान्य आणि बुद्धी द्या.
हे मंगलमयी तुम्ही येथेच निवास करा आणि माझ्या कार्यात मला सफल करा, माझे कार्यसिद्धी झाल्यावर स्वर्गात जा. दररोज पाणी द्या, मंत्र म्हणा आणि नमस्कार करा.

कोणत्या वृक्षापासून काय लाभ होतो आणि कोणते कार्य सिद्धीस जाते?

चंद्र खालीलप्रमाणे नक्षत्रात भ्रमण करत असेल, तसेच त्या दिवशी खाली दर्शवल्याप्रमाणे वार असेल तेव्हा दर्शवलेल्या मुळाचा उपयोग केल्याने, दर्शवलेले फळ मिळते, तसा शास्त्रात उल्लेख आहे.

१) चंद्र जेव्हा अश्विनी नक्षत्रात असतो आणि रविवार येत असेल, तेव्हा पळसाचे मूळ घ्यावे आणि आपल्या जवळ ठेवावे, त्यामुळे बुद्धी तीव्र होते आणि लेखन शक्तीसाठी स्फुरण येते.

२) चंद्र जेव्हा भरणी नक्षत्रात असेल आणि रविवार असेल तेव्हा डाळिंबीच्या [illegible] तिजोरीमध्ये किंवा पैशाच्या पेटीत ठेवल्याने धनवृद्धी होते.

३) चंद्र कृतिका नक्षत्र असेल आणि मंगळवार असेल तेव्हा वाझणी कंकोडी मूळ [illegible] घरात चारी दिशेला ठेवले तर घरामध्ये वंशवृद्धी होते.

४) चंद्राचे रोहिणी नक्षत्र आणि मंगळवार असेल तेव्हा चिंचमूळ लावून ताईत[illegible] ठेवल्याने भूत, प्रेत, बाधा वगैरे यांचा विनाश होतो. मानवाला कोणताही दोष त्रास देत नाही.

५) चंद्राचे जेव्हा मृगशीर्ष नक्षत्र असेल आणि शनिवार असेल तेव्हा बेहड्याचे मूळ जर हाताला बांधले तर आपल्या नोकरी, व्यवसाय इ. ठिकाणी सन्मान, प्रतिष्ठा वाढते आणि लोक आपल्याला वश होतात.

६) चंद्राचे आर्द्रा नक्षत्र असेल आणि रविवार किंवा मंगळवार असेल धोतऱ्याचे मूळ आणून ते उगाळून ज्या व्यक्तीला प्यायला देवू ती व्यक्ती आपणांस अनुकूल होते.

७) चंद्राचे पुनर्वसु नक्षत्र असेल आणि मंगळवार असेल तेव्हा शाल्मली साल उगाळून ते प्यायल्यास सत्ता प्राप्त होते. शरीर आणि प्रकृती सुधारते.

८) चंद्राचे पुष्य नक्षत्र असेल तर आणि मंगळवार असेल तर वडाचे मूळ उगाळून वांझ स्त्रीला पिऊ घातल्यास संतानप्राप्ती होते..

९) चंद्राचे आश्लेषा नक्षत्र असेल आणि रविवार असेल तर आंब्याचे मूळ आणून हाताला बांधल्यास लढाईच्या मैदानात विजय मिळतो.

१०) चंद्राचे मघा नक्षत्र असेल आणि रविवार असेल तेव्हा महुचे मूळ लावून शेतात गाडण्यात आले तर शेतात उंदरांपासून संरक्षण होते आणि तेथून उंदीर पळ काढतात.

११) चंद्राचे पूर्वा फाल्गुनी नक्षत्र असेल आणि मंगळवार असेल तेव्हा शमीचे मूळ आणून स्वत:जवळ ठेवल्यास स्वत:च्या पत्नीचे प्रेम वाढते.

१२) चंद्राचे उत्तर फाल्गुन नक्षत्र असेल आणि रविवार असेल तेव्हा शमीचे मूळ आणून स्वत:जवळ ठेवल्याने स्वत:चे कौतुक होते.

१३) चंद्राचे हस्त नक्षत्र असेल तेव्हा जर मंगळवार असेल तेव्हा शमीचे मूळ आणून ते जवळ ठेवल्याने वशीकरण होते.

१४) चंद्राचे चित्रा नक्षत्र असेल आणि रविवार येत असेल त्या दिवशी पळसाचे मूळ घ्यावे आणि एकाच घावात ते मूळ तोडावे. स्वत: कोठेही सावली पडणार नाही अशी काळजी घेत त्या मुळाला मांदीमाळ ताईत टाकून बांधले तर आपली धर्मानुसार असलेली इच्छा पूर्ण होते.

१५) चंद्राचे स्वाती नक्षत्र असेल आणि मंगळवार असेल तेव्हा कापसाचे मूळ आणून तोंडात ठेवले असता वक्तृत्वकला (बोलण्याची कला) विकसित होते.

१६) चंद्राचे विशाखा नक्षत्र असेल आणि मंगळवार असेल तर खजुराचे मूळ आणून घरात बांधल्यास वादविवाद किंवा भांडणात विजय मिळतो.

१७) चंद्राचे अनुराधा नक्षत्र असेल आणि मंगळवार असेल तर शंखवेलीचे मूळ घेऊन कानाला बांधल्यास डोळेदुखी बंद होते.

१८) चंद्राचे ज्येष्ठ नक्षत्र असेल आणि मंगळवार असेल तर शंखवेलीचे मूळ हाताला बांधल्याने सर्व इच्छा पूर्ण होतात.

१९) चंद्राचं मूळ नक्षत्र असेल तर आणि मंगळवार असेल तर खजूराचे मूळ हाताला बांधल्याने सर्व इच्छा पूर्ण होतात.

२०) चंद्राचे पूर्वाषाढा नक्षत्र असेल आणि रविवार असेल तेव्हा घ्रोनुं मूळ घेऊन सर्पदंश झालेल्याला उगाळून पिऊ घातले तर विष उतरते.

२१) चंद्राचे उत्तराषाढा नक्षत्र असेल आणि रविवार किंवा मंगळवार येत असेल तेव्हा अपराजिता गिरी कर्णिकेचे मूळ जवळ ठेवल्याने परस्परांमधील आकर्षण वाढते.

२२) चंद्राचे श्रवण नक्षत्र असेल आणि व रविवार किंवा मंगळवार येत असेल तेव्हा सफेद रिंगणीचे मूळ घ्यावे व ते वायव्य दिशेतील कोपऱ्यात ठेवावे. ते मूळ जवळ ठेवल्याने सर्व प्रकारच्या संपत्तीत वाढ होते.

२३) चंद्राचे घनिष्ठा नक्षत्र असेल आणि रविवार असल्यास तेव्हा दर्भ दाभड मूळ घ्यावे त्याला कुंकू लावावे. ते घरात पूजेला ठेवल्यास धन–धान्य वृद्धींगत होते.

२४) चंद्राचे शतभीषा नक्षत्र असेल व रविवार येत असेल तर शंखावलीचे मूळ घ्यावे ते दूधात उगाळून प्यायल्याने संतती होते. वंध्य स्त्रीला प्यायला दिल्यांस सुंदर बालकाची माता होते.

२५) चंद्राचे पूर्वाभाद्रपद नक्षत्र असेल आणी रविवार येत असेल तर सफेद चणोथीचे मूळ घ्यावे व ते जवळ ठेवल्याने नजरदोष आणि प्रेमदोष नष्ट होतात.

२६) चंद्राचे उत्तरा भाद्रपद नक्षत्र असेल आणि रविवार असेल तेव्हा राजहंसाचे मूळ घेऊन हाताला बांधावे त्यामुळे वीर्यवृद्धी होते आणि स्त्रीला बांधल्याने रजोदर्शन शुद्धता होऊन गर्भधारणा होते.

२७) चंद्राचे रेवती नक्षत्र असेल,रविवार असेल तेव्हा राजहंसाचे मूळ घेऊन वंध्य स्त्रीला प्यावयास द्यावे. ती सुंदर बालकाची आई होते.

परिशिष्ट ६ – लक्ष्मी कायम रहावी म्हणून विशेष वृक्ष

लक्ष्मीचा अक्षय्य निवास असलेला वृक्ष अर्थात शिवण

श्रीपर्णी

श्रीपर्णीचे संस्कृत नाम श्रीपर्णानि. गुजरातीत सेवन, हिन्दीमध्ये खुमर तसेच गांभारी, कन्नडमध्ये शिवन्नी, मल्याळममध्ये डुमल, लॅटीनमध्ये मीलाईना आर्कोरिया, तामिळनाडूमध्ये पेरुगुलिम, तेलंगण्यामध्ये शल्ला गुबुडीमेरु, मध्यप्रदेशामध्ये शिवन, मराठीमध्ये शिवण असे म्हणतात. याचे बोटॅनिकल नाव IrnUu Gmelina avcorea हे आहे.

गुजरात राज्यामध्ये पूर्व सरहद्दीमध्ये अबुपासून सुरू होऊन थेट डांगसारख्या उंच प्रदेशात श्रीपर्णी वृक्ष दिसतात. या वृक्षाची फळं एप्रिल, मे, जूनमध्ये पिकून खाली पडतात. त्याच्या बिया पक्ष्यांच्या घरटी अथवा वृक्षांखाली मिळतात. बी पावसाळ्यात पाण्याद्वारे नदीत आणि विविध प्रदेशात जातात आणि अनुकूल वातावरणामुळे तेथे उगवतात. भारतामध्ये हा वृक्ष विविध ठिकाणी उगवतो, म्हणून भारत देशाला समृद्ध म्हटले जाते. कारण ज्या ठिकाणी या वृक्षाची मोठी लागवड असेल त्याचा सर्वांगीण विकास होतो.

श्रीपर्णीचा विकास इतर वृक्षांपेक्षा झपाट्याने होतो. त्याची पाने इतर वृक्षांच्या पानांपेक्षा मोठी असतात. याची पाने गळली, की लागलीच नवीन पाने येतात. हा वृक्ष ४० ते ८०फुटांपर्यत उंच वाढलेला पहावयास मिळतो. श्रीपर्णी वृक्षाच्या दोन जाती आहेत, नर वृक्ष आणि मादी वृक्ष. नर झाडाच्या खोडांची साल लालसर पिवळसर पांढरी असते. मादी जातीच्या झाडांमध्ये सालांवर काळ्या डागाचे ठिपके असतात. नराची पाने मादीपेक्षा मोठी असतात आणि नर वृक्षाचा डिंक मादी वृक्षापेक्षा दाट असतो. मादी वृक्षाच्या पानावर दोन आणि नर वृक्षाच्या पानावर तीन चार खाचा असतात. मादीवृक्षाला फळे लागतात. हे वृक्ष सागकुळाचे असून मजबूत आणि टिकाऊ आहे तसेच त्याच्या पांढऱ्या रंगाचे उत्तम फर्निचर बनते. ते पवित्र मानले जाते आणि होमहवन, पूजाअर्चेमध्ये वापरले जाते.

श्री म्हणजे लक्ष्मी आणि पर्णी म्हणजे पान. ज्याच्या अंगप्रत्यंगामध्ये लक्ष्मीचा वास आहे ना वृक्ष ज्याच्या मालकीचा असेल त्याची आर्थिक स्थिती सुधारल्याशिवाय रहात नाही. या वृक्षाचे लहान रोपटे असताना पाने करवतीच्या पात्यासारखी किंवा खंडीत किनारीसारखी असतात. हा वृक्ष वाढत गेल्यावर पानाच्या धारेची किनार अखंडित होते. पिंपळाच्या पानांपेक्षा मोठी असतात. जानेवारी महिन्याच्या आसपास या वृक्षाची फुले पिवळ्या सुवर्णरंगाची अत्यंत मनोहरी असतात. ही फुले सुरूवातीला हिरवी असतात. फळे जांभळ्या रंगाची असतात. ही फुले एप्रिलपर्यंत पिकून त्याचे, जांभळासारख्या फळामध्ये रूपांतर होते. त्यामुळे त्याचा मनमुराद आस्वाद घेतात.

बियांमधील गर शंखासारखा आणि जांभळाच्या बीसारखा मोठा असतो. [illegible] जवळजवळ एकच प्रकारचे वृक्ष आहेत. पिंपळाचे खोड पांढरे आणि श्रीपर्णीचे [illegible] डाग असलेले असते. पिंपळाची वाढ डहाळीतून डहाळी अशी फुटत असते. श्री[illegible] मुळापासून होतो.

श्रीपर्णी म्हणजे लक्ष्मीचा वास असलेला वृक्ष आहे. पिंपळ विष्णु स्वरुपात आहे [illegible] विष्णुचा वास आहे आणि मोक्ष मिळविण्यासाठी भूतप्रेतबाधित जीव त्याभोवती फिरत असतात. आपल्याकडे अशी म्हण आहे की भुताचे स्थान पिंपळामध्ये असते. भूतप्रेत हे अपवित्र मानले गेले आहेत. अपवित्रता असेल तेथे लक्ष्मी रहात नाही. लक्ष्मीला पवित्रता आवडते. पिंपळाच्या उपासनेतून आध्यात्मिक उन्नती (प्रगती) होईल पण आर्थिक अडचणी दूर होणार नाहीत. श्रीपर्णी हे लक्ष्मीचे झाड आहे. तिला पवित्रता आवडते आणि तिचा पती विष्णु आहे. ह्या झाडापासून भूतप्रेत दूर रहात असल्यामुळे तेथे पवित्र वातावरणाची निर्मिती होते आणि त्यामुळे माणसाची आर्थिक प्रगती होते. आर्थिक उन्नती साधावयाची असल्यास आपल्या घरासमोर तसे शक्य नसेल तर मुख्य प्रवेशद्वाराच्या डाव्या हाताला नरवृक्ष व उजव्या हाताला मादीवृक्ष लावावा. या वृक्षाची फळे आणि बी या घरावर पडतील अशा रितीने झाड लावावे. त्यामुळे जणू लक्ष्मी नारायण आपल्या घरासमोर बसून आपल्याला आशिर्वाद देत आहेत असा भाव उत्पन्न होईल.

श्रीपर्णी वृक्ष फर्निचरच्या लाकडासाठी प्रसिद्ध आहे. लहान झाड पोकळ असल्यामुळे पाहिजे तसा आकार मिळत नाही, मात्र झाड दोन तीन वर्षांचे झाले की पोकळ रहात नाही. या वृक्षाला श्रद्धापूर्वक मंत्रोच्चार करून पाणी दिले तर अडचणी निघून जातील आणि आपल्या घरामध्ये कायम लक्ष्मीचा वास राहील असे शास्त्र सांगते.

लागवडीसाठी योग्य त्या श्रीपर्णी वृक्षाची निवड कशी करावी :

लागवडीसाठी जो वृक्ष मंदिराजवळ, नदीकिनारी, जंगलामध्ये, स्वच्छ जागी, विहिरी किनाऱ्याहून पवित्र जागेवर आणलेले आहे आणि त्या वृक्षाचे किमान वय बारा वर्षापेक्षा अधिक आहे, तेथून हा वृक्ष आणावा. मात्र संडास किंवा मुतारी उकीरडा यासारख्या अपवित्र जागेवरुन झाड घेऊ नये. ते अनुचित मानले जाते. श्रीपर्णी वृक्षाची प्राणप्रतिष्ठापणा करताना सिद्धीदायक नक्षत्रवार आणि तिथी यांच्या शुभ मुहूर्तावर जमिनीमध्ये खड्डा खणावा. त्यामध्ये कुंकू मिश्रितपाणी शिंपडून अक्षता, फूल, नाणे, सुपारी ठेऊन रोपाची लागवड करावी. तसेच श्रीपर्णीचे झाडाचा उपयोग करण्यासाठी ते कापावयाचे असल्यास वरीलप्रमाणे शुभवेळी गायीच्या दुधातील तुपाचा दिवा, अगरबत्ती, स्वच्छ पाणी, कुंकू, लाल फूल, तांदूळ घेऊन वृक्षासमोर जाऊन पूर्वाभिमुख बसावे. झाडाच्या थोड्या भागाला स्वच्छ पाण्याने धुऊन निरांजन आणि उदबत्ती लावावी. झाडाला सात प्रदक्षिणा घालाव्यात. त्यानंतर नैवेद्य दाखवून 'वेतालास्य, पिशाचास्य, राक्षसाच्य, शरीरपाण अधशर्पन्तु ते सर्व वृक्षस्मात् शिवाज्ञाया' हा मंत्राने अभिमंत्रित केल्यावर 'नमस्ते अमृते सर्भूते बालवीर्य विवर्धीनी बलमायुष्ये देही पापान्नो चाही दूरतह ' असा मंत्र म्हणून नमस्कार करावा. कापण्यापूर्वी भगवान विष्णु आणि वृक्षाला नमन करून म्हणावे, माझे तसेच माझ्या संबंधित व्यक्तिंच्या सकल मनोकामना सिद्धीसाठी लक्ष्मीवान, धनवान बनण्यासाठी आपल्याला उद्या घ्यावयांस येईन. आपण आमच्या निमंत्रणाचा स्वीकार करावा.' दुसऱ्या दिवशी वरील सांगितलेल्या वेळी पूजाअर्चा करण्याचे

परिशिष्ट ८ – नक्षत्राची शुभ रत्ने, शुभ रंग, शुभ अंक, नक्षत्रवृक्ष, क्षेमकर वृक्ष आणि धार्योषधी

क्र.	नक्षत्र	शुभरत्न	शुभ रंग	शुभ अंक	नक्षत्रवृक्ष	क्षेमकरवृक्ष	धार्योषधी
१	अश्विनी	पोवळे, वेडूर्य, लसण्या	पांढरा तांबूस	१,७,८	कुचला	जांभूळ	आघाडा
२	भरणी	हिरा, नीलम	पांढरा, निळा	२,६	आवळा	खैर	हदगा
३	कृतिका	माणिक, पोवळे	लाल, पांढरा, पिवळा	१,३	औदुंबर	आगरू, चंदन, बेहडा	कापूस
४	रोहिणी	मोती, हिरा,	पांढरा, मोतिया	२,६	जांभूळ	वेळू	आघाडा
५	मृग	मोती, पाचू	पांढरा, मोतिया, हिरवा	५,६	खैर	पिंपळ	शेवरी
६	आर्द्रा	गोमेद, पाचू	तपकीरी, हिरवा	६,८	कृष्णागरू	नागचाफा	पिंपळ
७	पुनर्वसू	पुष्कराज, पाचू	पिवळा, हिरवा, पांढरा	३,७	बांबू	वड	रूई
८	पुष्य	पुष्कराज, मोती	पिवळा, सोनेरी, पांढरा, मोतिया	४,८	पिंपळ	पळस	कापूर
९	आश्लेषा	पाचू, मोती,	हिरवा, मोतिया, पांढरा	२,९	नागचाफा	पायरी आंबा	कडू पडवळ
१०	मघा	माणिक, लसण्या	लाल, सोनेरी	१,८	वड	जाई	माका
११	पूर्वा	हिरा	पांढरा	६	पळस	बेल	रिंगणी
१२	उत्तरा	माणिक, पाचू	लाल, हिरवा	१,३	पायरी आंबा	अर्जुन	कडू पडवळ
१३	हस्त	मोती, पाचू	पांढरा, मोतिया, हिरवा	२,५	जाई	प्राजक्त	जुई, चमेली
१४	चित्रा	हिरा, पाचू	पांढरा, हिरवा	६,९	बेल	बकुळ	गेळफळ
१५	स्वाती	हिरा, नीलम	पांढरा, निळा	६,८	अर्जुन	सावरी	चमेली, जुई
१६	विशाखा	पुष्कराज	पिवळा, सोनेरी	३,६	प्राजक्त	राळ	गुंजा
१७	अनुराधा	पोवळे, हिरा	लाल, निळा, पांढरा	८,९	बकुळ	वेत	रूई
१८	ज्येष्ठा	पोवळे, पाचू	लाल, हिरवा	९	सावरी	फणस	आघाडा
१९	मूळ	पुष्कराज, माणिक	लाल, पिवळा	३,९	राळ	रूई	रूई

२०	पूर्वाषाढा	पुष्कराज, हिरा	पिवळा, पांढरा	३,६	वेत	शमी	कापूस
२१	उत्तराषाढा	माणिक, पुष्कराज	लाल, पिवळा	१,३	फणस	कळंब	कापूस
२२	श्रवण	मोती, निलम	पांढरा, मोतिया, निळा	२,८	रूई	आंबा	आघाडा
२३	धनिष्ठा	पोवळे, निलम	लाल, निळा	९	शमी	कडुलिंब	माका
२४	शततारका	गोमेद, निलम	निळा, जांभळा, काळा, मळकट पिवळा	८,६	कळंब	मोह	कमळ
२५	पूर्वा-भाद्रपदा	पुष्कराज, निलम	पिवळा, निळा	३,८	आंबा	कुचला	माका
२६	उत्तरा-भाद्रपदा	पुष्कराज, निलम	निळा, पिवळा, जांभळा, काळा	३,८	कडुलिंब	आवळा	पिंपळ
२७	रेवती	पुष्कराज, हिरा	पिवळा, पांढरा	५,६	मोह	औदुंबर	पिंपळ

नक्षत्रवन कोठे पहाल?

संपूर्ण देशामध्ये विविध ठिकाणी नक्षत्रवनांची उभारणी केली गेली आहे. विविध संस्था, सरकारचे वनखाते, देवस्थाने इ. ठिकाणी नक्षत्रवन पहायला मिळते. रांची येथे झारखंड राज्याच्या वनखात्याने एक अतिशय उत्तम असे नक्षत्रवन तयार केले आहे. याच बरोबर मुंबई, नागपूर, पिंपरी-चिंचवड इ. महानगर पालिकांनीही नक्षत्रवनाची निर्मिती केली आहे. बारामती येथे विद्या प्रतिष्ठानने एक नक्षत्रवन साकारलेले आहे.

रायगड जिल्ह्यात श्रीवर्धन तालुक्यात श्रीवर्धन म्हसळा रस्त्यावर वडघर पांगळोली या गावामध्ये श्री. दीपक जोशी उर्फ जोशीकाका यांनी देशातील पहिल्या शास्त्रोक्त नक्षत्रवनाची निर्मिती केली आहे. एकूण २५ एकराच्या या परिसरामध्ये भृगुसंहिता, वागभट इ. प्राचीन ग्रंथातील विधीनुसार त्यांनी प्रत्येक नक्षत्रवृक्ष संस्कारीत करून लावला आहे. या नक्षत्रवृक्षांची उंची ४० ते ५० फुटाहूनही अधिक आहे. याचबरोबर जोशीकाकांनी याच ठिकाणी देशात पहिले 'बोधीवन', 'चैत्यबन', 'शांतीवन' आणि 'गणेशपत्रीवन' (२१ गणेशपत्रींप्रमाणे) या ठिकाणी उभी केलेली आहेत.

वृक्ष महिमा श्लोक (विविध पुराणांमधून)

यः पुमान रोपयेद वृक्षान छाया पुष्पफलोपगान । सर्वसत्वोभोग्याय सयाति परमां गतिम ।।१।।	जो माणूस सर्व प्राण्यांच्या उपयोगासाठी सावली,फूल आणि फळ असलेले वृक्ष लावेल, त्याला परम गती प्राप्त होईल.
छायापुष्पोगात्रिशत फलपुष्पद्रुमात्रस्तथा । रोपमित्वा सशाखात्रस्तुव नरो न नरकत्र ब्रजेत ।।२।।	सावली देणारे, फूल असलेले तसेच फळ देणारे आणि अनेक शाखा असलेले असे तीस वृक्ष जो माणूस लावतो, तो नरकामध्ये जाणार नाही.
देव दानवग-धर्वाः किन्नरनागगुहमळाः । पशुपक्षीय मनुष्याश्च संश्रयन्ति सदा द्रुमान ।।३।।	देव, दानव, गंधर्व, किन्नर, नाग, यक्ष तसेच पशु, पक्षी आणि मनुष्य हे सर्वजण कायम वृक्षाचा आसरा घेतात.
पुष्पैः सदुगणाः सर्वे फलैश्चं पितरः सदा । छायया ये मनुष्यास्तु पशुपक्षिमृगास्तथा ।।४।।	फुलांमुळे सर्व देव, फळांमुळे सर्व पितर आणि सावलीमुळे सर्व मानव, पशु, पक्षी वगैरे प्राणीमात्र संतुष्ट होतात.
पुष्पोपगन्धांश्च फलोपगन्धाय यः पादपान रोपयते मनुष्यः। समृद्धेशे वरमेश्ववेधां लभेदधिष्ठानवरं स विप्रः ।।५।।	फूल आणि फळांनी सुगंधित वृक्ष जो मनुष्य लावेल तो ज्ञानी पुरुष समृद्ध नगरात उत्तम गृहात निवास करेल आणि त्याला मनोवांच्छित वरदान मिळेल.
तस्मात सुब्रहवो वृक्षा रोपयाः श्रेयोडयिवात्रच्छमा। पुत्रवत परिपाल्याश्च ते पुत्राः धर्मतः स्मृताः ।।६।।	ह्यासाठी स्वतःचे श्रेयस इच्छिणाऱ्या माणसांनी पुष्कळ वृक्ष लावावेत. तसेच त्यांचे पुत्रासारखे पालन करावे, कारण वृक्षाला धर्माप्रमाणे पुत्र समजले जाते.
किं धर्माविमुखैः पुत्रैः केवलं स्वार्थहेतुभिः । तरुपुत्रा वरं ये तु परार्थेकानुवृत्तयः ।।७।।	धर्मविहीन कृत्ये आणि फक्त स्वार्थामध्ये मग्न असणाऱ्या पुत्राकडून काय मिळणार? त्यापेक्षा वृक्षरूपी पुत्र पुष्कळ चांगला आहे. तो एकमात्र परमार्थ वृत्तीचे पालन करतो.

पत्रपुष्पफलच्छाया मूलवलकलदारुभिः ।
परेणाम उपकुर्वन्ति तारयन्ति पितांमहान ।।८।।
छेत्तारय अपि संप्रापतं छायापुष्पफलादिभिः ।
पूजयन्तेठ तरवो मुनिवत द्वेषवर्जिता ।।९।।

वृक्ष (पान) पत्र, पुष्प, फळ, सावली आणि लाकूड देऊन दुसऱ्याला उपकारक ठरतात आणि पितरांना तारतात कोणी कापण्यास आल्यावरही वृक्ष सावली,पुष्प आणि फळे वगैरेंनी स्वागतच करतात. वृक्ष हे मुनींप्रमाणे द्वेष रहीत असतात.

तारयन्ति च ये सम्यक सर्वस्थातिथ्य दायका ।
तस्मात ते पुत्रवत स्थाप्या विधिवत ड्भिजपुड:गवैः ।।१०।।

सर्वांचे आतिथ्य सत्कार करणारे वृक्ष खऱ्या अर्थाने सर्वांचे तारणहार आहेत. म्हणून त्यांची विधिपूर्वक पुत्रवत सर्वांनी स्थापना करावी.

छायाविश्रामपथिकैः पक्षीणां निलयेन च ।
पत्रमूलत्वगादीश्च औषधार्य तु देहिनाम
उपकुर्वान्ति वृक्षस्य पत्र्चयज्ञः स उच्यते ।।११।।

पथिकांना सावली–विश्राम, पक्ष्यांना घरटी, पान, मूळ आणि सालांद्वारे शरीरधारणांना औषध देऊन वृक्ष उपकार करतात. वृक्षांचा हा पंचयज्ञ म्हटला जातो.

तस्मान्न च्छेदयेत वृक्षान सपुष्पफलवान कदा ।
मदीच्छेत फुलवृद्धिश्च धनवृद्धी च शाश्वतीम ।।१२।।

जर वंश (कुल) वृद्धी तसेच धनाची वृद्धी कायम रहावी अशी इच्छा असेल तर फळफूल असलेले वृक्ष कधीही कापू नका.

नगरोपवने वृक्षान प्रमादद्धिच्छीनति यः ।
स गच्छेन्नरकं नाम जृम्भणं रौद्रदर्शनम् ।।१३।।

जो कोणी माणूस प्रमादाने नगरातील किंवा उपवनातील वृक्षतोड करेल तो जृम्भण नावाच्या भयंकर नरकात जाईल.

यथा सुपुत्रः कुलमुद्धरेह हि
यथातिकृच्छ्रनियमप्रयत्नात ।
तथात्र वृक्षाः फलपुष्ययुक्ताः स्वं स्वामिनं
नरकाह उद्धरन्ति ।।१४।।

ज्या रितीने सर्व कर्तव्य पार पाडत आणि नियमांचे पालन करत सुपुत्र कुळाचा उद्धार करतो, त्याप्रमाणे जगात फळ, फूल असलेले वृक्ष स्वतःच्या मालकाला नरकातून तारतात.

वसुधेति सुशीतेति पुष्पदेति धरेति च ।
नमस्ते सुभगे नित्यं प्रमोडयं वर्धतामिती ।।१५।।

तू द्रव्य देणारी आहेस. अति शीतल आहेस. पुण्य देणारी आहेस आणि सर्वांना सामावणारी आहेस. हे सुभग पृथ्वी तुला नमस्कार. तू वृक्षांची कायमपणे वृद्धी कर.

नक्षत्रे ही मनुष्यजीवनावर आपला प्रभाव पाडत असतात.
जसे रत्नांमध्ये या नक्षत्रांना आकर्षित करण्याची शक्ती असते.
तशीच वृक्षांमध्येही असते. शेवटी वृक्ष काय किंवा रत्ने काय,
एकाच भूमीच्या उदरातून बाहेर पडतात. जी खनिजे रत्नामध्ये
तीच वृक्षामध्येही तर ही जन्मनक्षत्र वृक्ष कोणती?
तिचा उपयोग आपल्या निखळ आनंदी जीवनासाठी कसा करून घेता येईल?
आणि पर्यायानं आजच्या भयग्रस्त अशा पर्यावरण विनाशापासून
सृष्टीला कसं वाचवता येईल?
जाणून घेऊया मानवाच्या त्या निसर्ग उपासनेचा शोध,
म्हणजेच 'नक्षत्रवृक्षाची हाक'त्या हाकेला साद घालुया
मानवी जीवन आणि सृष्टी सुंदर, संतुलित बनवूया.

ISBN
978-93-5196-146-8
Nakshatravruksh
Rs. 400

Anubandh Prakashan
202, Balaji Complex, Balaji Nagar
Dhankawdi Pune - 43.
Contact : 9373718666